टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

# शिवराम महादेव परांजपे यांच्या जीवन कार्याचा चिकित्सक अभ्यास (१८६४–१९२९)

तात्विक व सामाजिक शास्त्र विद्याशाखांतर्गत
'इतिहास' विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी)
पदवीसाठी सादर केलेला शोधप्रबंध

**– संशोधक –**
सौ. श्रेया संजीव दाणी
(**PRN No. 02114007282**)

**– मार्गदर्शक –**
डॉ. रघुनाथ धोंडिबा शेळके

ऑक्टोबर २०१८

# CERTIFICATE

This is to certify that the thesis entitled 'शिवराम महादेव परांजपे यांच्या जीवन कार्याचा चिकित्सक अभ्यास' (१८६४–१९२९) which is being submitted herewith for the award of the Degree of Vidyavachaspati (Ph.D.) in **History Department** of Tilak Maharashtra Vidyapeeth, Pune is the result of original research work completed by **MRS. SHREYA SANJEEV DANI** under my supervision and guidance. To the best of my knowledge and belief the work incorporated in the thesis has not formed the basis for the award of any degree or similar title of this or any other University or examining body upon her.

Signature of the Research Guide

Place :

Date :

# ऋणनिर्देश

पीएच.डी. संशोधनासाठी अनेक व्यक्तींचे मनःपूर्वक सहाय्य झाले. टिळक महाराष्ट्र विद्यापीठामध्ये पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला. सर्वप्रथम पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी माझे मार्गदर्शक डॉ. रघुनाथ शेळके यांचे मनःपूर्वक ऋण व्यक्त करते. त्यांनी माझ्यासाठी अमूल्य वेळ खर्च केला. प्रत्येक वेळी मार्गदर्शन करताना महत्त्वपूर्ण गोष्टींची माहिती दिली. संशोधनासाठी आवश्यक असणारे काळाच्या निवडक निबंधांची जुनी दुर्मिळ पुस्तके मला दिली. वेळोवेळी प्रोत्साहन देऊन उत्तम मार्गदर्शन केले. सरांच्या अभ्यासू वृत्ती व शिस्तीमुळेच माझे संशोधन कार्य वेळेत पूर्ण होत आहे.

माझ्या संशोधनकार्यात अनेकांचे सहकार्य झाले. पैकी टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या इतिहासविभाग प्रमुख डॉ. नलिनी वाघमारे यांनीही वारंवार प्रोत्साहन दिले. त्यांचेही मी आभार मानते.

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ग्रंथालयाची माझ्या संशोधन कार्यास खूप मदत झाली. तेथील ग्रंथपाल श्रीमती जयश्री बागाइतकर बाईंनी मला 'काळा'चे मूळ अंक, 'केसरी'चे मूळ अंक, 'काळा'चे निवडक निबंध, 'स्वराज्य' पत्राचे अंक, 'चित्रमय जगत', 'लोकशिक्षण' इ. मासिके उपलब्ध करून दिली. माझ्या संशोधन कार्यास मोठा हातभार लावला. म्हणून त्यांचेही खूप खूप आभार मानते.

माझ्या महाविद्यालयातील अनेक व्यक्तींचे प्रोत्साहन मला मिळाले. राजमाता जिजाऊ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व भोसरीचे माजी आमदार मा. श्री. विलासराव लांडे पाटील संस्थेचे सर्व संचालक मंडळ, उपप्राचार्य डॉ. अशोक पाटील, उपप्राचार्य प्रा. किरण चौधरी. माझे सर्व सहकारी प्राध्यापक वर्ग, कार्यालयीन सहकाऱ्यांचेही मी मनःपूर्वक आभार मानते.

प्रा. सौ. शिल्पा कुलकर्णी यांनी केलेली मदत अवर्णनीय आहे. संशोधनाची आवड आणि लवकर संशोधनकार्य पूर्ण करण्याचे प्रोत्साहन त्यांच्यामुळेच मला मिळाले. त्यांच्या ऋणातच राहणे मला जास्त आवडेल.

माझ्या कुटुंबाच्या सहकार्याशिवाय संशोधन कार्य शक्यच नव्हते. माझे सासरे कै. वसंत गणेश दाणी व सासूबाई कै. सौ. सविता वसंत दाणी यांची प्रेरणा होती. तसेच माझे वडील श्री. पांडुरंग श्रीनिवास काळगी व माझी आई सौ. प्रमिला पांडुरंग काळगी यांचे सतत प्रोत्साहन मिळत होते. माझे पती श्री. संजीव वसंत दाणी व माझी कन्या चि. सई संजीव दाणी यांच्या सहकार्य व पाठिंब्यामुळेच हे संशोधनकार्य मला पूर्ण करता आले.

पीएच.डी. पदवीकरिता तयार केलेला शोधप्रबंध सौ. वैशाली कदम, पुणे यांनी अथक परिश्रम करून योग्य वेळेत टंकलिखित करून दिला. त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानते.

माझ्या संशोधन कार्यास ज्या ज्ञात–अज्ञात व्यक्तींचे मला सहकार्य लाभले, त्यांचे पुनःश्च आभार व्यक्त करते.

(सौ. श्रेया संजीव दाणी)

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | प्रकरणाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | १–२७ |
| २. | राजकीय कार्य | २८–४७ |
| ३. | सामाजिक कार्य | ४८–७३ |
| ४. | वृत्तपत्रीय कार्य | ७४–१०० |
| ५. | लेखन कार्य | १०१–२१२ |
| ६. | धार्मिक कार्य | २१३–२३२ |
| ७. | निष्कर्ष | २३३–२३९ |
| | परिशिष्ठ | २४०–२४५ |
| | संदर्भ सूची | २४६–२५१ |

# प्रकरण – १

## प्रस्तावना

भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आपल्या उत्तम वक्तृत्त्वाने आणि 'काळ' पत्रातील जहाल लेखांनी इतिहासात सुवर्णाक्षरांनी नोंद करून ठेवावे, असे कार्य शिवराम महादेव परांजपे यांनी केले आहे. त्यांची अनेक चरित्रे मराठी, इंग्रजी भाषेमध्ये प्रकाशित झाली आहेत. शिवराम महादेव परांजपे यांचा जन्म २७ जून १८६४ रोजी महाड येथे झाला. त्यांच्या राजकीय, सामाजिक, धार्मिक, वृत्तपत्रीय व लेखनकार्य व विविध चळवळींचा अभ्यास सदर संशोधनात केला आहे.

शाळा, महाविद्यालयापासूनच लोकमान्य टिळक, शि.म.परांजपे यांना शिक्षक, प्रोफेसर, गुरू म्हणून लाभले. लोकमान्य टिळकांच्या जहालवादी विचारांचा प्रभाव शिवरामपंतांवर होता. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या गणपती उत्सव व शिवजयंती उत्सवामधून पंतांनी विविध व्याख्याने देऊन स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली. प्रभावी वक्ते, प्रतिभावंत, लेखक, साहसी विचारवंत, कुशल संघटक, मनमिळाऊ स्वभावाचे सदानंदी नेते म्हणून शिवराम महादेव परांजपे यांनी मोठा नावलौकिक मिळविला.

वडिलांच्या मृत्युनंतर कुटुंब पोषणाचा व स्वतःच्या शिक्षणपूर्तीचा भार त्यांच्यावर पडला. पुढे डेक्कन कॉलेजमधून त्यांनी एम्.ए.ची पदवी संपादन केली. महाराष्ट्र कॉलेजमध्ये प्रोफेसर पदावर त्यांची नियुक्ती झाली. परंतु त्यांच्या स्वातंत्र्य लढ्यातील उत्स्फुर्त सहभागामुळे शिवरामपंतांना आपल्या प्रोफेसर पदाचा राजीनामा द्यावा लागला.

राजकीय पुराणांच्या माध्यमांतून विविध मंदिरांमधून परांजपे यांनी बैठी व्याख्याने द्यायला सुरुवात केली. रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, दासबोध या विविध ग्रंथांतील दाखले देऊन ब्रिटिश सत्तेवर टीका करण्याचे काम शि.म. परांजपे यांनी केले.

शुक्रवार दि. २० मार्च १८९८ ते १९०८ पर्यंत 'काळ' हे साप्ताहिक संपादक–संचालकाचे दायित्व पत्करून यशस्वीरित्या चालविले. 'चाफेकर व रानडे', 'लोकमान्य व राजमान्य', 'दिल्लीचे तख्त आणि भाऊसाहेबांचा घण', 'एका खडी फोडणाऱ्याची गोष्ट',

‘विषासाठी कंठशोष’, ‘हृदयाविष्करण’, असे एकापेक्षा एक विविध अग्रलेख लिहून जहालवादी विचार तरुणांमध्ये रुजविण्याचे व ब्रिटिश सत्तेवर घणाघाती प्रहार करण्याचे मोठे कार्य केले. वि. दा. सावरकर सुध्दा इंग्लंडमधून ‘लंडनची बातमीपत्रे’ काळ पत्रासाठी पाठवित असत.

पुढे १९२० ते १९२७ या काळात पंतांनी ‘स्वराज्य’ नावाचे दुसरे साप्ताहिक काढले. महात्मा गांधींच्या विविध चळवळींची वार्तांकने स्वराज्य पत्रातून लिहिली. काळातील जहालवादी विचार स्वराज्य पत्रात दिसत नाही. परंतु ‘‘महात्मा गांधी तुम्ही चुकलात!’’ हा लेख स्वराज्य पत्रात लिहून म. गांधींवर टीका करण्यासाठी शि.मं.नी मागेपुढे पाहिले नाही.

लोकमान्य टिळकांच्या जहालवादाच्या काळात व महात्मा गांधींच्या असहकार चळवळीच्या काळात शिवरामपंतांनी मनापासून भाग घेतला. ज्यापासून स्वातंत्र्य मिळेल, अशा चळवळीत सहभागी होण्याचा त्यांचा स्वभाव होता. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी दोघांचेही सर्वच्या सर्व विचार पंतांना पटत होते असे नाही. त्यांनी आपले स्वतंत्र विचार लेखनांतून, वक्तृत्त्वातून मांडलेले होते.

शि.म.परांजपे यांनी काव्ये, नाटके, कादंबरी, साहित्यसंग्रह, स्फुटलेखन, ऐतिहासिक लेखन असे उत्तमोत्तम लेखन केलेले दिसते. त्यामुळेच १९२९ ला बेळगाव येथे झालेल्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती. अध्यक्षीय भाषणांतून त्यांनी मराठी भाषेचे महत्त्व स्पष्ट केले होते.

२७ डिसेंबर १९२९ रोजी परांजपे यांचे मधुमेह या आजाराने निधन झाले. त्या अगोदर दोन–तीन दिवस अगोदर म्हणजे २४ सप्टेंबरला त्यांनी ‘संगीत मीराबाई’ या नाटकातील काही भाग लिहिला होता.

स्वातंत्र्य चळवळीत अनेक नेत्यांचे योगदान आहे. त्यामध्ये शिवराम महादेव परांजपे यांचे कार्य खूपच महत्त्वाचे आहे. सदर संशोधनात शिवराम महादेव परांजपे यांच्या कार्याचा आढावा घेतला आहे.

## कौटुंबिक पार्श्वभूमी –

परांजपे यांची वस्ती फार प्राचीन काळी मौजे गांवखडी येथे असून त्या गांवखडी गावांत पूर्वी असलेला लक्ष्मीनारायण हा त्यांचा कुलस्वामी होता. पुढे या घराण्याची वस्ती अडिवरे, वाडा, कोणसर येथे झाली. त्यानंतर वाडा, मौजे अडिवरे येथील श्रीलक्ष्मी नारायणाची स्थापना शके १५३३ साली झाली. यामुळे तोच आपला कुलस्वामी झाला असे परांजपे त्यावेळेपासून मानू लागले असावे.

शिवरामपंत परांजपे यांचे कुलवृत्तांतानुसार घराणे ३६वे आहे. गावे ६ असून देवाचे गोठणे, शिवने, अडिवरे, पुणे, महाड व टेंभुर्णी ही आहेत. बल्लाळ, गणेश ऊर्फ बाळ बल्लाळ, शिवराम गणेश, सदाशिव शिवराम, शिवराम सदाशिव व महादेव शिवराम, शिवराम महादेव, कृष्णाजी शिवराम, वामन कृष्ण अशी परांजपे घराण्यातील पुरुषांची नावे आहेत. परांजपे घराण्यांपैकी बरीचशी घराणी मूळची अडिवऱ्याची आहेत व या संबंधीचे उल्लेखही ठिकठिकाणी सापडतात.[१,२]

वंशावळीतील पिढ्यांची संख्या आणि कागदपत्रांतील स्पष्ट उल्लेख लक्षात घेतले असता, परांजपे आडनावांचे ब्राह्मण तीन–चारशे वर्षापूर्वीपासून आजतागायत रत्नागिरी जिल्ह्यातील अडिवरे, गोवळ, पांवस, नेवरे वगैरे गावांतून राहत आले आहेत. त्याचप्रमाणे येथील माहितीच्या आधारे परांजपे हे आडनाव 'पारायण जपे' या शब्दावरून व्युत्पादिता येईल.[३] परांजपे यांची वस्ती कित्येक शतके कोकणात होती, तिची वाढ नानासाहेब पेशव्यांच्या काळात पुणे प्रांताकडे होऊ लागली.

परांजपे घराण्यातील लोक कोकणापासून दूरवर पुष्कळ प्रांतात पसरले आहेत व ते अनेक प्रकारचे उद्योगधंदे करीत आहेत. 'परांजपे' हे उपनाव सुरू झाले तेव्हा 'पारायण' व 'जप' या शब्दसमुच्चयाच्या अर्थाशी विशिष्ट व्यक्तीचा संबंध जोडता येण्याजोगा होता. परांजपे घराण्यातील शिवरामपंत व बाबासाहेब या व्यक्तींनी राष्ट्रीयत्वाच्या जोपासनेसाठी खडतर तपश्चर्या केली. राजकारणातही त्यांनी प्रभावी कामगिरी केलेली आहे.

शिवराम महादेव परांजपे हे ब्राह्मण समाजातील विष्णुवर्धन गोत्री होते. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील देवाचे गोठणे होय. पुढे श्रीवर्धनच्या भट घराण्याला पुण्याचे पेशवेपद मिळाल्यावर कोकण प्रांतातील लोक पुण्याला येऊन स्थायिक झाले. शिवरामपंतांचे आजोबा सदाशिवराव हे सवाई माधवरावांच्या पदरी नोकरीला होते. त्यांच्या कारकिर्दीत सदाशिवरावांच्या विविध गुणांचे सार्थक व्हायला सुरुवात झाली. परंतु सवाई माधवरावांचे राज्य फार काळ टिकले नाही. लवकरच चुकीचा कारभार सुरू झाला. त्यामुळे गुणी माणसांना दरबारात मान–सन्मान  मिळेनासा झाला. त्यामुळे सदाशिवरावांनी आपली नोकरी सोडून देण्याचा विचार केला व रावबाजीच्या कारभाराला रामराम ठोकून कोकणात कुलाबा जिल्ह्यात महाड येथे स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. सदाशिवराव आपल्या कुटुंबियांसह महाडला आले. तेथेच स्थायिक झाले. [४,५]

सदाशिवरावांना एकुलता एक मुलगा म्हणजे शिवराम ऊर्फ बाबा. त्यांच्यावेळी घरात अतिशय गरिबी होती. बाबांना वैद्यकी व गायन कला अतिशय चांगली अवगत होती. इतकी गरिबी असूनही आजारी माणूस त्यांच्या इच्छेने देईल तेवढे पैसे घ्यायचे. त्यामुळे बाबांना या व्यवसायात फार मोठी प्राप्ती होत नव्हती. त्यामुळे उदरनिर्वाहासाठी बाबांना आसपासच्या गावी जाऊन कीर्तने करावी लागत असत. कथाकीर्तने व वैद्यकी व्यवसायावर संसार कसाबसा चालत असे. शेवटपर्यंत गरिबी व दारिद्र्याने त्यांची पाठ सोडली नाही. पण शेवटी त्यांचा भाग्योदय उजाडला. महाडमधील एका गुजर वाण्याच्या व्यक्तीला त्यांनी आजारातून बरे केले. त्यामुळे वाण्याने त्यांना रोख रक्कम न देता काकरतळे नावाच्या तळ्यालगतची जमीन बक्षिसपत्र करून बाबांच्या नावाने दिली. पुढे शिवराम बाबांनी त्या विस्तीर्ण जागेत एक चारच खणी छोटेसे घर बांधले. त्या घरातच त्यांचा मुलगा महादेवराव यांचा विवाह इंदूरच्या मालशे घराण्यातील यमुताई बरोबर झाला. तिचे सासरचे नाव पार्वती असे ठेवले होते. वडील वारले त्यावेळी महादेव वीस–बावीस वर्षांचे होते. संपूर्ण कुटुंबाचा भार महादेवरावांवर पडला. लहानपणापासून गरिबी व दारिद्र्य त्यांनी जवळून पाहिले होते. आपल्या वडिलांबरोबर गावोगाव केलेल्या कथा–कीर्तनात त्यांनी झांज वाजविण्याचे काम केले होते. गायन कलेचे ज्ञान वडिलांकडून त्यांनी घेतले होते. चित्रकला व मूर्तीकला यांचेही ज्ञान त्यांना होते. लहान–लहान मातीच्या मूर्तीही ते बनवित असत. या विविध कलांवरच जीवन जगण्याचा प्रथम त्यांनी प्रयत्न केला. सुरुवातीला त्यांनी

तीन–साडेतीन रुपयांची नोकरीही केली. परंतु महादेवराव खूप महत्त्वाकांक्षी होते. त्यांनी वकिलीचा अभ्यास सुरु केला. मुंबई येथे जाऊन वकिलीची परीक्षा त्यांनी दिली व परिक्षेमध्ये पासही झाले. महादेवराव परांजपे हे उंच, सुरेख व सडपातळ होते. चांगले वकील तर ते होतेच, परंतु तबला, तंबोरा वाजविणे, चित्रे काढणे व मातीची चित्रे तयार करणे या कामातही ते हुशार होते. अशा गुणांमुळे त्यांच्या जीवनात पुढे सुखाचे दिवस येऊ लागले. विविध गुणांमुळे व आर्थिकदृष्ट्या समाजात त्यांनी प्रतिष्ठा मोठ्या प्रमाणात वाढू लागली. त्यांच्या घरात समाधानाचे वातावरण तयार झाले.[५]

महादेवराव व पार्वती यांना बयोताई व ठकुताई या दोन मुली झाल्या व पुढे शिवरामपंतांच्या रुपाने तिसरा मुलगा झाला. शिवरामपंतांचा जन्म शके १७८६ रक्ताक्षींनाम संवत्सरे ज्येष्ठ शुध्द सप्तमीचे दिवशी म्हणजे २७ जून १८६४ रोजी महाड येथे झाला. आजोबांचे नाव नातवाला ठेवण्याच्या जुन्या चालीरितीप्रमाणे मुलाचे नाव 'शिवराम' ठेवले. अपेक्षेप्रमाणे मुलगा झाल्याने सर्वत्र समाधानाचे वातावरण होते. या बाळाचे बारसे, उष्टावण आदी संस्कार झाले. या मुलाचे नाव जरी शिवराम ठेवले असले तरी ज्येष्ठ मुलाला वडिलांनी नावाने हाका मारु नये अशी कोकणात पध्दत असल्याने महादेवराव मुलाला 'शिवराम' या नावाने हाक न मारता 'बाळक्या' किंवा 'बाळकोबा' या नावाने हाक मारु लागले.[६]

पूर्वीच्या रितीरिवाजाप्रमाणे महादेवरावांनी आपल्या मुलाची शिवरामची पत्रिका तयार करवून घेतली. तेव्हाच त्यांच्या कुंडलीवरून शिवराम पुढे चांगले विद्वान, भाग्यशाली व लोकप्रिय होतील, असे भविष्य त्यावेळच्या ज्योतिषांनी वर्तविले होते, असे सांगतात.

महादेवरावांनी पुढे वकिलीच्या मिळालेल्या पैशांतून आसपासची जागा विकत घेतली. सर्व सोयींनीयुक्त असे टुमदार घर बांधले. पुढे बाळक्या लहानाचा मोठा होत गेला. त्याच्या सातव्या वर्षी म्हणजे सन १८७१च्या चैत्र महिन्यात महाड येथे बाळक्याची मुंज मोठ्या हौसेने केली. दरम्यान महादेवरावांना बाळक्याच्या पाठीवर एक मुलगी व दोन मुलगे अशी तीन अपत्ये झाली. मुलीचे नाव वेणुताई व मुलांची नावे गणेश व विष्णु अशी ठेवली होती.

बाळक्या लहानपणी अतिशय उनाडक्या करीत असे. महादेवरावांना आपल्या मुलाने मोठे व्हावे, नावलौकिक मिळवावा असे नेहमी वाटत असे. म्हणून त्यांनी आपल्या मुलाचे नाव सन १८७२च्या सुमारास महाडमधील प्राथमिक शाळेत घातले. परंतु शाळेला जातो म्हणून बाहेर पडून खेळ खेळून शाळा सुटण्याच्या वेळी शिवराम घरी येत असे. लहानपणी त्यांना खेळण्याप्रमाणे पोहण्याचाही छंद होता. वडिलांचे त्यांच्यावर फार प्रेम होते. परंतु रागीट स्वभावामुळे वडिलांचा अनेक वेळा त्यांना मार बसत असे. त्यामुळे वडिलांपेक्षा ते आईजवळ अधिक मनमोकळेपणाने बोलत असत.[७]

लहानपणी बाळक्याला नाटकाचाही खूप छंद होता. विविध नाटकांतून त्यांनी कामे केलेली होती.

महाडला इंग्रजी शाळा नव्हती. मुलाचे शिकण्यात विशेष लक्ष नाही म्हणून महादेवराव संतापले. त्यावेळी रत्नागिरी येथील रहिवासी असलेले व महादेवरावांचे स्नेही बळवंतराव पंडित यांनी बाळक्याला रत्नागिरीला इंग्रजी शाळेत घाला, असा सल्ला दिला. त्यामुळे महादेवरावानी त्वरित निर्णय घेतला. मुलाचा हुडपणा कमी होईल व शिक्षणाकडे लक्ष लागेल, या हेतूने बळवंतरावांच्या देखरेखीखाली बाळक्याला रत्नागिरीला ठेवण्याचा निर्णय घेतला.[८]

सन १८७८ च्या जून महिन्यात बाळक्याचे पहिल्या इयत्तेत सरकारी इंग्रजी शाळेत नाव नोंदवले. सुदैवाने सरकारी नोकरीत असलेले विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची त्याच शाळेत बदली झाली व ते मराठी हा विषय शिकवीत असत. विष्णुशास्त्री पुढे सन १८७९च्या मे महिन्यात रत्नागिरी सोडून पुण्याला रजेवर आले दि. १.१.१८८० रोजी टिळक, आगरकर व विष्णुशास्त्री या तिघांनी पुण्यात 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली. ही बातमी रत्नागिरीपर्यंत येऊन पोहोचली. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांनी पुण्यास न्यू इंग्लिश स्कूलला जाण्याचे ठरविले. त्या विद्यार्थ्यांमध्ये शिवरामपंताचाही समावेश होता. ''शास्त्रीबुवांनी नवीन शाळा काढली आहे. आम्ही पुण्यास जाणार....'' विद्यार्थ्यांमध्ये खूपच खळबळ माजली होती. अनेक विद्यार्थी पुण्याला जायला निघाले. परंतु हे सर्व विद्यार्थी पुण्याला पोहोचले, त्याचदिवशी दुर्दैवाने विष्णुशास्त्री चिपळुणकरांचा मृत्यू झाला होता. सर्व विद्यार्थ्यांना खूप मोठा धक्का बसला. परंतु शिवरामपंत व त्यांच्या मित्रांनी शास्त्रीबुवा हयात नसलेल्या शाळेत नावे घातली व जोमाने

अभ्यास सुरू केला. शिवरामपंत परांजपे यांनी पुण्यात राहण्यासाठी भाड्याने एक खोली घेतली व जागेश्वरीच्या शेजारील आप्पा खाणावळीत ते जेवत असत.[७]

शिवरामपंत शिकू लागले. त्यावेळी न्यू इंग्लिश स्कूलच्या शिक्षकांमध्ये लोकमान्य टिळक, आगरकर, वामन हरि आपटे, अशी दिग्गज मंडळी होती. टिळकांकडे गणित विषय होता. आपटे इंग्लिश व संस्कृत आणि आगरकर Poetry हे विषय शिकवीत असत. शिवरामपंत पाचवीच्या वर्गात दाखल झाले. तेव्हा त्यांचा नंबर पहिल्या तीनमध्ये असे. त्यांची हुशारी व तरतरी पाहून वामन आपटेंनी त्यांना एकदम पाचवीतून सातव्या इयत्तेत घेतले. एवढेच नव्हे तर शिवरामपंत व त्यांचे सहकारी महादेव हरि मोडक व बाबा पोतदार या तिघांची निवड करून त्यांची जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलरशिपसाठी तयारी करू लागले.[८]

त्यावेळच्या पध्दतीप्रमाणे शिवरामपंतांचे लग्न लवकर म्हणजे त्यांच्या वयाच्या ११व्या वर्षी सन १८७५च्या वैशाखात झाले. नवरी मुलगी ७ वर्षांची होती. गोरेगावचे गणेशपंत गोखले यांची कन्या बयोताई हिच्याबरोबर पंतांचे लग्न झाले. सासरी या मुलीचे नाव जानकी ठेवण्यात आले.[९]

सन १८८३मध्ये पहिल्या वर्षी शिवरामपंत मॅट्रिकच्या परीक्षेत नापास झाले. पण या अपयशाने खचून न जाता पुढील वर्षी १८८४ सालच्या परीक्षेत संस्कृत या विषयामध्ये त्यांचा पहिला नंबर येऊन त्यांना जगन्नाथ शंकरशेठ स्कॉलरशिप मिळाली.[१०]

शिवरामपंत मॅट्रिकची परीक्षा पास झाले आणि टिळक, आगरकर, आपटे या तडफदार व महत्त्वाकांक्षी मंडळींनी पुण्यात नवीनच फर्ग्युसन कॉलेजची स्थापना केली. त्यावेळी पुण्यात 'डेक्कन कॉलेज' हे नावारुपाला आलेले होते. तरीही आपले शाळेचेच शिक्षक असल्याने शिवरामपंतांनी प्रथम वर्षाला फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. फर्ग्युसन कॉलेजमधून प्रिव्हियसची (प्रथम वर्ष) परीक्षा पास झाल्यावर शिवरामपंत दुसऱ्या वर्षापासून डेक्कन कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथेच त्यांनी एम.ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.[११]

रेसिडेन्सीमध्ये न राहता मुंजाबाच्या बोळात तळेकरांच्या वाड्यात जागा घेऊन राहिले. कारण त्यांचे दोन भाऊ गणपतराव (गणेश), विष्णूपंत (विष्णू), पत्नी जानकीबाई, भाचे लक्ष्मण नारायण दारशेतकर, इ. सर्वजण एकत्र रहात. येथूनच शिवरामपंत कधी पायी तर कधी

गाडीने कॉलेजला जात. डेक्कन कॉलेजचे प्रिन्सिपल ऑक्झनहॅम व नंतर सेल्बीसाहेब असून प्रो.बॅरेट, प्रो. फॉरेस्ट, इ प्राध्यापक वगात होते. तर एतद्देशिय प्राध्यापकात डॉ. भांडारकर व प्रो. करकरे होते. कॉलेजचे प्रथम वर्ष पार पाडल्यानंतर शिवरामपंत कॉलेजच्या रेसिडेन्सीमध्ये राहू लागले. त्यावेळी वि. का. राजवाडे, रा. बापट, बाबासाहेब खरे, नीळकंठराव पाटणकर, प्रो.नारायण सखाराम पानसे, कृष्णाजीपंत खाडिलकर, महादेव हरी मोडक, इ. त्यांचे सहकारी होते.[१२]

शिवरामपंत बुध्दीमान विद्यार्थी हा नावलौकिक असला तरी शांत वृत्तीचे व अबोल म्हणून गणले जात होते. शिवरामपंतांना त्या काळात नाटक लिहिणे, संस्कृत नाटकांची भाषांतरे करणे याशिवाय अभ्यासापेक्षा संस्कृत, इंग्रजी वाङ्मय वाचण्याची आवड निर्माण झाली. वाचन व अभ्यासाची त्यांची बैठक सहा–सहा तासांची असे. कॉलेजमध्ये स्फुट काव्ये व पद्ये रचण्याचे त्यांचे काम चालूच होते. कॉलेजच्या 'डेक्कन कॉलेज क्वार्टरली' नावाच्या पहिल्याच अंकात शिवरामपंतांनी 'अहल्या–जार' या नावाचे एक लहानसे खंड काव्य प्रसिध्द केले होते. त्याची एक मोठी कविता आहे.[१३,१४]

शिवरामपंत आपल्या वयाच्या २४व्या वर्षी बी.ए.च्या वर्गात असताना म्हणजे सन १८८८ मध्ये त्यांचे वडील महादेवराव यांचे वयाच्या ६0व्या वर्षी निधन झाले. घरची व्यवस्था पाहण्यासाठी तिघा मुलांपैकी कोणीतरी घरी महाडला राहणे आवश्यक होते. त्यानुसार विष्णूपंत यांनी घरी रहावे असे ठरले. त्यावेळी वडिलांच्या मित्रांनी पंतांना सांगितले, ''बाळकोबा तुम्ही आता लवकरच बी.ए. होऊन वकिलीची परीक्षा द्या व वडिलांची गादी पुढे चालवा.''यावर शिवरामपंतांनी सांगितले, ''मला कळवंतिणीचा धंदा करावयाचा नाही! अर्थात बुध्दीविक्रय करावयाचा नाही, असा ठाम निश्चय त्यांनी त्यावेळी केला होता. अशा प्रकारची वकिली न करता देशाची वकिली करण्याचा निर्धार शिवरामपंतांनी त्याचवेळी केलेला होता.[१५]

वडिलांच्या पश्चात त्यांच्या मिळकतीवर पंतांनी कोणताही हक्क ज्येष्ठ मुलगा या नात्याने न दाखविता धाकट्या भावावर भार पडू दिला नाही. एक पै अथवा तांदळाचा दाणा कधी घेतला नाही. भावाने कधी पत्राने सल्ला विचारला तर तुम्ही करीत आहात तेच योग्य असणार असे लिहून मनाचा मोठेपणा दाखवित. पुढे शिवरामपंतांचे धाकटे बंधू गणेशपंताचा संसाराच्या ऐन

भरात प्लेगने अचानक मृत्यू झाला. तेव्हा मरतेसमयी त्यांना दिलेल्या वचनानुसार त्यांच्या तीनही मुलींची लग्ने चांगल्या स्थळी हुंडा देऊन स्वतः खर्च करून लावून दिली.[१६]

सन १९२७ साली विष्णूपंत व कै. गणेशपंतांचा मुलगा यांच्यामध्ये वाटण्या करण्याकरिता शिवरामपंत महाडला गेले. तेव्हा त्याच्या दोनच वाटण्या केल्या. स्वतःला त्यातील काहीच घेतले नाही. परंतु महाडातील जुन्या लोकांनी वडिलांचा प्रसाद म्हणून काहीतरी घ्यावे, असा सल्ला दिला. त्यानुसार मूळचे लहान खोपट (घर) म्हणजे त्यांचे जन्मस्थान व १७ मणांचे शेत एवढेच आपणाकडे ठेवले. परंतु ते ही कागदोपत्री. कारण ते असेपर्यंत त्याचे उत्पन्न सोडा, कधी त्यांनी चौकशीही केली नाही.[१७]

वडिलांच्या मृत्यूनंतर पुण्याला आल्यावर रेसिडेन्सीमध्ये राहण्याचे सोडून दिले व गावात त्यांनी बिऱ्हाड केले. श्रीकृष्ण सिनेमासमोरच्या ढमढेरे बोळात वाच्छापूरकरांच्या वाड्यात दरमहा तीन रुपये भाड्याची खोली घेतली. घर व शिक्षण करावयाचे असल्याने शिवरामपंतांनी ‘न्यू इंग्लिश स्कूल’ मध्ये शिक्षकाची नोकरी स्वीकारली. इंग्रजी पाचवी, सहावी वर्गांना संस्कृत व इंग्रजी हे विषय शिकवीत असत. त्यावेळच्या विद्यार्थ्यांमध्ये भालाकार भोपटकर, लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, गोपाळ कृष्ण देवधर असे विद्यार्थी होते. शिक्षण, नोकरी, जबाबदाऱ्या सर्व एकाचवेळी करीत असल्याने पंतांना बी.ए. होण्याला १८९० हे साल गाठावे लागले. परीक्षेत बराच वरचा क्रमांक आल्याने त्यांना डेक्कन कॉलेजमधील ‘दक्षिणा फेलोशिप’ मिळाली.[१८]

सन १८९१–९२ ही दोन वर्षे ते फेलो होते. तेथेच प्रिव्हियसच्या वर्गाला संस्कृत काव्य शिकविण्याचे काम त्यांच्याकडे होते. अत्यंत रसिकतेने पंत संस्कृत काव्य शिकवित असत. एकीकडे एम.ए.चा अभ्यास व कॉलेजच्या ग्रंथालयाचा योग्य उपयोग त्यांनी करून घेतला. याचकाळात पंतांनी ‘भामिनी विलास’ व ‘जगन्नाथ पंडितांच्या’ काव्याचे इंग्रजी भाषांतर व इंग्रजी नोटस् त्यांनी प्रसिध्द केल्या. जर्मनी, अमेरिका, इटली, फ्रान्स, इ. देशांतील लेखकांची पुस्तके आवडीने वाचीत. शेक्सपियर, रँके, गटे, लेसिंग, शिलर, कार्लाईल, रेसीन, बायरन, होमर, बर्क, गिबन, सॉक्रेटिस, प्लेटो, रुसो, टॉलस्टॉय, व्हॉल्टेअर. इ. अनेक लेखकांची पुस्तके वाचनात आल्याने शिवरामपंतांवर सोशॅलिस्ट मतांची छाप पडू लागली असे दिसते.

'इन्कमटॅक्स आणि सोशॅलिझम' 'राज्यापहार आणि न्याय' काळ अंकातून या विचारसरणीचा उदय झाला.[१९,२०]

सन १८९५साली शिवरामपंतांचा एम.ए.चा निकाल लागला. त्यांचा पहिला नंबर येऊन त्यांना भगवानदास व गोकूळदास अशी ९०० रुपयांची बक्षिसे व काही पुस्तके मिळाली. परंतु पंतांनी पुस्तके स्वतःकडे ठेवून ९०० रुपये महाडला आपल्या मातोश्रींकडे पाठविले. अशाप्रकारे शिवरामपंत एम.ए. ची डिग्री घेऊन डेक्कन कॉलेजातून बाहेर पडले. इयत्ता पाचवीच्या वर्गात पुण्यात दाखल झालेल्या पंतांना एम.ए. करेपर्यंत जवळजवळ तेरा वर्षे लागली.[२१]

हळूहळू पुण्यात गोपाळ गणेश आगरकर व मवाळ मंडळींचे प्रभुत्व कमी होऊन टिळकांचा वेगळा असा जहाल पक्ष निर्माण होऊ पहात होता. शिवरामपंतांचाही ओढा टिळक पक्षाकडे होता. कॉलेजचे शिक्षण पूर्ण होण्याअगोदरच टिळकांकडे पंतांचे जाणे-येणे सुरु होते. सन १८९५ साली टिळकांच्या स्वतःच्या गणपतीपुढे विंचूरकरांच्या वाड्यात मेळ्यांच्या पान-सुपारीच्या समारंभात शिवरामपंत स्वतः जातीने हजर राहिले होते.[२२]

सरकारी नोकरी पत्करून त्यात अडकायचे नाही, असे शिवरामपंतांनी ठरविले होते. परंतु योगायोगाने पुण्यात भावे स्कुलचे मास्तर जालनापूरकर व विष्णुपंत गोखले या दोघांनी पुण्यात 'महाराष्ट्र कॉलेज'ची स्थापना केली. सदर कॉलेजमध्ये प्रोफेसर म्हणून शिवरामपंतांची नेमणूक झाली. सन १८९६-१८९७ ही दोन वर्षे त्यांनी प्रोफेसर म्हणून काम केले. संस्कृत विषय शिकविण्याचे काम परांजपे यांच्याकडे आले. पूर्वीच्या कन्या शाळेच्या ठिकाणी म्हणजेच फडतऱ्यांच्या वाड्यात दुसऱ्या मजल्यावरील दिवाणखान्यात हे 'महाराष्ट्र कॉलेज' भरत असे.[२३]

कडक अंगरखा, रेशीमकाठी उपरणे, पागोटे, उभे केशरी गंध व कानात भिकबाळी असा कडक पोषाख पंतांनी वापरायला सुरुवात केली. हा त्यांचा पोषाख सन १९२०-२१ मध्ये महात्मा गांधीची चळवळ सुरू होईपर्यंत तसाच होता. शिवरामपंत परांजपे म्हटले की, हा पोषाख लोकांच्या नजरेसमोर येत होता.[२४]

देशसेवेची तळमळ असणाऱ्या शिवरामपंतांना नुसते कॉलेजमध्ये शिकवून स्वस्थ बसणे हे आवडेनासे झाले. त्यांच्या वयाच्या ३२व्या वर्षी अंगात रक्त आणि डोक्यात स्फूर्ती सळसळत

होती. लोकांची वैचारिक जागृती करण्यासाठी त्यांनी विविध देवळांमधून पुराणे सांगण्याची पध्दती नव्याने सुरू केली. ही जणू त्यांची बैठी व्याख्यानेच होती. म्हणून त्याला 'राजकीय पुराण' असे लोकांनीच नाव दिलेले होते.[२५]

विद्यापीठाच्या उच्च पदव्या घेतलेल्या व विविध बक्षिसे संपादन केलेल्या एका आंग्लविद्याविभूषिताने शेवटी 'पुराणिकबाबा' व्हावे हे अनेकांना थोडे विसंगत वाटू लागले. दिवसेंदिवस विविध देवळांमधून शिवरामपंतांच्या राजकीय पुराणाचा बोध घेण्यासाठी माणसांची खूपच गर्दी होऊ लागली. एवढा हा सर्व प्रकार पाहून डॉ. भांडारकर यांनी आपल्या शिष्याला (पंतांना) बोलावून घेतले व त्यांची कानउघाडणी केली, ''हे तुम्ही काय आरंभिले आहे? गळ्यात तंबोरा अडकवून बोवा का होणार आहात? आपली विद्वता अशी वाया दवडू नका!'' यावर शिवरामपंतांनी काहीच उत्तर दिले नाही. आपला दिनक्रम चालूच ठेवला.[२६]

अशा प्रकारे टिळकांच्या नेतृत्त्वाखाली काढलेल्या प्रत्येक चळवळीत परांजपे मनापासून भाग घेऊ लागले. अशा स्थितीत आपले नवीन काढलेले 'महाराष्ट्र कॉलेज' भरभराटीला यावे, असे कॉलेजच्या पुरस्कर्त्यांना वाटत होते. परंतु आपल्या कॉलेजातील हा प्रोफेसर या गोष्टी करीत आहे याची त्यांना भिती वाटू लागली. शिवाय महाराष्ट्र कॉलेजशी संबंध असलेल्या महाराष्ट्र मेळाव्यालाही परांजप्यांनी बरीच पद्ये करून दिली होती. त्यामुळे प्रोफेसर परांजपे यांचे एकंदर चरित्र त्यांच्या व्यवसायबंधूंना आवडेनासे झाले. एवढ्यावरच भागले नाही. पुढे दोन-चार महिन्यातच सार्वजनिक सभेमार्फत दुष्काळी चळवळीची मोहीम हाती घेतली गेली.[२७]

परांजपे सार्वजनिक सभेचे एक सेक्रेटरी म्हणून आंदोलनात सहभागी झाले. या सर्व प्रकारांमुळे परांजप्यांची लक्षणे ठीक दिसत नाहीत, असे महाराष्ट्र कॉलेजच्या संस्थापकांना वाटू लागले व त्याचा परिणाम म्हणजे शिवरामपंतांना आपल्या प्रोफेसरपदाचा राजीनामा द्यावा लागला. अशा रितीने त्यांची प्रोफेसरी संपली. परंतु 'प्रो' (प्रोफेसर) या अक्षराची त्यांची खूण मात्र त्यांच्या नावामागे जन्मभर कायम राहिली. उभ्या हयातीत प्रोफेसरचे काम त्यांनी दोनच वर्षे केले. परंतु त्यांना प्रोफेसर म्हणण्यात लोकांना त्यांचा गौरव केल्यासारखे वाटत होते. त्यांची प्रोफेसरीची कारकीर्द फारच छोटी होती.

टिळकांच्या पावलावर पाऊल ठेवीत चाललेल्या पंतांना सहकाऱ्यांच्या मतभेदामुळे कॉलेजांतूनही आपल्या प्रोफेसरीचा राजीनामा देऊन बाहेर पडावे लागले. त्यातही टिळकांचेच अनुकरण घडले. आतापर्यंत चळवळीत निदान सरकारशी प्रत्यक्ष संबंध तरी नव्हता. यापुढे मात्र सरकारशीच दोन हात करावयाचे होते. अशाप्रकारे राष्ट्रीय आंदोलनात आपल्या अमोघ वक्तृत्व व ओघवत्या लेखणीने सरकारला विरोध करण्याचे सत्र शिवरामपंतांनी आरंभिले.[२८]

## ● संशोधनाचा हेतू –

या संशोधनाचा हेतू शिवराम महादेव परांजपे यांचे विचार आणि त्यांच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास करणे असा आहे. शिवराम महादेव परांजपे यांच्या लेखन कार्याचे परिशीलन करणे हाही या संशोधनाचा हेतू आहे.

## ● संशोधनाची उद्दिष्टे –

१. शि. म. परांजपे यांच्या जीवन कार्याचा अभ्यास करणे.

२. शि. म. परांजपे यांच्या राजकीय कार्याचा अभ्यास करणे.

३. शि. म. परांजपे यांच्या सामाजिक कार्याचा अभ्यास करणे.

४. शिवरामपंतांच्या 'काळ' पत्राच्या कार्याचा अभ्यास करणे.

५. शि. म. परांजपे यांच्या इतर लेखन कार्याचा अभ्यास करणे.

६. शि. म. परांजपे यांच्या धार्मिक कार्याचा अभ्यास करणे.

## ● संशोधनाची गृहीतके –

१. लोकमान्य टिळकांचा जहालवाद व म.गांधींचा मवाळवादी विचार या दोन्ही नेत्यांच्या चळवळीत शिवरामपंतांचा सहभाग विशेष उल्लेखनीय होता.

२. मवाळ, जहाल, क्रांतीकारक विचारांचा प्रभाव पुणे जिल्ह्यातील समाजावर झालेला होता.

३. देशामध्ये झालेल्या विविध चळवळीत पुणे जिल्ह्याने आपला सहभाग नोंदविला.

४. शिवरामपंत परांजपे यांच्यावर टिळक आणि म.गांधी या दोघांच्या विचारांचा विलक्षण प्रभाव होता.

५. स्वातंत्र्यपूर्व काळात शिवरामपंत परांजपे यांनी आपल्या विचारांचा वेगळा ठसा उमटविला.

## ● संशोधनाचे महत्त्व –

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महाराष्ट्राचे योगदान फार महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रमध्ये पुणे जिल्ह्यात ज्या विविध चळवळी झाल्या, त्यामध्ये राजकीय, सामाजिक, क्रांतिकारी, ऐतिहासिक चळवळींचा परामर्श 'काळ' या पत्राने घेतलेला आहे. शिवरामपंत परांजपे यांचे विचार या संशोधनामुळे समाजापुढे येतील, त्यांचे योगदान प्रकाशात येईल. त्यांच्या कार्याचा समाजावर कसा प्रभाव होता हे स्पष्ट होईल. त्यांच्या कामाची परिणामकारकता स्पष्ट होईल, अशी आशा आहे.

## ● संशोधनाचे शीर्षक –

''शिवरामपंत महादेव परांजपे यांच्या जीवनकार्याचा चिकित्सक अभ्यास'' (१८६४–१९२९)

## ● संशोधनाची मर्यादा व व्याप्ती –

या संशोधनाच्या काही मर्यादा स्पष्ट करणे आवश्यक आहे. संशोधनाचा अभ्यास विषय म्हणजेच 'शिवराम महादेव परांजपे यांच्या राजकीय, सामाजिक, वृत्तपत्रीय, ऐतिहासिक स्थितीचा अभ्यास' मुख्यतः यावर केंद्रीत स्वरुपाचे आहे.

या संशोधनाच्या बाबतीत कालखंड ही एक मर्यादा म्हणावी लागेल. शिवरामपंत परांजपे यांच्या जन्मापासून म्हणजेच सन १८६४ ते १९२९ या काळाचाच या संशोधनात प्रामुख्याने विचार केलेला आहे. या संशोधनाची प्रमुख मर्यादा म्हणजे पुणे व मुंबई पुराभिलेखागारातील कागदपत्रेच यात साधन म्हणून वापरलेली आहेत.

शिवराम महादेव परांजपे यांचे विचार आणि त्यांच्या कार्याचा ऐतिहासिक अभ्यास करताना सर्वप्रथम त्यांच्या जीवनकार्याचा परिचय थोडक्यात करून दिलेला आहे. शिवरामपंत परांजपे यांचे राजकीय, सामाजिक, वृत्तपत्रीय व त्यांच्या विविध लेखनकार्यातील विचार तपासले

आहेत. त्यांच्या ग्रंथसंपदेचा अभ्यास केला आहे. त्यानंतर शिवरामपंतांची वैचारिक जडण–घडण, त्यांच्या विचारांचा पडलेला प्रभाव, लेखनसाहित्यातून त्यांचे आलेले विचार, स्वातंत्र्य चळवळीतील त्यांचे कार्य इ.वर प्रकाश टाकण्यात आलेला आहे.

संशोधन ही एक विद्याविषयक कृती आहे. क्लिफर्ड कुडी म्हणतात, ''या संशोधनामध्ये समस्येची व्याख्या केली जाते. उत्तरे सुचविली जातात. पुरावे गोळा करणे, संघटन करणे आणि मूल्यमापन करणे, निगमन करून निष्कर्षाची काळजीपूर्वक पडताळणी करणे, या अर्थाने विचार करता उपलब्ध ज्ञानामध्ये मूलभूत योगदान करून ते अधिक समृध्द संपन्न केले जाते. अध्ययन, निरीक्षण, तुलना आणि प्रयोग यांच्या मदतीने सत्याचा मागोवा संशोधनाद्वारे घेतला जातो.

- ## ऐतिहासिक संशोधन पध्दती –

संशोधन समस्येची निवड. संशोधनाचा आराखडा तयार करणे, उपलब्ध साहित्याचा आढावा घेणे, प्रत्यक्ष तथ्यांचे संकलन करणे, उपलब्ध तथ्यांचे अंतरंग व बहिरंग परीक्षण करून मिळालेल्या साधनांची अस्सलता व विश्वासार्हता तपासणे. त्यानंतर त्यांचे विश्लेषण करून निष्कर्ष मांडणे, अशा टप्प्यांचा समावेश ऐतिहासिक संशोधन पध्दतीमध्ये होतो. तीच पध्दत येथे वापरली आहे.

- ## तथ्य संकलन–

प्रस्तुत संशोधनासाठी या अभ्यासविषयाशी संबंधित प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेण्यात आलेला आहे.

## प्राथमिक साधने–

शि.म.परांजपे यांचे लिखित ग्रंथ, प्रत्यक्ष कागदपत्रे, मासिके आणि वर्तमानपत्रे इत्यादी साधनांतून माहिती मिळवली.

## दुय्यम साधने–

दुय्यम साधनात संदर्भ साहित्य, वृत्तपत्रे, प्रकाशित व अप्रकाशित साधने यातून माहिती उपलब्ध झाली.

## ● साहित्याचे पुनर्विलोकन–

''शिवराम महादेव परांजपे यांच्या जीवनकार्याचा चिकित्सक अभ्यास'' (सन १८६४ – १९२९) हा माझ्या प्रबंधाचा विषय आहे. ह्या विषयाच्या निवडीमागे स्वातंत्र्यपूर्व काळातील जहाल विचार व त्याचा प्रसार 'काळ' पत्राच्या माध्यमातून करणारे देशभक्त शिवराम महादेव परांजपे यांच्या कार्याचा सखोल अभ्यास करणे व शिवरामपंतांच्या विविध पैलूंचे दर्शन समाजापुढे मांडणे हा या प्रबंधाचा मुख्य हेतू होता.

संशोधन आराखड्यानुसार सर्वप्रथम ऐतिहासिक संशोधन कार्यानुसार कामाला सुरुवात केली. महाराष्ट्र शासनाच्या पुराभिलेखागार विभाग व विविध ग्रंथालयांमधून दुर्मिळ ग्रंथ व वर्तमानपत्रे यांच्यामधून माझ्या विषयाची माहिती संकलित करून घेतली.

भारत इतिहास संशोधन मंडळ, सदाशिव पेठ, पुणे या अभिलेखागारातून 'काळ' पत्राचे, केसरी व भाला पत्राचे मूळ अंक मिळाले. माझ्या संशोधन कार्यासाठी त्याचा उपयोग झाला. त्यातून संशोधन कार्यास गती मिळाली.

या खेरीज पुणे नगरवाचन ग्रंथालय, पुणे, विश्रामबागवाडा ग्रंथालय, पुणे, केसरीवाडा ग्रंथालय, पुणे, जयकर ग्रंथालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथून दुर्मिळ ग्रंथ, साप्ताहिके, मासिके प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे इ.चा अभ्यास करता आला.

काळाचे १ डिसेंबर १९०५ च्या मूळ अंकात स्वदेशी चळवळ व राष्ट्रीय सभेवरील आक्षेप यांची माहिती मिळाली, तर २७ नोव्हेंबर १९०८च्या मूळ अंकात बंगालमधील विलक्षण बातम्या व टिळकांचा जयजयकार इ. माहिती पाहता आली.

१ सप्टेंबर १८९६च्या केसरीच्या अंकातून गणपती उत्सव व शिवजयंती उत्सवाच्या संदर्भातील सर्व माहिती मिळाली. संशोधन कार्याला याची मदत झाली.

'काळ' पत्र सन १८९८ ते १९०८ या कालावधीत चालले. ब्रिटिशांच्या धोरणामुळे शिवरामपंत परांजपे यांना इंडियन पीनल कोडचे कलम १२४ अव १५३अ या कलमांखाली आरोप ठेवण्यात आले. त्यानुसार दि. १० जुलै १९०८ ते ५ ऑक्टोबर १९०९ पर्यंत १९ महिने शिवराम परांजपे यांना कारावास झाला. पुढे पु.बा. खरे व स.ल.सोमण या दोघांनी 'काळ' पत्र उत्तमरित्या चालविले. परंतु सरकारच्या पाशवी प्रेस ॲक्टमुळे 'काळ' पत्र पंतांना सन १९०८ साली बंद करावे लागले. शिवरामपंतांचे बरेच लेखन कार्य केलेले साहित्य सरकारने जप्त केले.

'काळ' पत्र बंद पडल्यानंतर पुढे श्री. यशवंत गोपाळ जोशी यांच्या य. गो. जोशी प्रकाशन कार्यालय, सदाशिव पेठ, पुणे २ यांनी ''काळातील निवडक निबंध'' दहा भागांचे पुर्नमुद्रण २७ सप्टेंबर १९४६ रोजी करण्याचे महत् कार्य केले. आजही ते लेख वाचल्यावर 'काळ' पत्र किती लोकप्रिय असेल याची प्रचिती आल्याशिवाय राहत नाही.

'काळ' पत्र बंद झाल्यावर पंतांनी विविध मासिकांमधून लेखन चालू ठेवले. 'चित्रमय जगत' या मधून त्यांचे लेख प्रकाशित झाले. परंतु सन १९२० ते १९२७ या काळात पंतांनी 'स्वराज्य' नावाचे नवे पत्र सुरू केले. 'स्वराज्यातील निवडक निबंध' वर्ष – दुसरे – १९२२ या ग्रंथातून 'काळ' पत्रानंतर शिवरामपंतांनी स्वराज्याच्या माध्यमातून आपले लेख लिहिले. परंतु 'काळ' पत्राची जहाल विचारसरणी स्वराज्य पत्रामधून दिसली नाही. लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर शिवरामपंत महात्मा गांधींच्या 'असहकार चळवळी'त सहभागी झाले होते. चौरीचौरा प्रकरणानंतर म.गांधींनी असहकार चळवळ अचानक बंद केली. 'एका वर्षात स्वराज्य' अशी घोषणा त्यावेळी म. गांधींनी केली होती. परंतु घोषणेचा काहीच प्रत्यय न आल्याने ''गांधी तुम्ही चुकलात!'' अशी सडेतोड टीका पंतांनी गांधींवर केलेली दिसते.

Maharashtra Information Centre ने प्रकाशित केलेल्या "Shivram Mahadev Paranjape - The orator of Patriotism हे इंग्रजी भाषेतील पुस्तक केसरीवाडा ग्रंथालयात उपलब्ध झाले. या पुस्तकातून शिवरामपंतांच्या जीवनकार्याचा अभ्यास करता आला.

परांजपे कुलवृत्तांत (आ–२) विष्णू विनायक परांजपे (संपा) यशवंत छापखाना, पुणे या ग्रंथातून परांजपे घराण्याच्या कुलवृत्तांताविषयी सविस्तर माहिती घेता आली.

परांजपे घराण्याचा इतिहास परांजपे विष्णू वि. ज्ञानाविलास प्रकाशन, पुणे, या ग्रंथामधून परांजपे घराणे मूळचे कोकणातील असून हळूहळू सर्व महाराष्ट्रभर कसे वाढत गेले. त्यांच्या चालीरिती, देवधर्म, कुळाचार, व्यवसाय आदी गोष्टींची सविस्तर माहिती मिळाली.

शिवरामपंत परांजपे यांनी लिहिलेल्या 'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' या ग्रंथामधून मराठ्यांच्या विविध आघाड्यांवर झालेल्या लढायांचे वर्णन केलेले आहे. कचखाऊ धोरण, नेतृत्त्वाचा अभाव, लाचखाऊ प्रवृत्ती अशा विविध कारणांमुळे मराठे लढायांमध्ये हरले होते, असे स्पष्ट मत शिवरामपंतांनी मांडल्याचे आढळते.

शिवरामपंत परांजपे यांनी लिहिलेल्या 'पहिला पांडव' या नाटकामधून कर्ण व कुंती यांच्या संवादाची उत्तम रचना केलेली दिसते. कुंती कर्णाला तूच पहिला पांडव आहेस, आपल्या लहान भावांना समजून घे, त्यांच्याबरोबर युध्द करू नकोस, असा सल्ला देताना दिसते. या नाटकामधून कर्णाची उत्तम व्यक्तिरेखा रेखाटलेली दिसते.

शिवरामपंत परांजपे यांनी लिहिलेल्या 'साहित्य संग्रह भाग – १,२,३ मधून (य.गो.जोशी प्रकाशन, पुणे) साहित्य क्षेत्रातील शि.म.परांजपे यांची अभिजात उंची स्पष्ट होते. अतिशय अभ्यासपूर्ण लेख लिहून परांजपे यांनी मराठी साहित्याची खूप मोठी सेवा केल्याचे दिसून येते.

शिवरामपंतांनी लिहिलेल्या 'विंध्याचल' व 'गोविंदाची गोष्ट' या कादंबऱ्यांमधून स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय समाजाची स्थिती दाखविली आहे. प्रत्येकाला ब्रिटिश राजवटीबद्दल तिरस्कार, संताप कादंबरीतून व्यक्त केलेला दिसतो.

शिवरामपंताचे 'मानाजीराव' हे नाटक खूप महव्वाचे आहे. हे नाटक महाकवि शेक्सपियरकृत मॅकबेथ नाटकाच्या आधारे पंतांनी रचले. 'मानाजीराव' हे शेक्सपियरच्या 'Macbeth' या मूळ इंग्रजी नाटकाचे मराठीतील भाषांतर आहे.

ओगले शि.ल. व बर्वे द. के. यांच्या शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र (जीवनकार्य, आठवणी) या ग्रंथातून समग्र शिवरामपंतांच्या चरित्राची माहिती समजून घेता आली.

परांजपे वामन कृष्ण यांनी लिहिलेल्या 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' या ग्रंथातून शि.म.च्या बालपणापासून त्यांच्या जीवनकार्याचा सविस्तर आढावा समजून घेता आला.

परांजपे वामन कृष्ण यांच्या 'शिवरामपंत परांजपे –व्यक्ति–वक्तृत्त्व–वाङ्मय' या ग्रंथातून शि.मं.च्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू, त्यांनी दिलेली विविध व्याख्याने व त्यांचे समग्र वाङ्मय या सर्व गोष्टींवर प्रकाश टाकता आला.

लेले रा. के. यांनी लिहिलेल्या 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' या पुस्तकातून काळ वृत्तपत्राच्या उदय, विकास व अस्त या गोष्टींची माहिती मिळते.

मोरे सदानंद यांच्या 'लोकमान्य ते महात्मा खंड–१' या ग्रंथातून लोकमान्य टिळकांपासून ते महात्मा गांधींच्या काळातील विविध चळवळीचा अभ्यास करता आला. लोकमान्य टिळक जहालवादी विचारांचे तर महात्मा गांधी हे मवाळवादी विचारांचे होते. परंतु दोघांचे ध्येय भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे, हेच होते. म्हणूनच शिवरामपंत टिळक,गांधी दोघांच्याही चळवळीत सक्रीय सहभागी झाले व आपल्या कार्याचा वेगळा ठसा परांजपे यांनी उमटविला, याचे चित्रण या ग्रंथात पहावयास मिळते.

'भारताचा राजकीय आणि घटनात्मक इतिहास', प्रा. गायकवाड, प्रा. थोरात यांच्या ग्रंथातून भारतामध्ये ब्रिटिशांच्या आमगनानंतर झालेल्या प्लासी व बक्सारच्या लढाईचा वृत्तांत व जहाल व मवाळांच्या धोरणाची सविस्तर माहिती समजली.

प्रधान ग.प्र. यांनी लिहिलेल्या 'पुणे जिल्ह्यातील स्वातंत्र्य लढा' या ग्रंथात शि.म.परांजपे व लो. टिळक यांच्या राजद्रोहाच्या आरोपाखाली झालेल्या अटक सत्राचा आढावा घेण्यात आला आहे. जावडेकर शं.द. आचार्य यांनी लिहिलेल्या 'आधुनिक भारत' या ग्रंथात शि.म. व टिळक जहालवादी विचारांचे होते. भारतातील ब्रिटिश विरोधी चळवळीची माहिती समर्पक आहे.

पांढरे डॉ. नीला यांच्या 'शि.म.परांजपे वाङ्मयीन अभ्यास' या ग्रंथातून शिवरामपंतांचे विविध विषयावरील वाङ्मय याचा सविस्तर विचार करता आला.

'लंडनची बातमीपत्रे' मधून वि.दा.सावरकरांनी इंग्लंडमधून 'काळ' पत्रासाठी पाठविलेल्या बातम्यांचा आढावा घेता आला.

डॉ. फडतरे भूषण गोविंद यांच्या ‘भारतीय स्वातंत्र्य लढ्यात पुणे जिल्ह्याचे योगदान’ या ग्रंथातून शिवरामपंतांनी पुण्यामध्ये घेतलेल्या सभा व वक्तृत्त्वाचा सविस्तर आढावा घेतला.

डॉ. शेळके रघुनाथ धोंडिबा यांच्या ‘भाला वृत्तपत्राचे सामाजिक, धार्मिक आणि राजकीय कार्य‘ (१९०५ ते १९१० आणि १९२५ ते १९३५) या ग्रंथातून स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतातील वृत्तपत्रांची स्थिती, सामाजिक, धार्मिक, राजकीय कार्याचा आढावा घेता आला.

आवश्यकतेनुसार इतर दुय्यम साधनेही अभ्यासली व काही दुर्मिळ छायाचित्रांचाही वापर करून घेतला. तसेच प्राथमिक साधने, समकालीन साधने वापरून त्याला संबंधित समकालीन व्यक्तींच्या दृष्टीकोनाची जोड मिळाली.

अशा प्रकारे प्रबंधाचा विषय निश्चित झाल्यापासून विषयाच्या स्वरुपाने इतिहासाची अस्सल साधने, संदर्भ साधने, वृत्तपत्रे, साप्ताहिके, मासिके, कुलवृत्तांत, इ. मधून माहिती मिळविली. अशा प्रकारे माझ्या प्रबंधाचे मार्गदर्शक डॉ. रघुनाथ धोंडीबा शेळके सरांच्या मार्गदर्शनाखाली सदर प्रबंध सादर करण्यात आला.

- **प्रकरण योजना**

**प्रकरण –१ प्रस्तावना**

पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तावना, संशोधन आराखडा सांगितलेला आहे. त्यात संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्टे, संशोधनाची गृहीतके ,संशोधन मर्यादा, संशोधनाचे महत्व, तथ्य संकलन संदर्भीय संशोधन साहित्याचे पुनर्विलोकन, प्रकरण नियोजन या टप्प्याची विस्तृत मांडणी केलेली आहे.

शिवरामपंतांच्या जन्मापासूनचा आढावा घेतला आहे. शि.म यांचे पणजोबा सवाई माधवराव पेशवे यांचे पदरी नोकरीला होते. सवाई माधवरावांच्या मृत्यूनंतर राज्यात बरीच अव्यवस्था होती. रावबाजीच्या हाताखाली काम करणे अवघड झाले झाल्याने त्यांनी नोकरी सोडली. शि.म.ना लहानपणी बाळक्या या नावाने संबोधले जाई.

बालपणी ते अतिशय उनाडक्या करत असत. परंतु त्या कौतुकाच्या मानल्या गेल्या तरी पुढे मुलाची लक्षणे एकंदरीत ठीक नाहीत हे पाहून महादेवरावांनी शि. मं. ना रत्नागिरी येथे एका स्नेह्याकडे पाठविले पंतांना अभ्यासाची गोडी लागली व तेथील शाळेतून इंग्रजी चार इयत्ता पास झाले. पुढे विष्णूशास्त्री चिपळूकरांनी स्थापन केलेल्या पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूल मध्ये प्रवेश घेतला. तेथे पहिल्या खेपेस पंत मॅट्रिकच्या परीक्षेत नापास झाले. परंतु निराश होऊन खचून न जाता १८८४ साली त्याच परीक्षेत जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप मिळविली.

त्यावेळच्या पध्दतीप्रमाणे शिवराम पंतांचे लग्न लवकर म्हणजे त्यांच्या वयाच्या अकराव्या वर्षी सन १८७५ च्या वैशाखात झाले. मुलगी ७ वर्षाची होती. गोरेगावचे गणेशपंत गोखले यांची कन्या. मुलीचे माहेरचे नाव बयोताई सासरी मुलीचे नाव जानकी ठेवण्यात आले.

कॉलेजचे पहिले वर्ष फर्ग्युसन कॉलेजमध्ये काढले. व त्यावर्षी लो. टिळक यांच्या अध्यापनाचा त्यांना लाभ झाला. त्यानंतर डेक्कन कॉलेजमध्ये नाव दाखल केले. १८९० साली ते बी.ए. पास झाले. त्यांना कॉलेजची फेलोशिप देण्यात आली. पुढे १८९५ साली ते एम.ए. झाले. व संस्कृतमध्ये त्यांना पाचशे रुपयांचे व चारशे रुपयांचे अशी भगवानदास व गोकुळदास पारितोषिके मिळाली. सन १८९६-९७ कै. विष्णुपंत भावे महाराष्ट्र कॉलेजमध्ये संस्कृतचे अध्यापक म्हणून कार्य केले.

## प्रकरण - २ - राजकीय कार्य -

लो. टिळकांनी राष्ट्रीय जागृतीसाठी सार्वजनिक गणेशोत्सव व शिवजयंती उत्सव सुरु केले. या सणांना धार्मिक स्वरुप देऊन महाराष्ट्रात एका महान परंपरेला सुरुवात केली. कॉलेजमध्ये काम करीत असतानाच विद्यार्थिदशेतच राजकारणाचे बाळकडू घेतलेल्या शिवरामपंतांना शिक्षणक्षेत्राची मर्यादा अपुरी वाटू लागली. स्वातंत्र्यासाठी तयार झालेले मन त्यांना स्वस्थ बसू देत नव्हते. खरोखरीच्या रणवीराला लुटुपुटुच्या लढाईत समाधान वाटेना. कॉलेजमधील नोकरी सोडल्यावर पंतांनी राष्ट्रसेवा करण्याचा निश्चय केला.

स्वदेशप्रेमाची ज्योत कायमची तेवत ठेवण्यासाठी लोकमान्यांनी जे अनेक मार्ग शोधून काढले. त्यापैकी गणेशोत्सवाची चळवळ सुरु केली होती. दहा दिवस ज्ञानसत्र चालू ठेवणे हाच त्यांचा उद्देश होता. त्या ज्ञानसत्रापैकी बराचसा भाग शिवरामपंतांनी आवडीने स्वत:च्या

शिरावर घेतला. व्याख्याने, प्रवचने, पुराणे करण्याचा परिपाठ त्यांनी सुरु ठेवला. रायगडावर शिवजन्मोत्सव साजरा करण्यासाठी जमलेल्या श्रोत्यांसमोर शि.म. परांजपे यांनी ''शिवाजी महाराज निर्माण झाले त्यावेळची महाराष्ट्रीयांची स्थिती व महाराजांनी पुढे आपल्या सामर्थ्याने दाखविलेले दोन सुखाचे दिवस'' या विषयावर व्याख्यान झाले. रायगडासारख्या जुन्या ऐतिहासिक किल्ल्यावर स्वराज्य संस्थापनेची भाषा शि.मं.च्या मनाला किंवा कानाला ऐकू येऊ लागली.

लो. टिळकांनी पुण्यात सार्वजनिक सभेच्या मार्फत दुष्काळी चळवळीची मोहीम हाती घेतली. परांजपे या सभेचे एक सेक्रेटरी म्हणून त्याही आंदोलनात सहभागी झाले होते. १/१०/१९०५ रोजी सार्वजनिक सभेच्या दिवाणखान्यात न.चि. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली विदेशी मालावरील बहिष्कारात ठसठशीत स्वरुप यावे म्हणून विदेशी कपड्यांची होळी करण्यात यावी ही कल्पना सावरकरांनी आपल्या भाषणात मांडली. काळकर्ते प्रो. परांजपे या सभेला उपस्थित होते. यावेळी झालेल्या मिरवणुकीत भालाकार, भोपटकर ,टिळक व परांजपे सामील झाले होते. लकडीपुलाच्या पलीकडे विदेशी कपड्यांची होळी पेटविण्यात आली होती. स्वदेशी बहिष्काराच्या चळवळीत शिवरामपतांनी शेकडो व्याख्याने दिली. याखेरीज दौरे, व्याख्याने, तरुणांशी खलबते हे उद्योग चालूच होते.

टिळकांच्या मृत्यूनंतर म. गांधींनी सुरु केलेल्या १९२०च्या असहकार चळवळीत शिवरामपंत सहभागी झाले. देशासाठी किंवा शिस्तीसाठी त्यांनी मिजाशी पोशाखाचा त्याग केला व जाडीभरडी वस्त्रे अंगावर घेतली व अखेरपर्यंत हे व्रत टिकविले. अशा प्रकारे विविध चळवळींच्या माध्यमातून देशाच्या स्वातंत्र्यासाठी राजकीय कार्य केले.

## प्रकरण – ३ – सामाजिक कार्य –

भारतीय समाजाला स्वतंत्रतेची जाणीव निर्माण करुन देणे महत्त्वाचे असल्याचे शिवरामपंतांना नेहमी वाटे. त्यानुसार समाजातील सर्वसामान्य जनतेचे वैचारिक प्रबोधन करण्यासाठी त्यांनी विविध आंदोलनांच्या माध्यमातून जागृती केली.

वंगभंगाच्या वेळी स्वदेशी बहिष्काराच्या आंदोलनात त्यांनी शेकडो व्याख्याने दिली. त्याचप्रमाणे पुढे टिळकांच्या होमरुल चळवळीत त्यांनी भाग घेतला. प्रकट करावयाच्या

चळवळीतून जागृती करावयाची असेल, रान उठ्वायचे असेल त्यात पुढाकार शि.म. घेत असत. १८९६ च्या दुष्काळी चळवळीत, शिवाजी व गणपती उत्सव यामधून त्यांनी समाजाची सेवाच केली. वेळोवेळी टिळकांबरोबर दौऱ्यावर जाऊन सामाजिक ऐक्य वाढविले. राजाने प्रजेकरिता काय केले पाहिजे? सन १८९६ साली दिलेल्या व्याख्यानात त्यांनी सरकारच्या चुकांचा पाढा वाचला. पुण्यातील तरुणांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करुन देण्याचे काम शिवरामपंतांनी केले. देशात असहकार चळवळीमुळे जनतेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्या चळवळीत शिवरामपंत मनापासून सामील झाले. टिळक स्वराज्य फंडाला स्वत: ५०० रुपये दिले.

'दुष्काळ निवारण', 'प्लेग निवारण', 'होमरुल चळवळ', 'असहकार चळवळ' अशा विविध उपक्रमात सहभागी होऊन सामाजिक कार्याला शिवरामपंतांनी चांगलाच हातभार लावला.

## प्रकरण – ४ – वृत्तपत्रीय कार्य –

धार्मिक, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक आणि वाङ्मयीन विषयांची नि:पक्षपाताने व निर्भयपणाने चर्चा करणारे 'काळ' (The Times) या नावाचे नविन साप्ताहिक मराठी वर्तमानपत्र काढले. 'काळ'चा पहिला अंक शके १८२० च्या पहिल्या दिवशी म्हणजे पाड्व्याला तारीख २० मार्च १८९८ रोजी शुक्रवारी सकाळी बाहेर पडला. पहिल्या अंकातच काळ पत्राच्या भावी यशाच्या आणि धोरणाच्या खुणा जाणत्या लोकांना पटण्यासारख्या होत्या. सरकारवर कडक लेख लिहायला सुरुवात झाली. वासुदेवराव चाफेकर, त्यांचे मित्र साठे व रानडे यांनी द्रविड्बंधूंवर पिस्तूल झाडून त्यांना मारले. या प्रकारामुळे खूप खळबळ उडाली. या विषयावर शिवरामपंतांनी 'चाफेकर व रानडे' असा अग्रलेख लिहिला होता. हा अग्रलेख पुढे कित्येक दिवस पुण्यात गाजत राहिला होता. यानंतर शिवरामपंतांच्या राहत्या वाड्यात पोलिसांची जप्ती आली होती. पण त्यात काही सापडले नाही हा वरील तेजस्वी व परिणामकारक अग्रलेख सावरकरांच्या वाचनात आला.

लो. टिळकांच्या 'केसरी'ने काळाचे स्वागत केले. स्वातंत्र्य हे लोकांचे ध्येय आहे व ते नेमस्त मवाळ लोकांच्या कार्यपध्दतीने मिळवायचे नाही. अर्ज, विनंत्या स्वातंत्र्य मिळविण्याचे

मार्ग नव्हेत, त्यासाठी जरुर असेच दडपण व दहशत सरकारला बसली पाहिजे अशा प्रकारची शिवरामपंतांची मते होती. दिवसेंदिवस शिवरामपंतांची लेखणी अधिकाधिक कडक होऊ लागली. शिवरामपंतांच्या वक्रलेखांच्या अमोघ शस्त्रामुळे प्रतिपक्षीयांना एक वेळ टिळक परवडले पण परांजपे नकोत असे वाटत होते.

काळ पत्राचा खप वाढत वाढत जाऊन १९०४ साली तर तो बारा हजारांच्या पुढे गेला. तर काळाचे सोळा हजार वर्गणीदार होऊ न सुटा खप धरुन बावीस हजार प्रती काढाव्या लागत असत.

समाज व्यवस्थेतील अन्याय, गरिबांचे रक्तशोषण, संपत्तीची विषम वाटणी इ. बद्दलची सोशॅलिस्ट पध्दतीची विचारसरणी शिवरामपंत 'काळा'तून मांडत होते. सन १९०० साली काळ पत्रात 'लोकमान्य' आणि 'राजमान्य' या विषयावर अग्रलेख लिहिला.

१९०५ पासून १९०८ पर्यंतची तीन चार वर्षे 'काळ'ने बजावलेल्या कामगिरीने परमोच्च शिखर गाठले. या अवधीत परराष्ट्रीय घडामोडींचे मार्मिक विवेचन, देशातील निरनिराळ्या विचारप्रवाहांचे वर्गीकरण, जगाच्या पाठीवर त्यावेळी चाललेल्या लढाया व क्रांत्या यांचा इतिहास व त्यांच्या बुडाशी असलेली तत्त्वे, भारतीयांवर राज्यकर्त्यांकडून अनेक बाजूंनी होणारे आक्रमण, त्यावर उपाय म्हणून स्वदेशी बहिष्कार इत्यादींचा पुरस्कार, संपासारख्या राजकीय शस्त्राची उपयुक्तता, हिंदुस्थानातील गरीब रयतेचे हाल वाचकांपुढे मांडून त्यांना सद्यःस्थितीची करून दिलेली जाणीव, शिवाजी महाराजांच्या स्फुर्तीदायक चरित्रातील गतगोष्टी अशा प्रकारे काळपत्रात लेखन केलेले आहे.

मुझफ्फरपूर या ठिकाणी झालेल्या बॉम्ब हल्ल्यात खुदीराम बोस, प्रफुल्लचंद्र चाकी यांनी मिसेस केनेडी व त्यांची मुलगी यांना प्राण गमवावा लागला. अशी बातमी आली. शिवरामपंतांनी यावर 'काळा'त 'हिंदुस्थानात बॉम्ब गोळे येण्याला मूळ कारण इंग्लिश लोकच!' असा लेख लिहिला. या लेखामुळे इंडियन पीनल कोडचे कलम–१२४अ व १५३अ या कलमांखाली शिवरामपंतांवर आरोप ठेवण्यात आला. झडतीत ऑफिसातील वह्या, पावत्या, पत्रव्यवहार पुस्तके, हस्तलिखिते, मजकूर वगैरे एका गाडीच्या भरतीचे सामान जप्त करण्यात आले. या

खटल्यात शिवरामपंतांना १९ महिने शिक्षा झाली. 'काळ'कडून दहा हजाराची जामिनकी मागण्यात आली. अशा प्रकारे 'काळ'पत्र १९०८ ला बंद पडले.

## प्रकरण – ५ – लेखन कार्य –

शिवरामपंत परांजपे यांच्या अंत:करणातील स्वदेशभक्ती, स्वाभिमान, स्वतंत्र बुध्दीचा प्रखरपणा हे त्यांच्या लेखनातून प्रत्येक शब्दामधून दिसून येतो.

सन १९२९ मध्ये बेळगाव येथे भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून शिवरामपंतांची निवड झाली होती.

तर्कशास्त्र, भामिनीविलास, प्रसन्नराघव इ. संस्कृत ग्रंथाच्या सटीक इंग्रजी आवृत्या काढल्या. शेक्सपियरच्या मॅक बेथने मानाजीराव, गिलरच्या रॉबर्टचे भीमराव व ॲडिसनच्या केटोचे रामदेवराव अशी रुपांतरित नाटके लिहिली. संगीत कादंबरी नाटकही लिहिले. पहिला पांड्व व अर्धवट राहिलेली मीराबाई व महाराष्ट्र लक्ष्मी, 'जयसिंग व पद्मिनी' ही नाटके लिहिली. विंध्याचल कादंबरी, गोविंदाची गोष्ट दीर्घकथा, साहित्यसंग्रहाचे दोन भाग, तर्कसंग्रह व अर्थसंग्रह, मराठ्यांच्या लढायांचा इतिहास, इ. ग्रंथ लिहिले. आम्रवृक्षमध्ये गिरणी कामगारांच्या मनात उद्भवलेले विचार सांगितलेले आहेत. प्रभाकरपंतांचे विचार ही लघुकथा पिंजऱ्यातील पोपट, एका चिनीबाईची गोष्ट, मेघदूतावरुन कालिदासाविषयी तर्कशास्त्रीय विचारसरणीचा लेख, चारुदत्त आणि मृच्छकटिक हा चिकित्सापूर्ण लेख, प्रियदर्शिका व नागानंद ही नाटके कोणाची ? लेख श्रीमद्भगतगीतेतील एक शंकास्थान, शाकुन्तल नाटकाचा चौथा अंक विष्णुसहस्त्रनाम अशा प्रकारच्या लेखांवरून त्यांचा संस्कृत ग्रंथांचा अभ्यास व्यापक व सूक्ष्म होता हे स्पष्ट होते.

बौध्दधर्मातील एक नमुना करताना असो किंवा अंगावर शहारे आणणारी इफिजिनिया आणि ओरेस्टेस ही ग्रीक पुराणातील करुण कहाणी, मदनदहन बाह्यांगी स्वर्गाचे वर्णन, मनाची मीमांसा गंभीरशास्त्रीय निबंध, नवी सृष्टी पूर्वजन्म किंवा पुनर्जन्म इ.

देशभक्तीची उदाहरणे शोधण्याकरिता त्यांनी रोम, ग्रीस, स्वित्झर्लंड, रशिया, अमेरिका इ. राष्ट्रांच्या इतिहासाचे परिशीलन केले.

'महात्मा गांधी तुम्ही चुकलात' असे सडेतोड व स्पष्टोद्‌गार काढण्यासाठी त्यांनी कमी केले नाही. इंग्लिश अधिकारी नेटिव राजे आणि इंडियन रयत कमकुवतपणा की प्रजाद्रोह इ. लेखांवरुन शुध्द स्वातंत्र्याचा महाराष्ट्रातील पहिला प्रतिपादक अशी त्यांची पुण्यस्मृती महाराष्ट्राला चिरकालीन राहील.

## प्रकरण – ६ धार्मिक कार्य

शिवरामपंत परांजपे यांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्य अवर्णनीय आहे. राजकीय, सामाजिक, त्यांच्या लेखन कार्याबरोबर त्यांचे धार्मिक कार्य महत्त्वाचे आहे. आपल्या काळ पत्राच्या माध्यमातून त्यांनी समाजाचे सामाजिक प्रबोधन केलेले आहे. याशिवाय लो.टिळकांबरोबर शिवजयंती उत्सव व गणपतीउत्सव यांच्या माध्यमातून विविध व्याख्यानांतून महाराष्ट्रात नवीन चळवळीची सुरुवात केली. महाराष्ट्रात एका नव्या युगाला सुरुवात झाली. धर्माच्या माध्यमातून लोकांच्या विचारात बदल करता येतो, याची जाणीव शि.मं.ना होती. म्हणून 'काळ' पत्रातून धार्मिक बाबतीत आपले विचार व्यक्त केलेले दिसतात. हिंदु लोक धर्माला पवित्र आणि आदराचे स्थान देतात. ख्रिश्चन, हिंदु, मुस्लीम, जैन, बौध्द अशा अनेक धर्माच्या चर्चेतून लोकांमध्ये एकवाक्यता निर्माण करण्याचा प्रयत्न परांजपेंनी केलेला दिसतो. ब्रिटिश सत्तेविरुध्द आवाज उठविण्याचे काम शि.मं.नी केलेले दिसते.

## प्रकरण – ७ – निष्कर्ष–

'शिवराम महादेव परांजपे यांच्या जीवन कार्याचा चिकित्सक अभ्यास(१८६४–१९२९)' यामध्ये संशोधकाने प्राप्त केलेल्या विषयासंदर्भातील निष्कर्ष उद्दिष्टानुसार प्रकरणात मांडलेले आहे.

इतर उपलब्ध प्राथमिक कागदपत्रे तसेच संबंधित छायाचित्रे दिलेली आहेत. संदर्भसूचीमध्ये अभ्यासासाठी वापरलेल्या साधनांचा निर्देश/यादी दिलेली आहे.

## संदर्भग्रंथ


१. परांजपे विष्णू विनायक (संपा.) परांजपे कुलवृत्तांत आ.–२ शंकर रामचंद्र दाते यशवंत छापखाना–पुणे–२ पृ.९

२. अग्निरे गाव–तत्रैव–पृ.२३

३. तत्रैव–पृ.४३–४५

४. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, पृ. ४

५. पांढरे डॉ. नीला, 'शि.म. परांजपे वाङ्मयीन अभ्यास', पुष्प प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती जून १९९३.पृ. १६

६. परांजपे वामन कृष्ण,उपरोक्त पृ. ४,५,६,८

७. तत्रैव पृ.९,१०

८. तत्रैव पृ. २१

९. परांजपे प्र.ना., 'काळकर्ते शिवरामपंत महादेव परांजपे' गंधर्ववेद प्रकाशन, नोव्हेंबर २०१०, पुणे–३० पृ. २२,२३

१०. तत्रैव पृ.२१

११. ओगले शि.ल., बर्वे दत्तात्रय केशव, 'शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र (जीवन कार्य व आठवणी)', य.गो.जोशी प्रकाशन, पुणे–२ पृ.५,६

१२. The Manager Governement central Pres- Bombay-4 Shivram Mahadev Paranjape .The Order of Patriotism Page 2

१३. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. १९४५ आवृत्ती पहिली, पृ. २३

१४. तत्रैव पृ. ४३

१५. तत्रैव पृ. ४३,४६

१६. परांजपे प्र.ना. 'काळकर्ते शिवरामपंत महादेव परांजपे' गंधर्ववेद प्रकाशन, नोव्हेंबर २०१०, पुणे–३० पृ. १७

१७. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. १९४५ आवृत्ती पहिली, पृ. ४६

१८. परांजपे शि.म., काळातींल निवडक निबंध भाग १, य.गो.जोशी प्रकाशन, पुणे निबंध क्र. १५ ते १७ काळातील राज्यापहार आणि न्याय, पृ. ८० ते ९५

१९. इन्कमटॅक्स आणि सोशिॲलिझम, परांजपे शि.म.,का. नि.नि. भाग २, निबंध क्र. २१ पृ. ११८ ते १२५

२०. परांजपे वामन कृष्ण, उपरोक्त पृ.५५

२१ तत्रैव पृ.५७

२२. तत्रैव पृ.५८, ५९,६०

२३. तत्रैव पृ.६४

२४. तत्रैव पृ.६६

२५. तत्रैव पृ.६७

२६. ओगले शि.ल., बर्वे दत्तात्रय केशव, 'शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र' (जीवन कार्य व आठवणी), य.गो.जोशी प्रकाशन, पुणे–२ पृ.११,१२

२७. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. १९४५ आवृत्ती पहिली, पृ. ७४,७५

२८. The Manager Governement Central Press - Bombay - 4 Shivram Mahadev Paranjape. The Order of Patriotism Page 2, 3

# प्रकरण – २

# राजकीय कार्य

## प्रास्ताविक –

महाराष्ट्र कॉलेजमधून प्रोफेसरपदाचा राजीनामा देऊन पूर्णपणे स्वातंत्र्य चळवळीत स्वतःला झोकून देण्याचे धोरण शिवरामपंतांनी आरंभिले. कॉलेजपासूनच लोकमान्य टिळकांच्या विचारांचा प्रभाव पंतांवर होता. सळसळते रक्त, तरुण वय, ब्रिटिश सत्तेविषयी प्रचंड संताप, देशहिताची मनःपूर्वक तळमळ अशा अनेक कारणांमुळे टिळकांच्या जहाल राजकारणाकडे शि.म.परांजपे आपसुकच वळले. टिळकांचे सर्वच विचार त्यांना पटत होते, असे नव्हते. तरीही टिळकांबद्दल त्यांच्या मनात कमालीचा आदर होता. महाविद्यालयीन जीवनातच शि.मं. चे टिळकांकडे जाणे–येणे सुरु होते. लोकमान्य टिळकांनी गणेशोत्सव व शिवजयंती उत्सव सुरू केले होते. या उत्सवाला लोकमान्यांनी सार्वजनिक स्वरुप दिले. त्यातून समाजाची वैचारिक जागृती होईल, असा त्यांना विश्वास होता. सन १८९५ साली टिळकांनी विंचूरकरांच्या वाड्यात स्वतःच्या गणपतीपुढे मेळ्यांच्या पानसुपारीचा कार्यक्रम ठेवला होता. त्या कार्यक्रमाला शि.म.परांजपे जातीने हजर होते.[१,२] त्याचा तपशील पुढीलप्रमाणे –

विंचूरकरांच्या वाड्यात टिळकांच्या लॉ क्लास गणपतीपुढे प्रो. भानु, परांजपे, साठे यांची भाषणे झाली. ता. २० सप्टेंबर १८९६च्या केसरीत परांजप्यांच्या व्याख्यानाचे इतिवृत्त खालीलप्रमाणे दिलेले आहे....

''सोमवारी प्रो. परांजपे यांचे 'निमित्तमात्रम् भवसव्यसाचित' या श्लोकावर व्याख्यान होते. विषय तत्त्व विचाराचा असून गहन होता. 'अनंत' व 'मर्यादित' यांची तुलना करून कर्म व दैववादाच्या जवळजवळ व्याख्याने पोहचतात. तो मेघराजांनी विशेष कृपा केल्यामुळे व्याख्यान बंद ठेवणे भाग पडले. भाषणांतून त्यांची बोलण्याची धाटणी, विचारसरणी व आवेश अत्यंत मोहक आहेत. प्रेक्षकांचे केसरीतले उद्गार पाहिले म्हणजे शि.मं.च्या वक्तृत्त्वाची छाप श्रोत्यांवर कशी पडू लागली होती, याचीही कल्पना येते.''[३]

महाराष्ट्र कॉलेजमध्ये संस्कृत विषयाचे ज्ञान विद्यार्थ्यांना देण्यामध्ये शि.म.परांजपे खूप रमून जात असत. विद्यार्थी खिळवून ठेवण्याची त्यांच्याकडे उत्तम कला होती. थोड्याच काळात ते विद्यार्थीप्रिय शिक्षक बनले. तास कधी संपत असे ते कळत नसे. परंतु त्यांच्या चळवळीतील सहभागामुळे त्यांना महाराष्ट्र कॉलेजच्या प्राध्यापकपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्याबद्दल शि.मं.च्या मनात कोणतीही खंत नव्हती. देशसेवा करण्यासाठी ते आता पूर्णपणे मोकळे झाले होते. कोणत्याही चौकटीत ते बंदिस्त नव्हते. नुसत्या कॉलेजच्या विद्यार्थ्यांना शिकवून देशसेवा होणार नाही, याची त्यांना जाणीव होती. सर्व समाजामध्ये जनजागृती करण्याची आवश्यकता वाटल्याने त्यांनी एक नवीनच पध्दती शोधून काढली. ती म्हणजे विविध मंदिरे व देवळांमधून पुराणे सांगणे. समाज हा धार्मिक आहे, त्याचा योग्य वापर करण्याचे त्यांनी ठरविले. देवळांमधून प्रो. परांजपे जुन्या पुराणिकबुवांप्रमाणेच व्यासपीठावर पोथी ठेवून पुराण सांगत असत. रामायण व महाभारत इतर श्लोकांच्या माध्यमातून एखादा प्रसंग सांगून सर्व राजकारण व समाजकारणाचा ते आढावा घेत. चालू ब्रिटिश राजनीतीचे सांगोपांग वर्णन करीत असत. त्यांची ही पुराणे नसून जणू काही बैठी व्याख्यानेच होती, असे म्हणावयास हरकत नाही. वेगवेगळ्या, विभिन्न पौराणिक कथांच्या या प्रयत्नाला लोकांनीच 'राजकीय पुराण' असे नाव दिले. राजकीय जनजागृतीसाठी देवळांतील पुराणांचा योग्य व उत्तम शैलीत उपयोग करून घेतला. त्यातून त्यांच्या भावी वक्तृत्त्व कलेचा विकास झाला. देवळातील व्यासपीठावरून जनतेला त्यांना बऱ्याच गोष्टी सांगता आल्या.[४]

महाविद्यालयीन शिक्षण व इंग्रजी शिक्षण घेतलेल्या विविध बक्षिसे प्राप्त केलेल्या पदवीधराने पुराणिकबुवा व्हावे, याचे अनेकांना वैषम्य वाटले. परंतु शि.म.परांजपे यांनी मात्र आपली पुराण सांगण्याची कला दिवसेंदिवस वाढविली. ओघवत्या, रसाळ वाणीमध्ये पुराणे ऐकणाऱ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत होती. पुराणे ऐकणाऱ्यांच्या गर्दीने मंदिरे फुलून जात होती. ही गोष्ट त्यांचे गुरु डॉ. भांडारकरांना समजली. त्यांनी आपल्या शिष्याला म्हणजे शि.म.परांजपे यांना बोलावून घेतले. या प्रकाराबद्दल त्यांची कान उघाडणी केली, ''हे तुम्ही काय आरंभिले आहे? गळ्यात तंबोरा अडकवून बोवा का होणार आहात? आपली विद्वत्ता अशी वाया दवडू नका!'' यावर शि.म.परांजपे यांनी कोणतेही उत्तर दिले नाही. पण आपली पुराणे सांगण्याची पध्दती बंदही केली नाही.[५]

टिळकांच्या प्रयत्नाने सुरू झालेल्या गणेशउत्सवात शि.मं.नी अगोदरच हजेरी लावून व्याख्यान दिले होते. त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे आराध्य दैवत मानल्या गेलेल्या शिवाजी महाराजांच्या जयंतीचा उत्सव साजरा करण्याचा लोकमान्यांचा मानस होता. त्यानुसार शिवरायांची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्याचा जिर्णोध्दार करून शिवजन्मोत्सव साजरा करण्याचे ठरविले. परंतु ऐनवेळी कुलाब्याच्या कलेक्टरने या उत्सवाला परवानगी नाकारली. परंतु लोकमान्य टिळकांनी गव्हर्नर लॉर्ड सँढर्स्ट यांच्याकडे महाबळेश्वराला जाऊन परवानगी मिळविली व कार्यक्रमाचा मार्ग मोकळा झाला.[६]

शिवरामपंत मूळचे महाडचे असल्याने या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी जणू त्यांच्यावरच होती. शि.मं.नी अगोदरच महाडला जाऊन आसपासच्या गावातील लोकांशी विचार–विनिमय करून उत्सव यशस्वी करण्याचे आवाहन केले. लोकमान्य टिळकांच्या स्वागताची जय्यत तयारी केली. शि.मं.चे लहान बंधू गणपतराव व विष्णुपंत यांनी सामानसुमान – शिधासामग्री गडावर नेणे व कार्यक्रमासाठी स्वयंसेवक आणणे या गोष्टींकडे विशेष लक्ष दिले.[७]

शेवटी लोकमान्य टिळक महाडात त्यांच्या सहकाऱ्यांबरोबर पोहोचले. महाडहून आठ मैलांवर असलेल्या किल्ले रायगडाच्या पायथ्याकडे सर्वजण निघाले. किल्ले रायगडाच्या पायथ्याशी एक शिबीर उघडण्यात आले होते. या हकीकतीचे शिवरामपंतांनी केलेले वर्णन.... ‘‘रायगडावरील पहिल्या शिवाजी उत्सवाच्या वेळी लोकमान्य रायगडास जाण्याकरिता आले. त्यावेळी त्यांच्याबरोबर श्री. रा. रा. माधव कृष्ण देशमुख व कै. नारायण बापूजी कानिटकर हे होते. संध्याकाळच्या वेळी रायगडाच्या पायथ्याशी मंडळी जाऊन पोहोचली. तेथे रा. रा.धारप, हर्डीकर वगैरे महाडच्या अनेक उत्साही स्वयंसेवकांनी उतरण्याची वगैरे सर्व जय्यत तयारी करून ठेवलेली होती व तेथेच रायगडावर पाठवावयाच्या सामानसुमानाचाही मुख्य कॅम्प होता व येथून धान्य, भांडीकुंडी वगैरे सामान गडावर पोचते करण्याकरिता आसपासचे शेकडो शेतकरी लोक खालून गडावर आणि गडावरून खाली अशा खेपा करीत होते. हे बहुतेक मजूर गडावरची खेप करून आपल्या गडाखालच्या छावण्यामध्ये संध्याकाळच्या वेळी परत आलेले होते. लोकमान्य टिळकही त्यावेळी छावणीत आलेले होते. लोकमान्य त्या छावणीमध्ये आल्यानंतर रात्रभर तेथे विश्रांती घेतील आणि नंतर पहाटेस ते गड चढून वर जातील, अशी पुष्कळांची सामुहिक कल्पना होती. पण हा कार्यक्रम अविश्रांत श्रम करण्याची सवय असलेल्या

लोकमान्यांच्या उत्साही धडाडीला मुळीच पसंत पडला नाही. त्यांनी संध्याकाळचा फराळ झाल्यावर थोडी विश्रांती घेतल्याबरोबर रात्रीच्या रात्री गडावर चढून जाण्याची तयारी चालविली. अशा रितीने शेकडो लोक इतक्या रात्री रायगडावर चढून जाण्याचे धाडस करण्याला लोकमान्यांच्या उद्दीपक उदाहरणामुळे उद्युक्त झाले. लगेच शेकडो मार्गदर्शक, मजुरांनी आपल्या चुली पेटविल्या. ओझेवाल्या मजुरांनी पाहुणे मंडळींचे बोजे आपल्या डोक्यावर घेतले आणि चार–पाच लोकांच्या दरम्यान एक–एक चूडवाला मनुष्य (मशाल धरणारे) अशा रितीने जवळजवळ चार–पाचशे लोक एक एक माणसांची रांग करून चालू लागले. रात्रीचा प्रसंग असल्यामुळे व कित्येक ठिकाणची पाऊलवाट अगदी अरुंद असल्यामुळे चार–चार, पाच–पाच माणसांची एक–एक रांग करून त्या डोंगरातून चालणे शक्य नव्हते. शेकडो चुडी पेटलेल्या असून त्यांची लांबचलांब अशी एक रांग डोंगरातील वळणे घेत घेत वर चढत असलेली पाहून तळच्या छावणीमध्ये असलेल्या लोकांना हा डोंगरातील देखाचा फारच मनोवेधक भासला व खुद्द शिवाजी महाराजांच्या वेळी शिवाजी महाराज आणि त्यांचे मावळे किल्ला सर करण्याच्या वेळी असेच रात्रीचे वर चढून जात असले पाहिजेत, हे त्या काळचे ऐतिहासिक चित्र त्यांच्या डोळ्यापुढे उभे राहून प्रस्तुतच्या पडत्या काळामध्येंही सर्वांच्या अंगात वीरश्री संचारण्याचा संभव दिसू लागला. त्यातच ''शिवाजी महाराज की जय!'', ''टिळक महाराज की जय!'' अशा रणगर्जना त्या गडावर होऊ लागल्या आणि त्यांचे प्रतिध्वनी त्या गडाच्या दऱ्या–खोऱ्यांतून उत्पन्न होऊ लागले. त्यावेळी तर हा सगळा रायगड किल्ला त्या चुडीच्या उजेडामध्ये स्वदेशभक्तीने प्रज्वलित होऊन स्वराज्य संस्थापनेची भाषा बोलू लागला की काय, असा भास झाला. अशारितीने रातोरात लोकमान्य रायगड चढून वर गेले.''[८]

दुसऱ्या दिवशी रायगडावर शिवजन्मोत्सव हा उत्सव मोठ्या थाटामाटात व उत्साहास संपन्न झाला. संध्याकाळी प्रो. शि.म. परांजपे, नारायण बापूजी कानिटकर व दापोलीचे गोगटे यांची भाषणे झाली. सर्वप्रथम शि.म. परांजपं यांचे भाषण झाले, ''शिवाजी महाराज निर्माण झाले त्यावेळी महाराष्ट्रीयांची स्थिती व महाराजांनी पुढे आपल्या सामर्थ्याने त्यांना दाखविलेले दोन सुखाचे दिवस'' या विषयावर व्याख्यान झाले. हेच शि.म. परांजपे यांचे पहिले जाहिर व्याख्यान होय.[९,१०]

कार्यक्रम संपल्यावर लो. टिळकांचा शि.म.परांजपे यांनी आपल्या महाडातील घरी नेऊन यथोचित सत्कार व आदरतिथ्य केले. लो. टिळकांनी देखील शि.मं.च्या आईला भेटून नमस्कार करून तेथून निरोप घेतला. अशाप्रकारे शि.म.परांजपे यांना टिळकांनी सुरू केलेल्या गणेशोत्सव व शिवजयंती उत्सवाचा उपयोग राष्ट्रहित व समाजहिताच्या कार्यासाठी करता आला.[११]

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिकसभेअंर्तगत दुष्काळी चळवळ सुरू केली. प्रो. शि.म.परांजपे यांना सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी नेमण्यात आले. लो. टिळकांबरोबर स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्यात परांजपेंनी उडी घेतल्याने महाराष्ट्र कॉलेजच्या संस्थांपकांना परांजपेंचे चारित्र्य ठीक वाटेना. कॉलेज भरभराटीला यावे, मोठे व्हावे असे वाटत होते. परंतु शि.म.परांजपे सतत चळवळीत सहभागी होऊ लागल्याने अखेर त्यांना आपल्या प्रोफेसरपदाचा राजीनामा द्यावा लागला. दोनच वर्षे प्रोफेसरपदावर काम केले तरीही शि.मं.च्या नावामागे प्रो. हा शब्द कायमचा कोरला गेला. त्यांचा गौरव केल्यासारखे लोक त्यांना प्रो. शिवराम महादेव परांजपे या नावाने ओळखत असत. परंतु प्रोफेसर पदाचा राजीनामा दिलेल्या शि.मं.ना आता विविध चळवळीत सक्रिय सहभागी होणे खूप सोपे झाले. सरकारशी प्रत्यक्ष लढण्यासाठी शि. म. आता सज्ज झाले होते. दिवसेंदिवस त्यांच्या उत्तम वक्तृत्त्वाची झलक लोकांना पहावयास मिळत होती.[१२]

### १. हसबनीसांच्या बखळीतील गणेशोत्सव –

''शुक्रवारी सायं. प्रो. परांजपे यांचे हसबनिसांचे बखळीत 'राजाने प्रजेकरिता काय केले पाहिजे' या विषयावर व्याख्यान झाले. 'राजद्रोह व प्रजाद्रोह' यांच्या व्याख्या तात्त्विकदृष्ट्या फारच प्रगल्भ होत्या. कण्या टाकून कोंबडी झुंजविण्याचा रोमचा कित्ता इंग्रजांनी वळविल्यासारखा दिसतो आहे. तेव्हा आम्ही प्रजाजनांनी सावध असावे व आपसांतील तंटे बंद करावे. सरकारासही ह्या गोष्टी समजून सांगाव्या. प्रजाद्रोहाचे पाप सरकारचे हातून होऊ देऊ नये धर्मजागृती करिता आम्ही उत्सव करितो, भांडणाकरिता नव्हे, हे सरकारच्या ध्यानात प्रजाजनांनी आणून दिले पाहिजे.''

## २. लोणावळे येथील ‘तरुण मित्रमंडळी’ तर्फेचा उत्सव –

“अडचणींमुळे नामदार टिळकांस आज येता आले नाही. याबद्दल आपण सर्वांस आज वाईट वाटत आहेच. पण विशेषतः मला त्यांचेच जागी बसून त्यांची योग्यता अंगात नसताना काम करावे लागत आहे. याबद्दल फार दुःख होत आहे. तथापि भक्तीने आपण फुलाची पाकळी दगडाच्या मूर्तीस अर्पण केली असता ती जशी विठ्ठलास पावतेच तद्वत आजचा आपण केलेला मान आम्ही ना. टिळकांच्या चरणी सादर करू. असो. आजच्या प्रसंगाला अनुरुप चार शब्द बोलले पाहिजेत. पण जातीमुळे मनुष्यास मोठेपणा येत नसून तो गुणांमुळे येतो, हे ध्यानात धरले पाहिजे. तरच आपले तारण आहे. तुम्हीच आपल्या राष्ट्राचे हातपाय आहात. तुमच्यावरच आमच्या साऱ्या उड्या. तर जरूर पडेल ती मदत करण्यास शहराचे सुशिक्षित लोक तयार आहेत, हे मी आपणांस खात्रीने सांगतो. आपले हे जे मेळे गणपतीचे सेवेस्तव रात्रंदिवस देह झिजवीत आहेत. त्यांच्या श्रमाचे चीज झाल्याशिवाय राहणार नाही. देशी कापडाचीच गोष्ट घ्या. आपण सर्व जर देशी कापड वापरण्याचा निश्चय कराल व काही मेळ्यांनी तो केलेला व अंमलात आणलेलाही दिसत आहे ही फार चांगली गोष्ट आहे. नुसता झगझगीत पोषाख घालणे. गावभर हिंडणे यांत काही मुद्दा नसून यापासून आपणांत ऐक्य होऊन अशा सुधारणा करू तरच आपले कर्तव्य आपण बजावल्यासारखे होईल व आपले कल्याण होईल.”

## ३. पुण्याच्या रे मार्केट मंडपात –

लोकांच्या अंगी धर्मोत्सवासारख्या देशोन्नतीचे काम करण्याची योग्यता नसेल तर ती योग्यता अंगी आणण्याचे प्रयत्न लोकांनी केले पाहिजेत. शुकबहात्तरीत शुकाने जसा एका स्त्रीस उपदेश केला आहे, त्याच धर्तीवर मी आपणांस काही गोष्टी सांगणार आहे. धर्मजागृती करावयाची असल्यास धर्मबुध्दीप्रमाणे इतरही सद्‌गुण अंगी असले पाहिजते. त्याशिवाय कार्य सिध्दी होत नाही. यज्ञादि क्रिया नियमितपणे पार पडाव्या म्हणून केवळ धर्माच्या रणातच गुंग असणाऱ्या ऋषिवर्यांना राम–लक्ष्मणाची मदत मागणे भाग पडले.

धर्मरक्षण करण्यारिता इतरही सद्‌गुण अंगी असले पाहिजेत. ते सद्‌गुण कोणते म्हणाल तर, स्वार्थ त्यागाची अत्यंत उदात्त कल्पना होय. देशाच्या कामी झटणाऱ्या मंडळींनी स्वतःस अजिबात विसरून गेले पाहिजे. कौरव–पांडवांच्या वेळी राष्ट्रहित साधणारे भीष्माचार्य हे अशाच

प्रकारचे होते. 'अ–राजा' राहीन म्हणून बापापाशी केलेली प्रतिज्ञा त्यांनी अखेरपर्यंत राखली. राज्याचे खरे वारसदार असताना राज्य–वैभव तुच्छ मानणारे त्यावेळी होते. म्हणून भारत भूमीची भरभराट झाली. ''मी मेलो तरी हरकत नाही. माझा अत्यंत लय झाला तरी हरकत नाही. पण कार्थेजला जिंका'' असे सांगणारे लोक रोममध्ये होते.[१३]

धर्माकरिता काय किंवा इतर गोष्टींकरिता काय, योग्य वाटेल ती गोष्ट करावयाचीच, मग मृत्युमुखांत आपणा स्वतःस उडी घेण्याचे भाग पडले तरी हौसेने ती गोष्ट करावयाची, अशा करारी स्वभावाचे लोक ज्या धर्मात नाहीत त्या धर्माच्या लोकांचे डोके कधीही वर व्हावयाचे नाही. आपण इमारतीखाली चिरडून गेलो तरी बेहेत्तर. पण इमारतीतील आपल्या वैऱ्यांच्या शरीराच्या ठिकऱ्या ठिकऱ्या झाल्या पाहिजेत. अशाच बुध्दीने सॅम्प्सनने शत्रूची इमारत आपल्या अंगावर कोसळून घेतली. आगीच्या भडक्यात आपण होरपळून मरा, काही चिंता नाही. पण पार्लमेंटातल्या आपल्या शत्रुंची जळून राख झाली पाहिजे. अशाच निकराच्या व निश्चयाच्या पण क्रूर बुध्दीने गन पावडर प्लॉटचे वेळी दारूच्या भुयारात गायफॉक्स आगीची ज्योत हातात धरून शिरला होता. हॅडमन, वॉशिंग्टन, शिवाजी वगैरे मंडळीच्या चारित्र्यात ह्याच निकराच्या व निश्चयाच्या उदात्त स्वभावाचे वर्णन केलेले आढळते. ज्या राज्यात असले लोक नाहीत, त्या राज्यात धर्मोन्नती, देशोन्नती हे शब्द देखील उच्चारावयास नकोत.[१४]

लो. टिळकांच्या मार्गावर पाऊल टाकून शि.म.परांजपे यांनी सामाजिक चळवळीत उडी घेतली. मवाळ पक्षाचा जोर कमी होऊन राष्ट्रीय चळवळीत टिळक पक्ष अग्रेसर झाला. जहालमतवादाचा दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर प्रसार होऊ लागला. सन १८९६ जुलैमध्ये सार्वजनिक सभेवर टिळकांचे वर्चस्व निर्माण झाले. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या जागेवर लो. टिळकांनी सुचविलेल्या शि.म.परांजपे यांची निवड झाली. टिळक पक्षाच्या जहालमतवादी विचारसरणी समाजाला योग्य वाटत होती. सार्वज़निक सभेअंतर्गत प्लेग निवारण, दुष्काळ निवारणासारख्या अनेक समस्या टिळकपक्षापुढे उभ्या होत्या. त्या सोडविण्यासाठी सर्व कार्यकर्ते तयार झाले.[१५]

लो. टिळकांच्या मार्गदर्शनाखाली सार्वजनिक सभेच्या चळवळीची सुरुवात झाली. १ नोव्हेंबर रोजी 'दुष्काळाबद्दल माहिती' हे जाहीरपत्रक शि.म.परांजपे व दुष्काळ समितीचे – कमिटीचे सेक्रेटरी अच्युत सीताराम साठे यांच्या सहीने निघाले.[१६]

एका मोठ्या सभेचे आयोजन सार्वज़निक सभेने केले. सभेचे प्रचारक प्रो. साठे यांनी ''पिके बुडाली असली तर सरकारला सारा देऊ नका'', असे रयतेला त्रिवार बजावून सांगितले. त्यावर लोकमान्य टिळक़ांनी केसरीत लिहिलेल्या अग्रलेखाला ''पोलिसांच्या पेटलेल्या बंदुकीच्या टप्प्यात भरलेली रयतेची जंगी सभा'' असा नेहमीच्या पध्दतीचा व लढाऊ वृत्तीचा निदर्शक असा मथळा दिला होता. पुढे प्रो. साठे यांना अटक झाली. साठेंना अटक झाल्यावर शि.म.परांजपे व महाडकर यांनी कामाला सुरुवात केली. राजकीय कार्यामध्येही शि.म.परांजपे यांनी आपला ठसा उमटवायला सुरुवात केली.[१७,१८]

राजकीय कार्य आणि धोरण याविषयी शि.म.परांजपे यांचे विचार......

''रामदासांची ऐहिक महत्त्वाकांक्षा म्हटली म्हणजे आपला देश परकीयांच्या जुलमापासून स्वतंत्र झालेला आपण पहावा ही होती. पण ही आपल्या स्वतंत्रतेची इच्छा त्यांच्या मनात उत्पन्न झाल्यानंतर त्यांनी आपल्या सभोवतालच्या परिस्थितीकडे पाहिले. त्यावेळी ती इच्छा आणि परिपूर्ण होण्याची साधने त्यांना कोठेच दिसेनात आणि त्यामुळे त्यांची अनेकवेळा ही निराशा झाली असली पाहिजे. स्वदेशाकरिता स्वतंत्रता मिळवू इच्छिणाऱ्या देशभक्तांना निराशेचे क्षण किती तरी वेळा येतात! आणि रामदास स्वामीचे त्यांच्या ग्रंथातून जे उद्‌गार आढळतात, त्यावरून त्यांच्या मनाचे पृथक्करण केले असता त्यांनाही असे निराशेचे क्षण वारंवार प्राप्त होत असले पाहिजेत, असे दिसते. स्वदेशाला स्वराज्य प्राप्त व्हावे अशी रामदास स्वामींची इच्छा तर खरी. पण ते बिचारे एकटे काय करणार? ज्यांनी त्यांच्या देशाला आपल्या जबड्यांत धरले होते ते लोक असंख्य प्रबळ आणि सुसंपन्न. त्यांच्यापुढे या एकट्या स्वदेशभक्ताने काय करावे? अशा कामाला वास्तविक सर्व लोकांची मदत असली पाहिजे. आपला एक 'राघवाचा अनंत पंथ' त्यांनी काढला होता व स्वातंत्र्य प्राप्तीच्या आणि स्वदेशभक्तीच्या उपदेशाचे काम त्यांनी सगळीकडे सुरू केले होते.[१९]

सार्वजनिक सभेच्या माध्यमातून विविध चळवळी व आंदोलनाच्या माध्यमातून शि.म.परांजपे यांनी अतिशय तळमळीची व हृदयाला भिडणारी व्याख्याने – भाषणे दिली. चळवळी व आंदोलनासाठी विविध दौरे केल्यामुळे शेतकरी व सामान्य लोकांची दुःखे त्यांना अगदी जवळून पाहता आली. पुढे 'काळ' पत्राच्या माध्यमातून सामान्यांची, गरीबांची दुःखे, हृदयद्रावक पध्दतीने मांडली. सुरुवातीला टिळक सर्वांना परिचित होते. परंतु काळ पत्र व विविध वक्रोक्तीपूर्ण व्याख्यांनाच्या उत्तम पध्दतीमुळे शि.म.परांजपे यांचीही ओळख समाजाला होऊ लागली. ब्रिटिश सरकारला विरोध करणे हेच शि.म.परांजपे व टिळक यांचे ध्येय होते. सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शि.म.परांजपे यांनी राजकीय व सामाजिक अशा चळवळीत भाग घेतला होता. लोकमान्य टिळक शि.मं. ना कायम गुरुस्थानी होते.[२०]

## महाराष्ट्राचे पुढारी – टिळक, परांजपे

टिळक – परांजपे हे त्यावेळी महाराष्ट्राचे लाडके पुढारी होते. ही जोडी असामान्य होती आणि म्हणूनच ती लोकांच्या कुतुहलाचा आणि आदराचा विषय होऊन बसली होती. हे देशभक्त द्वय नव्या महाराष्ट्राचे स्फुर्तीस्थान व श्रध्दास्थान होते. टिळक प्रखर बुध्दीमत्ता आणि धाडसी निर्भयता या गुणांनी लोकमान्य झाले होते. तर उत्कट देशाभिमान आणि वाक्चातुर्य या गुणांमुळे शिवरामपंत लोकप्रिय झाले होते. सुरुवातीचा एक काळ तर असा होता की, 'लोकमान्य' ही पदवी या उभयतांनाही लावली जात असे. सावरकरांनी सन १९०६ साली इंग्लंडात छापून प्रसिध्द केलेले आपले मॅझिनीचे चरित्र 'लोकमान्य टिळक आणि लोकमान्य परांजपे' यांना अर्पण केले होते. त्यांनी लोकांची मने पूर्णपणे काबीज केली होती. शिवरामपंतांच्या वीर रसप्रधान प्रतिभासंपन्न व छाप पाडणाऱ्या वक्तृत्त्वाचे वर्णन करताना प्रो. माटे लिहितात – ''अशा गुणांनी मंड्ति झालेल्या या वक्त्याने सुमारे दहा वर्षे पुणे शहर हस्तगत करून टाकले होते. टिळकांची थोरवी ही की, असल्या तेजस्वी माणसाला त्यांनी मागे टाकले! टिळक–परांजपे ही जोडी सजोड उल्लेखिली जाई व ती जेथे उभी तेथे सर्व श्रोते लोटावयाचे!'' [२१]

लोकमान्य टिळकांच्या 'होमरूल चळवळीत'ही शि.म.परांजपे यांनी मनःपूर्वक सहभाग घेतला. परांजपे व टिळक स्वातंत्र्य चळवळीतील दोन तेजोगोल होते. परांजपे यांना टिळकांबद्दल

खूपच आदर होता. परंतु दोघांमध्ये वैचारिक बदल होता. ध्येय मात्र एकच होते ते म्हणजे भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे![२२]

''टिळकांना लोकमान्य कोणी केले?''......

सन १९०० सालापूर्वीपर्यंत टिळक साधेच म्हणजे रा. रा. होते. कौन्सिलांत निवडून गेल्यावर काही दिवस त्यांचा नामदार म्हणून उल्लेख होत असे हे खरे. तथापि कौन्सिलचे सभासदत्व रद्द झाल्यानंतर पुन्हा अर्थातच त्यांना 'राजमान्य राजश्री' या ठसीव साचाच्या रुढ उपपदाने लांच्छित करण्यात येऊ लागले. परंतु त्यातील 'राजमान्य' या शब्दात पूर्वीच्या काळी काही अर्थ असला तरी आता टिळक हे खरे लोकपक्षाचे पुढारी आहेत! असा श्लेष व मर्म शोधून शि.मं.नी १९०० सालात आपल्या काळ पत्रात 'लोकमान्य आणि राजमान्य' या मथळ्याचा एक अग्रलेख लिहिला. त्यापूर्वी लोकमान्य हा शब्द कोणी क्वचित वापरला असला तरी तो पडून होता. या अग्रलेखामुळे तो सर्वांच्या जिव्हाग्री खेळू लागून लोकमान्य झाला. या संबंधीची केसरीचे संपादक श्री. ज. स. करंदीकर यांनी लिहिलेली आठवण येथे उध्दृत करण्यात येत आहे..... 'टिळकांना 'लोकमान्य' ही पदवी प्रथम कोणी व केव्हा दिली याविषयी वाद असून त्याविषयी अनेक जण आपआपला अग्रहक्क सांगत असतात. या संबंधात स्वतः लोकमान्यांनाच एकदा प्रश्न केला असता, त्यांनी पुढील अर्थाचे उत्तर दिले,'' लोकमान्य ही पदवी प्रथम कोणी उपयोगात आणली हे काही मला आता नक्की स्मरत नाही.[२३]

१९०० सालापूर्वी काही लेखकांनी अगर वक्त्यांनी ती पदवी वापरली असेल. परंतु ती कोणाच्या लक्षात येण्याइतकी रुढ झाली नव्हती. पण १९०० साली शि.म.परांजपे यांनी आपल्या 'काळ' पत्रात 'लोकमान्य आणि राजमान्य' या विषयावर अग्रलेख लिहिला आणि तो लेख वाचून कित्येकांनी मला पत्र लिहिताना 'राजमान्य राजश्री' हा नेहमीचा मायना न लिहिता 'लोकमान्य' लिहिण्याचा संकल्प केला असावा, असे दिसते. कारण त्यावेळेपासून मला 'लोकमान्य' या मायन्याची पत्रे येऊ लागली. आणि तो शब्द पूर्ण रुढ होण्याला पाच वर्षे लागली. 'राष्ट्रमत' पत्राने तो कायमचा रुढ केला.[२४]

टिळकांबरोबर शिवजयंती व गणेशोत्सवाच्या समारंभात शि.म.परांजपे हिरीरीने भाग घेतल्यामुळे ब्रिटिश सरकारी गुप्त पोलिसांची नजर त्यांच्यावर पडू लागली. पुण्यामध्ये १२ जून

रोजी लकडी पुलाजवळ असलेल्या विठ्ठल मंदिरात शिवजयंती उत्सवाला सुरुवात झाली. शि.म.परांजपे यांचे राजकीय पुराण झाले. 'राजसूय यज्ञ व शकुनी – धृतराष्ट्र संवाद' हा त्यांचा विषय होता. 'असंतोष श्रियो मूलम्' व 'संतोषस्तु श्रियो हन्ति' ही त्यांनी आधारवचने होती.[२५]

पुण्यामध्ये प्लेगने थैमान घातले होते. ब्रिटीशांची उपाययोजना पूर्णतः चुकीची असल्याने रँड व आयर्स्ट यांच्यावर गोळ्या झाडल्या. गुन्ह्याचा तपास लागण्यापूर्वीच मुंबईच्या इंग्रजी वृत्तपत्रांनी पुण्यातील ब्राह्मणांवर कडक टीका करायला सुरुवात केली. शिवाय रँडच्या हत्येमागे पुण्यातील ब्राह्मण असल्याचे वृत्तपत्रांनी सूचित केले. परंतु यावर लो. टिळकांनी अतिशय धडाडीने ''सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?'', ''राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे'', असे अग्रलेख केसरीमधून लिहिले. परंतु सरकारने टिळकांनाच लक्ष केले. दि. २७ जुलै रोजी लो.टिळक मुंबईत होते तेथेच त्यांना अटक करण्यात आली. केसरीमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांवर कविता करण्यात आली होती. याचे पर्यवसन लो.टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. त्यासंदर्भात स्वतः शि.म.परांजपे मुंबईला जाऊन आले. ''एवढेच नव्हे तर लोकांच्या माहितीकरिता खटल्याचे रोजची ताजी हकीकत देणारे जादापत्रक ते रोजच्या रोज संध्याकाळी छापून प्रसिध्द करत असत.'' अशी माहिती श्री. दादासाहेब रानडे सांगतात. १४ सप्टेंबर रोजी लो. टिळकांना दीड वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. सन १८९८ मध्ये टिळकांवर राजद्रोहाच्या कलमाखाली आरोप ठेवण्यात आला.[२६]

त्या कलमात दुरुस्ती करून ते अधिक व्यापक करण्याचा सरकारने कायदाच केला. या कायद्याविरुध्द आवाज उठविण्यासाठी सार्वजनिक सभेत एक ठराव मांडण्यात आला. तो ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.[२७]

सालाबादप्रमाणे पुण्यामध्ये वसंत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येत होते. त्याचे 'सेक्रेटरी' हे पद शि. म. परांजपे यांना नेमण्यात आले. त्यानुसार ७ जून रोजी झालेल्या पहिल्या व्याख्यानात शि. म. परांजपे यांनी 'धर्मप्रसाराचे वेड' या विषयावर व्याख्यान दिले. ख्रिश्चन मिशनरी भारतीयांना ख्रिश्चन धर्माच्या जाळ्यात कसे ओढतात याचे सुंदर वर्णन शि.मं.नी केले. त्यासाठी परिवर्तनाची गरज आहे, असे प्रतिपादन केले. शि. म. परांजपेंचा सनदशीर चळवळीवर अजिबात विश्वास नव्हता. क्रांती किंवा दहशतवाद हाताशी धरल्याशिवाय

आपली प्रगती होऊ शकत नाही, असे त्यांचे मत होते. ‘नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही’ या तत्त्वावर देशाचे राजकीय धोरण ठरवावे असे शि.मं.ना वाटत होते. शस्त्राचा वापर करून स्वातंत्र्य मिळवावे, हे त्यांचे स्पष्ट मत होते. सर्वसामान्य प्रजेची दुःखे, हालअपेष्टा, संकटे यावर मात करण्यासाठी जनजागृतीची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली. संप, बंद, हरताळ, इ. मार्गाने सरकारची अडवणुक करावी, असा त्यांनी सल्ला दिला होता. त्यानुसार राजकीय चळवळीची तयारी शि. म. परांजपे यांनी केलेली दिसते.[२८]

शि.मं.ची आठवण नागपूरचे प्रो. ना. के. बेहरे यांनी दिलेली उपलब्ध आहे.... ‘‘पुढे आण्णासाहेबांची (शि.मं.) गाठ पडली, तेव्हा या सबंधी बोलणे झाले. ते म्हणाले, टिळक उत्तम गणिती आहेत. सशस्त्र बंडाला यश मिळण्याचा शेकडा ५०% संभव असला तरी उरलेल्या ५०%चा भार ईश्वरावर टाकून त्या कार्यात मी पुढाकार घेईन, असे ते म्हणत असतात. पण अशा हिशोबी गणिताने जगात आजपर्यंत क्रांत्या घडून आल्या नाहीत. उत्कट भावना असेल तरच क्रांती घडून येईल. क्रांतीकारकाला हिशेबी होऊन परवडत नाही.’’ हाच नेमका टिळक व शि.मं.मधील फरक शि.मं.च्याच शब्दात उत्तम रितीने प्रकट झालेला आहे. चालू राजकारणात मवाळ पक्षाच्या विरुध्द हे दोघेही एकच असत. टिळकांबद्दल शि.मं.ना पराकाष्ठेची आदरबुध्दी होती व उलट टिळकांच्या मनात त्यांच्याबद्दल अत्यंत प्रेम व आपलेपणा वसत होता. शि.मं.वरील खटल्याच्या वेळी लोकमान्य टिळक वडीलभावाप्रमाणे त्यांच्यामागे उभे राहिले. यावरून दोघांचे घट्ट नाते समजते.[२९]

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्यावरही शि. म. परांजपे यांचा जबरदस्त प्रभाव होता. तो सुध्दा शि.मं.च्या काळ पत्रानेच. कारण नाशिक येथे शाळेत एका वक्तृत्वस्पर्धेत सावरकरांचा प्रथम क्रमांक आला म्हणून समारंभाच्या प्रमुखांनी सावरकरांना काळ पत्राचे अंक वर्षभर बक्षिसादाखल देण्याचे मान्य केले. म्हणजे सावरकर शि.मं.ना भेटण्याअगोदर ‘काळ’ पत्राच्या माध्यमातून जणू काही भेटले होते. त्याच काळात ‘चाफेकर आणि रानडे’ हा लेख, काळपत्रातून प्रसिध्द झाला व या लेखाचा सावरकरांवर खोल परिणाम झाला. शालेय शिक्षणानंतर सावरकर सन १९०२ला पुण्यात फर्ग्युसन महाविद्यालयात दाखल झाले. पुढे सावरकर व शि.मं. परांजपे यांची भेट झाली. शि. म. परांजपे यांचे ज्येष्ठ चिरंजीव कृष्णाजीपंत हे त्याच कॉलेजात असल्याने त्यांचाही सावरकरांशी चांगला स्नेह जुळला. पुढे सावरकरांचे

परांजपेंच्या घरी येणे–जाणे सुरू झाले. दोघांचेही विचार क्रांतीला पूरक असल्याने सुर जुळले. सावरकरांच्या विविध कविता 'काळ' पत्रात प्रसिध्द झाल्या. यापैकी एक उत्तम कविता म्हणजे 'विश्वांत आजवरि शाश्वत काय झाले?' ही काळावरच्या 'सर्वथस्यवशादगात्स्मृतिपंथ कालाय तस्मैनमः' या श्लोकांतील कल्पनेवरच आधारलेली आहे.[३०]

पुढे सावरकर व क्रांतीकारकांनी अभिनव भारतच्या माध्यमातून क्रांतीकार्य सुरू केले. अभिनव भारत या संस्थेमार्फत सार्वजनिक गणेशोत्सवामध्ये शि.मं.ना नाशिकला आमंत्रित करण्यात आले. शि. म. परांजपे यांनी दोन दिवस नाशिकला मुक्काम केला. त्यामध्ये विविध ठिकाणी सहा कार्यक्रम केले. व्याख्याने, प्रवचनांच्या माध्यमातून शि.मं.नी नाशिककरांची प्रचंड जनजागृती केली.[३१]

संपूर्ण भारतभर 'वंगभंगाची चळवळ' सुरू झाली. स्वदेशी व बहिष्काराचा नारा देण्यात आला. त्यावेळी वि. दा. सावरकरांनी, ''विदेशी कपड्यांची होळी करण्यात यावी'', असे सांगितले. न.चि. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेला शि. म. परांजपे हे ही उपस्थित होते.[३२]

त्यानुसार दसऱ्याचा दिवस सार्वजनिक होळीसाठी निश्चित करण्यात आला. विदेशी कपडे जमविण्यात आले. वाद्यवृंद वाजवून महाराष्ट्र विद्यालयातून लोकांच्या प्रचंड जमावातून मिरवणुकीची सुरुवात झाली. लोकमान्य टिळक, शि. म. परांजपे, भालाकार भोपटकर आदी मान्यवर मिरवणुकीत सहभागी झाले. लोकमान्य टिळकांनी जमावापुढे उत्तम व्याख्यान दिले. त्यानंतर लोकांच्या आग्रहास्तव शि. म. परांजपेंनाही व्याख्यान द्यावे लागले. होळीतील जळता कोट हातात घेऊन ब्रिटिश हिंदुस्थानची किती लुट करतात? हे आपल्या भाषणातून व्यक्त केले. पुण्यातील ही होळी महत्त्वपूर्ण ठरली. या होळीत सहभागी झाल्यामुळे वि.दा.सावरकर यांना फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य रँग्लर परांजपे यांनी मात्र दहा रुपयांचा दंड केला. परंतु याचा निषेध काळकर्ते शि. म. परांजपे यांनी आपल्या 'काळ' पत्रात केला.....[३३,३४,३५]

''देशबंधू सावरकर यांस देशभक्तीबद्दल दहा रुपये दंड कॉलेजातील अधिकाऱ्याकडून झाल्याची बातमी पूर्वीच प्रसिध्द झाली आहे. देशभक्तीसाठी दंड होण्याची पाळी यावी आणि तीही हिंदुस्थानात जन्मलेल्या माणसाकडून त्यांच्यावर यावी, ही खरोखरच शोचनीय गोष्ट आहे

व अशी ही व्यवस्था हिंदुस्थानात सर्व ठिकाणी व सर्व कामात होत आहे, यांतच इंग्लिशांचे कौशल्य, कौटिल्य व सामर्थ्य आहे. लोकांच्या पैशावर चालविलेल्या संस्थांनी तरी निदान लोकमताची पायमल्ली करणे श्रेयस्कर नाही. असो. देशबंधू सावरकर हे प्रस्तुतच्या कामात किती निर्दोष आहेत, हे त्यांच्याबद्दल त्यांच्या सहाध्यायी देशबंधुंनी जी सहानुभुती दाखविली आहे, तिजवरून व्यक्त होत आहे. देशभक्त सावरकर यांच्या दंडाची रक्कम त्यांच्याच बेचाळीस विद्यार्थी बंधुंनी वर्गणीने त्यांना गोळा करून दिली. परंतु सावरकरांनी स्वतःच्या उपयोगाकरिता न घेता तिचा विनियोग त्यांनी दुसरीकडे केला आहे.''[३६]

शि. म. परांजपे यांनी सार्वजनिक सभेच्या माध्यमातून सावरकरांचा दंड भरणाऱ्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.[३७]

फर्ग्युसन महाविद्यालयातून सावरकर बी.ए. झाले. पुढील शिक्षण घेण्यासाठी सावरकरांना इंग्लंडला जायचे होते. इंग्लंडला स्थायिक असलेले श्यामजी कृष्ण वर्मा यांच्याकडून सावरकरांना शिष्यवृत्ती मिळावी, यासाठी लो. टिळक व शि. म. परांजपे यांनी खूप प्रयत्न केले. सावरकर इंग्लंडला जाण्याच्या आदल्या दिवशी शि. म. परांजपे यांचेकडे मुक्कामाला होते. दोघांमध्ये प्रदीर्घ चर्चा झाली. परंतु दोघांनाही माहित नव्हते की, त्यांची भेट पुन्हा १७ वर्षांनी होणार आहे. सावरकर इंग्लंडहून 'लंडनची बातमीपत्रे' काळासाठी अगदी सन १९०९ सालापर्यंत पाठवित होते.[३८,३९]

पुढे सावरकरांना काळ्या पाण्याची शिक्षा झाली. जवळजवळ १२ वर्षे अंदमानात कैदेत ठेवले. त्यानंतर अलीपूर व येरवड्याच्या तुरुंगात आणले. त्याच दरम्यान शि. म. परांजपे यांना मुळशी सत्याग्रहाच्या आंदोलनाची शिक्षा म्हणून येरवड्याच्या तुरुंगात ठेवण्यात आले. तेथेच सन १९२२ मध्ये शि. म. परांजपे व सावरकर यांची जवळजवळ १७ वर्षांनी भेट झाली. सावरकरांच्या सुटकेसाठी शि. म. परांजपे यांनी अनेक वक्तव्ये, भाषणे व लेख लिहिले. १४ वर्षांच्या दीर्घ कारावासानंतर वि.दा.सावरकरांची तुरुंगातून मुक्तता झाली. मुंबईला जाण्यापूर्वी काही तास शि.मं.च्या घरी भेट झाली. कारण तात्काळ त्यांना रत्नागिरीला जायचे आदेश होते.[४०,४१]

शि. म. परांजपेंविषयी सावरकरांना कमालीचा आदर होता. सावरकर शि. म. परांजपेंविषयी म्हणतात, '' माझ्या राजकीय चरित्राला शि.मं.पासूनच सुरुवात झाली आहे. माझ्या चरित्राचे जनकच आहेत ते! मी आत्मचरित्र लिहीन त्यांत शि.मं.बद्दल मला प्रत्यक्ष माहित आहे तेवढे लिहिले तरी सहज दोनशे पाने होतील!'' अशा प्रकारे शि. म. परांजपे व वि.दा.सावरकर यांच्यातील स्नेहभाव अतिशय उत्तम होता.[४२]

लो.टिळकांच्या मृत्यूनंतर म.गांधींच्या नेतृत्त्वाखाली सुरू झालेल्या स्वातंत्र्यचळवळीच्या आंदोलनात शि. म. परांजपे सहभागी झाले. त्यामुळे बऱ्याच जणांच्या भुवया उंचावल्या. जहालवादी विचारांकडून गांधींच्या मवाळ–अहिंसावादी विचारांकडे शि. म. परांजपे कसे आकर्षित झाले? हा फार मोठा प्रश्न होता. परंतु देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी शि. म. परांजपे कोणत्याही चळवळीत सामील होण्यास तयार होते. सन १८९७च्या अमरावती येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात शि. म. परांजपे सहभागी झाले. पुढील ३२ वर्षे ते सन १९२९ पर्यंत सनदशीर चळवळीत कार्य करीत होते. मवाळ काँग्रेसमध्ये दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता यांच्याकाळातील काँग्रेसचे कार्य अर्ज–विनंत्यांच्या मार्गाने ठराव करण्यापलिकडे गेलेले नव्हते. मवाळांच्या काँग्रेसमध्ये धडाडीचे कार्य होणे अपेक्षित नाही, अशी शि.मं.ची समजूत झालेली होती. कोणत्याच सनदशीर चळवळीवर शि.मं.चा विश्वास नव्हता. त्यानुसार त्यांनी स्वदेशी, बहिष्कार चळवळीत भाग घेतला. विविध व्याख्यानांच्या माध्यमातून जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.[४३]

म.गांधीचे विचार जरी शि.म. परांजपे यांना फार पटत नसले तरी देशाला स्वातंत्र्य मिळविण्याच्या हेतूने त्यांनी टिळकांनंतर म.गांधींच्या चळवळीत भाग घेतला. अनेक राजकीय नेत्यांनी शि.मं.वर टीका केली. ''काही चमत्कार दाखविल्याशिवाय नमस्कार मिळत नाही,'' अशा प्रकारची मते शि.म. 'काळ' पत्रातून मांडीत असत. देशाला स्वातंत्र्य मिळणे महत्त्वाचे असल्याने शि.म. परांजपे कोणत्याही चळवळीत, आंदोलनात चटकन सहभागी होत असत.[४४]

'काळ' पत्राच्या माध्यमातून देशात होणाऱ्या विदेशी कपड्यांची होळी, वंगभंग चळवळ, होमरुल चळवळ, बंगालची फाळणी, शिवजयंती व गणेशोत्सव आदींच्या माध्यमातून जहाल लेख लिहून समाज जागृती करण्याचा चांगलाच प्रयत्न शि.मं.नी केलेला दिसतो. बऱ्याच वेळा

महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर लो.टिळकांबरोबर व्याख्याने देण्याचा उपक्रम त्यांनी राबविलेला दिसून येतो.[४५]

लो. टिळकांच्या काळात काँग्रेस अधिवेशन व प्रांतिक परिषदांमध्ये शि.मं.नी टिळकांची बाजू घेतली तर लोकमान्यांनंतर म.गांधीच्या असहकार चळवळीतही शि.मं.नी त्याच जोमाने भाग घेतला. त्यांनी आपल्या पोषाखांतही बदल केलेला दिसतो. अशाप्रकारे कोणतेही कार्य करताना अगदी समरस होऊन जाऊन काम करण्याची शि.म.परांजपे यांची सवय दिसून येते.[४६]

**शि.म.परांजपे यांच्या राजकीय कामगिरीचे सार –**

''शिवरामपंतांनी राजकीय क्षेत्रात

१. 'काळा'च्या द्वारा अपूर्व जनजागृती घडवून आणली आणि तीही मोठ्या प्रमाणावर.

२. आपल्या संस्कृतीच्या व इतिहासाच्या पायावर देशभक्तीची आणि राष्ट्रप्रेमाची भावना रुजवली.

३. टिळकांच्याही एक पाऊल पुढे टाकून स्वातंत्र्याचे ध्येय लोकांपुढे मांडले. त्यामुळे पर्यायाने टिळकांच्याच राष्ट्रीय चळवळीची तीव्रता वाढली आणि त्याला धार आली.

४. त्या काळात सुधारकांचे स्तोम वाजवीपेक्षा अधिक मानलेले होते. समाजाचे कल्याण आमच्याच हातून होणार आणि खरी कार्याची दिशा व कर्तबगारी आम्हीच करीत आहोत, असा भाव त्यांनी आणलेला होता. काही बाबतीत सामाजिक सुधारणांची आवश्यकता असली तरी या एकांगी धोरणाने जनतेचे लक्ष राजकीय ध्येय हाच परतंत्र राष्ट्रांच्या आकांक्षेचा उच्च बिंदू मानणे अधिक योग्य व कृतीशून्य सुधारकांवर हल्ले चढवून त्यांचे स्वरुपाविष्करण केले.

५. त्यावेळी मवाळांचे प्रस्थ मोठे होते. जहालांच्या तुलनेने पाहता त्यांना सरकारचाही पाठिंबा आणि सहानुभूती होती. ज्या काही संस्था होत्या, त्या त्यांच्या तंत्राने चाललेल्या होत्या. रानडे म्हणजे तर त्या काळांतले बडे धेंडच होते. मुळात काहीच नव्हते. त्या मानाने न्यायमूर्तींनी बरेचसे कार्य केले, यात शंका नाही. सनदशीर म्हणा, नेमस्त म्हणा, अर्ज विनंत्या म्हणा, पण मागणीला सुरुवात तर केली. पण आता वाढत्या आकांक्षेला याच्या पुढचे पाऊल टाकायला हवे होते. ते मवाळांना रुचेना, झेपेना. ते विरोध करू लागले व नेमस्तपणाच घट्ट धरून बसले. तेव्हांपासून मवाळ

विरुध्द जहाल असा झगडा सुरू झाला. शिवमरापंतांनी मवाळांची चुकीची दिशा व त्यांच्या मवाळ राजकारणाची विफलता व फुसकेपणा यांचे विदारण केले. मवाळ पक्षाविरुध्द टिळकप्रणित राष्ट्रीय पक्ष महाराष्ट्रांत सुस्थिर आणि बलिष्ठ करण्यात शिवरामपंतांचा मोठा वाटा होता.

६. स्वातंत्र्य हे ध्येय व सशस्त्रता हे साधन हा खणखणीत सिध्दांत आपल्या अवगुंढित भाषेत शिवरामपंतांनीच निर्भयपणे लोकांपुढे मांडला. स्वातंत्र्याकरिता हिंसेचा अवलंब करण्यात पाप किंवा अनैतिक काही नाही, असे त्यांचे प्रतिपादन असे. इतिहासाची साक्ष तशीच आहे. सनदशीर उपाय हरले म्हणजे लोकांनी तरी काय करावे? शिवरामपंतांना क्रांती हवी होती. साधत असली तर हिंसेनेही. साधत नसेल तर अहिंसात्मक प्रयत्नाने. हिंसेचे वावडे तर त्यांना नव्हतेच. पण उलट त्या दिशेने प्रयत्न व्हावे असे त्यांना वाटे. बाहेरून प्रकट विरोध, बहिष्कार, प्रतिकार अशी चळवळ आणि आंतून सशस्त्रतेची जोड असा त्यांच्या मताचा व प्रतिपादनाचा दुहेरी रोख असे.''

शि.म. परांजपे यांच्या मतानुसार ''ज्या बाबीने रिव्होल्युशन जवळ येईल, ती बाब हाती घ्यावी.''

डॉ. के. ना. वाटवे यांच्या मतानुसार, ''शिवरामपंतांचे राजकारण म्हणजे निर्भेळ व संपूर्ण ध्येयवादी स्वातंत्र्याचा काव्यमय व कल्पनारम्य उद्‌घोष होता.''

राजकीय नेते या दृष्टीकोनातून आचार्य भागवत यांनी शि.मं.चे केलेले परीक्षण महत्त्वाचे आहे... ''जीवनात केवळ बुध्दी, पांडित्य अथवा कला सामर्थ्य असून जीवन सफल होत नाही. जीवनाच्या साफल्यासाठी श्रध्दा आणि त्याग यांची शिदोरी भरपूर असावी लागते. त्यागाने श्रध्दा वाढत जाते. सत्य दर्शनासाठी सर्वस्वाची आहुती देण्याची तयारी असणाऱ्यालाच महात्म्यांच्या पंक्तीत स्थान मिळाल्याखेरीज खचित राहणार नाही!''[४७]

टिळकांच्या राजकारणाला योग्य पार्श्वभूमी तयार करण्याचे काम शि.मं.नी केले हे मान्य करावेच लागते. देशाला स्वातंत्र्य मिळविणे ही भावना फारच महत्त्वाची होती. 'शुध्द स्वातंत्र्याचा महाराष्ट्रातील पहिला प्रतिपादक' असे परांजपे यांचे नाव इतिहासात अजरामर आहे, यात तिळमात्र शंका नाही.[४८]

# – संदर्भग्रंथ –


१. The Manager Governement central Pres- Bombay-4 Shivram Mahadev Paranjape The Order of Patriotism page.2

२. परांजपे वामन कृष्ण, ‘काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन’ चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ.६४

३. केसरी २० सप्टेंबर १८९६

४. परांजपे वामन कृष्ण, उपरोक्त पृ.६७,६८

५. The Manager Governement Central Press - Bombay-4 Shivram Mahadev Paranjape The Order of Patriotism, Pg. 2

६. परांजपे वामन कृष्ण, ‘काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन’ चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ.६९, ७०

७. तत्रैव पृ. ७२

८. पांढरे डॉ. नीला, ‘शि.म. परांजपे वाङ्मयीन अभ्यास’, पुष्प प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती जून १९९३. पृ. १६

९. ओगले शि.ल., बर्वे दत्तात्रय केशव, ‘शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र’ (जीवन कार्य व आठवणी), य.गो.जोशी प्रकाशन, पुणे–२, पृ.५,६

१०. परांजपे वामन कृष्ण, ‘काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन’ चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९४५, पृ.६९

११. ओगले शि.ल., उपरोक्त पृ.६९

१२. जावडेकर शंकर दत्तात्रेय, (प्रस्तावना) का.नि.नि. भाग.४, पृ. ३

१३. (अ) परांजपे वामन कृष्ण, ‘काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन’ चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ. ७३, ७४

(ब) काळ अग्रलेख २४.१.१९०२,

१४. केसरी, २२ व २९ सप्टेंबर १८९६

१५. परांजपे वामन कृष्ण, ‘काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन’ चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, पृ. ७३,७४

१६. केसरी, २२ व २९ सप्टेंबर १८९६

१७. केसरी, जानेवारी १८९७

१८. प्रधान ग.प्र., 'पुणे जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा', प्रकाशक ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई–२०,पृ.१६

१९. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, पृ.४७

२०. तत्रैव पृ. ८४

२१. तत्रैव पृ.११९

२२. डॉ. मोरे सदानंद, 'लोकमान्य ते महात्मा' राजहंस प्रकाशन, पुणे पहिली आवृत्ती २६जाने. २००७, पृ.८१

२३. परांजपे वामन कृष्ण,'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९४५, पृ.११९

२४. तत्रैव पृ.८५

२५. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ. ४९,५०

२६. तत्रैव पृ. ८८,८९

२७. तत्रैव पृ. ८८,८९

२८. डॉ. मोरे सदानंद, उपरोक्त पृ.८१

२९. तत्रैव पृ.९१

३०. ओगले शि.ल., बर्वे दत्तात्रय केशव, 'शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र' (जीवन कार्य व आठवणी), य.गो.जोशी प्रकाशन, पुणे–२ पृ. १२४

३१. शेळके रघुनाथ धोंडिबा, 'भाला वृत्तपत्राचे सामाजिक, धार्मिक आणि राजकीय कार्य' (१९०५ ते १९१० व १९२५ ते १९३५) हर्षवर्धन प्रकाशन, बीड, एप्रिल २०१७, पृ.८३

३२. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ.९८,१२४

३३. दाते शंकर रामचंद्र, 'अभिनव भारताचे रणझुंजार', दाते प्रकाशन, पुणे– १९७९ पृ.३३

३४. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' उपरोक्त पृ. १२५,१२६

३५. तत्रैव पृ. १२८,१२९

३६. तत्रैव पृ. १२६, १२७

३७. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', तत्रैव उपरोक्त, पृ. १२९

३८. तत्रैव पृ. १२९

३९. तत्रैव पृ. १२९

४०. तत्रैव पृ. १३०

४१. तत्रैव पृ. १३१

४२. परांजपे वामन कृष्ण, 'शिवरामपंत परांजपे व्यक्ती–वक्तृत्व वाङ्मय', चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे, पृ. ८२

४३. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९४५, पृ.१४१

४४. परांजपे वामन कृष्ण, 'शिवरामपंत परांजपे व्यक्ती–वक्तृत्व वाङ्मय' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. पृ. ४४,४५

४५. तत्रैव पृ. ५७,५८,५९

४६. तत्रैव पृ. २१२

४७. तत्रैव पृ. २११

४८. ओगले शि.ल., बर्वे दत्तात्रय केशव, 'शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र (जीवन कार्य व आठवणी)', य.गो.जोशी प्रकाशन, पुणे–२, पृ. १११,११२

# प्रकरण – ३

# सामाजिक कार्य

भारतीय समाजाला स्वतंत्रतेची जाणीव निर्माण करून देणे महत्वाचे असल्याचे शिवरामपंत परांजपे यांना नेहमीच वाटत असे. समाजातील सर्वसामान्य जनता हा घटक शि.मं.नी फार महत्त्वाचा मानला होता. सामान्य लोकांचे वैचारिक प्रबोधन झाल्याशिवाय सामाजिक बदल होणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केलेले आढळते. विविध आंदोलनाच्या माध्यमातून, सहभागातून सामाजिक प्रबोधन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न शिवरामपंत परांजपेंनी केलेला दिसतो.[१]

## भारतीय समाज आणि ब्रिटिश सत्ता –

प्लासी आणि बक्सारच्या दोन युध्दांमध्ये – लढायांमध्ये विजय मिळवून ब्रिटिशांनी बंगाल प्रांतामध्ये आपले पाय रोवले. हळूहळू राजकीय, सामाजिक व आर्थिक अशा सर्व क्षेत्रांवर ब्रिटिशांची मक्तेदारी निर्माण झाली. व्यापाराच्या निमित्ताने भारतामध्ये आलेल्या इंग्रजांनी भारतामध्ये 'फोडा आणि झोडा' या राजनीतीचा अवलंब करून संपूर्ण भारत पादाक्रांत केला. लाचखोरी, फितूरी, भ्रष्टाचार, शिक्षणाचा अभाव, वैचारिकतेचा अभाव अशी अनेक वैगुण्ये इंग्रजांना भारतात दिसली. सर्वच बाबतीत दुर्बल असणाऱ्या भारतीयांवर प्रबळ साम्राज्यवाद इंग्रजांनी निर्माण केला.[२]

भारतात जुन्या रुढी, प्रथा, परंपरा व अंधश्रध्दा प्रचंड प्रमाणात होत्या. बालविवाह, सतीप्रथा, विधवांच्या पुर्नविवाहास विरोध असे प्रकार सर्रास चालत होते. या सर्व परिस्थितीमुळे ब्रिटिशांनी भारतात एककलमी आपली हुकूमशाही प्रस्थापित केली. ब्रिटिशांच्या आगमनामुळे भारतात एक वेगळे वातावरण निर्माण झाले.[३]

सन १८८५ला राष्ट्रीय सभेची स्थापना करण्यात आली. राष्ट्रीय हक्काचे व्यासपीठ भारतीयांना मिळाले. ॲलन ॲक्टन ह्यूम यांच्या प्रयत्नातून राष्ट्रीय सभेची निर्मिती झाली. इंग्रजांच्या प्रयत्नातून व्यासपीठ मिळाल्याने त्यांच्या विचारांवर श्रध्दा ठेवणारा मवाळ पक्षाचा उदय झाला. यामध्ये फिरोजशहा मेहता, दादाभाई नौरोजी, न्या. रानडे, आगरकर, गोपाळ

कृष्ण गोखले आदी मान्यवरांचे मवाळ पक्ष व राजकारणावर प्रथम मोठा प्रभाव असल्याचे दिसते. 'ब्रिटिश राज्य हे ईश्वरी वरदान आहे' असे मानणारा हा वर्ग होता. ब्रिटिशांच्या न्यायप्रियतेवर त्यांचा कमालीचा विश्वास होता. परंतु मवाळांच्या प्रयत्नामुळे इंग्रज कोणत्याच मागण्या मान्य करीत नव्हते. म्हणून ब्रिटिशांना विरोध करणारा जहाल गट हळूहळू उदयाला आला. स्वातंत्र्य मिळविणे हा हेतु एकच असला तरी तेथपर्यंत जाण्याचे मार्ग मात्र अत्यंत वेगळे होते. त्यामुळे जहाल–मवाळ यांच्यात तीव्र मतभेद निर्माण झाले.[४]

## मवाळ–जहाल – वैचारिक मतभेद –

भारतामध्ये मवाळ–जहाल व क्रांतिकारक असे वैचारिक भेद असणारे विविध गट तयार झाले. मवाळ लोक ब्रिटिश धार्जिणे होते, असा त्यांच्यावर जहाल लोक आरोप करीत असत. जहाल विचारांच्या माध्यमातून लो.टिळक, शि.म.परांजपे, न.चि.केळकर आदी मंडळी सरकारला धारेवर धरीत असत. त्यामुळे भारतीय राजकारणात जहाल–मवाळ असे दोन गट निर्माण झाले. शिवाय क्रांति करून स्वातंत्र्य मिळविणाऱ्या विचारांचा क्रांतिकारी गट उदयाला आला. 'स्वातंत्र्य मिळविणे' हे जरी एकच ध्येय असले तरी तेथपर्यंत जाण्याचे वैचारिक मार्ग मात्र भिन्न–भिन्न होते.[५]

ब्रिटिशांनी भारतात नंतर आक्रमक धोरणाचा पुरस्कार केला होता. परंतु लो. टिळकांच्या जहाल पक्षाने सरकारवर उघडउघड टीका केलेली दिसते. जहाल–मवाळ यांच्यामध्ये राजकीय सुधारणा आधी की सामाजिक सुधारणा आधी? असा प्रश्न निर्माण झाला. त्यावरून जहाल–मवाळांमध्ये वैचारिक मतभेद निर्माण झाले. मवाळ गटातून आगरकर व जहाल गटातून लो.टिळक यांच्यात वैमनस्य निर्माण झाले. आगरकरांनी 'केसरी' पत्रातून आपले अंग काढून घेतले व स्वतःचे 'सुधारक' हे नवे पत्र सुरू केले. आगरकरांची सामाजिक मते क्रांतिकारक होती – ''इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार'' असे आगरकरांचे मत होते. प्रथम सामाजिक सुधारणा होणे गरजेचे आहे, असे आगरकरांचे मत होते. याउलट लोकमान्य टिळकांना समाजसुधारणेपेक्षा राजकीय सुधारणा महत्त्वाच्या वाटत होत्या. कारण भारतीय समाजालाही, जनतेला सामाजिक सुधारणा मान्य नव्हत्या. त्यामुळे भारतात आपोआपच राजकीय सुधारणा व सामाजिक सुधारणा यावरून पक्षीय मतभेद झाल्याचे

आढळते. अर्थात शिवरामपंत परांजपे लो. टिळकांच्याच विचारांचे असल्याचे दिसते. टिळक व आगरकर यांच्यातील वैचारिक मतभेद सांगताना डॉ. अ.ना. देशपांडे म्हणतात, ''टिळकांची भूमिका रामचंद्राप्रमाणे 'आराधनाय लोकांना' होती तर आगरकर भवभूतीप्रमाणे 'उत्पस्यतेऽस्ति मम कोऽपि समान धर्मा' म्हणणारे होते.[६]

जहाल व मवाळ यांच्यात मतभेद होते. मवाळांना सुधारणा आवश्यक होत्या. जहालांना राजकीय सुधारणा म्हणजे स्वातंत्र्य तात्काळ मिळावे, असे वाटत होते. जहाल व मवाळ यांच्यातील वैचारिक कलहाचा फायदा ब्रिटिशांनी घेण्याचे ठरविले. त्यानुसार थोड्या थोड्या सुधारणा देऊन मवाळ–जहाल मतभेद वाढविण्यावर त्यांनी भर दिला. जहालांनी सामाजिक सुधारणांना विरोध केलेला दिसतो. महाराष्ट्रात लोकहितवादी, न्या. महादेव गोविंद रानडे, म. ज्योतिबा फुले इ.नी सुधारणांसाठी अथक प्रयत्न केले. परंतु शि.म.परांजपे यांनी सुधारणांकडे पाठ फिरविली. त्यांनी लोकमान्य टिळकांच्याच विचारांचा पुरस्कार केल्याचे दिसते.[७]

शिवरामपंतांनी आपल्या 'काळ' पत्रातून मवाळ नेत्यांवर प्रचंड टीका केल्याचे दिसते. कारण मवाळ ब्रिटिशांकडे झुकलेले होते. ब्रिटिशांची तरफदारी करण्यात धन्यता मानत होते. शि.मं.नी 'शरदऋतुतील मेघांनो', 'सगळेच नरसू', 'एका  सोमयज्ञाची हकिकत', 'स्वयंवर व संकुल युध्द', 'खोटे बोलण्याच्या विषयातील परीक्षा व बक्षिस', 'ब्लॅक होल', अशा अनेक लेखांतून मवाळ समाजसुधारकांवर टीका केलेली आढळते.[८]

## शिवरामपंतांचा सामाजिक दृष्टिकोन –

शिवरामपंत परांजपे यांचे 'देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे', हे ध्येय होते. त्या दृष्टीकोनातून त्यांनी आपल्या लेखनातून व दिलेल्या विविध व्याख्यानांमधून सामाजिक जनजागृती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले. आपली परखड मते वारंवार व्यक्त केली. भारतीय समाजाची मानसिकता बदलण्याची गरज त्यांनी बऱ्याचवेळा व्यक्त केलेली दिसते. फंदफितुरी, लाचखोरी यामुळे भारतीय समाज ब्रिटीशांनी जोडला जात आहे. म्हणून भारतीय समाजाच्या वैचारिक परिवर्तनाची गरज वारंवार शि.म.नी प्रतिपादन केल्याचे दिसते.[९]

लोकमान्य टिळकांना गुरुस्थानी मानणाऱ्या शिवरामपंतांनी टिळकांनी सुरु केलेल्या सर्व चळवळीत भाग घेतल्याचे दिसते आपल्या लेखणीतून व वक्तृत्वातून समाजजागृतीचा वसा पंतांनी शेवटपर्यंत चालूच ठेवलेला दिसतो. त्यांच्या प्रत्येक कृतीतून भारत देशाच्या स्वातंत्र्याचा उल्लेख होत होता. विविध आंदोलनातून समाजातील जनतेचा सहभाग उत्स्फूर्त व्हावा असे आण्णासाहेबांना वाटत होते.[१०]

टिळक – परांजपे सामाजिक सुधारणेच्या विरुध्द का? या संदर्भात वा.कृ.परांजपे यांनी शि.मं.च्या चरित्रात म्हटल्याप्रमाणे .... ''टिळक़ आणि परांजपे यांनी सामाजिक सुधारणेच्या विरुध्द पक्ष उचलला याची कारणे खालीलप्रमाणे असावीत.

१. मवाळ सुधारकांना इंग्रज देवदूत वाटत होते. जहालांचे विरोधी धोरण ही काही अंशी त्याची प्रतिक्रिया होती.

२. एक तर सुधारकांचे मोठे–मोठे पुढारी सुध्दा कृतीशून्य होते आणि शिवाय ते सरकारची मदत घेत असत. त्याचा जहालांना मोठा राग.

३. आपल्या चालीरितींमुळे इंग्रज येथे आले आणि त्यांनी आपल्याला जिंकले असे थोडेच आहे! शिवाजींनी स्वातंत्र्य स्थापले किंवा पूर्वी अनेक मोठमोठी स्वदेशी साम्राज्ये होती. तेव्हा काय चाली नव्हत्या? असा जहालांचा कोटीक्रम होता.

४. त्यावेळच्या सामाजिक बंधनांना झुगारून बहुसंख्य सनातनी समाजाचा रोष ओढवून घेण्याची हिंमत इच्छा व आग्रह जहालांजवळ नव्हता.

५. शिवरामपंतांचे म्हणणे असे दिसते की, आपल्या सर्व दुःखाचे मूळ व प्रमुख कारण परतंत्रता हे आहे. तिकडे लक्ष द्यावे. ते खरे प्राथमिक मूलगामी व पराक्रमाचे काम आहे. सामाजिक सुधारणा काय हळूहळू कालमानाने होतीलच.

६. परके इंग्रज आमच्या समाजातल्या उणिवा, दोष, रुढी, मागासलेपणा, जुन्या चालीरिती यांना नावे ठेवीत व त्यांचाच अनुवाद हे सुधारक करीत होते. त्यामुळे स्वाभिमानी जहालांना हे सर्व दोष कबूल करण्याची मानहानी आहे, असे वाटे. सुधारणा आमच्या आम्ही करू, हे उपरे कोण आम्हांला सांगणार, असा तो पीळ होता. इंग्रज म्हणतात म्हणून ते चूक आणि म्हणून ते करावयाचे नाही किंवा नावडतीचे मीठ आळणी ही अवमानितांची स्वाभाविक प्रतिक्रिया या धोरणाच्या मुळाशी होती. वेळ येईल तेव्हा ही

गृहच्छिंदे आमची आम्ही बुजवू. परंतु तोपर्यंत त्यांना आम्ही विरोधच करणार, अशी एका दृष्टीने तेजस्वीपणाची तर दुसऱ्या दृष्टीने पोकळ अभिमानाची व हट्टाची ही जहालांची वृत्ती होती.''[११]

अशाप्रकारे मवाळ व जहाल या दोन पक्षात वैचारिक मतभेद निर्माण झाल्याचे दिसते. परंतु दोघांचे ध्येय 'देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे', हेच होते. तिथपर्यंत जाण्याचे मार्ग मात्र वेगळे होते. इंग्रजांनी याच गोष्टीचा फायदा घेतला. भारतात अंतर्गत कलह कसे वाढतील व आपला साम्राज्य विस्तार कसा जास्त वाढविता येईल, याकडे लक्ष दिल्याचे दिसते.[१२]

शिवरामपंत एम.ए. झाल्यावर त्यांना चांगल्या पगाराची प्रोफेसरपदाची नोकरी महाराष्ट्र कॉलेजला मिळाली होती. पण त्यांच्या अनेक चळवळीतील सहभाग व व्याख्याने यामुळे संस्थाचालक त्रस्त झाले व शि.मं.ना आपल्या प्रोफेसरपदाचा राजीनामा द्यावा लागला. शि.मं.नी या अगोदरच लो.टिळकांच्याच पक्षात उडी घेतली होती. पंतांनी सुरुवातीला केसरीमध्ये लेख लिहिलेले होते. परंतु नंतर त्यांनी सन १८९८ साली स्वतःचे 'काळ' साप्ताहिक काढले. 'काळ' पत्रातून राजकीय, सामाजिक व आर्थिक विचार समाजापुढे मांडले.[१३]

पुण्यामधील सर्वात महत्त्वाची संस्था म्हणून सार्वजनिक सभेकडे पाहिले जाते. २ एप्रिल १८७० रोजी न्या. महादेव गोविंद रानडे यांनी सार्वजनिक सभेची स्थापना केली. ब्रिटिश सरकार व भारतीय लोक यांच्यामध्ये वाटाघाटी, त्यांच्यातील समस्या व प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक सभेचे आयोजन करण्यात आले. गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका यांचे सार्वजनिक सभेतील स्थान अद्वितीय होते. पुण्याच्या पर्वती संस्थानच्या गैरकारभाराला आळा घालण्यासाठी 'सार्वजनिक सभेचा' योग्य वापर सार्वजनिक काकांनी केला. सन १८८० पर्यंत सार्वजनिक काकांनी निस्पृःहपणे सार्वजनिक सभेचे कार्य पहिले. त्यानंतर न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या तंत्राने सभेचे कामकाज होऊ लागले. परंतु नंतर सन १८९६ मध्ये लोकमान्य टिळकांच्या हातात सार्वजनिक सभेची सुत्रे गेली. लोकमान्य टिळकांच्या नेतृत्त्वाखाली सभेचे उत्तम कामकाज सुरू झाले. सरकारने देशी भाषेत कायदे प्रसिध्द करावेत. हिंदू प्रतिनिधींच्या सल्ल्याने हिंदूचे प्रश्न सोडवावेत. जिल्ह्यांची सांपत्तिक स्थिती प्रकाशित करणे. दुष्काळी भागाला विश्वासू लोकांच्या भेटींचे आयोजन करणे,

दुष्काळाखाली रिलीफ फंड गोळा करणे, स्वदेशीचा पुरस्कार करणे, लघु उद्योग सुरू करणे. शेतकऱ्यांमध्ये जनजागृती करणे, अशी अनेक कामे सार्वजनिक सभेने हाती घेतली. [१४]

भारतीय राजकारणात लोकमान्य टिळकांच्या नेतृत्त्वाखाली जहालवादाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. मवाळांच्या कार्याचा दबदबा कमी झाला. त्यामुळे पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या कार्यातही बराच बदल झाला. मवाळांच्या हातातून सार्वजनिक सभा जहालांच्या हातात गेली. सार्वजनिक सभेत क्रांतीकारक बदल झाला. प्रथमतः गोपाळकृष्ण गोखले सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी होते. त्यांच्या जागेवर आता शिवरामपंत परांजपे हे सेक्रेटरी झाले. शिवरामपंतांच्या रुपाने सार्वजनिक सभेला एक नवा सेक्रेटरी मिळाला. सार्वजनिक सभेच्या कार्यामध्ये सुसूत्रता निर्माण करण्याचे काम शिवरामपंतांनी केले. लोकमान्य टिळकांच्या अध्यक्षतेखाली सार्वज़निक सभेच्या कार्यात भरीव सुधारणा करण्यात आल्या. पुण्यातील लोकांची कामे करण्यावर भर देण्यात आला. [१५]

लोकमान्य टिळकांच्या पक्षाचा सार्वजनिक सभेत विजय झाल्याने टिळक पक्षियांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. सार्वजनिक सभेची सूत्रे त्यांच्याकडे आली. असल्याने कामाचा उत्साह वाढला. परंतु, दुर्दैवाने सर्व देशात दुष्काळाचे सावट निर्माण होते. दुष्काळाचे रौद्र रुप पाहून सर्व भारतीयांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले. दुष्काळा पाठोपाठ प्लेगचे थैमान मोठ्या प्रमाणात निर्माण झाले. पुणे व मुंबई या दोन्ही प्रांतात प्लेगचे रुग्ण वाढले. सर्वत्र भितीचे वातावरण झाले. ब्रिटिश सरकार कोणत्याही प्रकारची मदत करण्यासाठी तयार नव्हते. एका बाजूला दुष्काळ व दुसऱ्या बाजूला प्लेग असे भीषण चित्र निर्माण झाले. सर्व सामान्य जनता कोंडीत सापडली. दुष्काळाचा सामना करावा की प्लेगच्या साथीतून आरपली सुटका करून घ्यावी, याच विचाराने सामान्य जनता त्रस्त झाली होती. गुरे–ढोरे यांना खायला–प्यायला नाही. शेतीत पीक नाही. ‘फॅमिन कोड’ हा कायदा मुंबई सरकार अंमलात आणण्यासाठी तयार नव्हते. धान्य, वैरणीची, पाण्याची सर्वत्र टंचाई निर्माण झाली होती. या सर्व परिस्थितीचा फायदा ब्रिटिश मिशनऱ्यांनी घ्यायला सुरुवात केली. गरीब हिंदु लोकांना मदतीच्या नावाखाली ख्रिश्चन धर्म स्विकारायला भाग पाडले. सामान्य भारतीयांच्या असहायतेचा फायदा घेण्याचे ब्रिटिशांचे काम चालूच होते. [१६]

हताश झालेल्या सर्वसामान्य प्रजेला अभय मिळणे आवश्यक होते. बिकट परिस्थितीतून लोकांना बाहेर काढणे महत्त्वाचे होते. कायदेशीर बाबी लोकांना समजणे आवश्यक होते. सामान्य लोकांमध्ये जिद्द व आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी लोकमान्य टिळकांनी चळवळीचे नेतृत्त्व आपल्या हाती घेतले. सार्वजनिक सभेच्या माध्यमातून लोकोपयोगी कार्ये करून आंदोलन व चळवळ हाती घेतली.[१७]

दुष्काळी भागात दौरे काढून सामान्य जनतेला दिलासा देण्याचे काम सार्वजनिक सभेच्या माध्यमातून करणे हे उद्दिष्ट ठरविण्यात आले. शिवरामपंत परांजपे दुष्काळ कमिटीचे सेक्रेटरी व अच्युत सीताराम साठे या दोधांच्या सहीने 'दुष्काळाबद्दल माहिती' हे पत्रक प्रसिध्द करण्यात आले. त्याप्रमाणे शि.म.परांजपे, साठे, वि.का.राजवाडे, नारायण बाबा घमेंडे, न.चि.केळकर, इ. प्रतिनिधी दुष्काळी भागाचा दौरा करण्यासाठी विविध भागात जाण्यासाठी निघाले. दुष्काळग्रस्त जनतेला समजावून सांगणे, त्यांच्या मनातील भिती कमी करणे, जनतेला मदत करणे, अशा उद्देशाने दौऱ्यांचे आयोजन करण्यात आले होते. ठाणे जिल्ह्यातील खत्तलवाड या गावी प्रो. साठे यांनी सभेमध्ये ''पिके बुडाली असली तर सरकारला सारा देऊ नका'', असे आवाहन जनतेला केले. त्यानंतर प्रो. साठे यांना अटक करण्यात आली. पुढे शिवरामपंतांनी अलिबाग या ठिकाणी दौरा काढला. संपूर्ण महाराष्ट्रात विविध व्याख्याने देऊन लोकांशी चर्चा करून सामान्यांमध्ये दिलासा देण्याचे काम पंतांनी केले. सर्वसामान्य लोकांची दुःखे शिवरामपंतांना जवळून पाहता आली. यावर एकच उपाय म्हणजे लवकरात लवकर देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन ब्रिटिश सरकारला विरोध करणे हे मत ठामपणे शि.म.परांजपे यांनी मांडल्याचे दिसून येते.[१८]

विविध चळवळीत सहभागी होऊन दौऱ्यांवर व्याख्याने देऊन समाज जागृती करण्याचे महत्त्वपूर्ण काम शि.मं.नी केले. वेळोवेळी टिळकांबरोबर दौऱ्यावर जाऊन सामाजिक ऐक्य वाढविले. सन १८९६साली 'राजाने प्रजेकरिता काय केले पाहिजे?' हे व्याख्यान दिले. या व्याख्यानातून सरकारच्या चुकांचाच पाढा वाचला. पुण्यातील तरुणांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करून देण्याचे काम शिवरामपंतांनी केले.[१९]

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये होमरुल चळवळ ही अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी होमरुल चळवळीचा उदय झाला. डॉ. ॲनी बेझंट यांनी आर्यलंडमध्ये सुरु झालेली ही चळवळ भारतात सुरू करण्याचा विचार व्यक्त केला. भारतामध्ये मद्रास प्रांतात सन १९१६ साली होमरुल लीगची स्थापना करण्यात आली. सर्वसामान्य लोकांमध्ये स्वातंत्र्याविषयी जनजागृती निर्माण करणे व स्वतःचे शासन निर्माण करणे ही उद्दिष्ट्ये नजरेसमोर ठेऊन भारतात ही चळवळ सुरू करण्यात आली. डॉ. ॲनी बेझंट यांनी लोकमान्य टिळकांची भेट घेऊन आंदोलनाची दिशा ठरविली. होमरुल आंदोलनामुळे भारतीय स्वातंत्र्य चळवळ सक्रियपणे सुरू झाली. ''आपल्या देशाचा राज्यकारभार करण्याचा अधिकार आपल्याला मिळावा, यासाठी केलेले आंदोलन म्हणजे 'होमरुल आंदोलन', चळवळ होय. भारतीयांना स्वतःचे शासन करण्याचा कायदा करण्याचा अधिकार मिळण्यासाठी होमरुल चळवळ सुरू झालेली होती. लोकमान्य टिळकांनी महाराष्ट्रात या चळवळीने सामान्य जनतेच्या मनात आत्मविश्वस निर्माण केलेला होता. लोकमान्य टिळकांनी आपल्या 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्रातून होमरुल आंदोलनाचा मोठ्या प्रमाणात प्रसार केला. सामान्य लोकांचा या चळवळीतील सहभाग लक्षणीय होता.[२०]

संपूर्ण देशामध्ये दुष्काळग्रस्त वातावरणातून सामान्य जनतेला बाहेर काढण्यासाठी समाजसुधारकांचे दौरे पार पडले. परंतु लगेचच पुण्यामध्ये सन १८९६-९७ मध्ये प्लेगची साथ सुरू झाली. सरकारने काही प्रमाणात उपाय योजना केली. परंतु साथीचा रोग मोठ्या प्रमाणात वाढू लागला. इंग्रजी अधिकारी चुकीच्या पध्दतीने वागत होते. हिंदी लोकांवर जबरदस्त अन्याय व अत्याचार करीत होते. पुण्यामध्ये प्लेग निवारण्याच्या कार्यासाठी ब्रिटिश सरकारने रँड नावाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती केली होती. रँड व त्याच्या सहकाऱ्यांनी हिंदी लोकांच्या धार्मिक भावना दुखावण्याचे काम केले. घरातील स्वच्छता करण्याच्या हेतूने बुट घालूनच स्वयंपाक घरात व देवघरात जाणे, घरातील साहित्य रस्त्यावर फेकून देणे, अशी कामे केल्यामुळे संतप्त झालेल्या चाफेकर बंधूंनी रँड व त्याचा सहकारी आयर्स्ट याचा खून केला. पुढे सरकारने चाफेकर बंधूंना फासावर लटकाविले. हळूहळू पुण्यातील प्लेगची साथ कमी होऊ लागली. पुण्यातील वातावरण निवळले.[२१]

पुण्यामध्ये शिवजयंती उत्सवास पुन्हा मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. ब्रिटिश राणी व्हिक्टोरिया हिच्या कारकिर्दीला साठ वर्षे पूर्ण झाल्याने सर्वत्र भारतात विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आलेले होते. शिवरात्र उत्सवाला पुण्यात लकडी पुलावरील विठ्ठल मंदिरात सुरुवात झाली. शि.म.परांजपे यांनी उत्साहात आपले पुराण सादर केले. त्यामध्ये 'राजसूय यज्ञ व शकुनी–धृतराष्ट्र यांच्यातील संवाद' हा मुख्य विषय होता. 'असंतोषःश्रियो मूलम् व संतोषस्तु श्रियो हन्ति' ही त्याची आधार वचने होती. महाभारतातील उत्तम उदाहरणे देऊन शि.म.परांजपे यांनी अतिशय उत्तम निरुपण केले. नुसते पोटभर खायला मिळून उपयोग नाही. आपला होणारा अपमान कोणालाही सहन होणार नाही. त्यामुळे निर्माण होणारा असंतोष नष्ट करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करायला हवा. असे उत्तम भाषण देऊन लोकांच्या मनावर प्रभाव निर्माण करण्याचे काम शिवरामपंत परांजपे यांनी केले.[२२]

रँडसाहेबांनी पुण्यात प्लेग निवारण या कामामध्ये उच्छांद मांडल्याने त्यावर गोळ्या झाडण्यात आल्या. रँड आणि त्याचे सहकारी आयर्स्ट यांचा मृत्यु झाला. ब्रिटिश वृत्तपत्रांनी पुण्यातील ब्राह्मणांविरुध्द आगपाखड करायला सुरुवात केली. त्यावेळी लोकमान्य टिळकांनी 'केसरी' या आपल्या पत्रातून ''सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?'', ''राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे'', असे अग्रलेख लिहून सरकारवर धारदार टीका केली. २२ जुलै रोजी मुंबईत लोकमान्य टिळकांना अटक करण्यात आली. पुढे १४ सप्टेंबरला लो. टिळकांना दीड वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. सरकारने कायदा अधिक व्यापक केला. सन १८१८ साली वसंत व्याख्यान मालेचे सेक्रेटरी या पदावर शिवरामपंत परांजपे यांची निवड करण्यात आली. ७ जून रोजी शि.म.परांजपे यांचे 'धर्मप्रसाराचे वेड' या विषयावर व्याख्यान झाले. या व्याख्यानात शि.म.परांजपे यांनी आपले सडेतोड विचार मांडले. ख्रिश्चन मिशनरी भारतीय लोकांना आपल्या धर्माच्या जाळ्यात कसे अडकवितात आणि आपल्या धर्मियांची संख्या वाढवितात, या विषयावर त्यांनी सडेतोड विचार व्यक्त केले. आपल्या वक्तृत्त्वातून व लेखांतून समाजप्रबोधनावर भर देणाऱ्या शिवरामपंतांना आपण एखादे वर्तमानपत्र काढावे, असा विचार मनात आल्याशिवाय राहिला नाही आणि त्यामधूनच जाज्वल्य देशाभिमान, वक्रोक्ती, व्याजोक्ती, उपहास असे जळजळीत अंजन घालणारे 'काळ' नावाचे साप्ताहिक उदयाला आले, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.[२३]

लॉर्ड कर्झनने १६ ऑक्टोबर १९०५ रोजी बंगाल प्रांताची फाळणी केली. पूर्व बंगाल व पश्चिम बंगाल असे दोन भाग करण्यात आले. हिंदू–मुस्लीम या दोन्ही धर्मात तेढ निर्माण करणे, हाच कर्झनचा मूळ हेतु होता. परंतु बंगाल प्रांत मोठा असल्याने राज्य कारभाराच्या सोयीसाठी बंगालची फाळणी केल्याचे लॉर्ड कर्झनने स्पष्ट केले. भारतीयांच्या भावना दुखावण्याचे काम कर्झनने केल्याने संपूर्ण भारतात असंतोषाचे व संतापाचे वातावरण निर्माण झाले. त्यातूनच लॉर्ड कर्झनने केलेल्या बंगालच्या फाळणीला संपूर्ण भारतात तीव्र विरोध करण्यासाठी 'वंगभंग चळवळ' सुरू झाली. हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक महत्त्वपूर्ण आंदोलन मानले जाते. सर्व देशभरात आंदोलने, सभा, मिरवणुका यांचे आयोजन करण्यात आले. त्यातूनच 'वंदेमातरम्' या प्रसिध्द घोषणेचा उदय झाला. या घोषणेमुळे भारतीयांमध्ये एकवाक्यता निर्माण झाली. 'वंदेमातरम्' ही घोषणा दिल्यास ब्रिटिश सरकार भारतीयांना तुरुंगात डांबत असत. यातूनच संपूर्ण भारतात स्वदेशी व बहिष्कार चळवळीचा कार्यक्रम पुढे आला. बंगालच्या फाळणीच्या संपूर्ण देशभर तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. बंगालच्या फाळणीच्या विरोधात कलकत्ता येथे निषेध सभा आयोजित करण्यात आली. त्यामध्ये स्वदेशीचा वापर व ब्रिटिश बनावटीच्या वस्तुंवर बहिष्कार हे तत्त्व सर्वानुमते मान्य करण्यात आले. 'स्वराज्य' हेच महत्त्वाचे ध्येय ठरविण्यात आले. अनेक ठिकाणी परकीय दुकांनापुढे निदर्शने करण्यात आली. परदेशी कपड्यांच्या होळ्या करण्यात आल्या. स्वराज्य मिळविण्यासाठी स्वातंत्र्यपूर्वकाळात वंगभंग चळवळ व स्वदेशी आंदोलनाचे स्थान अनन्य साधारण मानले जाते. कारण यामधूनच भारतीय समाज जाती, धर्म, पंथ विसरून एकत्र आला, हे मान्य करावेच लागते.[२४]

लोकमान्य टिळक व पंतांमध्येही वैचारिक मतभेद होतेच. स्वातंत्र्य मिळविण्याचा मार्ग किंवा साधने यावरून दोघांमध्ये बराच बैचारिक गोंधळ होता. लोकमान्यांचा सनदशीर मार्गावर विश्वास होता. परंतु शिवरामपंतांना चळवळी, सभा, आंदोलने करून आपल्याला स्वातंत्र्य मिळणार नाही. शस्त्रास्त्रांचा वापर करून दहशतीच्या मार्गाचा अवलंब करावा, असे शि.मं.ना वाटत असे. ज्यामुळे Revolution घडून येईल, असे करावे, असे शि.म. म्हणत असत. परंतु तरीसुध्दा परांजपे यांनी उघडउघड कधीही लोकमान्य टिळकांना विरोध केलेला दिसत नाही. लोकमान्यांबद्दल अतीव आदर होता. त्यामुळे काही गोष्टी खटकल्या तरी शि.म. कधीही बोलून दाखवत नसत.[२५]

## टिळक–परांजपे दोन सूर्य –

शिवरामपंत परांजपे व लोकमान्य टिळक यांच्यातील नाते गुरु–शिष्याचे होते. शि.म.परांजपे पुण्याला न्यू इंग्लिश स्कूल मध्ये शिकण्यासाठी आले. त्यावेळी 'गणित' हा विषय शिकविण्याचे काम लोकमान्य टिळक करीत होते. पुढे शि.म.परांजपे यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये पहिल्या वर्षाला प्रवेश घेतला. त्यावेळी तेथील असलेल्या प्रोफेसरांमध्ये टिळकांचे स्थान महत्त्वाचे होते. गणित आणि संस्कृत शिकविण्यामध्ये लो.टिळक़ पारंगत होते. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांच्या मनामध्ये टिळकांविषयी एक वेगळाच आदर निर्माण झालेला होता. शाळा आणि कॉलेजमध्ये शिकविणारे एक शिक्षक व प्रोफेसर म्हणून टिळकांचा विशेष सन्मान शि.मं.च्या मनात सदैव होता. पुढे पंतांनी प्रिव्हियसची परिक्षा पास झाल्यावर पुढील शिक्षणासाठी डेक्कन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. डेक्कन कॉलेजमधून ते एम्.ए. उत्तीर्ण झाले. पुढे पुण्यामध्ये टिळक आणि आगरकर असे दोन वैचारिक गट किंवा पक्ष निर्माण झाले. सर्व सामान्य लोकांची दुःखे जाणणारा टिळक पक्ष विचारांनी जहाल होता. देशप्रेम, स्वातंत्र्याप्रती तळमळ, जहाल विचार, इ. मुळे शिवरामपंत लोकमान्य टिळकांच्या विचारांकडे वळले. शाळा, कॉलेजपासून शिवरामपंत व लो.टिळक यांचा स्नेह होताच. सन १८९५ साली विंचूरकरांच्या वाड्यात टिळकांच्या स्वतःच्या गणपती उत्सवात पान–सुपारीच्या कार्यक्रमात शिवरामपंत जातीने उपस्थित होते. लोकमान्य टिळकांनी शिवजयंती व गणपती उत्सव हे समारंभ सार्वजनिकरित्या सुरू केले. किल्ले रायगडावर 'शिवजयंती' उत्सवाची जबाबदारी टिळकांनी शिवरामपंतांवर टाकली व ती त्यांनी अतिशय चोखपणे बजावली.'' शिवाजी महाराज निर्माण झाले त्यावेळी महाराष्ट्रीयांची स्थिती महाराजांनी पुढे आपल्या साामर्थ्याने त्यांना दाखविलेले दोन सुखाचे दिवस' या विषयावर शि.म.परांजपे यांनी पहिले जाहिर व्याख्यान दिले.[२६]

काळकर्ते शिवरामपंत परांजपे यांच्यावर लोकमान्य टिळकांचा मोठा प्रभाव होता. परांजपे यांची व्याख्याने वक्रोक्ती, व्याजोक्ती, उपहास या विचारांनी काठोकाठ भरलेली असत. लोकमान्य टिळकांपेक्षा अधिक जहालवाद शि.म.परांजपे यांच्या विचारात होता. लो. टिळकांना क्रांतीचा मार्ग विशेष पसंत नव्हता. परंतु शिवरामपंतांना स्वातंत्र्य मिळविण्यासाठी क्रांतीच्या, दहशतीच्या मार्गाचा अवलंब करावा, असे सततत वाटत असे. वा. कृ. परांजपे यांनी म्हटल्याप्रमाणे ''शिवरामपंत टिळकांना येऊन मिळाले असले तरी त्यांच्यात मिसळले नव्हते.''

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा ओढा टिळकांपेक्षा परांजपे यांच्याकडे अधिक होता. सावरकरांचे चरित्रकार शि.ल.करंदीकर यांनी ''सावरकरांच्या क्रांतीकारक जीवनाच्या वैचारिक स्फुर्तीचे गुरुत्त्व 'काळ' पत्र व त्याचे संपादक प्रो. आण्णासाहेब परांजपे यांच्याकडे जाते.'' ही गोष्ट मान्य केली पाहिजे असे म्हटलेच आहे.[२७]

महाराष्ट्रात त्यावेळी मवाळांचे वर्चस्व संपले होते. त्यामुळे टिळक़ांचा जहालवाद आणि त्याचा प्रसार सर्वत्र झाला होता. तरुणही जहालवादाकडे आकर्षित झालेले होते. सन १८९८ ते १९०८ या काळात महाराष्ट्रात लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व शिवराम महादेव परांजपे हे दोन सूर्य तळपत होते. टिळक – परांजपे म्हणेल ती पूर्व दिशा महाराष्ट्राच्या राजकारणात होती. 'केसरी' आणि 'काळ' या पत्रांच्या माध्यमतून दोघांचेही समाजप्रबोधनाचे कार्य जोरात सुरू होते. सरकारवर सतत टीका करून समाजाच्या मागण्या आपल्या पत्रांतून मांडत होते.[२८]

सन १८९७ मध्ये अमरावती येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाला शिवरामपंत पहिल्यांदा उपस्थित राहिले, तेव्हापासून अगदी १८२९ पर्यंत त्यांचा काँग्रेसशी जवळचा संबंध होता. मवाळांच्या हातात सत्ता असेपर्यंत काँग्रेसमध्ये चांगले काम होणार नाही, असे शि.मं.ना कायम वाटत असे.[२९]

पुढे १९०७च्या काँग्रेसच्या सुरत अधिवेशनात जहाल–मवाळ यांच्यात प्रचंड गोंधळ माजला. त्यामुळे काँग्रेसमध्ये फूट पडली. सन १९१४ साली राजद्रोहाच्या खटल्यातून मंडालेच्या तुरुंगातून टिळकांची सुटका झाली. जहाल व मवाळ यांच्यात पुन्हा एकदा समेट घडवून आणावा, असे लोकमान्य टिळकांना वाटत होते. परंतु मवाळांशी समेट करण्यात अर्थ नाही, असे शि.मं. ना वाटत होते. टिळकांचे धोरण शि.मं.ना फारसे आवडले नव्हते. बेळगावला देखील या प्रश्नाची बरीच चर्चा झाली. त्यावेळी 'बळवंतराव वैद्याने ही गोळी दिली आहे म्हणून ती घ्यावयाची,'' असे शिवरामपंतांनी खासगी चर्चेत त्यावेळी सांगितले होते, असे म्हणतात. पुढे १९१७ मध्ये मवाळ गट काँग्रेसमधून बाहेर पडला व त्यांनी 'लिबरल फेडरेशन' नावाचा नवा पक्ष काढला.[३०]

दुर्दैवाने १ ऑगस्ट १९२० रोजी लो.टिळकांचे दुःखद निधन झाले. संपूर्ण देशात दुःखाचे वातावरण पसरले. जहालवादाचा जणू काही अंत झाला होता. राष्ट्रीय काँग्रेसचे नेतृत्त्व

मोहनदास करमचंद गांधी अर्थात महात्मा गांधी यांचेकडे आले होते. म. गांधी वेगळ्या मार्गांचा अवलंब केल्याचे दिसून येते. अहिंसा, सत्याग्रह, असहकार, सविनय कायदेभंग अशा तत्त्वांचा वापर करून सरकारला सळो की पळो करण्याचे धोरण राबविले. सर्व चळवळीत सर्वसामान्य लोकांचा सहभाग घेण्याचे ठरविले. परंतु लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर महाराष्ट्रातील त्यांचे अनुयायी चटकन म.गांधींच्या चळवळीत सामील होताना विचार करू लागले, कारण लो.टिळकांच्या अगदी उलट विचार होते. टिळकांचा जहालवाद जवळजवळ संपुष्टात आला होता. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या नेत्याला पाठिंबा देण्याचे शिवरामपंतांचे धोरण असल्याने म.गांधींच्या चळवळीत ते सहभागी झाले. अनेक महाराष्ट्रीय नेत्यांनी शि.मं.वर प्रचंड टीका केली. परंतु कोणाच्याही टीकेकडे लक्ष न देता 'देशाचे स्वातंत्र्य' हा घटक महत्त्वाचा मानून गांधींच्या चळवळीत परांजपे सहभागी झाले.[३१]

## महात्मा गांधी व शिवरामपंत परांजपे –

१ ऑगस्ट १९२० हा दिवस दुर्दैवी मानला जातो. कारण या दिवशी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे निधन झाले. लो. टिळकांच्या मृत्युनंतर भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्त्व मोहनदास करमचंद गांधी म्हणजेच महात्मा गांधी यांचेकडे आले. पारतंत्र्याच्या अंधःकारात चाचपडणाऱ्या भारताला म. गांधींच्या नेतृत्त्वाखाली १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. ब्रिटिशांच्या जोखडातून भारत मुक्त झाला. अहिंसा, सत्याग्रह, कायदेभंग, छोडो भारत अशा वेगवेगळ्या निःशस्त्र चळवळीने देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यावर महात्मा गांधींचा पूर्ण विश्वास होता. याद्वारे जगासमोर एक नवा आदर्श निर्माण करण्याचे कार्य. म. गांधीनी केले. 'राष्ट्रपिता' हा बहुमान त्यांना प्राप्त झाला. जगभरातून म.गांधींच्या कार्याचा गुणगौरव आजही केला जातो. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांना मुलभूत हक्कांचा लढा म. गांधींच्या नेतृत्त्वाखाली जिंकला. त्यामुळे नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या आग्रहास्तव भारतात येऊन स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होण्याचे मान्य केले. मवाळ धोरण व विचारांचा म.गांधीवर प्रभाव होता. ''लोकमान्य टिळकांच्या जहाल विचारसरणीमुळे राष्ट्रीय चळवळ हिंसात्मक बनेल'', असे मत म. गांधींनी व्यक्त केले होते. म. गांधींनी एक वर्षभर संपूर्ण भारताचा दौरा करून सर्व भारतीय लोकांचे परिस्थितीचे अवलोकन केले. त्यानंतर 'सत्याग्रह' व 'असहकार' या तत्त्वांचा अवलंब करून चळवळ करण्याचे निश्चित केले.[३२]

लोकमान्य टिळकांबरोबर जसे पंतांचे वैचारिक मतभेद होते तसेच महात्मा गांधी यांचेबरोबरही त्यांचे मतभेद होतेच. गांधींचे कोणतेही चळवळीचे विचार पटले तरच शिवरामपंत त्यामध्ये सहभागी होत. अन्यथा गप्प राहत. कोणाच्याही पूर्णपणे आहारी न जाता स्वतःच्या विचारांवर ठाम असत. कारण आण्णासाहेबांचे स्वतःचे एक स्वतंत्र व्यक्तिमत्व होते. विचार होते व स्वतंत्र बाणा होता. लो. टिळकांच्या मृत्यूनंतर पंतांनी म.गांधींना स्वातंत्र्य लढ्यात साथ देण्याचे ठरविले.[३३]

''एका वर्षात स्वराज्य मिळवून देऊ'', असा नारा म.गांधींनी दिला. त्यामुळे पंतांनी या चळवळीत समरस होण्याचे ठरविले. सन १९२७ साली 'पुणे प्रांतिक परिषदे'चे शि.म.परांजपे स्वागताध्यक्ष होते. त्यामध्येच 'संपूर्ण स्वराज्याचा ठराव' त्यांनी मांडला. बार्डोली सत्याग्रह दिन, सायमन कमिशनवरील बहिष्कार व नेहरू रिपोर्टचा प्रचार अशा अनेक सामाजिक कार्यात पंतांनी आपला सहभाग नोंदविला. टिळक़ स्वराज्य फंडाला स्वतः रु. ५०० दिले. शिवाय पुण्यातील विविध व्यापाऱ्यांबरोबर त्यांचे चांगले संबंध होते. त्यामुळे पुण्यात व इतर ठिकाणी फिरून भरपूर वर्गणी गोळा करण्याचे काम केले. शिवाय डौलदार पोषाखाचा त्याग करून जाडीभरडी खादीची वस्त्रे वापरायला सुरुवात केली. काळाबरोबर नवीन गोष्टी स्विकारल्या पाहिजेत, असा संदेश पंतांनी समाजाला दिलेला दिसतो.[३४]

सुरुवातीला म.गांधींच्या राजकारणावर शि.म. परांजपे प्रचंड टीका करताना दिसतात. ते म्हणत असत – ''सुताने स्वराज्य मिळाले तर देवळांत पुराण ऐकून सूत काढणाऱ्या म्हाताऱ्या आजीबाईंनीच ते अगोदर मिळविले असते.'' सूत कताई करणाऱ्याची त्यांनी खिल्ली उडविलेली दिसते.[३५]

डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे यांनी शि.म.परांजपे यांच्याबद्दल सांगितलेली आठवण अतिशय महत्त्वपूर्ण मानली जाते. त्यांच्या म्हणण्यानुसार –''सन १९२१–२२ ची गोष्ट. प्रेम, अहिंसा, असहकारचे युगास प्रारंभ झाल्यानंतर पहिल्यांदा माझी व शिवरामपंतांची मुंबईस सरदारगृहात भेट झाली. त्यादिवशी मुंबईत विलायती कपड्यांची होळी महात्माजींच्या अध्यक्षतेखाली होणार होती. मी काही कामानिमित्त मुंबईस गेलो. होतो. मी सरदारगृहाचा जीना चढून वर चाललो होतो व तिकडून अंगरखा, शुभ्र धोतर, खादीची टोपी, अशा पोषाखांत

आण्णासाहेब खाली उतरत होते. ह्या वेळेस त्यांनी घातलेली खादीची टोपी पाहून मी पहिल्यांदा त्यांना क्षणभर ओळखू शकलो नाही व चकित होऊन विचारले, ''कां आण्णासाहेब डोक्यावरील पगडी गेली का? आता टोपी आली डोक्यावर! ते हसले व म्हणाले ''आत युग पालटले आहे. तुमच्याप्रमाणे आम्ही inappreciative नाही.''

मला त्यांच्या या उद्‌गारांचा फार अचंबा वाटला व धक्का बसला आणि वाटूं लागले की खरोखरच युग  बदलले आहे की काय! तो प्रसंग अजूनही माझ्या डोळ्यांपुढे कायम दिसतो. टिळकांना जाऊन तेव्हा फक्त एकच वर्ष झाले असेल नसेल. म्हणून तर मला त्या प्रसंगाचा जास्तच शॉक बसला.'' या वरून आपल्याला पंतांनी स्विकारलेले काम समरसपणे करण्याचे धोरण आखलेले दिसते. लोकमान्य टिळकांच्या कळातील मिजाशी पोषाखाचा त्याग करून म.गांधीचंया आवाहनानुसार खादीची वस्त्रे परिधान करण्याचे धोरण पंतांनी अगदी शेवटपर्यंत पाळले, हा त्यांचा विशेष गुण वाखाणण्याजोगा होता, हे स्पष्ट होते.[३६]

कोणतेही कार्य हातात घेतल्यावर कायृपूर्ती केल्याशिवाय शिवरामपंत स्वस्थ बसत नसत. म.गांधींच्या चळवळीत शि.म.सहभागी झाल्यावर त्यांच्या चळवळीला प्रसिध्दी मिळावी, ह्या हेतूने परांजपे यांनी 'स्वराज्य' या नवीन पत्राची सुरुवात केली. १२ ऑगस्ट १९२० गुरुवार रोजी स्वराज्यपत्राचा पहिला अंक निघाला. पहिल्याच अंकात 'लोकमान्य टिळकांवर मृत्युलख' लिहिण्याचा प्रसंग त्यांच्यावर आला. 'काळ' पत्रातील जहाल विचार स्वराज्य पत्रात दिसत नाहीत. कारण महात्मा गांधींचे सर्वच विचार पंतांना पटत नव्हते. स्वराज्य पत्राच्या माध्यमातून म.गांधीची चळवळ महाराश्ट्रऋात आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिवरामपंतांनी केले.

स्वराज्य पत्र १९२० ते १९२७ या काळात चालविले. परंतु थोडेसे विचार मवाळ वाटतात. परंतु म.गांधींनी एका वर्षात स्वराज्य मिळवू, अशी घोषणा करून स्वराज्य मिळविले नाही, म्हणून 'महात्मा गांधी, तुम्ही चुकलांत!'  असा लेख स्वराज्यपत्रातून लिहून पंतांनी म.गांधींवर सडेतोड टीका केल्याचे दिसते.[३७]

लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी या दोघांही महान सुधारकांबरोबर चळवळीत सहभागी होण्याचे महत् कायृ शिवराम महादेव परांजपे यांनी केल्याचे दिसून येते. लोकमान्य टिळक व महात्मा गांधी यांच्याबरोबर पंतांचे वैचारिक मतभेद होते. त्यांचे विचार पटले तर

त्यामध्ये सहभागी होत अन्यथा स्वस्थ बसत. 'Not failure but low aim is crime' हे ब्रीद शिवरामपंतांचे होते. शिवरामपंतांच्या विचारांचा एक बाणा होता. स्वतंत्र विचार होते. कोणाच्याही आहारी जाण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. त्यांची काही तत्त्वे त्यावर ते ठाम असत. स्वातंत्र्यासाठी टिळक आणि गांधी या दोघांच्याही चळवळीत पंत सहभागी झाले. परंतु मते मात्र त्यांचीच असत. त्यांच्या मतांवर ते ठाम असत. परंतु दोघांनाही त्यांनी कोणताही अडथळा निर्माण केला नाही. लोकमान्य टिळकांपेक्षा जहाल व क्रांतीकारी विचार मांडून शि.मं.नी विविध व्याख्यानांद्वारे आपले विचार व्यक्त केलेले दिसतात. महाराष्ट्रात खरा जहालवाद निर्माण करण्यामध्ये शिवरामपंतांचा सिंहाचा वाटा होता.

परंतु महात्मा गांधींच्या नेतृत्त्वाखाली असहकार चळवळीत शिवरामपंत सहभागी झाले. यावर अनेकांनी प्रश्नचिन्ह निर्माण केले .परंतु स्वातंत्र्याची चळवळ सुरू ठेवल्याशिवाय भारत स्वतंत्र होणार नाही, याची जाणीव शि.मं. ना होती. म्हणून मवाळ विचार असले तरी म.गांधींच्या चळवळीला सहाय्य करण्याचे धोरण शि.मं.नी राबविले. गांधींच्या आदेशानुसार अंगरखा, पागोटे, सोडून खादीची वस्त्रे परिधान केली. त्यांच्यावर झालेल्या टीकेकडे पंतांनी दुर्लक्ष केले. कारण गांधींच्या रुपाने भारतात एक सर्वसमावेशक चळवळ निर्माण होत होती. स्वातंत्र्याचा लढा देण्यासाठी महाराष्ट्रातून अनेक व्याख्याने दिली व गांधींच्या चळवळीला पाठिंबा दिला. ज्याने क्रांती जवळ येईल, स्वातंत्र्य जवळ येईल, असे कार्य हाती घ्यायचे असे शिवरामपंतांनी ठरविले होते, हे यावरून लक्षात येते.[३८]

## मुळशी सत्याग्रहातील सहभाग –

समाजातील लोकांना न्याय मिळवून देणे हे शि.मं.चे ध्येय होते. सेनापती बापट यांच्या नेतृत्त्वाखाली मावळ मुळशी येथे सत्याग्रह सुरू झाला. टाटा कंपनीने मुळशी येथे धरण बांधण्याचे ठरविले. त्यामुळे मावळातील लोकांच्या जमिनी पाण्याखाली जाणार होत्या. त्यासाठी लढा उभारण्यात आला. त्यासाठी सन १९२२ साली 'सत्याग्रह सहाय्यक मंडळा'ची स्थापना करण्यात आली. या मंडळाचे अध्यक्षपद शिवरामपंतांना देण्यात आले. त्यानुसार १) मुळशी पेट्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी वाचविणे २) धरणाच्या बांधकामास पूर्णपणे विरोध करणे. ही या मंडळाची ध्येये ठरविण्यात आली.[३९]

आधुनिक सुधारणांमुळे सर्वसामान्य लोकांना आपल्या जमिनी गमवाव्या लागत होत्या, त्यामुळे शि.मं.नी चळवळीत सहभागी होण्याचे ठरविले. कारण सामान्य लोकांचा कोणीच विचार करीत नव्हते. आधुनिक सुधारणा व वीजनिर्मितीच्या नावाखाली सामान्यांचे हाल होत होते.[४०]

९ डिसेंबर १९२१च्या 'स्वराज्य'च्या अंकात शिवरामपंत म्हणतात – ''आमच्या स्वराज्यांत आम्हाला सर्व काही अर्वाचीन काळच्या सुधारणा पाहिजे आहेत. फक्त त्या आमच्या अंमलाखाली असल्या पाहिजेत. दुसऱ्यांच्या तंत्राखाली राहणारी आणि दुसऱ्यांची तुमडी भरणारी अशी आगगाड्या, तारायंत्रे, पोस्ट ऑफिसे वगैरे खाती पुष्कळ असून आम्हांला त्यांचा काय उपयोग ? अशा प्रकारची ती निरुपयोगी खाती असल्यापेक्षा नसलेलीच जास्त चांगली. परंतु ती आमची खाती आमच्याच फायद्याकरिता जेव्हा चालविली जाऊ लागतील, तेव्हा ती सर्व आमच्या स्वराज्याकरिता आम्हां हिंदुस्थानातील लोकांना पाहिजेच आहेत.[४१]

ब्रिटिशांना आणि येथील श्रीमंत लोकांना उपयुक्त सुधारणांना विरोध करण्याचे धोरण शि.मं.नी मुळशी सत्याग्रहात राबविले. टाटा कंपनीने धरण बांधून वीज निर्मितीचा प्रकल्प हाती घेतला होता. मावळातील गरीब लोकांना थोड्या पैशांचे अमिष दाखवून जमिनी बळकविण्याचे धोरण अवलंबिले होते. लोकांच्या जमिनी पाण्याखाली बुडू नयेत म्हणून सत्याग्रह सुरू केला. परंतु जमिनीच्या बदल्यात कंपनीने पैसे द्यायला सुरुवात केली. १ मे १९२२ला शि.म.परांजपे यांनी मुळशी सत्याग्रहात भाग घेतला. जोरदार सत्याग्रह करूनही काही फायदा झाला नाही. मुळशीच्या डोंगरात टाटा कंपनी धरण उभे करणारच होती. त्यांना सरकारचा मोठा पाठिंबा होता. महाराष्ट्रातील नेत्यांमध्ये वैचारिक मतभेद झाल्याने मुळशी सत्याग्रह अयशस्वी झाला. पुढे सर्व आंदोलकांना अटक करण्यात आली. पुढे दिनांक ७ नोव्हेंबर १९२२ रोजी सहा महिन्यांच्या कारावासानंतर शि.म.परांजपे, फाटक व दामले यांना पुण्याच्या येरवड्याच्या तुरुंगातून सोडण्यात आले.[४२]

मावळ मुळशीतील लोकांच्या जमिनी वाचविण्याचा प्रयत्न शि.मं.सह अनेक कार्यकर्त्यांनी केले. मुळशी सत्याग्रहात आपला सहभाग नोंदवून शि.मं.नी समाजातील लोकांच्या प्रश्नाला पाठिंबा दिल्याचे दिसते. कोणत्याही सामाजिक कार्यात परांजपे यांचा वाटा सिंहाचा होता.[४३]

## कौन्सिल प्रवेश–

लोकमान्य टिळकांच्या निधनानंतर कलकत्त्याच्या अधिवेशनात असहकाराचा ठराव संमत करण्यात आला. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कार्यात सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले. पंतांवर टीका होऊनही ते या स्वातंत्र्याच्या यज्ञात सहभागी झाले. कौन्सिल प्रवेश करण्यावरून कॉंग्रेसमध्ये फाटाफुटीचे राजकारण मोठ्या प्रमाणावर सुरू झाले. कौन्सिलमध्ये जाऊन सरकारला विरोध करणारा फेरवादी (टिळकांच्या विचारांचे) गट होता. तर म. गांधीच्या असहकार कार्यक्रमात बदल न करता तो तसाच चालू ठेवावा, असे म्हणणारा, मानणारा नाफेरवादी गट होता.[४४]

शिवरामपंत गांधींच्या चळवळीत सहभागी झाल्याने अर्थातच नाफेरवादी गटात होते. सरकारशी असहकार करून कौन्सिलात न जाण्याचा निर्णय शि.मं.नी घेतला होता. कॉंग्रेसमधील गटातटाचे राजकारण थांबवून महात्मा गांधींच्या चळवळीसाठी सर्वांनी एकत्र येण्याचे आवाहन पंतांनी केले होते.[४५]

टिळक मोठे का गांधी मोठे? या वादात न पडता देशाला लवकर स्वातंत्र्य मिळवून देण्याचे ध्येय उराशी बाळगावे, असे आवाहन शि.म.परांजपे यांनी केले. महाराष्ट्रातील राष्ट्रीय पक्षात ऐक्य निर्माण व्हावे, असे पंतांना वाटत असे.[४६]

टिळक मोठे की गांधी मोठे या संदर्भात शि.म. परांजपे म्हणतात – ''लो. टिळक आणि म.गांधी हे दोघेही सर्वांना सारखेच वंदनीय आहेत. परंतु लो. टिळक हे महात्मा गांधींपेक्षा किती तरी जास्त मोठे होते, असे मानणे ज्यांना जरूर असेल त्यांनी तसेही जरूर मानावे. त्याबद्दल कोणाचाही वाद नाही. गांधी मोठे की टिळक मोठे आणि त्यांच्या तुलनेपासून काय सिध्द होते, हा काही हल्ली राज्यापुढे प्रश्न नाही. आपला देश स्वतंत्र आणि स्वराज्ययुक्त कसा होईल, हा लोकांपुढे मुख्य प्रश्न आहे.'' या सर्व वादापेक्षा स्वातंत्र्याला महत्त्व द्या असा जणू इशारा शि.मं.नी दिलेला दिसतो.[४७]

लो. टिळकांच्याच शिकवणुकीने पंतांनी राजकारणात पाऊल टाकले होते. लो. टिळकांबद्दल त्यांना प्रचंड आदर होता. स्वराज्यपत्राच्या पहिलाच अंक १२ ऑगस्ट १९२०मध्ये

टिळकांच्या कार्यकर्तृत्वाचे कौतुक करताना शि.मं.नी पुढील उद्गार व्यक्त केलेले आढळतात – ''दररोजच्या व्यवहारांतील जो जो राजकीय प्रश्न राष्ट्राच्या पुढे विचाराकरिता येईल तो तो प्रश्न हाती घ्यावयाचा, त्याच्याकडे स्वदेशाभिमानाच्या दुर्बिणीतून पहावयाचे त्या भिंगातून जी योग्य दिशा दिसेल त्या दिशेने तो प्रश्न लोकांपुढे मांडावयाचा. लोकांची मने त्या दिशेला अनुकूल करावयाची आणि लोकमताच्या प्रबळ सामर्थ्याचे सभांतून आपल्या स्वदेशाभिमानाच्या दृष्टीला सरकारी अधिकारी अनुकूल झाले नाहीत तर त्यांच्यावर वर्तमानपत्रांतून, सभांतून, कौन्सिलांतून, कॉन्फरन्सेसमधून आणि काँग्रेसमधून हल्ले चढवावयाचे व त्यांच्या मताचा पाडाव करून आपल्या मताचा विजय प्रस्थापित करावयाचा हे कार्य लो.टिळकांनी केलेले आहे.[४८]

देशाला स्वातंत्र्य हा घटक महत्त्वाचा असल्याने गांधी – टिळक वाद घालण्यापेक्षा दोघांबद्दल सारखाच आदरभाव व्यक्त करण्याचे शि.मं.नी सांगितले.[४९]

सन १९२४ साली राष्ट्रीय काँग्रेसने कॉन्सिल प्रवेशाला मान्यता दिली. त्यातूनच पुढे 'स्वराज्यपक्षा'ची स्थापना करण्यात आली. त्यावेळी शिवरामपंतांनी कॉन्सिल प्रवेश प्रचारासाठी अनेक ठिकाणी दौरे काढले होते.[५०]

सन १९२४ च्या जानेवारी महिन्यात येरवड्याच्या तुरुंगात असताना महात्मा गांधींना अपेंडिक्सचा त्रास झाल्याने ससून रुग्णालयात त्यांच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली. त्यावेळी रोज संध्याकाळी शिवरामपंत म.गांधींना भेटण्यासाठी ससून रुग्णालयात जात असत. त्यावेळी दोघांमध्ये बराच विचार विनिमय होत असे. पुढे सरकारने महात्मा गांधी रुग्णालयात असतानाच त्यांची सुटका केली.[५१]

सन १९२५ साली महात्मा गांधी काही कामानिमित्त पुण्यात आले होते. त्यावेळी एक दिवस त्यांचा मुक्काम शि.म. परांजपे यांचेकडे होता. काँग्रेसचे अनेक कार्यकर्ते पुण्यात आले की शि.मं.कडेच उतरत असत. शि.मं.चे अशा प्रकारे देशसेवेचे कार्य चालूच होते. काळाच्या ऐवजी 'स्वराज' पत्राच्या माध्यमातून महात्मा गांधींचे राजकारण महाराष्ट्रात पंतांनी आणले, म्हणूनच आज महाराष्ट्रात गांधींची चळवळ दिसत आहे व काँग्रेसचे तेज पडत आहे,'' असे मत अनेक जणांनी व्यक्त केलेले दिसत आहे.[५२]

महात्मा गांधींच्या अहिंसेच्या तत्त्वाचे कधीतरी हिंसेत रुपांतर होईल, असे शि.मं.ना सतत वाटत असे. हिंसा व अहिंसा हे दोन मार्ग होते. पैकी कोणत्याही एका मार्गाने देशाला स्वातंत्र्य मिळणे महत्त्वाचे होते. पुढे मागे क्रांती होईल व देशाला स्वातंत्र्य मिळेल अशी आशा पंताना वाटत होती.[५३]

सन १९२८ मध्ये 'सायमन कमिशन' बहिष्काराच्या चळवळीतही शि.म.परांजपे सहभागी झालेले दिसतात. पंडीत जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस या तरुण कार्यकर्त्यांमुळे काँग्रेसमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. पुण्यात रे मार्केटच्या मैदानात हजारो कार्यकर्ते लोक एकत्र आले. सायमन कमिशनचा निषेध व्यक्त करण्यात आला. सर्व पक्षीय नेते एकत्र येऊ लागले. पुण्यात संयुक्त महाराष्ट्र प्रांतिक परिषद भरविण्यासाठी योजना आखली. त्याचे अध्यक्षपद देशभक्त बाबु सुभाषचंद्र बोस यांना देण्याचे सर्वानुमते ठरले. ही परिषद  टिळक स्मारक, पुणे येथे भरविण्यात आली. तेथे शिवरामपंतांचे स्वागताध्यक्ष म्हणून भाषण झाले. आपल्या भाषणात पंतांनी बहिष्कार सुरु ठेवा, सारा सरकारला देऊ नका, असे आवाहन जनतेला केले. ''हिंदी लोकांचे ध्येय संपूर्ण राष्ट्रीय स्वातंत्र्य हे आहे. असे ही परिषद जाहीर करत आहे.'' असा ठराव स्वागताध्यक्ष म्हणून पंतांनी मांडला.[५४]

संपूर्ण स्वराज्याची एकत्रित मागणी करण्यासाठी नेहरू रिपोर्ट  प्रसिध्द करण्यात आला. नेहरून रिपोर्टला पाठिंबा मिळविण्यासाठी शिवरामपंतांनी कल्याण, धुळे, जळगाव, एरंडोल, चाळीसगाव, अंमळनेर, नगर, नाशिक, इ. ठिकाणी अनेक व्याख्याने दिली. या काळात सर्व राजकीय पक्ष व कार्यकर्ते एकत्र आल्याचा आण्णासाहेबांना खूप आनंद वाटत होता. त्या संदर्भात एके ठिकाणी गणेश शास्त्री जोशी लिहितात – ''पक्षीय मतभेद व गटाचे राजकारणाला कंटाळून शि.म. म्हणाले होते – ''शास्त्री बोवा, मी जिवंत आहे तोपर्यंत राष्ट्रीय विचारांच्या लोकांचा एक पक्ष व्हावा म्हणून प्रयत्न करीन. या उपर ईश्वराची मर्जी!'' पुढे पुण्यात सर्व पक्ष एकत्र आले. स्वातंत्र्य मिळविणे हे महत्त्वाचे असल्याचे वारंवार शि.म. सांगत होते. आपल्यातील दुहीचा, वैमनस्याचा फायदा ब्रिटिश घेत असल्याचे अगदी सुरुवातीपासून शेवटपर्यंत शि.म.परांजपे सांगताना दिसतात.[५५]

स्वातंत्र्य हेच ध्येय मानल्याने शि.मं.नी जशी लो. टिळकांना साथ दिली त्याप्रमाणे म. गांधींनाही साथ दिलेली दिसते. शि.मं.नी आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत देशासाठी, समाजासाठी, मराठी भाषा समृध्द करण्यासाठी अगदी प्रामाणिक प्रयत्न केलेले दिसतात. ब्रिटिश सरकारला लक्ष करून आपले लेखन व व्याख्याने देत असत. आपल्या व्याख्यानातून व लेखनातून स्वातंत्र्याचा हिरीरीने पुरस्कार शि.मं.नी केलेला होता.[५६]

शि.म. परांजपे टिळकांनंतर गांधींच्या चळवळीत सहभागी झाले होते. त्यांनी गांधीच्या चळवळीबाबत एक आराखडा मांडला होता, तो पुढे तंतोतंत खरा ठरला. शि.मं. आपल्या 'स्वराज्यातील निवडक निबंधात' आपले मत मांडले होते. ''अनत्याचाराचे रुपांतर अत्याचारांत पुढे मागे केव्हा होणारच नाही असे नाही. अनत्याचार फक्त काही ठरावित मुदतीपर्यंतच पाळावयाचा होता. मुदतीनंतरचा कार्यक्रम पुढे ठरणार होता. अनत्याचाराची पूर्व तयारी दाखविल्यानंतर जनतेने अत्याचाराकडे बोट बळविले असते तर म.गांधींनीही आपले अनत्याचारित्वाचे तत्त्व अगदी राज्यप्राप्ती होण्याच्या वेळी देखील सोडले नसते, असे नाही. जनतेची तयारी आणि एकंदर वातावरण पाहून म. गांधींनीही आपला अनत्याचारित्वाचा आग्रह सोडला नसता व अगदी शेवटी त्यांनी आपली एकटी व्यक्ती संबंध जनतेतून काढून घेतली असती, तर मग अर्थात त्यावेळी जनतेने म.गांधींना टाकूनच दिले असते. म. गांधींनीही त्यावेळी आपल्या डिक्टेटरच्या जागेचा राजीनामा दिला असता! आणि अनत्याचारित्वाच्या तत्त्वाचे संपादन केलेल्या शक्तीवर थोड्याशा अत्याचाराने म. गांधींच्या मदतीशिवाय जनतेचे यशःप्राप्ती करून घेतली असती.''[५७]

## सामाजिक बांधिलकी –

ज्या समाजामध्ये आपण राहतो, त्याचे आपण देणे लागतो.

याची पूर्ण जाणीव शिवरामपंतांना होती. त्यामुळे पारतंत्र्यात असणाऱ्या समाजाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्यांनी मनोमन कार्य केले. समाजाला आर्थिक स्थैर्य मिळावे यासाठी बरेच प्रयत्न केले .समाजातील प्रत्येक घटकाचा देशाच्या स्वातंत्र्यासाठी उपयोग व्हावा असे पंतांना वाटत असे. 'काळ' व 'स्वराज्य' या दोन पत्रांच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न मांडण्याचे कार्य केले.[५८]

स्वातंत्र्यासाठी समाजाची मने तयार करण्यात परांजपे अग्रेसर असत. ब्रिटिशांच्या गुलामगिरीवर सतत टीका करताना शि.मं.नी भारतीयांना वेळोवेळी सल्ले सुध्दा दिले. शिक्षण, व्यवसाय, शेती, नोकरी इ. घटकांना समाजाने महत्त्व दिले पाहिजे, असे ते म्हणत असत. आपली सामाजिक बांधिलकी जपण्याचा शि.मं.नी शेवटपर्यंत प्रयत्न केला.[५९]

भारताला मिळालेले स्वातंत्र्य पाहण्याचे स्वप्न त्यांना पाहता आले नाही. त्या अगोदर सन १९२९ मध्येच त्यांचा मृत्यू झाला. अखंड पस्तीस वर्षे देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी शि.मं.नी अपार कष्ट केले. सामाजिक, आर्थिक, धार्मिक प्रश्न सोडविण्यासाठी अहोरात्र झुंजले. सर्व घटकांचा परिपूर्ण अभ्यास करूनच आपले लेख, व्याख्याने दिली.

सर्व चळवळीत ते सहभागी झाले. सर्वच ठिकाणी त्यांनी उत्साहाचे वातावरण निर्माण केले. कोणताही मोर्चा असो, आंदोलन असो, ते सर्वात पुढे असत. तरुणांना लाजवेल असा उत्साह त्यांच्यामध्ये साठीतही जाणवत होता. वर्तमानपत्र हा समाजाचा आरसा आहे, याची जाणीव ठेवून ‘काळ’ आणि ‘स्वराज्य’ही पत्रे चालविली. जगातील अनेक स्वातंत्र्य चळवळींचा अभ्यास पंतांनी केलेला होता. सर्व ठिकाणी समाजाच्या ऐक्यामुळे स्वातंत्र्य मिळालेले आहे, याची जाणीव शि.मं.ना होती. म्हणून समाजाचा योग्य वापर करून घेणाऱ्या म.गांधी यांच्या चळवळीत कोणतीही आडकाठी न ठेवता लगेचच सहभागी झाले. अशाप्रकारे शिवरामपंत परांजपे यांच्या सामाजिक कार्याचा आढावा घेता येईल.

# संदर्भग्रंथ


१. ओगले शि.ल., बर्वे द. के., 'शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र (जीवन कार्य व आठवणी)', य.गो.जोशी प्रकाशन, १९३६, पुणे–२ पृ.१०,११

२. प्रा. गायकवाड रा. ज्ञा. व थोरात वि. ज्ञा., भारताचा राजकीय आणि घटनात्मक इतिहास, राविल पब्लिकेशन, सातारा, सन १९७२, पृ.२,३

३. तत्रैव पृ. २८,२९

४. तत्रैव पृ. १६७ ते १७०

५. तत्रैव पृ. १८० ते १८१

६. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ.२१०,२११

७. प्रा.गायकवाड प्रा. थोरात, 'भारताचा राजकीय आणि घटनात्मक इतिहास', राविल पब्लिकेशन, सातारा, १९७२ पृ.२,३

८. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ.१०५

९. तत्रैव पृ. १०८

१०. तत्रैव पृ. १०७,१०८

११. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ.१०५

१२. तत्रैव पृ.१०८

१३. ओगले शि.ल., बर्वे द. के., 'शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र' (जीवन कार्य व आठवणी), य.गो.जोशी प्रकाशन, १९३६, पुणे–२ पृ.११,१२

१४. टीकेकर अरुण (संपा), शहर पुणे, एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, निळूभाऊ लिमये फाऊंडेशन, पुणे २000, पृ. १४३

१५. तत्रैव पृ.७४,८४

१६. तत्रैव पृ.८४,८६

१७. तत्रैव पृ.८३,८४

१८. परांजपे वामन कृष्ण, 'शिवरामपंत परांजपे व्यक्ती–वक्तृत्त्व–वाङ्मय', चित्रशाळा प्रकाशन, पुणे २, आवृत्ती १ली, १९५४, पृ. ३८, ३९
१९. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', चित्रशाळा प्रेस, पुणे, आवृत्ती १ली, १९४५, पृ. ७५
२०. (अ) प्रा. गायकवाड रा. ज्ञा. व थोरात वि. ज्ञा., भारताचा राजकीय आणि घटनात्मक इतिहास, राविल पब्लिकेशन, सातारा, सन १९७२, पृ. २२७
(ब) ओगले शि. ल., बर्वे द. के., शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र (जीवन कार्य व आठवणी), य. गो. जोशी प्रकाशन, पुणे २, २७ सप्टेंबर १९३६, पृ.१३–१४
२१. (अ) तत्रैव पृ. ८७–८८
(ब) तत्रैव पृ. २२७
२२. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', चित्रशाळा प्रेस, पुणे, आवृत्ती १ली, १९४५, पृ. ८७–८९
२३. तत्रैव पृ. ८९–९०
२४. (अ) प्रा. गायकवाड रा. ज्ञा. व थोरात वि. ज्ञा., भारताचा राजकीय आणि घटनात्मक इतिहास, राविल पब्लिकेशन, सातारा, सन १९७२, पृ. २०५, २१६, २३५, २३६
(ब) डॉ. शेळके रघुनाथ धोंडीबा, भाला वृत्तपत्राचे सामाजिक, धार्मिक व राजकीय कार्य (१९०५ ते १९१० व १९२५–१९३५), एप्रिल २०१७, पृ. २१७ ते २१९
२५. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', चित्रशाळा प्रेस, पुणे, आवृत्ती १ली, १९४५, पृ.५४
२६. तत्रैव पृ. ४१, ७० ते ७२
२७. डॉ. मोरे सदानंद, लोकमान्य ते महात्मा – खंड १, राजहंस प्रकाशन, पुणे, पृ. ४०
२८. तत्रैव पृ. १२०, १२१
२९. तत्रैव पृ. १३९
३०. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. १९४५ आवृत्ती पहिली, पृ.५४
३१. तत्रैव पृ.६२ ते ६४

३२. प्रा. गायकवाड रा. ज्ञा. व थोरात वि. ज्ञा., भारताचा राजकीय आणि घटनात्मक इतिहास, राविल पब्लिकेशन, सातारा, सन १९७२, पृ. २७९–२८२

३३. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९४५ पृ.५१

३४. तत्रैव पृ. १३९ ते १४३

३५. ओगले शि.ल., बर्वे द. के., 'शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र' (जीवन कार्य व आठवणी), य.गो.जोशी प्रकाशन, १९३६, पुणे–२ पृ.१२८

३६. तत्रैव पृ. ११९, १२०

३७. तत्रैव पृ. १४ ते १६

३८. परांजपे वामन कृष्ण, 'शिवरामपंत परांजपे व्यक्ती–वक्तृत्त्व–वाङ्मय', चित्रशाळा प्रकाशन, पुणे २, आवृत्ती १ली, १९५४, पृ. ६०, ६१

३९. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९४५ पृ.२४५–२४६

४०. तत्रैव पृ. २४६

४१. तत्रैव पृ. २४९, २५९

४२. तत्रैव पृ. २५९, २६०

४३. तत्रैव पृ. २६२

४४. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९४५, पृ.९२,९३

४५. तत्रैव पृ. ९२,९३

४६. तत्रैव पृ. ६२

४७. तत्रैव पृ. ९२,९३

४८. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. १९४५ आवृत्ती पहिली, पृ.२८०

४९. तत्रैव पृ. २८१

५०. तत्रैव पृ. २८१

५१. तत्रैव पृ. २८२

५२. फडतरे डॉ. भूषण गोविंद 'भारतीय स्वातंत्र्य लढ्यात पुणे जिल्ह्याचे योगदान' डायमंड पब्लिकेशन पुणे, २०१३, पृ. ४७,५३,५४

५३. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९४५, पृ.२९०,२९३

५४. डॉ. मोरे सदानंद, 'लोकमान्य ते महात्मा खंड –१', राजहंस प्रकाशन, १ली आवृत्ती, २६ जानेवारी२००७, पुणे, पृ.२,३

५५. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ २९२,२९३.

५६. ओगले शि.ल., बर्वे दत्तात्रय केशव, 'शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र' (जीवन कार्य व आठवणी), य.गो.जोशी प्रकाशन, १९३६, पुणे–२ पृ.१७,१८

५७. तत्रैव पृ. १७,१८

५८. तत्रैव पृ. २८,२९

५९. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे व्यक्ती वक्तृत्व वाङ्मय' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, प्रस्तावना – अणे माधवराव, पृ. १ ते ११

# प्रकरण – ४

# वृत्तपत्रीय कार्य

## ('काळ' – सन १८९८ ते १९०८, 'स्वराज्य' – सन १९२० ते १९२७)

भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात अनेक थोर विभूती होऊन गेल्या, की ज्यांच्या कार्यामुळे त्यांचे नाव व कार्य कायम स्मरणात राहील. पुण्यामधून शिवराम महादेव परांजपे यांनी 'काळ' नावाचे साप्ताहिक उदयाला आणले.[१]

स्वातंत्र्य चळवळीच्या आंदोलनात 'काळ' पत्रातून परांजपे यांनी सरकारला सळो की पळो करुन सोडले. त्यांचे उत्तम लेखन, उत्तम वक्रोक्ती, विषयांची अभ्यासपूर्ण मांडणी याचे चित्र 'काळ' या पत्रातून वाचकांना पहायला मिळाले.[२]

**काळ वृत्तपत्राचा जन्म –**

ज्यावेळी 'स्वातंत्र्य' हा शब्द उच्चारणे म्हणजे एक पाय तुरुंगात ठेवण्यासारखे होते. लोकमान्यांचा फोटो लावणे म्हणजे सरकारच्या रोषास आपण होऊन आमंत्रण देण्यापैकी होते. क्रांतीची भाषा बोलणे म्हणजे गळ्याभोवती असणाऱ्या फासाची दोरी आवळण्यापैकी होते. अशावेळी शिवरामपंतांच्या मनाची चुळबुळ चालू झाली होती. इतके दिवस कोंडलेली स्वदेशप्रेमाची व स्वातंत्र्य लालसेची ऊर्मी कशाचीही पर्वा न करता बाहेर पडण्याची वेळ आली होती. सामान्य जनतेला सद्यःस्थितीची कल्पना देण्याची वेळ आली आहे, असे शि.म.परांजपेंना वाटू लागले. घरची माणसे, हितचिंतक, स्नेही, शेजारी–पाजारी यांच्या विरोधाला न जुमानता पंतांनी पूर्ण विचारांती 'काळ' साप्ताहिक पत्र काढण्याचे ठरविले.[३]

''लोकांत दृढमूल व रुढ झालेल्या कित्येक राजकीय कल्पनांच्या उच्छेदासाठीच काळाचा जन्म आहे.'' असे खुद्द शिवराम महादेव परांजपे यांनी म्हटले होते. 'काळ' काढण्यातील दिसण्यात मोघम पण आंत खोल अर्थ भरलेला हेतू त्यांनी काळांतच दोन–तीन ठिकाणी स्पष्ट केला होता. आतापर्यंतच्या चळवळींपेक्षा निराळे असे राजकीय तत्त्वज्ञान त्यांनी वसविले होते किंवा पसंत केले होते. आपल्या विचारांचा प्रसार करण्यासाठी त्यांना 'काळ' हवा

होता. या विशिष्ट तत्त्वज्ञानापासूनच वि.दा. सावरकरांनी स्फुर्ती, प्रेरणा घेऊन कार्य केले, असे खुद्द सावरकर सांगतात.[४]

साप्ताहिक 'काळ' दर शुक्रवारी प्रसिध्द होईल, अशी जाहिरात फडकली! केसरीच्या तारीख १ फेब्रुवारी सन १८९८च्या अंकात खालील छोटी पण मुखपृष्ठावर छापलेली जाहिरात अशी होती....

येत्या वर्ष–प्रतिपदेपासून सुरु होणार

धार्मिक, सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक आणि

वाङ्मयीन विषयांची निःपक्षपाताने व निर्भयपणाने पूर्ण चर्चा करणारे..

काळ

The Times

या नावाचे नवीन साप्ताहिक मराठी वर्तमानपत्र

संपादक

प्रो. शिवराम महादेव परांजपे, एम.ए.[५]

### 'काळ' नावातील सूचकता व समर्पकता –

''काळ पत्राने महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारत देशात स्वतःचे एक स्वतंत्र अस्तित्व निर्माण केले. 'काळ' हा शब्द अर्थाच्या दृष्टीने पाहिला तर 'टाईम्स' (Times) या शब्दाच्या अर्थाशी जुळणारा आहे. सरकारच्या बाजुनेही इंग्रजी वर्तमानपत्रे जे वजन उत्पन्न करण्याचा प्रयत्न करीत असत, त्याला लोकांच्या बाजूने तोडीस तोड करण्याचा एखादा सूक्ष्म हेतू 'काळ' हे नाव आपल्या पत्रास देताना शि.मं.च्या मनात आला असेल असे म्हणण्यात निदान अशी कल्पना करण्यात काही चूक होईल असे वाटत नाही. 'काळ' या शब्दाला मराठीमध्ये आणखी एक समर्पक अर्थ आहे – 'तो अमक्याचा काळ आहे' अशा वाक्यातून 'काळ' – काल – यम – मरणे – नाश' अशी भयानक सूचना मराठी वाचकांच्या मनात आल्याशिवाय राहणार नाही. जणू काही काळ हे वृत्तपत्र इंग्रजांचा काळ आहे, असे मनात आल्यावाचून राहत नव्हते. 'काळ' म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूदेवताच आपल्या पत्राला नाव देताना शि.मं.च्या बुध्दीमत्तेची चुणूक समजते.''[६]

## 'काळा'चा पहिला अंक –

कळाचा पहिला अंक २५ मार्च १९९८ रोजी बाहेर पडला. नंतर प्रत्येक शुक्रवार या साप्ताहिकाचा अंक बाहेर पडू लागला. पहिल्याच अंकात 'काळाचा महिमा' वर्णन करणारा एक श्लोक देऊन शिवराम परांजपे यांनी 'काळ' नावाचा अग्रलेख लिहिला होता.[७]

''सा रम्या नगरी महान्सनृपतिः सामन्तचक्रंचतत् । पार्श्वं तस्यच सा विदग्धपरिषताश्चंद्र–बिंबाननाः।। उन्मतः स च राजपुत्रानिवहस्तेबंदिनस्ताः कथाः । सर्वयस्य वशादगात् स्मृतिपंथ कालायतस्मै नमः ।।१।।'' मोठमोठी साम्राज्ये धुळीला मिळविण्याचे सामर्थ्य असलेल्या काळाला परांजप्यांनी येथे वंदन केले आहे.''

शि.मं.नी आपल्या 'काळ' साप्ताहिकाच्या पहिल्याच अंकात आपल्या प्रतिभेची, कल्पकतेची व उत्कट देशभक्ती प्रकट करणारा 'काळ' या नावाचा अग्रलेख लिहिला. 'काळ' या शब्दाचा महिमा सांगितला आहे.[८]

## 'काळ' अग्रलेख (२५.०३.१८९८) –

''पूर्वी पुढे हल्ली इ, व्यवहार आपण नेहमी करतो. त्या सर्वांना आधारभूत जी काही कल्पना, तिलाच आपण 'काळ' असे म्हणतो. 'काळ' हा पदार्थ डोळ्याने दिसण्यासारखा नाही किंवा स्पर्शाने जाणता येण्यासारखा नाही. पण तरी तो डोळ्याला दिसत नाही किंवा हाताला लागत नाही, असे मात्र म्हणता येणार नाही. काल, आज, उद्या, पूर्वी, हल्ली, पुढे, इ. व्यवहार 'काळ' म्हणून काही पदार्थ नसता तर आपणाला करताच आला नसता. तसेच काळ हल्लीचा काळ, पुढचा काळ असले प्रयोग जे आपण पावलोपावली करतो ते करता आले नसते. पण ज्या अर्थी ते करता येतात, त्या अर्थी काळाचे अस्तित्व कबूल करणे भाग आहे. ह्या काळाला आदि आणि अंत हे मुळीच नाहीत. ज्याप्रमाणे सूर्य पूर्वेकडील क्षितीजाच्या खाली जाईपर्यंतच काय तो आपल्याला दिसतो. त्याच्या आधीच्या आणि नंतरच्या स्थितीबद्दल आपल्याला काहीच कळत नाही. त्याप्रमाणे काळाचा देखील काळी भाग मात्र जाणता येतो आणि त्याच्या आधीचा भाग आणि नंतरचा भाग ह्यांविषयी मनुष्याचे पूर्ण अज्ञान असते. इतिहासाच्या साधनाने काळाच्या उगमाकडे आणि ज्योतिषाशास्त्राच्या साधनाने काळाच्या

मुखाकडे जाण्याविषयी मनुष्याचे सतत प्रयत्न चालले आहेत. पण त्यांना कितीसे यश आले आहे?[९]

## सारांश –

परमेश्वराप्रमाणे 'काळ' हा आद्यंतरित आहे आणि आदि व अंत ह्यांनी विरहित हा काळ असल्यामुळे परंपरेने ह्याच्याशी अंगात विलक्षण शक्तींचा समावेश झालेला आहे. परमेश्वर हे सगळ्यांचे मुख्य कारण आहे आणि 'काळ' उपाधीभूत आहे. 'काळ' हा जसा अनादि आणि अनंत आहे, तसाच तो सर्व ठिकाणी आणि सर्व वेळी असतो. म्हणून जगात आजपर्यंत ज्या या गोष्टी घडून आल्या, त्या सर्व काळाने पाहिल्या आहेत व यापुढे ज्या ज्या गोष्टी घडून येणार असतील, त्याही सर्व काळाला पहावयास सापडतील. अशा प्रकारचे काळाचे भव्य, उदात्त, गंभीर आणि अतर्क्य स्वरुप लक्षात आणले म्हणजे काही काही तत्त्ववेत्ते काळ हे निराळे द्रव्य न मानता त्याचे परमेश्वराशी तादात्म्य मानतात. हे किती यर्थार्थ आहे हे चांगले लक्षात येईल.''[१०]

## काळाचा महिमा –

स्वदेशभक्ती, स्वराज्य अशा उद्दिष्टांनी 'काळा'चा जन्म झाला. दर शुक्रवार लोक चातक पक्षाप्रमाणे 'काळ' पत्राची वाट पाहत असत. ''लोकांत दृढमूल व रुढ झालेल्या कित्येक राजकीय कल्पनांच्या उच्छेदासाठी 'काळा'चा जन्म आहे.'' असे पत्र काढण्याचे उद्दिष्ट शि.मं.नी जाहिर केले होते. सर्व सामान्य समाजाला आपले विचार स्पष्टपणे सांगण्यासाठी शि.म.परांजपे वृत्तपत्राकडे वळले होते. ब्रिटिश सरकारविषयी सर्वसामान्य लोकांमध्ये चीड निर्माण करून स्वातंत्र्याचा अग्नी पेटविण्याचे काम 'काळा'ने सुरू केले. मवाळांच्या दृष्टीने 'ब्रिटिश राज्य हे ईश्वरी वरदान आहे.' या कल्पनेला छेद देण्यासाठी शि.मं.नी काळा'च्या निर्मितीचा घाट घातला होता. देशाला स्वातंत्र्याकडे नेणे, हे मुख्य उद्दिष्ट 'काळा'च्या मागे होते. काही जाहिराती, काही बातम्या सोडल्या तर 'काळ' पत्रात सर्व मजकूर स्वतः शिवरामपंतांचाच असे. लोकमान्य टिळकांच्या मार्गदर्शनाखाली शि.मं.नी स्वातंत्र्य चळवळीत उडी घेतली होती. त्यांच्या लेखनात भावना, साहित्य, वक्रोक्ती, देशाभिमान या गोष्टींची वेळोवेळी प्रचिती येते.[११]

'काळ' सुरुवातीला 'जगहितेच्छु' छापखान्यात छापण्यात येत असे. इतरही व्यवस्थेत त्या छापखान्याची मदत होती. पण एक वर्ष झाले नाही तोच काळातील कडक लेखनाची छापखानेवाल्यांना धास्ती वाटू लागली. सरकारी रोषाला आपला छापखानाही बळी पडेल, अशा भितीने पत्र छापण्यास छापखान्याच्या चालकांनी नकार दिला. शि.मं.ना अर्थात या अडचणीची कल्पना असल्याने आपला स्वतंत्र छापखाना उभारण्याच्या तयारीला ते लागले होते. एक जुना छापखाना विकत घेऊन तो 'मनोहर प्रेस' या नावाने सुरु करण्यात आला. हाच छापखाना पुढे त्यांच्या 'स्वराज्य' पत्रासही उपयोगी पडला. 'काळ' पत्राने लोकप्रियता मिळाल्याने शि.मं.ची सुस्थिती उत्तम झाली. अर्थात पैसा मिळविण्यासाठी हा उद्योग त्यांनी सुरु केला नव्हता. सरकारविरोधी लिहिल्याशिवाय राहवत नव्हते म्हणून शि.म. 'काळ' पत्र काढण्यास उद्युक्त झाले होते.[१२]

''त्या काळात केसरी व सुधारक ही वर्तमानपत्रे नावारुपाला आलेली होती. परंतु या दोन्ही पत्रांची नक्कल न करता 'काळा' ने आपले स्वतंत्र विश्व निर्माण केले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना शि.मं.नी 'काळा'तून मांडल्या. लोकमान्य टिळकांबरोबर जवळ-जवळ २५ वर्षे शि.मं.नी कार्य केले. टिळकांच्या मृत्यूनंतर म. गांधींच्या चळवळीतही ते प्रामाणिकपणे सहभागी झाले.[१३]

सशस्त्र क्रांती करून देशाला स्वातंत्र्य मिळवावे, याचे शि.मं.नी समर्थनच केल्याचे दिसते. हिशोबी गणिताने क्रांत्या घडून येत नाहीत, असे त्यांचे मत होते. कौन्सिल मतदान, ब्रिटिश शासन यांवर शि.मं.चा विश्वास नव्हता. सन १८९८ ते १९०८ या दहा वर्षांच्या 'काळ' पत्रातून त्यांचे लेखन म्हणजे स्वातंत्र्यकवनेच होती. एखादा विषय ठरवून आपली मते उत्तम रितीने मांडण्याची लकब शि.मं.नी साधली होती. 'पत्रकर्त्याचे स्फुट विचार' ते सादर करीत. देशस्वातंत्र्य हाच घटक त्यांच्या लेखनातून महत्त्वपूर्ण होता. गुलामगिरी, दारिद्र्य, कुपोषण, अन्यायी कर-कायदे, आदी विषयांवर कडक लेख लिहून समाजात ब्रिटिशविरोधी वातावरण निर्माण करण्याचे काम करीत होते. दहा वर्षे अशी उत्तम विचारधारा व स्वातंत्र्याचे स्फुल्लिंग असणारे 'काळ' पत्र खरोखरच उत्तम दर्जाचे पत्र ठरले.[१४]

शि.मं.चा वृत्तपत्राबाबत दृष्टीकोन भिन्न होता. कंटाळवाणे लेखन न करता लोकांमध्ये जागृती करणे हा हेतू होता. शि.मं.च्या मताप्रमाणे ''आम्ही वर्तमानपत्र लिहितो असे मुळीच नाही, आम्ही काय करतो तर (देशातील) तीस कोटी प्रसिध्द न होणारी वर्तमानपत्रे प्रत्येक आठवड्याला अत्यंत काळजीपूर्वक रितीने आम्ही वाचून पाहतो. लोकांचे खरे विचार आम्ही खऱ्या शब्दांनी लिहितो. जनतेचे मनोगत वृत्तपत्रातून प्रकट करणे हे आमचे काम व ते आम्ही करतो.'' असेच त्यांनी येथे सुचविले आहे. पण हे प्रकटन 'स्वातंत्र्याचा ध्यास' ह्या एकाच भावनेभोवती फिरत असे.[१५]

सुरुवातीला 'काळ' पत्रामध्ये शि.मं.नी वैदिक धर्म, धर्माचे महत्त्व, जातीभेद, ख्रिश्चन मिशनऱ्यांचे धार्मिक धोरण (हिंदूंचे धर्मांतर) असे विषय घेतले. मवाळांच्या कार्यप्रणालीचा शि.मं.ना कमालीचा राग होता. मवाळ पक्षीय नेत्यांवर 'काळा'तून बऱ्याच वेळा त्यांनी टीका केलेली दिसते. त्यांना उद्देशून म्हणतात, ''शरद ऋतूतील मेघांनो ! तुम्ही काय केले आहे, म्हणून एवढ्या गर्जना करिता?''[१६]

शि.मं.चे वाचन चौफेर व गाढा अभ्यास असल्याने 'काळा'तील त्यांचे लेख चिंतनीय व मननीय होते. 'स्वातंत्र्याचा उद्घोष' हे त्यांचे लेखनामागील मूळ उद्दिष्ट होते. जागतिक राजकारणातील घडामोडींचा परामर्श त्यांनी 'काळ' पत्रातून घेतलेला दिसतो.[१७]

इटली, आर्यलंड, स्वित्झर्लंड आदी देशांमध्ये गुलामगिरी नष्ट करण्यासाठी केलेल्या चळवळींचा आढावा 'काळ पत्रातून शि.मं.नी घेतला होता. त्याच अनुषंगाने भारतातही चळवळी होऊन ब्रिटिश सत्ता नष्ट करण्याचा प्रयत्न व्हायला हवा, असे मत मांडले होते. हिंदुस्थान, चीन, तिबेट या देशांवर ब्रिटिशांनी वर्चस्व निर्माण केले आहे. 'शिवाजी महाराजांची स्वराज्य स्थापना' व 'पेशव्यांचे पराक्रम' या विषयांवरील 'काळा' तील शि.मं.चे लेख महत्त्वपूर्ण आहेत.[१८]

दुष्काळ आणि उपासमारीवरील हृदय पिळवटून टाकणारे लेख वाचणाऱ्यांच्या हृदयात भिडत. अनेक देशांच्या स्वातंत्र्य संग्रामाच्या लेखांप्रमाणे 'दिल्लीचे तख्त' आणि 'भाऊसाहेबांचे घण' या लेखात भाऊसाहेबांनी हे दिल्लीचे तख्त फोडले नव्हे तर हिंदुस्थानच्या गुलामगिरीचे डोकेच फोडले, असे त्यांनी सांगितले. 'शिवाजींचे पुण्याह वाचन', 'शिवाजीची एक रात्र' हे

त्यांचे गाजलेले दोन लेख स्वातंत्र्याच्या प्रेमाने व कल्पनेच्या भरारीने ओथंबलेले होते. टिळकांच्या चळवळीचा एक भाग म्हणून शि.मं.नी खेडेगावातील दुष्काळाची दैन्यावस्था पाहिली होती. मजूर व शेतकरी यांची उपासमार त्यांच्या लेखातून अनेकदा बोलकी झाली. 'गरीबांची उपासमार', 'संपत्तीचा दुरुपयोग', 'दुष्काळाला कारण कोण?', 'पावसाने अतिशय घाण केली', 'एक खडी फोडणाराची गोष्ट, 'एका शेतकऱ्यांचा उध्दार' अशा अनेक लेखांमधून शेतकऱ्यांची दैन्यावस्था ज्वलंतपणे मांडण्याचा उत्तम प्रयत्न केलेला दिसतो.[१९]

शि.म. परांजपे यांनी 'काळा'मध्ये जे जे लेख लिहिले त्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीचा मार्ग सांगितलेला असायचा. 'स्वातंत्र्य' हा शब्द उच्चारायला त्या काळात जणू काही बंदीच होती. परंतु शि.मं.नी काळाच्या माध्यमातून स्वातंत्र्याचा जोरदार पुरस्कार केला सरकारी वक्रदृष्टीची टांगती तलवार मात्र शि.मं.ना कधी कधी चिंताग्रस्त करीत होती. वृत्तपत्रांची मुस्कटदाबी ब्रिटिशांनी सुरू केली होती. परंतु शि.म. परांजपेंसारख्या बुध्दीवाद्याने 'वक्रोक्ती' हा अलंकार वापरून ब्रिटिशांवर टीका करण्याचा सपाटा चालूच ठेवला. 'एका खडी फोडणाराची गोष्ट' व 'विषासाठी कंठशोष' ह्या लेखातून वक्रोक्ती ओतप्रोत भरलेली दिसते. सरकारवर टीका करताना परांजपे कधीच मागे-पुढे पाहत नव्हते. 'सगळेच नरसू', 'स्वयंवर व संकुल', 'तिबेट संबंधीचा लेख' या लेखांच्या माध्यमातून शि.मं.नी समाज सुधारकांवर प्रचंड टीका केलेली दिसते. 'दगडी कोळसा' व 'हृदयाविष्करण' आदी लेखांतून समाजातील धग स्पष्ट होते. पुढे मवाळांवर निशाणा ठोकण्यासाठी 'नृपांगणगतखलां' हा लेख लिहिला. वक्रोक्ती अलंकार, स्पष्टवक्तेपणा, देशभक्ती, अभ्यासपूर्ण लेख, इत्यादी कारणांमुळे शिवराम परांजपे यांचा 'काळ' अगदी थोडक्याच काळात लोकप्रिय झाला.[२०]

### लोकमान्य आणि राजमान्य –

शि.मं.नी आपल्या 'काळ' पत्रात 'लोकमान्य आणि राजमान्य' या मथळ्याचा एक अग्रलेख लिहिला होता. त्यापूर्वी 'लोकमान्य' हा शब्द कोणी क्वचित वापरला असला तरी तो पडून होता. या अग्रलेखामुळे सर्वांना समजला. यासंबंधीची केसरीचे संपादक श्री.ज.स.करंदीकर यांची आठवण महत्त्वपूर्ण आहे. ''टिळकांना लोकमान्य ही पदवी प्रथम कोणी व केव्हा दिली याविषयी वाद असून त्याविषयी अनेकजण आपआपला अग्रहक्क सांगत असतात. या संबंधात

स्वतः लोकमान्यांनाच एकदा प्रश्न केला असता, त्यांनी पुढील अर्थाचे उत्तर दिले. ‘लोकमान्य’ ही पदवी प्रथम कोणी उपयोगात आणली हे काही मला आता नक्की स्मरत नाही. १९०० सालापूर्वी काही लेखकांनी अगर वक्त्यांनी ती पदवी वापरली असेल. परंतु ती कोणाच्या लक्षात येण्याइतकी रुढ झाली नव्हती. पण १९०० साली शि.म.परांजपे यांनी ‘काळ’ पत्रात ‘लोकमान्य आणि राजमान्य’या विषयावर अग्रलेख लिहिला आणि तो लेख वाचून कित्येकांनी मला पत्र लिहिताना ‘राजमान्य राजश्री’ हा नेहमीचा मायना न लिहिता ‘लोकमान्य’ लिहिण्याचा संकल्प केला असावा, असे दिसते. कारण, त्या वेळेपासून मला ‘लोकमान्य’ या मायन्याची पत्रे येऊ लागली.[२१]

सलग १० वर्षे ‘काळ’ पत्र समाजाचे प्रबोधन करताना दिसते. ‘वक्रोक्ती’ या नवीन लेखन प्रकारामुळे तरुण वर्ग दर शुक्रवारी ‘काळ’ पत्रासाठी वाट पाहू लागला. प्रो. माटे यांच्या मतानुसार ‘‘दर शुक्रवारी हाता पडणाऱ्या ‘काळा’च्या वाचनाने तरुण लोकांची डोकी जशी भणाणून जात तशीच त्यांच्या आवेशयुक्त व्याख्यानांनाही जात. एकदा कॅ. प्रोफेसर महादेव मल्हार जोशी म्हणाले, ‘‘विषय ऐतिहासिक असावा व शिवरामपंत परांजप्यांसारखा वक्ता असावा म्हणजे श्रोत्यांना असे वाटू लागते की, तलवार हाती घेऊन आता कापांकाप करीत सुटावे!’’ प्रो. जोशांचे हे उद्‌गार अगदी खरे आहेत, ही जर उतार वयाची माणसाची स्थिती तर भावनाप्रधान उमेदवार लोकांची काय होत असेल हे सहज ध्यानात येईल.[२२]

सन १८९८ साली ‘काळ’ पत्राला सुरुवात झाली. तेव्हा ६०० वर्गणीदार असून बऱ्याच सुट्ट्या प्रतीही खपत. पुढे १९०४ पर्यंत ‘काळा’चा खप १२ हजारापर्यंत वाढला आणि १९०८ साली ‘काळा’ चा खप १६ हजारापर्यंत वाढला. फुटकळ अंकही खपत. त्यामुळे २२ हजार प्रती काढाव्या लागत. त्या काळात लो. टिळकांच्या ‘केसरी’ व ‘मराठा’ या पत्रांनी अतिउच्च शिखर गाठलेले होते. तरीसुध्दा तरुणांच्या गळ्यातील ताईत बनलेले ‘काळ’ पत्र शि.मं.च्या लेखणीने लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचले. वाचक वर्ग ‘काळा’च्या प्रतिक्षेत असत. यावरून या वृत्तपत्राची उंची समजते.[२३]

आपल्या अफाट व अचाट लेखनाने अशीच लोकप्रियता मिळविलेले ‘संदेश’कार अच्यूत बळवंत कोल्हटकर यांनी शि.मं.च्या वक्तृत्त्वाचे व मर्यादचेही पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे...

''शि.मं.ची मर्दुमकी म्हणजे सर्व महाराष्ट्रभर त्यांनी उत्पन्न केलेली स्वातंत्र्याची प्रिती होय! शि.मं.च्या पूर्वी राजकारण सत्तेशी संगनमत करणारे होते. शि.मं.च्या पूर्वी स्वातंत्र्य हा शब्द महाराष्ट्रात नवखा नव्हता. जे निर्भेळ असेल तेच स्वातंत्र्य! स्वातंत्र्याची कल्पना महाराष्ट्रात प्रथम शि.मं.नी मांडली!.... पण ज्यांची गती लेखनीजवळ थांबली. पण त्या लेखनीची बहादूरी इतकी जाज्वल्य आहे की, ती कोणत्याही काळात जॉर्ज वॉशिंग्टन उत्पन्न करील. केमालपाशाला जन्म देईल. हिंदुस्थानात लेनिन उत्पन्न करून त्याचे मस्तकावर हिंदुस्थानचा स्वातंत्र्य मुकूट चढवील!'' ''प्रभातकार श्रीपाद शंकर नवरे यांनीही आपल्या आत्मपर लेखनात 'केसरी' पेक्षाही 'काळा'चे आकर्षण अधिक वाटे,'' अशी आठवण नोंदली आहे.[२४]

स्वातंत्र्यवीर सावरकर हे ही शि.मं.ना आपले प्रेरणादायी मानीत असत. रँडप्रकरणी सरकारला माहिती पुरविली म्हणून चाफेकर बंधूंनी १८९९ फेब्रुवारीला द्रविडांवर सूड घेतला होता. त्यावेळी शि.मं.नी 'चाफेकर व रानडे' असा 'काळा'मध्ये अग्रलेख लिहिला. नाशिक येथे शिकत असलेल्या वि.दा.सावरकरांनी तो लेख वाचल्यावर त्यांच्या मनावर खोल परिणाम झाल्याचे त्यांनी म्हटले आहे.[२५]

फिरोजशहा मेहतांसारख्या मवाळ नेत्यांनी मात्र 'चाफेकर व रानडे' या लिहिलेल्या अग्रलेखाबद्दल काळकर्ते शि.म.परांजपे यांचा निषेध नोंदविला होता.[२६]

शि.म.परांजपे यांचे 'काळ' हे पत्र मतपत्रच होते. वाक्यांची, प्रसंगांची सुरेख गुंफण करून सद्यःस्थितीवर प्रकाश टाकण्याचे काम शि.म. करताना दिसतात. 'काळ' पत्रातील सर्व लेखन स्वतः परांजपेच करीत असत. त्यांच्या लेखनातील सरकारवरील टीकेचा जोर कमी होत नव्हता. म्हणून १९०४ सालीच 'काळ' वर सरकारची बंदी येण्याची शक्यता होती. शि.मं.च्या काळातील काही अंकांची इंग्रजी भाषांतरे करण्यात आली होती. कायद्याच्या चौकटीत शि.मं.ना अडकविण्यासाठी योग्य पुरावा न मिळाल्यामुळे तुर्तास बला टळली होती. लॉर्ड कर्झनची दिल्लीत राजवट चालू होती. ना. गोखल्यांनी कर्झनची सम्राट औरंगजेबाबरोबर तुलना केली होती. त्याच अनुषंगाने १० जून १९०४ रोजी लिहिलेला 'काळ'चा अंक लॉर्ड कर्झन यांना राजद्रोही वाटला. कारण २ सप्टेंबर १९०४ च्या अंकात रशियन प्रधान एम.डी. प्लेहवे यांच्या खूनाची माहिती दिली होती. प्लेहवे नागरिकांच्या रोषाला बळी पडला होता. त्याच्याप्रमाणे लॉर्ड कर्झन लोकांच्या

रोषाला बळी पडण्याची शक्यता काळात वर्तविली होती. शि.म.परांजपे यांच्या या लेखासंदर्भात लंडन व मुंबईच्या टाईम्सपत्राने प्रचंड कोलाहल माजविला.[२७]

शिवरामपंतांची कडक भाषा व त्यांनी ब्रिटिशांवर केलेली जळजळीत कडक टीका, यामुळे शि.म.परांजपे व त्यांचे 'काळ' पत्र अडचणीत सापडण्याची शक्यता निर्माण झाली. मवाळ पक्षातील फिरोजशहा मेहता यांनीही काळकर्त्यांचा निषेध करण्याची मागणी केली. 'काळ' हे शिवरामपंतांचे मतपत्रच होते. ब्रिटिश सरकारला काळ पत्राच्या माध्यमातून 'सळो की पळो' करून सोडण्याचे काम पंतांनी केले होते. ब्रिटिश सरकारच्या रोषाला पत्र बळी पडू नये, याची काळजी घेत होते. परंतु शि.मं.च्या काळातील लेखांचे इंग्रजीत भाषांतर करून त्यांच्यावर खटला दाखल करण्याच्या संदर्भात तयारी सुरू होती. त्यानुसार प्रयत्न सुरू होते. मुंबइच्या न्याय विभागाचे सचिव सी.जी.हिल. यांनी टाईम्स ऑफ इंडियाचे एल्.जी. फ्रेजर यांना १० जुलै १९०४ रोजी गुप्त पत्र पाठवून काळातील लेख राजद्रोही ठरवावेत, अशी सूचना केलेली दिसते. मवाळ नेत्यांना सुध्दा काळकर्ते परांजपे यांना शिक्षा व्हावी, असेच वाटत होते. हिलसाहेबांनी त्या दृष्टीकोनातून पावले टाकायला सुरुवात केली.[२८]

हिल साहेबांनी मांडलेले विचार फार महत्त्वाचे होते. त्यांच्या मतानुसार,............ "Paranjape would be terrrified if he found that his outpourings were noticed in this way and if he felt that light was being thrown on his articles, on the other hand the majority of moderates - Gokhale and so forth would welcome such asn exposure for Paranjape's writing bring disrepute upon the Congress and moderate party." [२९]

अशा प्रकारे शि.म. परांजपे यांच्या लेखांची भाषांतरे करवून त्यांच्यावर खटला भरण्याची, शहानिशा करण्याची तयारी सुरू होती. दिल्लीमध्ये लॉर्ड कर्झन यांची सत्ता हाती. दडपशाही करण्यामध्ये त्यांचा क्रमांक वरचा होता. १० जुलै १९०४ रोजी काळातील लेख लॉर्ड कर्झन यांना राजद्रोही वाटला. कारण कर्झनच्या खुनाला चिथावणी देणारा लेख आहे, असे वाटले. कारण रशियातील एम.डी. प्लेहवे व कर्झन यांची तुलना व साम्य लेखात होते. १२डिसेंबर १९०४ च्या पत्रानुसार शि.मं.च्या लेखांचे भाषांतर करण्यात आलेले होते. त्यानुसार... "They (Government of India) agree that this strengthens the grounds for refraining from prosecution, but they still inclined to think that it was a mistake to

provide the Editor of the Times of India with Government translations of the articles alleged to be incriminatory. If the publication of the article in that paper which was based on these translations has done good, it has also not improbably had bad effects as well. Many native newspapers have shown that they know that Government provided the Editor of the Times of India with translations of which use was made."[३०]

शिवरामपंतांनी, ''रशियामध्ये एम.डी.प्लेहवे क्रांतीकारकांच्या रोषाला बळी पडले. त्याचप्रमाणे भारतामध्ये लॉर्ड कर्झन बळी पडले तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही,''असे लिहिले होते. त्यानुसार काळकर्त्यांवर राजद्रोहाचा खटला भरावा, अशा प्रकारच्या सूचना मिळत होत्या. मराठी काळातील विचारांचे इंग्रजीत भाषांतर केले जात होते. त्यानुसार आक्रमक भाषा, सरकार विरोधातील वक्तव्ये, यामुळे काळावर खटला भरलाच जाईल, अशी स्थिती निर्माण झाली.[३१]

'काळ' पत्राविरुध्द सरकारला चिथावणी देण्याचे काम 'टाईम्स' पत्राने केले. टाईम्सच्या पत्रात – 'An Aspect of Native Journalism' हा अग्रलेख लिहिला होता, त्यातील काही वाक्ये खालीलप्रमाणे होती – "The article published in 'Kal' upon September 2nd with its illuminating lesson's deduced from the assassination of M.D. Plehve is...... the most questionable of series........ But we very much doublt whether in any city in the world except Poona any journalist had the wicked audacity to commend the assissination as a 'noble deed' and then to state that the late and the future head of the Administration under which we lived was responsible for longer list of grievances.... The Kal we believe is a journal of some notoriety and considerable circulation. It is not an obscure monfussil sheet but a paper whose weekly issue is reputed to exceed that of any vernacular journal in the presidency save on. What effect may we except to be produced upon the minds of the thousand who read this publication constantly, if a stream of such screeds is permitted to be circulated with impurity and without intervention?.. The time seems to have arrived when Government needs to be reminded that though they are the custodian of the liberty of the press, they are also charged with the duty of repressing shameful (writing). It is Government to decide whether the extracts we print constitute an undue violation of journalistic privilege. Our duty terminates now that we have called attention to attitude of the Kal towards the Administration and towards the Kind Emperor's late representative."[३२]

शि.मं.नी 'काळा'च्या ७ ऑक्टोबर १९०४च्या अंकात ब्रिटिश वृत्तपत्रांच्या टीकेला उत्तम उत्तर दिले होते. परांजपे म्हणतात, ''टाईम्सने आपल्या १९ सप्टेंबरच्या अंकात आमच्या विरुध्द जो एक निर्मूलक, भ्रामक आणि असत्य आक्षेप आणला आहे, त्या आक्षेपाची ही ... सूर्यप्रकाशाने धुके जसे दूर होते त्याप्रमाणे स्थिती आहे.... टाईम्सचे असे म्हणणे आहे की, ''रशियामध्ये एम.डी.प्लेहवे ह्यांचा जसा खून झाला, तसा हिंदुस्थानात कर्झन साहेबांसंबंधाने प्रकार व्हावा, अशाबद्दल आम्ही लोकांना चिथविले आहे. हा टाईम्सचा आक्षेप होय.... ठीक आहे याच्यावर काही वेळापर्यंत मौनव्रत करणे हे आमचे गरिबाचे उत्तर... हा आक्षेप निराधार आहे... एम.डी.प्लेहवे यांच्याबद्दलचे स्फूट आणि लॉर्ड कर्झन यांच्याबद्दलचे स्फूट यांची साखळी एकमेकांत अडकविलेली आहे. या वाळूवर विरुध्द बाजूनी आपली इमारत रचली आहे... रिव्ह्यू ऑफ रिव्ह्युजचे कर्ते मि. स्टेड हे आपल्या मासिक पुस्तकामध्ये 'प्रोग्रेस ऑफ दि वर्ल्ड' या सदराखाली प्रत्येक महिन्याला स्फूट लेख लिहीत असतात. त्यांची पध्दत ही अशीच आहे. प्रत्येक महिन्यात काय काय विशेष गोष्टी झाल्या आणि काय-काय विशेष मते पुढे आली ती सगळी एकत्र करून केळीच्या एका पानातून दुसरे पान त्याप्रमाणे कदलीदल न्यायाने किंवा मालापुष्प न्यायाने एका-पुढे एक मांडावयाची, असा स्टेड साहेबांचा बहुतेक वेळा परिपाठ असतो. वास्तविक जगाच्या घडामोडीतील भिन्न-भिन्न विषय एकमेकांपासून असंबध्दच असतात. परंतु एकाचा शेवट दुसऱ्याच्या आरंभाला थोड्याशा भाषापध्दतीच्या खुबीने चिकटवून दिला तर तो प्रकार अधिक गोड दिसतो व तसाच क्रम गाळातील स्फूट लेखांमध्ये पाळण्यात येतो. हा क्रम २ सप्टेंबरच्या अंकाकरिताच स्विकारलेला दिसत होता असे नाही. ज्यांना काळाचे दुसरे अंक पाहण्याची सवड झाली असेल किंवा होईल, त्यांना असे आढळून येईल की, ही लेखनपध्दती काळात अनेक प्रसंगी उपयोगात आणलेली आहे.......''

टाईम्समध्ये अगदी खोडसाळपणे शि.मं.वर टीका केलेली दिसते. 'Education Value of Murder असे भाषांतराला शीर्षक दिलेले होते.[३३]

परंतु 'काळ' पत्रामध्ये राजकीय विषयांवर बहुतांश चर्चा होत असे. ब्रिटिशांवर टीका करताना भारतीय समाजालाही एकनिष्ठा व राजनिष्ठेचे सल्ले वेळोवेळी शि.म.देताना दिसतात. शि.म.परांजपे यांनी म्हटले होते, ''आपण इंग्रजांच्या अंमलाखालील हिंदुस्थानातील लोकांनी राजनिष्ठाही दाखविली पाहिजे व स्वदेशभक्तीही केली पाहिजे. हे आपले कर्तव्यकर्म आहे....

त्याच धोरणावर आम्ही आपल्या वर्तमानपत्राचे वळण ठेविलेले आहे... सत्यस्थितीचे सत्य वर्णन करावे तर कोणी करावे?.... ह्या राजद्रोहाच्या संबंधाने सरकारने वर्तमानपत्रकारांना एका मोठ्या विलक्षण तऱ्हेच्या अडचणीमध्ये आणून ठेवीले आहे. एकीकडे मुद्रण स्वातंत्र्य दिले आहे आणि दुसरीकडे राजद्रोहाची कलमे करून ठेवीली आहेत. 'लिहा' ही म्हणावयाचे आणि 'लिहू नका' असेही म्हणावयाचे. अशा प्रकारची विलक्षण स्थिती निर्माण करून ठेवण्यात आली आहे..... राजद्रोह ही गोष्ट सर्वस्वी सरकारच्या मर्जीवर अवलंबून असणार. तिच्याबद्दल सरकारपाशी वाद घालून काय हशील आहे?''[३४]

ब्रिटिश सरकारने 'काळ' पत्र व शि.म.परांजपे यांना कायद्याच्या कचाट्यात अडकविण्याचे प्रयत्न केले. परंतु ते फोल ठरले. टाईम्स ऑफ इंडियाने शि.मं.वर टीका तर केलेली होती, शिवाय भारतीय नेत्यांनीही टाईम्सला दुजोरा दिलेला होता. मवाळ नेते फिरोजशहा मेहता यांनी 'काळा'तील लेखांबद्दल नाराजी व्यक्त केली. 'रास्त गोफ्तार' व 'चँपियन' या मुंबईतील पत्रांनी 'काळ' पत्रावर खटला भरावा, असे सांगितले. बंगालमधील काँग्रेस कमिट्यांनी 'काळ' पत्रावर बहिष्कार घालून संपादकांना (शि.मं.ना) बहिष्कृत करावे, असा आरडाओरडा करण्यास सुरुवात केली.[३५]

फिरोजशहा मेहतांना तर वाटत होते की, टिळकांच्या 'केसरी'तून 'काळ' पत्राचा निषेध नोंदिवण्यात यावा. तसे त्यांनी टिळक तुरुंगात असताना तात्यासाहेब केळकरांना बोलावून सांगितले की, ''तुम्ही जर निषेध केला नाही तर तुमचे आमचे जमणार नाही. पण सर्व पुण्यावरही मुंबईची अवकृपा होईल. I shall run my pencil through the name of Poona wherever it may occur." असे फिरोजशहांचे शब्द होते.[३६]

भारतीय लोकच इंग्रजांना मिळालेले होते. त्यामुळे 'फोडा आणि झोडा' या राजनीतीचा योग्य वापर करून भारतीयांमध्ये विविध गट-तट निर्माण करण्याचे कार्य ब्रिटिशांनी केले. 'काळ' पत्राला एतद्देशियांनीच केलेला विरोध चिंतनीय होता. परंतु 'काळ' पत्राच्या प्रभावाने वि.दा.सावरकर क्रांतीकारी बनले. हे खुद्द त्यांनीच सांगितले आहे.[३७]

परांजपे यांच्यावरील राजद्रोहाचा खटला –

शेवटी सन १९०८ साली शि.म.परांजपे यांना ब्रिटिश सरकारने कायद्याचा बडगा दाखविलाच. १५ मे १९०८ च्या काळ पत्रातील अंक राजद्रोही ठरविला. त्यानुसार ११ जून १९०८ रोजी शि.म.परांजपे यांना अटक करण्यात आली. लोकमान्य टिळक आपल्या नातवाच्या मुंजीला नाशिकला गेले होते. परंतु त्यांना ही बातमी समजल्यावर ते तडक मुंबईला पोहोचले.[३८]

''गुरुवार ता. १९ जून १९०८ रोजी सकाळी सहा वाजण्याचे सुमारास पुणे येथे पोलिसांपैकी मि.किंग, मि. डेविस, मि. पॉवेल व मुंबईचे पोलीस इन्स्पेक्टर मि. सुलेव्हान ह्या अधिकाऱ्यांसह पाच–सहा युरोपियन पोलीस व पंचवीस नेटिव पोलीस व काही घोडेस्वार यांनी 'काळ' कार्यालयाला वेढा दिला. त्यानुसार प्रो. शि.म.परांजपे यांच्या झोपण्याचे खोलीत मि. ॲस्टन यांच्या स्वाक्षरीचे वॉरंट दाखवून पकडले. 'काळ' कार्यालयाच्या झडतीचे काम जवळ–जवळ तीन तास चालले होते. त्यामध्ये वेगवेगळ्या वह्या, पत्रव्यवहार, पावत्या, हस्तलिखित मजकूर असे जवळजवळ एक गाडीभर सामान–सुमान सरकारने जप्त केले.[३९]

यावर शि.म.परांजपे यांनी व्यक्त केलेले मत खूपच हृदयद्रावक आहे... ''देहांत प्रायश्चित्ताची शिक्षा देऊन सुध्दा मला जितका धक्का बसला नसता तितका सरकारने माझा प्रतिप्राण असणारे दहा वर्षातले वाङ्मय जप्त करून दिला व हाच माझा तरुणपणाचा जिवंत मृत्यू होय.''[४०]

''इंडियन पीनल कोडचे कलम १२४अ व १५३अ या कलमांखाली शि.मं.वर आरोप ठेवण्यात आले. १२४ अ हे कलम राजद्रोहासाठी होते, तर १५३अ हे कलम निरनिराळ्या जातीत वैमनस्य निर्माण करण्यासाठी होते. त्यात सांगितले होते की, १५ मे १९०८ च्या 'काळ' वर्तमानपत्राच्या अंकात दुसऱ्या पानावरील ४/५/६ रकान्यात व तिसऱ्या पानावरील ११/१२ रकान्यात अग्रलेख व स्फूट टीपा छापून मुंबईमध्ये प्रसिध्द केल्या व ज्यामध्ये (भाषांतर केल्यावरून) खालील प्रकारचा मजकूर आहे. ''बंगालातील बॉम्ब गोळ्याचा प्रकरणातील आरोप पकडण्याच्या कामी ज्या लोकांनी बहादुरी केली त्यांच्या बक्षिसाची यादी प्रसिध्द झाली आहे.'' येथपासून (भाषांतर) ''युरोपियन डिफीट असोसिएशन पावेतो दुसऱ्या आरोपात म्हटले होत की ज्या अपराधास इंडियन पीनल कोड कलम १५३अ मध्ये शिक्षा

सांगितली आहे व ज्या गुन्ह्यास शिक्षा करण्याचा अधिकार हायकोर्टास आहे, असा अपराध तुम्ही केला आहे.[४१]

शि.मं. वरील आरोप घट्ट करण्यासाठी सरकारने २० मार्च, २९ मे व ५ जून असे 'काळ' पत्राचे तीन अंक पुराव्यासाठी सादर केले होते. २० मार्चच्या अंकात इंग्रजी राज्याचा पाया किती पोकळ झाला आहे. ते तुतिकोरिन येथील परिस्थितीचे वर्णन आहे. २९ मेच्या अंकात लंडनच्या जस्टीस पत्रात हिंडमन यांनी जे विचार मांडले होते, त्याचे भाषांतर देण्यात आले होते. ५ जून च्या अंकात बॉम्बगोळे हिंदुस्थानात येण्याला मूळ कारण इंग्लिश लोकच! असे सांगितले होते.

शि.म.परांजपे यांनी स्वतःच खटला चालविला. कारण 'काळा'तील लेख मी स्वतः लिहिले आहेत. त्याचे स्पष्टीकरण मलाच चांगले करता येईल, असे त्यांचे मत होते.[४२]

**प्रो. शि. म. परांजपे यांचे कोर्टातील भाषण–**

काही अंश .......

''जज्जसाहेब आणि ज्युरीमधील सभ्य गृहस्थहो, हे न्यायाचे कोर्ट आहे आणि येथूनच मला न्याय मिळावयाचा आहे. ही गोष्ट माझ्या पूर्णपणे लक्षात आहे. ती सांगण्याची जरुरी ॲडव्होकेट जनरल यांना बिलकूल नव्हती. कोर्ट ही वादविवाद करणारी मंडळी नाही, हे मी समजतो...... मी काही वकील नाही. मी मुंबई युनिर्व्हसिटीचा एक एम.ए. आहे.

... जरी या राजद्रोहाच्या खटल्यात कायद्याचा पुष्कळ संबंध आहे. तरी सरकारतर्फेच्या पुराव्याची भिस्त सर्वस्वी माझ्या लेखावरच आहे आणि ते लेख मी स्वतः लिहिलेले असल्यामुळे त्याचे तद्गत दुसऱ्या कोणाला माझ्याइतके स्पष्ट सांगता येणार नाही.... राजद्रोहाचे दोन भाग करण्यात येतात, एक कायद्याचा आणि दुसरा वस्तुःस्थितीचा आणि मी माझ्या भाषणात वस्तुःस्थितीच्या दृष्टीने विचार करणार आहे. कायद्याचे विवेचन करण्याचे काम मी जज्जसाहेबांवर सोपवितो. ज्या लेखावरून फिर्याद करण्यात आली आहे तो लेख आपणापुढे आहेत. ॲडव्होकेट जनरल प्रमाणेंच मी आपणांस विनंती करतो की, ते लेख आपण समग्र वाचून पहा. लेखांतील सरकारतर्फे पुढे मांडलेली तुटक तुटक वाक्ये आपण वाचू नका....

वाचाल तर ते लेख लिहिण्यामध्ये माझा हेतू प्रामाणिकपणाचा होता, असेच आपले मत होईल. मी माझे लेख स्वदेश भक्तीने आणि देभाभिमानाने लिहिले आहेत. राजद्रोह प्रसृत करण्याचा माझा इरादा नव्हता. ज्या वेळेला मी सदर लेख लिहावयाला बसलो त्यावेळी इंग्रज सरकारच्या विरुध्द आपल्याला बंडाळी माजवावयाची आहे, असे माझे उद्दिष्ट नव्हते. 'बॉंब' हा शब्द मी माझ्या लेखांत शंभर वेळा वापरला आहे खरा, पण मी बॉंब हा शब्दच वापरला आहे, मी बॉंब फेकलेला नाही. यासाठी बॉंब शब्द वारंवार आल्यामुळे त्यावरच विशेष भिस्त न ठेवता लेखांचे समग्र स्वरुप आपण लक्षात घ्यावे....[४३]

मी हिंदुस्थानचा रहिवासी आहे आणि माझ्या देशबांधवांची अंतःकरणे समजतात....

मी सरकारविरुध्द अप्रिती उत्पन्न केली हे उघड होईल. पण मला असे वाटत नाही की, लोकांत असंतोष आहे. असे मी सरकारला सांगितले म्हणजे मी राजद्रोह केला असे म्हणण्याइतका सरकारचा न्याय अनुदार होईल... मी सरकारविरुध्द राजद्रोह पसरीत नव्हतो., मी तो राजद्रोह थांबवीत होतो.... इंग्लिश जात कशीही असली तरी ती आम्हांवर राज्य करणारी जात इंग्लिशांचीच आहे असे नाही. त्यामध्ये इंग्लिश लोक आहेत, हिंदू लोक आहेत, मुसलमान लोक आहेत व पारशी लोक आहेत. ज्यावेळी आम्ही वर्तमान पत्रकार राज्य करणाऱ्या जातींविषयी लिहितो, त्यावेळी आम्ही हिंदू व इंग्लिश या दोन जातींमध्ये वैमनस्य कसे उत्पन्न करितो हे मला समजत नाही.... माझा हेतू निर्दोषी आहे असे सहज आपल्या लक्षात येईल व माझा सदर लेख लिहिण्यामधील उद्देश व प्रयत्न इंग्रज सरकारविरुध्द राजद्रोह उत्पन्न करण्याचा किंवा जाती-जातींमध्ये वैमनस्य माजविण्याचा नव्हता, अशी आपली खात्री होईल.[४४]

साडेतीन तासापर्यंत चाललेल्या या वक्तृत्त्वपूर्ण व मुद्देसूद भाषणाचा शेवट शि.म.परांजपे यांनी पुढीलप्रमाणे केला -

''ज्यूरींमधील सभ्य गृहस्थहो आपण मुद्रण स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते आहां, आपण जो निकाल द्याल ता मला मान्य आहे. आपली जबाबदारी आपण लक्षात घ्या. आपण मला दोषी ठरविले तर त्याबद्दल जी शिक्षा होईल ती भोगण्याला मी तयार आहे. पण असे होईल असे मला वाटत नाही.''[४५]

आरोपी दोन्ही कलमांखाली गुन्हेगार आहे, असे सर्व ज्यूरींचे मत पडले. परंतु आरोपीने (शि.मं.नी) स्वदेशाभिमानाने प्रेरित होऊन लेख लिहिला, असे ज्यूरींस बहुमताने वाटते व यामुळे आरोपीवर दया करावी असे सर्वांचे मत आहे.'' त्यानुसार पहिल्या गुन्ह्याखाली १५ महिने व दुसऱ्या गुन्ह्यासाठी ४ महिने अशी एकूण १९ महिने अशी शिक्षा देण्यात आली.[४६]

शिक्षा जाहीर होण्यापूर्वी शिवरामपंत म्हणाले की, स्वदेशावर प्रेम करणे हा जर गुन्हा असेल तर तो मी केला आहे नि त्यासाठी जी शिक्षा मला मिळेल ती मी आनंदाने भोगायला तयार आहे![४७]

दिनांक १० जुलै १९०८ ते ५ ऑक्टोबर १९०९ पर्यंत १९ महिने शिवरामपंतांना कारावास झाला. शिक्षा होताच शि.मं.ना ठाण्याच्या (मुंबई) तुरुंगात तीन महिने ठेवण्यात आले. त्यानंतर साबरमतीच्या तुरुंगात ठेवण्यात आले.[४८]

शि.म.परांजपेंच्या कारावासानंतर पु.बा.खरे व स.ल.सोमण या दोघांनी 'काळ' पत्र अत्यंत उत्तमरित्या चालविले. खरे तुरुंगात जाणाऱ्या राजकीय नेत्यांबद्दल 'ऑनर्स लिस्ट' या नावाने उल्लेख करीत. पु. बा. खरे हे सुध्दा शि.म.परांजपे यांच्यासारखेच लेख लिहित असत. १८ डिसेंबर १९०८ला 'काळ' पत्रात खरे यांनी 'बुडत्याचा पाय खोलात' नावाचा लेख लिहिला. त्यामुळे ब्रिटिश सरकारने खरे यांना सहा महिन्यांची शिक्षा दिली. खरे यांच्यानंतर सोमणांनी 'काळ' पत्र जिद्दीने चालविले.[४९]

सुरुवातीला शि.मं.ना तुरुंगात खूप त्रास सहन करावा लागला. जेवणाचे खूपच हाल झाले. तीन महिन्यात जवळजवळ २० पौंड वजन कमी झाले. पुढे साबरमतीच्या तुरुंगात लो. टिळकांचीच कोठडी शि.मं.ना मिळाली होती. अशाप्रकारे जवळजवळ १५ महिन्यांची शिक्षा भोगून झाल्यानंतर ५ ऑक्टोबरला शि.मं.ची सुटका होणार असल्याचे सरकारने जाहीर केले. 'काळ' पत्रात १ ऑक्टोबरच्या अंकात...

'ने मजसी ने परत मातृभूमीला,
सागरा प्राण तळमळला!''
वि.दा. सावरकरांची कविता प्रसिध्द करण्यात आली.[४६]

शिक्षा संपल्यानंतर शिवराम परांजपे यांचे अहमदाबाद, मुंबई, पुणे येथे मोठ्या प्रमाणावर सत्कार करण्यात आले. परंतु त्यावेळी टिळकांनाही मंडालेच्या तुरुंगात ठेवण्यात आले होते. तेव्हा शि.मं.नी सांगितले होते, ''खरा आनंदाचा दिवस तो असेल की ज्या दिवशी पूज्य लोकमान्य मंडालेहून परत येतील.''[५०]

शिवराम महादेव परांजपे यांची आई खूपच थकली होती. कामाच्या व्यापातून व सरकारी मेहेरनजर असल्याने महाडला आईला भेटण्यासाठी शि.मं.ना जायला जमले नाही. त्यांची आई प्राण कंठात आणून त्यांची वाट पहात होती. शेवटी आईच्या मृत्यूची तार आल्यावर शि.म. महाडला गेले. आईला भेटता आले नाही, याचे दुःख आयुष्यभर शि.मं.ना वाटत राहिले. ''मातोश्री मी तुमचा अनंत अपराधी आहे, मला क्षमा करा.'' आपल्या आईला शेवटचा नमस्कार करताना शि.म. उद्गारले होते. पंधरा तीन आठवडे आईचे क्रियाकर्म करण्यासाठी शि.म. महाडला राहिले होते.[५१]

शि.मं.ना आईच्या मृत्यूचा पहिला धक्का बसला होता, तर दुसरा धक्का ब्रिटिश सरकारने दिला होता. सरकारने नवा प्रेस ॲक्ट संमत केला होता. त्यामुळे 'काळ' पत्राचे भवितव्य अंधारात होते. नवीन कायद्यानुसार 'काळ' पत्राला दहा हजाराचा जामीन बजावला होता. एवढी मोठी रक्कम शि.म.परांजपे यांचेकडे नव्हती. लोकवर्गणी काढून 'काळ' पत्र चालवावे, असा त्यांचा स्वभाव नव्हता. जरी काहीतरी खटपट करून पत्र चालविले तरी कधी कोणता लेख आक्षेपार्ह ठरविला जाईल, याचा नेम नव्हता. त्यामुळे इच्छा नसताना ही शि.मं.ना 'काळ' एवढे गाजलेले पत्र बंद करावे लागले. सरकारच्या पाशवी प्रेस ॲक्टमुळे 'काळ' पत्र शि.म.परांजपे यांना बंद करावे लागले. लोकजागृती व समाजाचा आरसा असणाऱ्या 'काळ' पत्राचा सरकारने बळी घेतला. विमनस्क अवस्थेत शि.म.परांजपे यांना 'काळ' पत्र बंद करावे लागले, हा त्यांना बसलेला प्रचंड मोठा धक्का होता.[५२]

'काळ' पत्र बंद पडल्यानंतर पुढे श्री. यशवंत गोपाळ जोशी यांच्या य.गो.जोशी प्रकाशन कार्यालय, सदाशिव पेठ, पुणे २ यांनी 'काळांतील निवडक निबंध' दहा भागांचे पुर्नमुद्रण, २७ सप्टेंबर १९४६ ला करण्याचे महत् कार्य केले. आजही ते लेख वाचल्यावर 'काळ' लोकप्रिय का झाला असेल? याची प्रचिती येते.[५३]

प्रो. पोतदार यांनी काळाच्या बिनतोड कामगिरीचे वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे. ''त्यांच्या भोवतालच्या परिस्थितीत जागरुक इंग्रज सरकारच्यासमोर बिनधोकपणाने आणि सफाईने स्वातंत्र्याचा असा कुशल पुरस्कार करणारा वक्ता आणि लेखक उभ्या हिंदुस्थानात दुसरा कोणी असल्याचे आम्हांस माहीत नाही. आट्यापाट्याच्या खेळांत ज्याप्रमाणे विलक्षण चपळाईने मार न खाता पाट्या ओलांडीत जाऊन एखादा कुशल खेळाडू लोण पोहचवितो, त्याप्रमाणे इंग्रज सरकारच्या कायद्याच्या बंदोबस्ताच्या पाट्या सफाईने ओलांडून आपल्या अंगास स्पर्श होऊ न देता शिवराम पंतांनी निर्भेळ स्वातंत्र्याच्या प्रसाराचे लोण महाराष्ट्राच्या मैदानावर सर्वांसमक्ष पोहोचवून दाखविले ही त्यांची कामगिरी केव्हाही अविस्मरणीय अशीच ठरेल.''[५४]

## 'स्वराज्य' पत्राची सुरुवात –

'काळ' पत्र दुर्दैवी रितीने बंद करावे लागले. त्यानंतर शि.म.परांजपे एकाकी झाले. पुढे साधारण दहा–अकरा वर्षे ते वृत्तपत्रापासून बाजूलाच राहिले. सन १९१४ साली शि.मं.नी कानड्यांचा वाडा सोडला व तुळशी बागेजवळ घेतलेल्या स्वतःच्या घरात रहायला आले. 'काळ' पत्राच्या वेळी असलेल्या 'मनोहर' छापखान्याचे 'गोवर्धन' असे नामकरण करून नवीन घरात आणला.[५५]

दुर्दैवाने १ ऑगस्ट १९२० रोजी लो. टिळकांचे निधन झाले. शि.मं.ना प्रचंड धक्का बसला. लोकमान्यांच्या दहाव्या दिवशी भरलेल्या जंगी दुखवट्याच्या सभेत शिवरामपंत म्हणाले होते, ''लोकमान्य गेले. पण त्यांचे गुण पाठीमागे आहेत. त्यांना आपण अटकाव केला पाहिजे. नाहीतर ते Father of Indian Unrest वरती चळवळ करतील आणि परमेश्वराशी भांडून मला लवकर का आणिले म्हणून त्याला विचारतील. लोकमान्यांच्या जाण्याने परलोकाचाच काय तो फायदा झाला आहे.''[५६]

सुरुवातीला टिळकांचे आजारपण व नंतर मृत्यू यामुळे शि.मं. चे नवीन पत्र काढण्याचे थोडे लांबणीवर पडले. कारण दहा वर्षे 'काळ' पत्र चालविलेल्या, वृत्तपत्रात रमणाऱ्या शि.मं.ना स्वस्थ बसवेना. म. गांधी यांचा सत्याग्रह, जालियनवाला बाग हत्याकांड, खिलाफत चळवळ, माँटेग्यू–चेम्सफर्ड सुधारणा, अशा अनेक घटना घडत होत्या. त्यामुळे शि.म. परांजपे यांनी

पुन्हा वर्तमानपत्र काढण्याचा निर्णय घेतला. या नव्या पत्राचे नाव 'स्वराज्य' असे ठेवण्यात आले. 'काळा' चा अंक दर शुक्रवारी प्रकाशित होत होता, त्याचप्रमाणे स्वराज्य पत्राच्या प्रकाशनाचा दिवस गुरुवार ठरविण्यात आला.[५७]

१२ ऑगस्ट १९२० वार गुरुवार रोजी 'स्वराज्य' पत्राचा पहिला अंक पुण्यात प्रसिध्द झाला. परंतु या पहिल्याच अंकात 'लो. टिळकांवरील मृत्यूलेख' लिहिण्याचा प्रसंग शि.म.परांजपेंवर आला.[५८]

''लो. टिळक हे हा इहलोक सोडून परलोकी गेले, त्यामुळे परलोकाचा काय फायदा झालेला असेल तो असो, परंतु येथील लोकांचे मात्र त्यायोगाने अतिशय नुकसान झाले आहे. स्वदेशाभिमानाच्या मोहिमा करण्याला महाराष्ट्राला इतकेच नव्हे तर साऱ्या हिंदुस्थानाला लो.टिळक यांच्यासारखा धाडसी, बुध्दिमान आणि यशस्वी नेपोलियन मिळाला होता, हे आपल्या देशाचे इतके दिवस मोठे भाग्य होते.'' टिळकांवरील प्रशंसनीय लेख पहिल्या स्वराज्य पत्राच्या अंकात होता.[५९]

स्वराज्य पत्राच्या पहिल्याच अंकात 'स्वराज्य' या विषयावर शि.मं.नी अग्रलेख लिहिला होता. 'काळ' व 'स्वराज्य' या दोन्ही पत्रात जवळ–जवळ १२ वर्षांचे अंतर होते. हे दोन्ही अंक त्या त्या परिस्थितीत सुरू केले होते.[६०]

लोकमान्य टिळकांच्या मृत्यूनंतर त्यांचे अनुयायी गंगाधरराव देशपांडे, काकासाहेब खाडीलकर आदी मंडळी महात्मा गांधीच्या चळवळीत सहभागी झाली. त्यांच्याप्रमाणेच शि.म.परांजपे यांनीही म. गांधींना स्वातंत्र्यचळवळीत साथ देण्याचे ठरविले.[६१,६२]

'स्वराज्य' आणि 'काळ' या दोन पत्रामध्ये खरोखरच जमीन–अस्मानाचे अंतर होते. 'काळ' पत्र चालविणारे शि.म.परांजपे आणि 'स्वराज्य' पत्र चालविणारे शि.म.परांजपे यांच्यात खूपच अंतर होते. लो. टिळक़ांच्या मुशीत तयार झालेल्या शि.मं.ना गांधींच्या चळवळीशी समरस होणे तितकेसे जमले नाही. ''आपण स्वराज्य मिळवूंच मिळवू!'' या गांधीच्या आत्मविश्वासाच्या जोरावर शि.मं.नी गांधींच्या सर्व चळवळीत अगदी प्रामाणिकपणे भाग घेतला.[६३]

'काळ' पत्रात लोकमान्य टिळकांपेक्षा जहाल विचार मांडून सरकारवर टीका करण्याचे काम शि.मं.नी केले. 'काळ' तरुणांना आकर्षित करणारे पत्र ठरले. परंतु 'स्वराज्य' पत्राचे

वेगळे होते. महात्मा गांधींच्या नेतृत्त्वाखाली असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ, दांडी यात्रा, अशा अनेक चळवळी उदयाला आल्या. त्यामध्ये शि.मं.नी भाग घेतला. त्याचे वार्तांकन 'स्वराज्य' पत्रात केलेले दिसते. परंतु 'काळ' पत्रामध्ये असणारी जहाल विचारांची धार 'स्वराज्य' पत्रामध्ये दिसत नाही. 'स्वराज्य' हे पत्र शि.मं.नी १९२७ सालापर्यंत चालविले. 'काळ'पत्राप्रमाणे 'स्वराज्य' पत्राला विशेष लोकप्रियता मिळाली नाही. शि.मं.नी जरी 'स्वराज्य' पत्र काढले असले तरी ते 'काळकर्ते' नावानेच ओळखले जातात. कारण 'काळ' पत्रामुळे त्यांना मोठा नावलौकिक मिळाला होता. असहकार चळवळीमध्ये सरकारी गोष्टींवर बहिष्कार घालण्याची जी योजना होती त्याचा शि.म. परांजपेंवर चांगलाच परिणाम झाला होता. त्यानुसार ९ सप्टेंबर १९२०च्या 'स्वराज्य'च्या अंकात शि.म. लिहितात, ''लोक आपल्या स्वतंत्र आणि नवीन निर्माण केलेल्या साधनांनी आपली सर्व राजकीय कार्ये उरकून घेऊ लागले. म्हणजे ही सगळी सरकारी खाती आपोआपच अर्धांग वायू झालेल्या अवयवांप्रमाणे लुली (लुळी) आणि निर्जीव होऊन वाळून आणि गळून जातील आणि हेच 'स्वराज्य' होय! दुसऱ्याच्या अपेक्षेशिवाय आपली कामे आपण स्वतःच करू लागलो, म्हणजे याच्यापेक्षा स्वराज्य काही निराळे आहे, असे नाही.''[६४]

''.... याकरिता कोणी कोणाच्या उखाळ्या-पाखाळ्या न काढता दोघांनी मिळून तिसऱ्यांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्याकरिता एक झाले पाहिजे. तरच आपल्याला स्वराज्य मिळेल. व्यक्तींच्यासाठी देश नाही, देशासाठी आपण सर्व व्यक्ती आहोत, ही उच्च आणि उदात्त भावना आपण आपल्या मनात बाळगली तर परमेश्वर आपल्याला अजूनही स्वराज्याच्या सुखाचे दिवस खात्रीने लवकर दाखवील.'' असेही प्रतिपादन स्वराज्यपत्रात शि.मं.नी केले होते.[६५]

'स्वराज्य' पत्रात शि.म.परांजपे यांनी 'मवाळाच्या प्रयत्नांना निराळे वळण', 'गुलामगिरीमधून स्वराज्यामध्ये पतितपरावर्तन', 'एक जुना प्रधान आर्यचाणक्य आणि हल्लीचे नवे प्रधान', 'कमकुवतपणा की प्रजाद्रोह', 'स्वातंत्र्याच्या अटी', 'गरीबांचे गुप्त कट', कौन्सिलांवरील बहिष्काराचा पूर्व आणि पूर्ण इतिहास', 'हृदयविष्करण', 'महात्मा गांधी तुम्ही चुकलांत!' असे अनेक लेख लिहीले. पैकी 'महात्मा गांधी तुम्ही चुकलांत!' हा लेख विशेष महत्त्वपूर्ण मानला जातो.[६६]

महात्मा गांधींनी 'एका वर्षात स्वराज्य' मिळवून देण्याची भीष्म प्रतिज्ञा घेतली होती. परंतु म. गांधीची असहकार चळवळ अपयशी ठरल्याने म.गांधींवर सडेतोड टीका 'स्वराज्य' पत्राच्या माध्यमातून शि.मं.नी केलेली दिसते. – ''यशाच्या दृष्टीने दोष कोणाचा हा प्रश्न

बाजूला ठेवला तर, तुमच्या चळवळीने एक वर्षाच्या आत स्वराज्य प्राप्त झाले नाही. तेव्हा तुम्ही चुकलात असेच इहलोक म्हणणार! स्वर्गलोकांत अशा परिश्रमांना आणि अशा स्वार्थ त्यागांना निःसंशय पुष्कळ जास्त किंमत असेल. पण त्याचा काय उपयोग ? अशी चळवळ करून तुम्ही स्वतःचे अगर लोकांचे काही एक साधले नाहीच. लोकांना तर स्वराज्य मिळवून दिले नाहीच. पण स्वतःचे स्वराज्य घालवून बसलांत. अनुयायी अनुकरण करण्याला तत्पर नाहीत. अशा ठिकाणी पुढाऱ्यांच्या अमौलिक आणि अलौकिक पण वैयक्तिक कृतीला असलीच फळे यावयाची, हा दैव दुर्विलास आहे!''[६७]

म. गांधींच्या राष्ट्रीय शिक्षणाचा मुद्दा शि.मं.नी महत्त्वपूर्ण मानला होता. नवीन राष्ट्रीय शाळा अपुऱ्या पडत असल्या तरी तात्पुरत्या ''शाळांवरील बहिष्काराने विद्यादेवीचे सिंहासन डळमळत नाही.'' अशा प्रकारचा अग्रलेख 'स्वराज्य' पत्रात लिहिला होता.[६८]

पुढे शि.म.परांजपे यांनी मुळशी सत्याग्रहात भाग घेतला होता. त्यासाठीही त्यांना कारावासाची शिक्षा झाली होती. [६९]

सन १९२७ साली शि.म.परांजपे यांच्या वयाला त्रेसष्ठ वर्षे पूर्ण झाली होती. तरीही प्रत्येक कामांत त्यांचा उत्साह वाखाणण्याजोगा होता. तरीही दगदग व प्रकृती ठीक नसल्या कारणाने छापखाना व वर्तमानपत्राचा व्याप सांभाळणे दिवसेंदिवस अवघड होऊ लागला. त्यामुळे शि.म.परांजपे यांनी 'स्वराज्य' पत्र श्री. शंकरराव देव व हरोलीकर यांचेकडे स्वाधीन केले. अशाप्रकारे 'स्वराज्य' पत्राचा संसार आटोपला.[७०,७१]

'काळ' पत्राप्रमाणे 'स्वराज्य' पत्राला विशेष प्रसिध्दी मिळाली नसली तरी म. गांधीच्या काळातील काही महत्त्वपूर्ण वार्तांकने करण्याचे काम शि.म.परांजपे यांनी 'स्वराज्य' पत्राच्या माध्यमातून केलेले दिसते. स्वातंत्र्य लढ्यातील योगदानात शि.म. परांजपे यांच्या 'स्वराज्य' पत्राचे ही स्थान अद्वितीय होते, असेच म्हणावे लागेल.[७२,७३,७४]

## – संदर्भग्रंथ –


१) परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९४५, पृ.९२,९३

२) तत्रैव पृ.९१

३) तत्रैव पृ.९२

४) दै. लोकसत्ता, १० डिसेंबर २०१७

५) तत्रैव पृ.९४, केसरी १ फेब्रुवारी १८९८

६) का. नि. नि. भाग १, १९४६, य.गो. जोशी प्रकाशन, पुणे–२, प्रस्तावना – पोतदार दत्तो वामन, पृ.१,२

७) परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ.९२,९३

८) तत्रैव पृ.९९

९) का. नि. नि. भाग १, य.गो. जोशी प्रकाशन पुणे–१९४८, पृ.

१०) ता. २५.३.१८९८ (अग्रलेख काळ) पृ. १ ते ६

११) परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९४५, पृ.१००,१०१

१२) तत्रैव पृ.९३ ते ९६

१३) का. नि. नि. भाग १ य.गो. जोशी प्रकाशन पुणे–१९४६, पृ.

१४) परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शि.मं.परांजपे', चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे १९४५ पृष्ठ – ९३–९६

१५) लेले रा.के . मराठी वृत्तपत्रांचा इतिहास कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९९४ पृ. ४६२,४६३

१६) परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ.११६

१७) तत्रैव पृ.१०८,

१८) परांजपे शि.म., का. नि. नि. भाग ४, य.गो. जोशी प्रकाशन, पुणे–१९४६, पृ –३९

१९) परांजपे वामन कृष्ण, 'शिवरामपंत परांजपे व्यक्ती–वक्तृत्व वाङ्मय' चित्रशाळा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे.२, पुरस्कार प्रस्तावना अणे माधव श्रीहरी पृ.७

२०) ओगले शि.ल., बर्वे द. के., 'शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र' (जीवन कार्य व आठवणी), य.गो.जोशी प्रकाशन, पुणे–२ पृ. ४६,४७

२१) (अ) 'काळ' – सप्टेंबर १९०४

(ब) का. नि. नि. भाग ३, १९४६, य. गो. जोशी प्रकाशन, पुणे–२, पृ. ६९ ते ७६

२२) 'काळ' – १८ ऑक्टोबर १९०७

२३) तत्रैव पृ. ४७,४८

२४) परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ.१०५,१०७,१०८,११४

२५) परांजपे वामन कृष्ण, 'शिवरामपंत परांजपे व्यक्ती–वक्तृत्व वाङ्मय' चित्रशाळा प्रेस, पुणे–२ पृ.४९,५०

२६) अ.ह. गद्रे संपा. अच्युतराव कोल्हटकर स्मारक ग्रंथ भाग – ३रा, मुंबई – पृ.१३६–१३८

२७) दै. सकाळ, १८ सप्टेंबर २०१६

२८) लेले रा. के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे १९८४, पृ. ४६८ ते ४७०.

२९) 'Source Material for a History of the Freedom Movement in India, Vol. II', Government of Maharashtra, Bombay, 1958, Page 646-650.

३०) तत्रैव, पृष्ठ ६५६

३१) लेले रा. के. 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे १९८४, पृष्ठ ४७२ ते ४७५.

३२) Times of India, September 19, 1904 P.4

३३) परांजपे वामन कृष्ण, 'शिवरामपंत परांजपे व्यक्ती–वक्तृत्व–वाङ्मय' चित्रशाळा प्रेस, पुणे–२ पृ. ४४

३४) तत्रैव पृ. १८

३५) परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ.१६१,१६२

३६) तत्रैव पृ. १६१,१६२

३७) तत्रैव पृ. १९०

३८) (अ) तत्रैव पृ. १७१,१७२,

(ब) दंड्वते गोविंद धोंडदेव प्रकाशक मुंबई– १९०८, काळावरील राजद्रोहाचा खटला, पृ.१५,१६

३९) परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन' चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ.१७१,१७२,१७४

४०) तत्रैव पृ. १७५,१७६

४१) तत्रैव पृ. १७५ ते १७९

४२) तत्रैव पृ. १८४

४३) तत्रैव पृ. १७९

४४) तत्रैव पृ. १८४,१८५

४५) तत्रैव पृ. १८४,१८५

४६) तत्रैव पृ. १८४,१८५

४७) तत्रैव पृ. १८८

४८) तत्रैव पृ. १८९,१९३

४९) तत्रैव पृ. १९४

५०) तत्रैव पृ. २०३

५१) तत्रैव पृ. २०८

५२) पोतदार दत्तो वामन, प्रस्तावना– का. नि. नि. भाग १ १९४६ य.गो. जोशी प्रकाशन पृ. १,२

५३) परांजपे वामन कृष्ण, ‘शिवरामपंत परांजपे व्यक्ती–वक्तृत्व वाङ्मय’, चित्रशाळा प्रेस, पुणे–२, पृ. २७०

५४) परांजपे वामन कृष्ण, ‘काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन’ चित्रशाळा प्रेस, आवृत्ती पहिली, १९४५, पृ.२३१

५५) तत्रैव पृ. २३२

५६) तत्रैव पृ. २३३

५७) तत्रैव पृ. २३३,२३४

५८) (अ) तत्रैव पृ. २३५

(ब) पोतदार दत्तो वामन, प्रस्तावना– का. नि. नि. भाग १ १९४६, य.गो. जोशी प्रकाशन, पृ. १, २

५९) परांजपे वामन कृष्ण, ‘काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन’ चित्रशाळा प्रेस, आवृत्ती पहिली, १९४५, पृ.२७०

६०) परांजपे वामन कृष्ण, ‘शिवरामपंत परांजपे व्यक्ती–वक्तृत्व वाङ्मय’, चित्रशाळा प्रेस, पुणे–२, पृ. ६४

६१) परांजपे वामन कृष्ण, ‘काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन’, चित्रशाळा प्रेस, आवृत्ती पहिली, १९४५, पृ.२३५

६२) ओगले शि.ल., बर्वे द. के., ‘शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र’ (जीवन कार्य व आठवणी), य.गो.जोशी प्रकाशन, पुणे–२ पृ. २४१

६३) तत्रैव पृ. २८३

६४) ‘स्वराज्यातील निवडक निबंध’ – काळकर्ते दे.भ. शि.म.परांजपे यांचे स्वराज्यातील निवडक निबंध, मुद्रक, प्रकाशक – परांजपे कृष्णाजी शिवराम पृ. १२६ ते १३३

६५) तत्रैव पृ. १२६ ते १३३

६६) परांजपे वामन कृष्ण, ‘काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन’, चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे. आवृत्ती पहिली, १९४५, पृ.२३५, २३५

६७) तत्रैव पृ. २४५, २५९

६८) तत्रैव पृ. २८२

६९) तत्रैव पृ. २८१

७०) तत्रैव पृ. २८३

७१) 'स्वराज्यातील निवडक निबंध'– पेणची परिषद, काळकर्ते दे.भ. शि.म.परांजपे यांचे स्वराज्यातील निवडक निबंध मुद्रक, प्रकाशक – परांजपे कृष्णाजी शिवराम पृ. २८३

७२) तत्रैव पृ. १२६ ते १३३

७३) तत्रैव पृ. १२६ ते १३३

७४) तत्रैव पृ. १२६ ते १३३

# प्रकरण – ५

## लेखन कार्य

'काळ' पत्र सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे बंद पाडले. सरकारने 'काळ' कचेरीची झडती घेण्याचे ठरविले. आपले वाङ्मय दुसऱ्या कोणाच्या हातामध्ये पडू नये, म्हणून शि. म. परांजपे यांनी सन १९१० साली संध्याकाळी कोनकरांच्या वाड्यात ते राहत असलेल्या ठिकाणी स्वतःच्या हातांनी सर्व साहित्य जाळले होते. याची कल्पनाही करवत नाही. ज्या हातांनी एवढे मोठे साहित्य लिहिले त्याच हातांनी साहित्य जाळावे लागले! शि.म.परांजपेंच्या मनावर त्याचा धीरगंभीर परिणाम झाला होता. आज ना उद्या सरकारला जाग येईल, भारतीय लोकांना स्वातंत्र्य मिळेल या आशेवर शि.मं.नी आपली वाटचाल सुरू ठेवली.[१]

त्यासंदर्भात 'हृदयाविष्करणांत' शि.मं.नी स्वतः लिहिले होते – 'काळ हे पत्र यदाकदाचित बंद पाडले गेले, तरी त्यापासून काय होणार? काळ हे प्रसिध्द होणारे एक पत्र आहे. परंतु प्रसिध्द न होणारी अशी हिंदुस्थानमध्ये तीस कोटी वर्तमानपत्रे आहेत, त्यांची सरकार काय वाट लावणार? लेख जप्त करता येतात पण लेखनशक्ती जप्त करता येत नाही. लेखांवर बंदी घालून क्रांतीभावना बंद पडत नाही.''[२,३]

शि.म.परांजपे यांचा प्रचंड आत्मविश्वास होता. २६ मे १९२९ला बेळगाव येथे भरलल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद शि.म.परांजपे यांना बहाल करण्यात आले होते. मराठी साहित्याची त्यांनी केलेली सेवा महान होती. त्यावेळी आण्णांची म्हणजे शि.म. ची तब्येत फार ठीक नव्हती. तरीही शि.म.परांजपे यांनी साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून अध्यक्षीय भाषणातून आपले विचार अगदी सडेतोडपणे मांडले.[४,५]

'सरकारजमा पुस्तके' या विषयावर चर्चा करताना शि.म.परांजपे म्हणाले होते, ''सरकारने काही पुस्तके जप्त केली, म्हणून आपल्या ओजस्वी वाङ्मयाचे काय वाकडे झाले आहे? काही मुर्ख माशांनी समुद्रातील मोती गळ्यावर घालण्याऐवजी गळ्याखाली घातला आहे. म्हणून त्याच्या योगाने जगातील संपत्ती थोडीच कमी झाली आहे! कित्येक संशयग्रस्त अधिकारी रानांतील एखाद्या अविचारी वणव्याप्रमाणे आपल्यापुढील वाङ्मयाचे उभे पीक जाळून खाक

करीत असतात. पण त्या राजधानीतील अधिकाऱ्याला आणि त्या रानांतील वणव्याला हे ईश्वरी तत्त्व कोठे समजत असते की, आपण जी जागा जाळूनपोळून टाकीत असतो, त्या ठिकाणी पुढे नवीन पीक दुप्पट जोराने उगवते!...'' मुद्राराक्षस नाटकात आर्य चाणक्याने म्हटले आहे की, ''सगळ्या सेना फितूर होऊन शत्रूकडे गेल्या तरी हरकत नाही. पण एका केवलमर्थसाधनविधों सेनाशतेभ्योऽधिका..... बुध्दिस्तु गान्मम ।।''[६,७]

त्याप्रमाणे सरकारने सर्व काही जप्त करून नेले. तरी जोपर्यंत स्वदेशाभिमान ग्रंथकारांच्या डोक्यांमध्ये त्यांची बुध्दी कायम आहे तोपर्यंत आपल्या भाषेला स्वदेशाभिमान अशा उत्कृष्ट वाङ्मयाची कधीही उणीव पडणे शक्य नाही. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या सद्यःस्थितीवरील निबंधाला किंवा विनायकराव सावरकर यांच्या मॅझिनीच्या चरित्राला सरकारने बंदी केली म्हणून कोणाचे काय अडले आहे? त्यांच्यापेक्षा शंभरपटीने तीव्र अशी कम्युनिझमपर्यंत मजल मारणारी वाङ्मये आज देशामध्ये उत्पन्न झालेली नाहीत काय?''[८]

## शि.म.परांजपे यांचे लेखनकौशल्य–

शि.म.परांजपे यांनी स्वातंत्र्याचा ध्यास घेतलेली 'काळ'व'स्वराज्य' ही साप्ताहिके चालविली. त्याचप्रमाणे त्यांनी अफाट साहित्याचे लेखन केले. कादंबरी, नाटक, स्फूट लेख, काव्य, कथा, ललित लेख अशा माध्यमातून आपल्या लेखन प्रतिभेचा अव्वल दर्जा जगाला दाखवून दिला. अतिशय प्रामाणिकपणे उत्तम दर्जाचे लेखन करताना शि.मं.चे प्रतिभा कौशल्य समजते. त्यातूनच उत्तम वाङ्मयाची निर्मिती झाली. रंजकता, व्यंजकता, कल्पकता, बहुश्रुतता ह्या गुणांनी शि.मं.चे साहित्य समृध्द व संपन्न होते. त्यांनी बहुतेक साहित्य लेखनातून स्वातंत्र्याचा पुरस्कार केलेला दिसतो. ग्रंथ रचनेचा हेतू काय असावा याबद्दल स्वतः शि.म. म्हणतात, ''पूर्वी शिवाजींच्यासारखी स्वराज्ये उत्पन्न झाली होती, तरी आमचे कवी रामराज्याचीच वर्णने गात होते आणि पानिपतासारखे भयंकर राष्ट्रविघातक रणसंग्राम त्यांच्या डोळ्यांदेखत घडून येत असतांही ते महाभारतांतील कौरव–पांडवांच्या युध्दाचीच यमके जुळवीत बसले होते. आपले स्वराज्य आणि स्वातंत्र्य ज्यांच्यासाठीच कवींनी मुख्यत्वेकरून आपली काव्ये गावी आणि सर्व देशांतील कवी गात आले. ते आपले स्वराज्य आणि स्वातंत्र्य जाणार, जात चालले–गेले तरी त्याची आपल्यापैकी कोणी कवींनी दाद घेतली नाही! देशांतील काही

वीर पुरुष १८५७ सालापर्यंत आपल्या स्वातंत्र्याकरिता शेवटची धडपड करीत होते. पण त्यांचीही वर्दी आपल्या कवींपैकी कोणाच्याही काव्याच्या कानांवर कधी गेली नाही.[९]

शिवरामपंतांची लेखनशैली अतिशय अभ्यास, मनोहारी वक्रोक्तीपूर्ण आणि देशाभिमानी पध्दतीची होती. विविध विषयांवर प्रकाश टाकण्याचे काम शि.मं.नी केले. ऐतिहासिक घटना, राजकीय, सामाजिक, नाट्य, काव्य, कला, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय अशा अनेक विषयांचा मागोवा शि.मं.नी आपल्या लेखन संपदेतून केलेला दिसतो. शि.मं.ना मराठी भाषेविषयी सार्थ अभिमान होता. अति उच्च कोटीच्या मराठी भाषेतून आपले लेखन करीत शि.म.परांजपे यांनी अचाट साहित्याची निर्मिती केली. जे इंग्रज आपल्याला गुलामगिरीत वागवितात, अशा इंग्रजी भाषेबद्दल त्यांना प्रचंड चीड होती. म्हणून जास्तीत जास्त मराठी भाषेत लेखनास शि.मं.नी प्राधान्य दिले. मराठी, संस्कृत व इंग्रजी या सर्व भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. परंतु मराठी भाषेबद्दल त्यांना नितांत आदर होता. मराठी साहित्यात त्यांची उंची फार अभिजात होती. त्यामुळेच सन १९१४ मध्ये पुण्यात नूतन आर्यभूषण थिएटरमध्ये भरलेल्या नाट्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना मिळाले. तसेच २६ मे १९२९ रोजी बेळगाव येथे भरलेल्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान शिवराम परांजपेंना मिळाला होता.[१०]

शिवरामपंतांचे लेखन जसे उत्तम तशीच त्यांची भाषा शैली अलंकारिक, आवेशयुक्त, स्वदेशभक्तीने ओतप्रोत, भाषा शुध्दता होती. त्यांच्या लेखनातून त्यांच्या स्वभावाचेही दर्शन घडते. सन १९०८ साली शिवरामपंतांना राजद्रोहाची शिक्षा झाली. त्यावेळचे त्या खटल्याच्या हकीगतीचे एक जुने पुस्तक उपलब्ध आहे. त्यात शिवरामपंतांचे संक्षिप्त चरित्र दिलेले आहे. त्यांत खालील मजकूर आढळतो....

''प्रो. परांजपे हे वाङ्मय क्षेत्रातील एक जादुगार आहेत व त्यांची भाषा म्हणजे निःसंशय लोकांना मोहित करणारी जादू आहे, असे म्हणावे लागेल. राजकीय, सामाजिक किंवा धार्मिक बाबतीत रा. परांजपे यांच्याहून दक्षिणोत्तर ध्रुवाइतकी ज्यांची मते भिन्न आहेत, असे पुष्कळ विद्वान लोक असतील. परंतु विचाराची बाजू सोडून दिली आणि निव्वळ भाषा पध्दतीच्या दृष्टीने पाहिले तर रा. परांजपे यांच्या लेखात अशी काहीतरी लोकोत्तर खुबी आढळून येते की, अगदी विरुध्द मनाच्या माणसांना देखील निदान मनोरंजनाकरिता तरी त्यांचे लेख वाचावेसे वाटतात व मनोरंजनाच्या भरात हे लोक इतके वाहवून जातात की, घटकाभर आपली सर्व मते व पूर्वग्रह

विसरून जाऊन लेखकाबद्दल धन्यतेचे उद्‌गार त्यांच्या तोंडावाटे हळूच बाहेर पडल्याशिवाय राहत नाहीत!''[११]

अशा प्रकारे उत्तम आणि ओजस्वी भाषा शैलीचा वापर करून शि.म.परांजपे लेखन करताना दिसतात. प्रसंग, विषयानुरुप भाषाशैली बदलताना दिसते. चर्चा, संशोधनात्मक, टीकात्मक, बुध्दीवादी काव्य अशा अनेक पध्दतींचा सुंदर मिलाफ त्यांच्या लेखनात दिसतो. त्यामुळे त्यांचे साहित्य वाचताना वाचक वर्ग खिळवून ठेवण्याचे सर्व श्रेय शि.म.परांजपेंना द्यावे लागते.[१२]

'काळ' पत्र बंद पडल्यानंतर शि.म.परांजपे यांचे स्नेही श्री. वासुदेवराव जोशी यांच्या सांगण्यावरून ते 'चित्रमयजगत' मासिकात आपले लेख देत असत. त्याचप्रमाणे लोकशिक्षण, रत्नाकर, यशवंत, विविध ज्ञानविस्तार, अशा विविध मासिकांमधून शि.मं.नी आपले विविध लेख लिहिले. साहित्य संग्रह भाग – १, २, ३, यामध्ये अफाट लेखन केले आहे.[१३]

## शि.म.परांजपे यांची ग्रंथसंपदा –

### १) राजकीय साहित्य, वाङ्मय –

'काळ' कचेरीवर सरकारने झडतीचे काम केल्याने काळाचे अंक व इतर साहित्य सरकारने जप्त केले. राजद्रोहाचा खटला होऊन शि.म.परांजपे यांना १९ महिन्यांची कारावासाची शिक्षा झाली होती. परंतु काळाचे लेखन पुढील पिढीला समजावे यासाठी य.गो.जोशी प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे २ यांनी 'काळा'तील महत्त्वपूर्ण लेख 'काळातील निवडक निबंध भाग १ ते १० अशा दहा भागात दि. २७ सप्टेंबर १९४६ रोजी प्रकाशित केले आहेत.[१४]

### २) स्वराज्यातील निवडक निबंध –

सन १९०८ ला 'काळ' पत्र बंद पडल्यावर विविध मासिकांमधून शि.म.परांजपे यांनी लेखन सुरू ठेवले होते. परंतु वर्तमानपत्राच्या लिखाणाशिवाय शि.मं.ना स्वस्थ बसवेना. लोकमान्य टिळकांच्या मृत्युनंतर म. गांधींच्या काळात 'स्वराज्य' पत्राची सुरुवात केली. स्वराज्य पत्र सन १९२० ते १९२७ सालापर्यंत चालू होते. दर गुरुवारी स्वराज्य पत्र निघत

होते. स्वराज्य पत्रातील हे सर्व लेख स्वराज्याच्या देशाभिमानाच्या प्रेमाचे प्रतिक म्हणून महत्त्वपूर्ण मानले जातात. स्वराज्यपत्रातील लेखांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. [१५]

१) मवाळांच्या प्रयत्नांना निराळे वळण –

शि.म. परांजपे यांनी या लेखाच्या माध्यमातून मवाळ पक्षाच्या कार्यकर्त्यांवर जबरदस्त टीका केल्याचे दिसते. मवाळ होणे ही अजिबात सोपी गोष्ट नाही. कारण मवाळांची सुख–दुःखे त्यांची त्यांनाच माहित. ब्रिटिशांचे राज्य हे ईश्वरी वरदान आहे, असा म्हणणारा मवाळ वर्ग शि.म.परांजपे यांना अजिबात आवडत नाही. मवाळ लोक हे ब्रिटिशधार्जिणे आहेत. ब्रिटिशांच्या कोणत्याच धोरणाला चुकीच्या कारभाराला मवाळ विरोध करीत नाहीत. स्वातंत्र्य प्रेम, स्वदेश भक्ती फक्त भाषणांतून व्यक्त करून उपयोग नाही, ती प्रत्यक्षात अंमलात आणायला हवी. प्रत्येकवेळी मवाळांनी सरकारच्या कार्याला पाठिंबा देणे, हे चुकीचे आहे. कौन्सिलमध्ये सध्या मवाळ लोकांची वर्णी लागलेली आहे. नुसते प्रश्न विचारून उपयोग नाही. सर्वसामान्य लोकांच्या हिताचा विचार मवाळांनी या कौन्सिलांत मांडला पाहिजे. मिळालेल्या संधीचा जनतेच्या कारणासाठी उपयोग केला पाहिजे. सर्व जागा, अधिकार पदे मवाळांना मिळालेले आहेत. तुम्ही नुसती व्याख्याने देऊन उपयोग नाही. कारण सर्वसामान्य लोकांचा मवाळ पक्षाला पाठिंबा नाही. कौन्सिलमध्ये निवडून जाऊनही देशाच्या स्वातंत्र्यासाठी तुम्ही काहीच करताना दिसत नाही. मवाळांनी सर्वत्र दौरे करावेत. आपल्या संघटनेमध्ये लोकांची संख्या वाढवावी.बहुजन समाजामध्ये मवाळ पक्षाला काडीचीही किंमत नाही. कारण बहुजन समाजाचे हित त्यांच्या कारभारात कुठेच दिसत नाही. भारतात सत्यशोधक लोक व युरोपियन लोक तुमच्या सोबत कायम राहतील. कारण युरोपियन लोकांच्या मदतीशिवाय मवाळ एक पाऊलही उचलू शकत नाहीत. मवाळ पक्षातील नेत्यांनी व्याख्याने दिली तरीही ते युरोपियनांच्या विविध सुधारणांचे कौतुक करणारच. सरकारचे अस्तित्व कायम टिकावे असे त्यांना वाटते. रेल्वे, रस्ते, तारायंत्रे, उद्योग, शिक्षण, संपत्ती यांचा विचार तुम्ही आपल्या व्याख्यानातून मांडता. परंतु दुष्काळात अडकलेल्या शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेकडेही लक्ष द्यावे. त्यांच्या सारा माफीसाठी प्रयत्न करावेत. कारण तुम्हांला सध्याच्या भारतीय लोकांच्या स्थितीची काहीच कल्पना नाही. कौन्सिलमध्ये भारतीयांनी प्रवेश करू नये, असे सर्वजण सांगत असताना आपण कौन्सिलमध्ये प्रवेश केला आहे. तुम्ही लोकांच्या मतांचा आदर करणे गरजेचे होते. युरोपियनांच्या म्हणण्याप्रमाणे तुम्ही

लोकांमध्ये मिसळला तरी लोक तुमचे ऐकत नाहीत. कारण त्यांच्या कल्याणाच्या कोणत्याच योजना तुमच्याकडे नाहीत. तरीही ब्रिटिश सरकारच्या पाठीशी ठामपणे उभे आहात. महात्मा गांधी काहीतरी वेगळी समाजाभिमुख चळवळ आणल्याशिवाय राहणार नाहीत. मवाळ हे कायम ब्रिटिशांबरोबर राहतील, असे नाही. कारण त्यांनाही स्वतःची जात–गोत आहेच की. परंतु मवाळांना आपल्या बाजूला वळवून ब्रिटिशांनी आपली भारतात चांगलीच सत्ता स्थिरावली हे मात्र कटु सत्य आहे, असेच दुर्दैवाने म्हणावे लागते.[१६]

## २) नाकाशी क्लोरोफॉर्म आणि पायावर ऑपरेशन –

भारतातील विविध चळवळींबद्दल ब्रिटिश सरकारच्या धोरणांची माहिती या लेखात देण्यात आलेली आहे. ''राजकीच चळवळी करणाऱ्या पुढाऱ्यांवर सरकार खटले भरेल'', असे कलकत्ता येथील स्टेटस्मन पत्रामध्ये छापून आलेले होते. अशा प्रकारच्या बातम्या देऊन हिंदुस्थानमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण करण्याचे कार्य ब्रिटिश लोकांनी सुरू केले होते. खोट्या–नाट्या बातम्या देऊन भारतीय लोकांमध्ये नैराश्य निर्माण करणे, हा मुख्य हेतू होता.

भारतामध्ये महात्मा गांधींनी असहकार चळवळीची सुरुवात केलेली होती. भारतामध्ये सर्वसामान्य लोकांना चळवळीत सहभागी करून घेतलेले होते. सरकारशी असहकार करून आंदोलन करणे आणि अहिंसा या तत्त्वाचा अंगिकार करणे ही शिकवण म.गांधींनी दिलेली होती. तरी सुध्दा काही ठिकाणी लोकांनी शस्त्रे उगारून आंदोलने केली. मलबारमध्ये मोपल्यांनी फार मोठा दंगा केला. याही दंग्यामागे असहकार चळवळ किंवा खिलाफत चळवळ असण्याची शक्यता वर्तविली गेली. म्हणजे ब्रिटिशांविरोधात कोणत्याही चळवळी होऊ नयेत, हाच या मागचा हेतू होता. खिलाफत आणि असहकार या दोन्ही चळवळींनी भारतामध्ये शांतता राखण्याचे आवाहन केलेले आहे. मोपला हे अज्ञानी, अंध:कारी लोक होते. धर्मवेडेपणा त्यांच्यामध्ये होता. शेतकरी लोक असल्याने त्यांनी शेतकीच्या बाजूने दंगा केलेला होता. त्यांना असहकार चळवळीबद्दल काही देणे–घेणे नव्हते. देशात शांतता, सुव्यवस्था निर्माण करण्याचे मागे बंड मोडून काढण्याची भाषा बोलतात. मोपल्यांचे दंग्यावरून खिलाफत व असहकार आंदोलकांवर खटले भरण्याच्या विचारात आहेत.

त्यामुळे हिंदुस्थानातील विविध चळवळींचा आढावा घेता हिंदु व मुस्लीम यांच्यामध्ये एकवाक्यता होणे गरजेचे आहे. कारण ब्रिटिशांनी भारतामध्ये 'फोडा आणि झोडा' या राजनीतीचा अवलंब केलेला दिसतो. परंतु महात्मा गांधींच्या असहकार चळवळीबद्दल सरकारने थोडा कानाडोळा केलेला दिसतो. कारण एकाला जवळ करायचे आणि एकाला लांब ठेवायचे हा ब्रिटिशांचा डाव होता. हिंदु आणि मुस्लीम यांच्यात ऐक्य निर्माण होऊ नये, असाच डाव ब्रिटिशांचा होता. वैद्यकीय शास्त्रानुसार पायावर ऑपरेशन करायचे असल्यास नाकाला थोडीशी भूल द्यावीच लागणार. परंतु भारतातील हिंदु व मुस्लीमांनी ब्रिटिशांच्या धोरणाचा अंगिकार न करता एकवाक्यतेने रहायला हवे, कारण स्वराज्य मिळविण्यासाठी एकदिलाने सामोरे जायला हवे.[१७]

## ३) गुलामगिरीमधून स्वराज्यामध्ये पतितपरावर्तन –

विविध बंडांच्या, अत्याचाराच्या बातम्या वर्तमानपत्रांतून येत होत्या. त्यामध्ये मलबारमध्ये झालेल्या मोपल्यांनी केलेल्या आंदोलनाचा उल्लेख होता. हिंदु लोकांना बाटविण्याचे काम मोपल्यांनी केल्याचा त्यांच्यावर आरोप करण्यात येतो. हिंदुंची मंदिरे पाडली. हिंदु स्त्रियांवर मोठ्या प्रमाणात अत्याचार केले. मोपले, हिंदु, मुसलमान यांच्यामध्ये गोंधळ निर्माण करण्याचा वारंवार प्रयत्न केला गेला. भारतामध्ये कलहाचे वातावरण निर्माण करून त्यांचा फायदा घेणे ही ब्रिटिशांची रणनिती होती. तसे जर पाहिले तर युरोपातील ख्रिश्चनांनी देखील संपूर्ण जगामध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्याचे काम केले. मोपल्यांविरुध्द ब्रिटिशांनी खोट्या तक्रारी केलेल्या होत्या. संपूर्ण भारताला गुलामगिरीत ठेवण्याचे काम ब्रिटिशांनी केले आहे. हिंदु धर्माचा जर विचार केला तर या धर्मात कठोरता आहे. बाहेर गेलेल्या लोकांना सहजासहजी ते परत धर्मात घेत नाहीत. परंतु गुलामगिरीमध्ये जे लोक पतीत झालेले आहे, त्यांचे परावर्तन करणे आवश्यक आहे. त्यांचा उध्दार करण्याची आवश्यकता आहे. भारतीय लोकांची गुलामगिरीतून मुक्तता करावी व स्वराज्याच्या कार्यामध्ये त्यांना सहभागी करून घ्यावे. भारतीय लोकांबद्दल उदारमतवादी धोरणाचा अवलंब करावा. भारतामध्ये स्पृश्य–अस्पृश्य असा भेदभाव पाळला जातो. ब्रिटिशांनी भारतीयांना आर्थिक स्वातंत्र्य, स्वराज्याचे पूर्ण हक्क, स्वयंनिर्णयाचे तत्त्व, इ. अधिकार द्यावेत. परंतु त्यांच्या दयेची वाट न पाहता भारतीयांनी आपला उध्दार करून भारताचे स्वातंत्र्य कायदेशीर रितीने पार पाडावे.[१८]

## ४) गुलामगिरीच्या महोत्सवाचा तिरस्कार की अंगीकार –

ब्रिटिश युवराज भारतात येणार असल्याचे त्याच्या स्वागताची तयारी या संदर्भात काही मत–मतांतरे निर्माण झाली होती. काहींना वाटत होते की, युवराजांचे स्वागत जोरदार व्हावे, काहींना वाटत होते स्वागतावर बहिष्कार घालावा.

प्राचीन काळातील ही गोष्ट आहे. नंद घराण्यातील धनानंद राजाचा पराभव करून तेथे मौर्यांची सत्ता स्थापन करणारा राजा चंद्रगुप्त होता. राजाने आपण गादीवर आल्याने राज्यात मोठा महोत्सव करावा, अशी आज्ञा नागरिकांना दिली. त्यानुसार त्याला वाटले की, सर्वत्र महोत्सवाची तयारी सुरू असेल. परंतु राजा चंद्रगुप्ताला समजले की कोणीही कसलीही महोत्सवाची तयारी करीत नाही. त्याने काही लोकांना याबाबत विचारणा केली. परंतु लोकांनी आर्य चाणक्याने महोत्सवावर बहिष्कार घालण्याचे कारण सांगितले. तेव्हा चंद्रगुप्ताने आर्य चाणक्याला तत्काळ बोलावून घेतले व कारण विचारले. तेव्हा आर्य चाणक्याने चंद्रगुप्ताच्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली व महोत्सव करण्याची गरज नसल्याचे स्पष्ट केले. म्हणजे राजाची आज्ञा असूनही त्याची गरज नसल्याने आर्य चाणक्याच्या हुशारीने महोत्सव झालेला नव्हता.

त्याचप्रमाणे भारतात युवराजांच्या आगमनाची योग्य कारण समजल्यास महोत्सव करावा, अन्यथा करू नये, असा सूर भारतात उमटला. देशामध्ये दारिद्र्य, दुष्काळ, रोगराई, आर्थिक विवंचना, असे अनेक प्रश्न असताना ब्रिटिश युवराजाचे स्वागत का करायचे? हा फार मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. लोकांना खायला अन्न नाही. दडपशाही मोठ्या प्रमाणात आहे. अनेक लोकांना क्षुल्लक कारणांसाठी तुरुंगात डांबले जात आहे. भारतात सर्वत्र गुलामगिरीचे, दहशतीचे, भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याने राजपुत्र ब्रिटिशांचे असतील, भारतीय लोकांना त्याचे काही देणे–घेणे नाही, पोटभर खायला नाही आणि युवराजाच्या स्वागताचे महोत्सव काय साजरे करायचे? असा प्रश्न समस्त भारतीयांपुढे निर्माण झालेला आहे.

भारतातील अधिकारी मात्र युवराजांचे स्वागत जोरात व्हावे यासाठी प्रयत्नशील आहेत. मिरवणूक काढून त्यांनला मानपत्र देण्याचे निश्चित केले आहे. मोठी गर्दी व्हावी, अशी सर्वांना अपेक्षा आहे. परंतु सर्वत्र आंदोलनाचे वातावरण असल्याने युवराजांच्या स्वागताचे अशक्य वाटत आहे. म्हणून युवराजांनीच जेथे लोक आहेत तेथे जावे. तरीही ब्रिटिश धार्जिण्या लोकांना एकत्र

करण्याचे प्रयत्न सुरूच आहेत. शिवस्मारकाचे उद्‌घाटन युवराजांच्या हस्ते करण्याचा प्रयोग योजिला आहे. परंतु मराठ्यांना माहित आहे, याच शिवाजी महाराजांना इंग्रजांनी लुटारू म्हटले होते. महाराजांनी मराठ्यांना गुलामगिरीतून मुक्त करून मराठ्यांना हिंदवी स्वराज्य निर्माण करून दिले. परंतु भारतातील गुलामांना एकत्र करून युवराजांच्या आगमनाचा महोत्सव आयोजित करण्यावर भर आहे. परंतु ब्रिटिशांच्या कोणत्याही गोष्टींवर भारतीयांनी विश्वास ठेवू नये. युवराजांच्या आगमनावर पूर्ण बहिष्कार टाकून आपला निषेध नोंदवावा. [१९]

**५) एक जुना प्रधान–आर्य चाणक्य आणि हल्लींचे नवे प्रधान! –**

चंद्रगुप्त मौर्याने राज्यातील जनतेला महोत्सव साजरा करण्याची आज्ञा दिलेली होती. परंतु राज्याचा प्रधान आर्य चाणक्याने महोत्सवाची गरज नसल्याचे लोकांना सांगितले. त्यानुसार लोकांनी महोत्सव साजरा न करण्याचे राज्य चंद्रगुप्त यास सांगितले. म्हणजे प्राचीन काळामध्ये प्रधान आर्य चाणक्य याचा शब्द महत्त्वाचा मानला जात होता. आर्य चाणक्य अतिशय कुशाग्र, बुध्दीमान प्रधान होता. नंद घराण्यातील धनानंद राजाचा पराभव करून मौर्य साम्राज्याची स्थापना करण्यामध्ये आर्य चाणक्याचा सिंहाचा वाटा होता. एवढ्या विस्तीर्ण प्रदेशावर आर्य चाणक्याच्या पराक्रमामुळे राजा चंद्रगुप्त मौर्य राज्य करीत होता. कौटिल्य किंवा आर्य चाणक्य रणनिती आणि राजनितीवरील 'अर्थशास्त्र' या नावाचा ग्रंथ जगप्रसिध्द होता. राजाने राज्य कसे चालवावे, याचे सार या ग्रंथामध्ये दिलेले होते. अतिशय कर्तबगारीने, प्रामाणिकपणे आर्य चाणक्य राज्य कारभार करताना राजा चंद्रगुप्ताला मनापासून सहकार्य करीत होता. आजच्या काळात असा प्रामाणिक प्रधान सापडणे थोडेसे दुर्मिळच आहे. राजा चंद्रगुप्ताचा राजवाडा भव्य–दिव्य होता. त्याच्या दिमतीला हजारो नोकर–चाकर होते. प्रचंड संपत्ती त्याच्या पायी लोळण घेत होती. परंतु हे सर्व मिळवून देणारा राजाचा प्रधान आर्य चाणक्य हा एका झोपडीवजा घरात राहत होता. त्याच्याकडे बुध्दी हीच संपत्ती होती. त्याच्या जोरावरच मौर्य राज्य चाललेले होते. ते सुजलाम्, सफलाम् आणि समृध्द होते. आर्य चाणक्याची राहणी साधी होती. कोणत्याही प्रकारचा डामडौल नव्हता. हल्लीच्या प्रधानांमध्ये आर्य चाणक्याचे कोणतेच चांगले गुण आढळत नाहीत. आर्य चाणक्याची मुत्सद्‌देगिरी कोणामध्ये आढळत नाही. नुसत्या ऐष आरामाची या मंत्र्यांना सवय झालेली आहे. स्वदेभ भक्ती आणि स्वातंत्र्य प्रेम हे गुणही त्यांच्याजवळ नाहीत. हल्लीचे प्रधान राजे म्हणेल त्याप्रमाणे वागतात. कारण यांच्याकडे चांगल्या

बुध्दीमत्तेचा अभाव आहे. भले मोठे पगार घेऊन सामान्य लोकांच्या पैशावर जगणारे प्रधान स्वतः फार मोठे समजतात. आजच्या देशाला आर्य चाणक्यासारख्या प्रधानांची खरोखर आवश्यकता आहे. हल्लीच्या प्रधानांच्या कार्यावर देशाचे भले होणे फारच अवघड आहे. अशा प्रधानांपासून भारत देशाचे रक्षण व्हावे, असेच वाटते. देशाला आर्य चाणक्यांसारखे प्रधान मिळाले तर देशाला लवकरात लवकर स्वातंत्र्य मिळून शांतता, सुव्यवस्था निर्माण होईल, यात तीळमात्र शंका नाही. [२०]

## ६) कमकुवतपणा की प्रजाद्रोह –

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतामध्ये अनेक बंडांचा प्रार्दुभाव झाला. भिल्ल, कोळी, पेंढारी या लोकांबरोबरच मलबार येथे मोपल्यांचे बंड मोठे होते. कोणतीही पूर्वसूचना न देता मोपल्यांनी बंड केले होते. म्हणून ब्रिटिशांना म्हणावा तसा त्या बंडाचा बिमोड करता आला नाही. ब्रिटिश सरकारने लष्करी फौजांचा बंदोबस्त केला. तेथील सामान्य लोकांना वाटले की, मोपल्यांचा पूर्ण बंदोबस्त करून सर्वत्र शांतता निर्माण होईल. परंतु असे काही घडल्याचे दिसत नाही. कारण संपूर्ण जगावर राज्य करणाऱ्या ब्रिटिशांना मोपल्यांचे बंड मोडता आले नाही. कारण ब्रिटिशांच्या फौजा, लष्कर असतानाही मोपले नव्याने बंड करीत होते. शिवाय सरकारी संपत्तीचे मोठे नुकसान करीत होते. आगगाडीचे रुळ उखळणे, तारा मोडणे, सरकारी पोलिसांचे खून करणे, सामान्य लोकांची लूटमार करणे, असे प्रकार सर्रास सुरू होते. याशिवाय हिंदूंची मंदिरे तोडणे, मुर्त्या फोडणे, हिंदूना जबरदस्तीने धर्मांतर करण्यास भाग पाडणे, याही गोष्टींना लोक कंटाळले होते. असहकार व खिलाफत चळवळीच्या विरोधातील हा एक पुरावा मानला जात होता. गांधींच्या चळवळीवर टीका केली जात होती. हिंदु–मुस्लीमांमध्ये कटुता निर्माण करणे, हा या मागील मुख्य उद्देश होता. म. गांधींच्या चळवळीवर टीका व प्रहार करण्याचे काम ब्रिटिशांनी केलेले होते. परंतु त्याचा काही उपयोग होणार नव्हता. मोपल्यांचे बंड चालू असताना आमच्यावर राज्य करणारे ब्रिटिश सैनिक काय करीत होते? हा प्रश्न उभा राहतो. हिंदू धर्म भ्रष्ट करून हिंदू मंदिरे तोडली जात होती. मुर्ती फोडल्या जात होत्या. तरीही त्याला ब्रिटिश विरोध करीत नव्हते. ही फार मोठी शोकांतिकाच होती. भारतीयांचे संपूर्ण संरक्षण करण्याची जबाबदारी ब्रिटिशांचीच होती. भारतीयांवर राज्य करण्याचा इंग्रजांना कमालीचा अभिमान होात. मोपला बंड हे खरे तर लहानच होते. परंतु त्यांचा पुरता बंदोबस्त ब्रिटिशांना करता आलेला

नव्हता. कारण भारतीयांच्या विरुध्द बंडे झाली म्हणजे त्यांना समाधानच होणार. परंतु ब्रिटिशांनी भारतामध्ये शांतता, सुव्यवस्था निर्माण करावी याला प्राधान्य द्यावे ही गोष्ट महत्त्वाची आहे. [२१]

### ७) मराठा वॉर मेमोरियल –

पुण्यामध्ये विविध कार्यक्रमाचा उद्‌घाटन समारंभ आयोजित करणार आहे. कारण प्रिन्स ऑफ वेल्स दि. १९ नोव्हेंबर रोजी येणार आहेत. पुण्यामधील महत्त्वाची ऐतिहासिक वास्तू म्हणजे शनिवारवाडा होय. या वाड्यापुढे मराठा–वॉर मेमोरियलच्या पायाचा दगड बसविणे, ह्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ठीक १०.३० वाजता हा कार्यक्रम ठरविलेला आहे. परंतु पुण्यातील बहुजन समाजाने मात्र या कार्यक्रमावर कडकडीत बहिष्कार घालण्याचे ठरविले आहे. परंतु तरीही पुण्यातील काही ब्रिटिशधार्जिणी मंडळी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहतील, याची तीळमात्र शंका नाही.

परंतु ही नवीन स्मारके का उभी करायची? हा मोठा प्रश्न आहे. अशी स्मारके उभारायची आणि त्यांच्या उद्‌घाटनाला ब्रिटिशांना बोलवायचे. परंतु भारतीय समाजाला विविध लोकंची स्मारके कशाला हवीत? हाच फार मोठा प्रश्न आहे. जुन्या गोष्टीच नव्या रुपात आणण्याची पध्दती येत आहे. ज्या शिपायांना वीरमरण आले, त्यांचे स्मारक उभे करणे हा त्यामागीइल हेतू आहे. परंतु हे लोक गुलामगिरीत वाढले. त्याची स्मारके उभी करून देशाला काय आदर्श देणार ? अशी स्मारके उभी करण्यापेक्षा राष्ट्रीयत्वाचा संदेश देशापुढे निर्माण करणे आवश्यक आहे. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केला पाहिजे. देशावर असणारे पारतंत्र्याचे जोखड झुगारून दिले पाहिजे. हिंदुस्थानच्याच पैशाने या लाकांची स्मारके उभी करणे कितपत योग्य आहे? कारण भारतामध्ये असे अनेक युरोपियनांचे पुतळे आहेत. क्लाईव्ह लॉईड, वॉरन हेस्टिंग्ज, डलहौसी, लॉर्ड वेलस्ली, या गव्हर्नरांचे पुतळे आहेत. त्यांचा काय आदर्श ठेवायचा? त्यांनी हिंदुस्थानची प्रचंड लूट केली. सर्वत्र गुलामगिरी मोठ्या प्रमाणावर निर्माण केली. या सर्व घटकांपेक्षा स्वराज्य, स्वातंत्र्य निर्माण होईल, यासाठी प्रयत्न करा. पुतळे किंवा स्मारके उभे करून काहीही साध्य होणार नाही. हिंदुस्थानवरील ब्रिटिशांचे वर्चस्व नष्ट

करण्याचा प्रयत्न सर्वांनी एकवाक्यतेने केला पाहिजे. मराठ्यांनाही या गोष्टीची जाणीव व्हायला पाहिजे. सर्वांनी स्वातंत्र्यासाठी झटले पाहिजे.[२२]

## ८) इंग्लिश अधिकारी, नेटिव राजे आणि इंडियन रयत –

भारतामध्ये सुरुवातीला राजा व प्रजा असे दोन घटक होते. परंतु ब्रिटिशांच्या आगमनामुळे भारतात इंग्लिश अधिकारी, नेटिव राजे आणि इंडियन रयत असे तीन घटक निर्माण झाले आहेत. ब्रिटिशांनी भारतीयांच्या सर्वच गोष्टी ताब्यात घेतल्या आहेत. त्या सर्व आपल्याला मिळाव्यात, देशाला स्वातंत्र्य मिळावे, असे सर्वांना मनापासून वाटत होते. जोपर्यंत आपले स्वातंत्र्य मिळत नाही, तोपर्यंत ब्रिटिशांशी कोणत्याही प्रकारचे सहकार्य करायचे नाही, असे भारतीयांनी ठरविले होते. सध्या भारतामध्ये अधिकारी वर्ग व सामान्य लोकांचा एक वर्ग असे दोन वर्ग आहेत. शिवाय नेटिव राजांचाही एक वर्ग उत्पन्न झालेला आहे. ब्रिटिशांनी प्लासी आणि बक्सारच्या लढाईनंतर भारतात आपली निर्विवाद सत्ता स्थापन केली. भारतातील जवळ–जवळ सर्व प्रांतावर आपली सत्ता निर्माण केली. भारतातील राजे 'नेटिव' म्हणजे 'स्थानिक राजे' म्हणून संबोधले जाऊ लागले. लॉर्ड डलहौसीने स्थानिक राजांची राज्ये खालसा करण्याचे बरेच प्रयत्न केले. दत्तक वारसा नामंजूर या नावाखाली भारतातील संस्थाने खालसा करण्याचे कार्य सुरू केले. म्हणजेच ब्रिटिशांच्या साम्राज्य विस्ताराचे जोमाचे कार्य सुरू झाले. हिंदुस्थानातील रयत आणि येथील स्थानिक राजे यांचा दृढ संबंध होता. कारण पूर्वापार त्याच राजांनी राज्य केलेले होते. राजा आणि प्रजा यांच्यात चांगले वातावरण होते. परंतु ब्रिटिशांनी भारतामध्ये राज्य निर्माण करताना स्थानिक राजांच्या हातात कोणतेच हक्क ठेवले नाहीत. त्यामुळे ब्रिटिशांनी भारतीय प्रजेवर कितीही अन्याय अत्याचार केले तरी नेटिव राजे प्रजेच्या मदतीला धावून जात नव्हते हे फार मोठे दुर्दैव होते. फितुरीचा फार मोठा कलंक भारताला लागलेला होता. ब्रिटिशांचा हा फार मोठा फायदा होता. सिराजउद्दौला, टिपु सुलतान, राजा रणजितसिंह या सर्व राजांना ब्रिटिशांविरोधात रयतेने मनःपूर्वक मदत केलेली होती. पण हल्लीचे लोक राजांना मदत करताना दिसत नाहीत, कारण राजाची प्रजेबद्दल भूमिका रयतेला समजली आहे.

सुरुवातीला मराठी सत्ता वाचविण्याचा प्रयत्न शिंदे, होळकरांनी केला. सध्याच्या इतिहासात टिळक व गांधी हे कार्य करताना दिसतात. टिळकांनी जहाल विचारसरणीचा उपयोग केला, तर म. गांधींनी भारतात असहकार तंत्राचा वापर केल्याचे दिसते. देशाला स्वातंत्र्य मिळविताना भारतीय राजे आमचे आहेत. आम्ही पण त्यांचेच आहोत. भारतीय राजे व प्रजा यांच्यात फुट पाडण्याचा कोणी प्रयत्न करू नये, एवढेच या निबंधातून समजते. [२३]

## ९) चाफळचे स्वामी –

रामदास स्वामी स्वराज्याचे मोठे भक्त होते. स्वराज्य निर्माण करण्याच्या संदर्भात शिवाजी महाराजांनी वारंवार समर्थ रामदासांचा सल्ला घेतल्याचे सार्वांना ठाऊक आहे. परंतु चाफळचे स्वामी हे रामदास स्वामींचे वंशज आहेत. तरीही त्यांचे कार्य मात्र ब्रिटिश धार्जिणे आहे. कारण शनिवारवाड्यासमोर 'मराठा वॉर मेमोरियल' कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्या वेळी चाफळचे स्वामी संस्कृतमध्ये आशिर्वाद देणार होते. अर्थात उद्घाटनाला ब्रिटनचे प्रिन्स ऑफ वेल्स उपस्थित राहणार होते. अर्थात स्वामींचे आशिर्वाद कोणाला असणार हा फार मोठा प्रश्नच आहे.

समर्थ रामदासांनी सर्व मराठ्यांना, 'मराठा राज्य वाढवावे चोहीकडे' असा उपदेश केलेला होता. मराठा राज्य गुलामगिरीतून नष्ट करून स्वातंत्र्याचा ध्यास घ्यावा, असेही सांगितले होते. समर्थ रामदासांनी एकवाक्यतेचा संदेशही दिलेला होता. आपल्या संसाराचा त्याग करून मराठ्यांच्या एकवाक्यतेसाठी रामदासांनी आपला जन्म घालविला. म्हणून समर्थ रामदासांना छत्रपती शिवाजी महाराजांचे तिसरे प्रेरणास्त्रोत मानले जाते.

चाफळचे स्वामींनी रामदासांच्या कृतीचे अनुकरण करणे आवश्यक होते. परंतु ब्रिटिशांच्या पाहुण्यांच्या कार्यक्रमात संस्कृत भाषेमध्ये आशिर्वाद देण्याचे चुकीचे काम ते करताना दिसतात. कारण इतरांनी या सर्व कार्यक्रमावर बहिष्कार घालण्याचे ठरविले असताना चाफळच्या स्वामींचे हे कार्य अशोभनीय आहे, असेच म्हणावे लागते. अशा कार्यक्रमात नेतृत्त्व करण्याची गरज नव्हती. त्यामुळे चाफळच्या स्वामींबद्दल म्हणावा तितका आदर राहिलेला नाही. मराठे समाजातील किती लोक संस्कृत आशिर्वादाला विचारत आहेत? असल्या कार्यक्रमात चाफळच्या स्वामींनी लुडबुड करण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे त्यांच्याबद्दल सर्वांना राग

येणे अपेक्षित आहे. सज्ञनगड व रामदासी पंथाकडून त्यांचा विरोध करण्याची खूप गरज आहे. युरोपियन लोकांचा संस्कृतवर आणि किंबहुना हिंदूवर किती विश्वास आहे, हा ही प्रश्नच आहे. त्यामुळे चाफळच्या स्वामींनी हे असले उद्योग बंद करायला पाहिजेत. स्वतःच्या देशाचे स्वातंत्र्य स्वदेशहित याचा विचार करणे आवश्यक आहे. पुण्यामध्ये मात्र या घटनेचा सर्वत्र निषेध करण्यात आलेला दिसतो. [२४]

## १०) संस्कृत आशिर्वाद –

पुण्यातील मराठा वॉर मेमोरियलच्या कार्यक्रमात समर्थ रामदास स्वामींचे शिष्य चाफळचे स्वामी यांनी संस्कृत आशिर्वाद दिलेला होता. युरोपियन लोकांना या आशिर्वादाचे काही देणे–घेणे नव्हते. पण त्याची या स्वामींना जराही कल्पना नव्हती. ''आपल्या हिंदुस्थानात गायींची भरभराट, समृध्दी व्हावी'', असा तो आशिर्वाद होता. युरोपियनांना या आशिर्वादाचा अर्थ तरी कळणार होता का? देवांनी काय सर्व रत्ने युवराजांना द्यायला सांगितली होती का? कामधेनूची आवश्यकता भारतीयांना होती. ख्रिस्ती लोकांना भारतीय देव–देवता, त्यांचा आशिर्वाद यांचा दूरदूरचा संबंध नव्हता. स्वामींनी भारताला स्वातंत्र्य मिळवण्यासाठी काही तरी प्रयत्न करणे आवश्यक होते. परंतु त्यांनी ब्रिटिश लोकांना आशिर्वाद देऊन पारतंत्र्यात असणाऱ्या भारतीय लोकांचा प्रचंड अपमान केलेला आहे. त्यामुळे अशा स्वामी लोकांना भारतीयांनी जागा दाखवून द्यावी. समर्थ रामदासांना पारतंत्र्य, गुलामगिरी, याविषयी तिटकारा होता. त्यामुळे सर्वांनी स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करावेत.[२५]

## ११) एका पहारेकऱ्याची गोष्ट –

एका शहरात एका कोणा व्यक्तीचे स्मारक उभे करण्यात आले होते. परंतु त्या व्यक्तीबद्दल कोणाच्याही मनात आदराची भावना नव्हती. म्हणून स्मारक बनविणाऱ्यांना स्मारकाची तोडफोड होण्याची शक्यता कायम वाटत असे. त्यामुळे सतत दिवस–रात्र या स्मारकाच्या संरक्षणासाठी पहारेकऱ्यांची निवड केलेली होती. अनेक लोक या स्मारकाजवळ येऊन दात–ओठ खाऊन त्याची निर्भत्सना करीत असत. संताप, तिरस्कार व्यक्त करीत. परंतु पहारेकऱ्यांना आपल्याकडे हे काम देऊन आपल्याला मोठा मान सन्मान दिला आहे, असे वाटायचे. भाडोत्री पहारेकऱ्यांना काय सांगेल ते काम करायचे. त्या पहारेकऱ्यांपैकी एक मुख्य

होता. त्याला कायम स्वतःबद्दल फाजील आत्मविश्वास वाटायचा व तो सतत म्हणत असे, ''काही झाले तरी मी इमाने इतबारे या स्मारकाचे संरक्षण करीनच.''

त्याची घरची स्थिती तशी हालाखीचीच होती. अर्धपोटी राहून स्मारकाच्या संरक्षणातच धन्यता मानायचा. त्याची आई आजारी होती. तिला डोळ्याने दिसत नव्हते. धड चालायलाही येत नव्हते. एके दिवशी त्याची आई रात्रीतून जगते का मरते अशी स्थिती होती. परंतु तिला तसेच एकटीला घरी टाकून तो पहारेकरी स्मारकाच्या संरक्षणाकरिता आला. पहारेकऱ्याला झोप लागली व स्वप्न पडले, त्याला स्वप्नात दिसले, अनेक लोक स्मारकाच्या जवळ जमा झालेले आहेत. ''तुम्ही जर या स्मारकावर हल्ला करणार असाल, तो तो मी करू देणार नाही'',असे पहारेकरी म्हणतो. ''तू याचे संरक्षण करणार? अरे मुर्खा तू याचे संरक्षण करणार?'' असे मनुष्याचे आवाज त्याच्या कानी येतात. अशी जगातील अनेक स्मारके आम्ही जमीनदोस्त केलेली आहेत. राजांनी अनेक पहारेकरी ठेवले. परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही. तुमच्यासारखे गुलामगिरीत जगणारे पहारेकरी काय करणार? सृष्टीची, पृथ्वीची निर्मिती खरे तर ईश्वराने केली आहे. हे या तुमच्या मालकीचे आहे काय ? धर्मशाळेप्रमाणे तुम्ही सर्वजण वागत आहात. ही वेड्या लोकांची स्मारके तुम्हाला कोणी उभी करायला सांगितली आहेत. राजा व त्याचे नातेवाईक, त्याचे नोकर–चाकर, त्यांची कुत्री–मांजरे यांचीही स्मारके तयार केली जातात. ही सर्व स्मारके नष्ट करायला परमेश्वराने आम्हाला पाठविले आहे. पृथ्वी एखाद्या गुलामाप्रमाणे सर्व सहन करीत असते. तरीही तू याचे संरक्षण करणार, असे वारंवार म्हणत आहे. दगडाचे आणि तुझे काय नाते आहे? घरात आई मरणासन्न अवस्थेत आहे, तिने तुला जन्म देऊन हाल–अपेष्टा सहन केल्या आहेत. तिच्या उपकाराची जाणीव ठेव. तिच्याजवळ थांबण्याऐवजी दगडाच्या स्मारकाच्या संरक्षणासाठी बाहेर आला आहे, हे कितपत योग्य आहे. आईला अशा अवस्थेत सोडून येताना तुला काही लाज वाटली नाही का? अशा कुपुत्रांचा काय उपयोग? अशा मुलांचा धिक्कारच करायला पाहिजे.''

अशाप्रकारे हा संवाद होत असताना पहारेकरी स्वप्नातून जागा झाला. त्यावेळी त्याला एक व्यक्ती कंदील घेऊन, ''तुझ्या आईचा जीव कासावीस झाला आहे, तेव्हा घरी चल'', असे म्हणतो आणि पहारेकऱ्याला घरी घेऊन जातो.

या लेखातून एवढेच स्पष्ट होते की, रक्ताच्या नात्यापेक्षा गुलामगिरीत जगणेच लोकांना आवडत आहे. कशाला महत्त्व द्यावे, हे न कळल्यास जीवन खरोखरच व्यर्थ आहे, हा बोध होतो. [२६]

## १२) स्वातंत्र्याच्या अटी –

मनुष्याच्या जीवनात स्वातंत्र्य हा घटक अधिक महत्त्वाचा असतो. कारण गुलामगिरीत राहणे कोणालाच आवडत नाही. एका धूर्त मालकाकडे एक भोळसर गुलाम होता. पण या गुलामाला आपण स्वतंत्र व्हावे कायम वाटत असे. तो सतत आपल्या मालकाला ''मला स्वातंत्र्य द्यावे'', अशी विनंती करीत होता. परंतु मालक त्याच्या बोलण्याकडे कायम दुर्लक्ष करीत असे. परंतु गुलामाने सुरुवातीला अन्नत्याग केला. मालकाला वाटले की, आपले अन्न वाचते आहे. परंतु पुढे गुलाम काम करीत नसे, त्यावेळी मालकाला वाटले की या गुलामाच्या स्वातंत्र्याचा विचार केला पाहिजे. त्यानुसार गुलामाला काही अटींवर स्वातंत्र्य द्यायला तयार होते. त्या अटी खालीलप्रमाणे होत्या –

१. या गुलामाला आता गुलाम न म्हणता 'स्वतंत्र मनुष्य' या नावाने ओळखण्यात यावे.
२. या गुलामाला एकदम स्वातंत्र्य दिले तर त्याचे डोळे प्रकाशाने दिपून जातील. म्हणून त्याला पचेल त्याप्रमाणे थोडे स्वातंत्र्य द्यावे.
३. गुलामाच्या पायातील बेड्या निम्म्या वजनाच्या कराव्यात. लोखंडाच्या बेड्यांवर रुप्याचा मुलामा देण्यात यावा.
४. मालकाने दिलेले खाल्ले तर त्याला अजुनही गुलाम असल्याचा भास होईल, म्हणून स्वतःच्या कष्टाने कमवून अन्न खावे.
५. गुलामाला लगेचच स्वतःचे घर घेणे शक्य होणार नाही. राहण्याचा प्रश्न निर्माण होईल, त्यामुळे त्याच्यावर दया दाखवून त्याची जी कोठडी होती, तेथे रात्री झोपण्याची परवानगी दिली जाईल. परंतु रात्रीच्या वेळी हिंस्त्र प्राण्यांचा त्याच्यावर हल्ला होऊ नये, चांराचा हल्ला होऊ नये, म्हणून रात्रीच्या वेळी कोठडीच्या दाराला मालक कुलूप घालेल.
६. सार्वजनिक हवेत त्याला श्वासाच्छ्वास करणे व बाकीचे हक्काबाबत गुलामाला पूर्ण स्वातंत्र्य दिलेले आहे. अशा प्रकारच्या अटी पाळल्या जाणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे मालक व गुलाम यांच्यात करार होऊन त्याच्यावर स्वाक्षऱ्या झाल्या व त्याद्वारे गुलामाला स्वातंत्र्य देण्यात आले. त्याचे स्वातंत्र्य मान्य करण्यात आले.[२७]

## १३) एका पाठभेदाची चर्चा –

''सखे माझे परतोनि घरां येतां ।। तुवां सजणे हा समाचार घेतां ।।

तया शोकें घायाळ हृदय होतां ।। कशी होशिल तें आठवितों आतां ।।

ही रघुनाथ पंडितांनी केलेली रचना आहे. त्यामध्ये पहिल्या वाक्यामध्ये शेवटी 'येता' हा शब्द आढळतो, तर काही ठिकाणी 'जातां' हा शब्द बऱ्याच ठिकाणी आढळतो. शब्द चमत्कारापेक्षा वाक्याचा अर्थ हा महत्त्वाचा मानला जातो. त्यामुळे पाठभेदाची चर्चा होणे महत्त्वाचे होते. 'जाता' शब्दाऐवजी 'येता' शब्द बरोबर आहे. परंतु अर्थाच्या दृष्टीने येता हा पाठभेद बरोबर नाही. ''मला इकडे कोणीतरी धरले आहे. म्हणून तुझे हृदय घायाळ होईल, तुझी अवस्था करूण होईल, याची मी आठवण करीत आहे. याचे चित्र माझ्यापुढे उभे आहे.'' असा हंसाच्या म्हणण्याचा अर्थ सांगता येईल. येता या शब्दाने हंस आपल्याच घरी आहे, असा अर्थ होतो व हंसीचे हृदय घायाळ होण्याचे कारण नाही. त्यामुळे 'येता' या शब्दाने सर्व अर्थच बदलतो. त्यामुळे 'जाता' हा शब्द येथे बरोबर आहे. या कवितेत 'आठवितो' हा शब्दही सदोष वाटतो. कारण आठवणीतून भूतकाळाचा निर्देश होतो. हृदय पिळवटून गेल्यावर आठवण येणार. परंतु तो शब्द अगोदरच वापरण्यात आलेला आहे. भविष्य काळाच्या अगोदर भूतकाळाचे वर्णन आलेले आहे. म्हणून या लेखातून शब्दांचे प्रयोग, काळाचे प्रयोग अर्थाला साजेशे वापरावेत, असे सूचित करण्यात येते. अर्थ बदलला तर कवितेचा आशय योय रितीने स्पष्ट होत नाही. म्हणून योग्य अर्थाच शब्दप्रयोग करावेत.[२८]

## १४) अन्ने व लब्धांबरे ही जोडी जमते काय? –

मोरोपंतांनी आर्यभारताच्या विराट पर्वाच्या पहिल्या अध्यायात दोन आर्या लिहिलेल्या आहेत.

''अज्ञातवासकाळी' त्याची कष्टा दशा वदावि किती।

द्रव्यासाठी भीम अर्जुन अन्नें व लब्धांबरे तदा विकिती ।।२८।।

एकांती गुप्तपणे भेटे चोरांसि जेवि चोरसखा

सहदेव म्हणे 'बहु कृश दिसता, व्हा तुष्ट, पुष्ट, गोरस खां ''।।३०।।

या काव्यांत भीम आणि अर्जुनाच्या कृत्याचे वर्णन आलेले आहे. दोन्हीही काव्ये चांगलीच आहेत. भीम अन्नें विकत आहे व अर्जुन वस्त्रे विकत आहे. अन्ने आणि अंबरे ही नामे ठेवण्याऐवजी मोरोपंतांनी अंबरे यासाठी लब्ध हे विशेषण वापरले आहे. विशेषण लावताना दोन्ही शब्दांना लावायला हवे होते. परंतु अंबरे या शब्दाला वापरले आहे. लब्धांबरे हा शब्द अन्न आणि अंबरे दोन्ही शब्दांना एकच विशेषण वापरणे शक्य नाही. मारोपंतांनी लब्धांबरे हा शब्दप्रयोग का केला हा शब्द त्यांनी कोठून आणला? हे विचारात घ्यावे लागते.

महाभारतामध्ये विराटपर्वाच्या १३व्या अध्यायात खालील श्लोक आढळतात –

'भीमसेनोऽपि मांसानि भक्ष्याणि विविधानि चा

अति सृष्टानि मत्स्येन विक्रीणीते युधिष्ठिरे ।।७।।

वासांसि परिजीर्णानि लब्धान्यंतः पुरेऽअर्जुनः ।।

विक्रीणानश्च सर्वेभ्या पांडवेभ्यः प्रयच्छति ।।८।।

महाभारताच्या या श्लोकांबद्दलमोरोपंतांनी 'लब्ध' या शब्दाचा वापर केला असावा, असे दिसते. विराट राजापासूनच अन्न आणि अंबरे मिळालेली दिसतात. भीम आणि अर्जुन लब्धे अन्नांबरे विकत असल्याचे आढळून येते.

दुसऱ्या श्लोकांत सहदेव आपल्या भावांना गोरस चोरून खाण्याचा आग्रह करताना दिसत आहे. पांडव पुत्रांवर चोरीचा आरोप करणे बरोबर नाही. चोरापेक्षा चोरासारखा गुप्तपणा, अलिप्तपणा येथे अभिप्रेत आहे. यातून वाक्यातील भावार्थ महत्त्वाचा आहे. [२९]

## १५) टिचभर संस्थानाची शांतता की सगळ्या जगाची शांतता –

मद्यपान विरोधी वातावरण आणि उपदेश करणारे कैदी बनतात, हे या लेखातून समजते. दारू किंवा मद्यपान करणारे भरपूर लोक आहेत. न पिणारे अगदी बोटावर मोजण्याइतकेच आहेत. परंतु दारू पिऊ नका असे सांगितले तर मोठा गुन्हा मानला जात होता. कारण त्याच्या व्यक्ती स्वातंत्र्यावर गदा येईल, असे वाटत होते. दारूला प्रतिबंध करणारे किंवा पिऊ नये यासाठी उपदेश करणाऱ्यांना पकडण्याचे आदेश दिले होते. प्रत्येक शिपाई अगदी काटेकोरपणे काम करीत होता. परंतु या सर्व शिपायांमध्ये एक शिपाई असा होता, तो स्वतः कधीही दारू पित नव्हता आणि दुसऱ्यानेही पिऊ नये असेच त्याला कायम वाटत असे. पण नोकरीत

असल्याने त्याला कोणालाही उपदेश करता येत नव्हता. परंतु एका उपदेश करणाऱ्याला पकडण्याची वेळ त्याच्यावर आली. त्याने त्या व्यक्तीला अटक केली. ज्या व्यक्तीला पकडले ती व्यक्ती समाधानी व आनंदी होती. पण ज्या शिपायाने पकडले, त्याची मात्र अतिशय वाईट अवस्था झाली होती. कारण आपण चांगल्या केलेल्या उपदेशाने कैदी झालेली व्यक्ती अभिमानास्पद कामगिरी केल्याने आनंदी होती. त्या व्यक्तीला कोतवालाकडे आणण्यात आले व त्याच्या हातात बेड्या  घातल्या गेल्या. चांगल्या कार्याला या प्रकारची शिक्षा होणे तसे चुकीचे आहे. शिपायाला या गोष्टीचे खूप वाईट वाटले. परंतु नोकरीमध्ये जसे आदेश तसे त्याचे पालन करणे गरजेचे असल्याने त्याचा नाईलाज झाला. या गोष्टीने दिवसभर त्याला अस्वस्थ वाटत होते.

बैचेन अवस्थेत झोपल्यावर रात्री त्याला एक स्वप्न पडले. त्यामध्ये त्याला आपला मृत्यु झालेला असून आपल्याला यम घेऊन चालला आहे, असे दिसते. परंतु नेताना या शिपायाला खूप त्रास देत असल्याचे त्याला दिसले. कोणी त्याला बेड्या घालत आहे, कोणी अंगावर मुद्रा तापवून डाग देत आहे, कोणी त्याला फटके मारीत आहे, कोणी भाल्याचे टोके टोचत आहे, कोणी त्याच्या अंगाची साले सोलून काढीत आहे. तो देवाला म्हणत असे, ''हे मला खरेच सोसवत नाही.''

यमदूत शिपयाला रागवून म्हणतात, ''तू चांगल्या व्यक्तीवर अन्याय केलेला आहे. चांगले गुण असणाऱ्या व्यक्तीला अटक करण्याचे काम तू केलेले आहे. त्याला खोल काळोखात आपल्याला नेले जात आहे, असे दिसते. तो जोरजोरात ओरडू लागला. त्याला लोकांनी जागे केल्यावर आपण एक भयंकर स्वप्न बघितले आहे. असे त्याला समजले त्याने आपल्या शरीराला हात लावून तपासून पाहिले. सर्व काही ठीक असल्याचे त्याला दिसते. परंतु तरीही आपल्या वागण्याची त्याला लाज वाटू लागली. त्याला नोकरी करणे अवघड वाटू लागले. तो नोकरी सोडून गेला. उत्तरेत गंगोत्रीच्या यात्रेत अलकनंदा नदीच्या काठावर त्याचे सारखे कोणीतरी स्नान करताना दिसल्याचे समजले. परंतु त्याचा काही शोध लागला नाही.

या लेखातून चांगले काम करणाऱ्याला विरोध करणाऱ्यांना त्याचा पश्चाताप करावाच लागतो, हेच स्पष्ट होते.[३०]

## १६) अर्थनाशे समुत्पन्ने सर्वं त्यजति पंडितः! –

मानवाच्या जीवनात जे ठरविले आहे ते घडत नाही. म्हणून नको त्या मार्गांचा अवलंब करून चुकीच्या मार्गाने जाण्याचे काम मानवाच्या हातून घडताना दिसत आहे. नंतर पश्चाताप करण्यात काय अर्थ आहे. त्या संदर्भातील वेगवेगळी उदाहरणे देऊन या प्रकारच्या व्यक्ती कशा असतात, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

अ) एक व्यक्ती स्वर्गात जाण्यासाठी खूप प्रयत्न करतो. परंतु पातकाच्या, सैतानाच्या प्रयत्नामुळे त्याचे स्वर्गात जाण्याचे रद्द होते. परंतु सैतानाला हे माहित असते. सैतान त्या व्यक्तीला म्हणतो, ''स्वर्गात जाणे तुला जमले नाही, मी तुला नरकात घेऊन जातो.'' लगेचच ही व्यक्ती नरकात जायला तयार होते. यावरून हे समजते की, ध्येयाप्रमाणे वाटचाल न करता आहे त्या परिस्थितीला सामोरे जाण्याचा प्रयत्न केला जातो. पण ती परिस्थिती बरोबर आहे किंवा नाही, याची शहानिशा करणे आवश्यक असते.

ब) एका गावात श्रीमंत लोक सभ्य, प्रामाणिक व दुसऱ्या बाजूला चोर लोक राहत असतात. चोरांनी या श्रीमंत व्यक्तीच्या घरामध्ये चोरी करून सर्व संपत्ती लुटली व त्या श्रीमंत व्यक्तीची सुंदर कोमल बायकोही त्यांच्या हाती पडली. श्रीमंत व्यक्तीने संपत्ती न्या, पण माझी बायको नेऊ नका, अशा अनेक विनंत्या केल्या. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. सर्व संपत्ती व त्याची बायको घेऊन चोर निघाले. परंतु त्यातील एका चोराला या सुंदर, कोमल स्त्रीची दया आली. ती आपल्याबरोबर एवढे अंतर कसे चालेल? याची त्याला चिंता वाटू लागली. चोराने त्या श्रीमंत व्यक्तीला सांगितले की, तुला जर आपल्या बायकोची दया येत असेल, तिच्यावर तुझे मनापासून प्रेम असेल तर तू तिला खांद्यावर घे आणि आमच्या घरापर्यंत आणून पोहोचव. दुसऱ्या खांद्यावर चोरलेल्या संपत्तीचे ओझे दिले. अशा प्रकारे सभ्य श्रीमंत मनुष्य त्या चोरांबरोबर चालत–चालत त्यांच्या गावाकडे निघाला. म्हणजे बायकाचे रक्षण करण्याऐवजी तिलाच घेऊन चोरांच्या गावी नेण्याचे महापातक श्रीमंत व्यक्ती करत असल्याचे दिसले.

क) एका गावामध्ये मद्यपानास विरोध करणारे मद्यापान निषेधक मंडळाची स्थापना करण्यात आली होती. त्या मंडळामध्ये अनेक स्वयंसेवक लोकांनी मद्यपान करू नये, यासाठी

प्रयत्न करीत होते. परंतू, त्याचा काही एक उपयोग झाला नाही. परंतु दुकानदारांना याचे फार वाईट वाटले. स्वयंसेवकांच्या प्रयत्नांना अजिबात यश येत नव्हते. त्यांना काही तरी दुसरे काम द्यावे, असे दुकानदारांना वाटले. त्यांनी या सर्व स्वयंसेवकांना बोलावून एक सभा घेण्याचे ठरविले. त्या सभेमध्ये स्वयंसेवकांच्या कार्याचे कौतुक केले गेले. आपल्या देशातील मद्यपान करणाऱ्या लोकांवर काहीच परिणाम होत नाही. तुमचे कोणीच ऐकत नाही. लोकांची दारू पिणे बंद होत नाही. तर तुम्ही त्यांच्या कल्याणासाठी तुम्ही त्यांचे दारू पिलेले पेले स्वच्छ करून देण्याचे काम करावे, अशी इच्छा व्यक्त केली गेली. स्वच्छ पेल्यातून दारू पिल्याचे समाधान त्यांना मिळेल. हे ऐकल्यावर 'मद्यपान प्रतिबंधक मंडळा'चे नाव बदलून 'स्वच्छतोत्पादक मंडळ' असे नाव देऊन या लोकांनी काम सुरू केले. दारू मालकांनी आपल्या दुकानात कामाला असणाऱ्या नोकरांना कामावरून काढून टाकले. त्यामुळे सरकारने नव्या युक्तीबद्दल दारू मालकांचे अभिनंदन केले होते व त्यांना सिल्व्हर मेडल्स देण्याचा सरकारचा विचार असल्याचे बोलले जात आहे. आपल्या प्रतिष्ठेप्रमाणे कामाची निवड करणे गरजेचे आहे, हे यातून समजते.

ड) फितुरी हा आपल्या देशाला लागलेला मोठा शापच होता. ब्रिटिशांचे भारतावर वर्चस्व निर्माण झाल्यावर भारतातील सैनिक आपापला प्रदेश वाचविण्यासाठी जीवाचे रान करून लढत होते. परंतु ब्रिटिशांनी भारतामध्ये 'फोडा आणि झोडा' राजनीतीचा वापर केला. काही लोकांना पैसा, मान–सन्मान देऊन फितुर बनविले. त्यामुळे भारतातील अनेक भागांवर वर्चस्व निर्माण करणे, त्यांना फारच सोपे गेले. ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांनी शौर्य, पराक्रम गाजविणाऱ्या भारतातील सैनिकांचे कौतुक केले. त्यांना शाबासकी दिली. परंतु तुमचा देशासाठी लढून काहीच उपयोग नाही. कारण तुमचे राज्यच आम्ही ताब्यात घेतले आहे. तुम्ही आता या देशात शांतता, सुव्यवस्था ठेवण्याच्या कामी आम्हाला मदत करा. लगेचच भारतीयांनी आपली 'स्वराज्य संस्थापक मंडळ' नावाची संस्था नष्ट करून 'सुराज्य संरक्षक मंडळ' या नावाच्या नवीन संस्थेची स्थापना केली. त्यामध्ये येथील राजे, प्रधान, शूर शिपाई, देशभक्त, सरदार, मुत्सद्दी असे अनेक लोक या ठिकाणी नोकरी करताना आढळतात. आपले राज्य टिकविले असते तर ब्रिटिशांची नोकरी करण्याची वेळ या लोकांवर आली नसती. हेच यावरून समजते.

इ) महाराष्ट्रात मुळशी येथे धरण बांधण्याची कल्पना ब्रिटिश आणि टाटा कंपनी यांनी मांडली. परंतु धरण बांधल्यामुळे मावळ–मुळशीतील अनेक शेतकऱ्यांच्या जमिनी पाण्याखाली

जाणार होत्या. शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान होणार होते. म्हणून मावळ–मुळशीतील शेतकऱ्यांनी सेनापती बापटांच्या नेतृत्वाखाली मुळशी सत्याग्रह आरंभिला. परंतु अर्थात ब्रिटिश कंपन्यांनी येथील शेतकऱ्यांना पैशाचे आमिष दाखवायला सुरुवात केली. काहीही झाले तरी टाटा कपंनीचे धरण या डोंगर रांगांमध्ये उभे राहणारच होते. लोकांना जास्तीत जास्त पैसे मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत, असा भास निर्माण केला. हे अनेकांना पटलेही. मावळ्यांना मिळणारे पैसे तितकेच आहेत का? ते दिलेले पैसे खरे आहेत की खोटे? हे तपासून पाहण्यासाठी दोन मंडळांची स्थापना करण्यात आली. म्हणजे कोणाला कोणत्या गोष्टी करण्यात आनंद मिळेल, हे सांगता येत नाही. ब्रिटिश धार्जिणे लोक अधिक होते, हेच स्पष्ट होते. [३१]

## १७) गरिबांचे गुप्त कट –

एखादी गुप्त माहिती मिळवायची असेल तर आपण जवळचा सहकारी, मित्राच्या सहाय्याने मिळवितो. राजा, संस्थानिक यांची माहिती मिळवायची असेल तर विविध अधिकाऱ्यांच्या कमिट्या नेमल्या जातात व त्याद्वारे माहिती मिळविली जाते. कोणी–कोणी आपल्या आवडीकरिता अशा प्रकारची माहिती गोळा करण्याचा उद्योग सुरू करतो. भारत देशामध्ये सध्या गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. सर्वत्र अस्वस्थता आहे. भारतामध्ये असे अनेक गुप्त कट अस्तित्वात आलेले आहेत. परंतु त्याला 'गरिबांचे गुप्त कट' असे नाव देण्यात आलेले आहे. परंतु हे गरिबांचे गुप्त कट खरोखरच माठे क्रांतिकारक होते. सुरुवातीच्या या कटात सहभागी लोकांची संख्या साधारणपणे एक हजाराच्या आसपास होती. परंतु आज हा आकडा कोटींपेक्षा जास्त झालेला आहे. शहरांमध्ये, खेड्यांमध्ये हे कट आहेत. त्यांच्या सभासदांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. गुप्त कटवाल्यांचा मुख्य संस्थापक कोण? हे अद्यापही समजलेले नाही, कोणाला वाटते ब्रिटिश हेच संस्थापक असावेत, कोणाला गरिबांना लुटणारे सावकार संस्थापक वाटतात. त्यामुळे देशामध्ये गरीबांच्या गुप्त कटवाल्यांची संख्या वेगाने वाढत आहे. अनेकांनी लहरी पावसाला याला जबाबदार मानले आहे. पाऊस आला नाही तर दुष्काळ पडतो. त्यामुळे गरीबांच्या गुप्त कटवाल्यांची संख्या वाढते. अनेकांवर गुप्त कटवाल्यांचा आरोप ठेवण्यात येतो. श्रीमंत लोक अधिक श्रीमंत होतात. गरीब लोक अधिक गरीब होतात. श्रीमंतांना अंगभर घालायला कपडे असतात. परंतु गरीबांना लज्ज्ञा रक्षणासाठी कपड्यांची भ्रांत असते. गरीबांच्या गुप्त कटांमुळे प्रचंड प्रमाणात अस्वस्थता वाढत आहे.

गरीबांचे गुप्त कट नष्ट करण्यात येतात. गरीब लोक अन्न–पाण्याविना मरत आहेत. ब्रिटिश कायदे वेगळेच आहेत. गरीबांना धड जगू दिले जात नाही. त्यांच्या भीक मागण्यावर बंधने घालण्यात आली आहेत. त्युळे शहरात भिकारी दिसत नाही. शहरे श्रीमंत झालेली दिसतात. गरीबांनी अर्धपोटी राहू नये, अशी सूचना देण्यात आलेली आहे. दडपशाहीच्या मार्गाने गरीबांचे गुप्त कट नष्ट करण्यात येत आहेत.[३२]

## १८) पेणची परिषद –

महाराष्ट्र प्रांतिक परिषदेची बैठक कुलाबा जिल्ह्यामार्फत पेण येथे रा. रा. कृष्णाजी प्रभाकर खाडीलकर यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. पहिली परिषद वसईला भरली होती. तिसरी परिषद रत्नागिरीला होणार आहे. ठाणे, कुलाबा, वसई, पेठ व रत्नागिरी म्हणजे समुद्रकाठी असणाऱ्या प्रदेशांमध्ये राष्ट्रीय आणि राजकीय मत प्रवाहांचा प्रसार करणे हा या मागील खरा हेतू आहे.

कोणत्याही प्रकारचा जास्त खर्च न करता पेण या ठिकाणी एका आमराईत या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सावकार व कुळे यांच्यातील वाद परिषदेपुढे मांडण्यात आला होता. याशिवाय सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस येथील शेतसारा वाढीचा विषय पुढे आला होता. या व्यतिरिक्त मद्यपानाला विरोध, प्रजेच्या तक्रारी, मुळशी आंदोलनाला पाठिंबा, विविध कायद्यामध्ये सुधारणा असे जवळ–जवळ २१–२२ ठराव पेणच्या परिषदेमध्ये संमत करण्यात आले होते. म. गांधींनी सुरु केलेल्या असहकार चळवळीची चर्चा मोठ्या प्रमाणात करण्यात आली होती. चळवळीतील कार्यक्रमानुसार लोकांनी वागावे, असे पेणच्या परिषदेत ठरविण्यात आले.

१ ऑगस्ट १९२०ला लोकमान्य टिळकांचे निधन झाले. त्याचवेळी म. गांधींचा भारताच्या राजकारणात उदय झाला. लो. टिळकांनी 'प्रतियोगी सहकारिता' हा शब्द वापरला होता. कलकत्त्याच्या काँग्रेस अधिवेशनामध्ये असहकारितेचा ठराव संमत करण्यात आला. परंतु टिळक विरुध्द गांधी असा वाद निर्माण झाला. लोकमान्य टिळकांनी आपल्या, जहाल विचारांच्या माध्यमातून 'होमरुल चळवळीच्या' प्रसारामुळे देशाला स्वातंत्र्याचे धडे दिले. त्यानंतर गांधींच्या कार्याला कमी मानण्याचा प्रकार निर्माण झाला आहे. म. गांधींच्या असहकार चळवळीने देशामध्ये चांगलेच वातावरण निर्माण केलेले आहे. अशा प्रकारे लोकांमध्ये भांडणे निर्माण होणे

दुर्दैवाचे आहे. परंतु याचा फायदा ब्रिटिश निश्चितच घेतील. यात शंका नाही. टिळकांच्या अनुयायांनी गांधींच्या चळवळीला पाठिंबा द्यायला हवा. आपल्याला नेमके काय करायचे आहे, याचा विचार भारतीयांनी करणे आवश्यक आहे. लो. टिळक आणि म. गांधी हे दोघेही सर्वांना सारखेच वंदनीय आहेत. गांधी मोठे का टिळक मोठे? या वादात न पडता देशाचे स्वातंत्र्य हा घटक महत्त्वाचा मानावा. एका वर्षात स्वराज्य असा नारा म. गांधींनी दिलेला आहे. लो. टिळकांनी होमरुल चळवळीच्या माध्यमातून आपल्या देशामध्ये चळवळ उभारली. जवळ–जवळ दीड लाख रुपये देशाच्या स्वातंत्र्यासाठी निधी उभा केला आहे. परंतु आता म. गांधींच्या चळवळीवर उगीचच टिका करून काही उपयोग होणार नाही.

उगीचच भांडणे करण्यात वेळ घालविण्यात काही अर्थ नाही. सरकारशी असहकार चळवळ करता–करता आपल्यामध्ये जर आपण असहकार ठेवला तर काय उपयोग? सरकार याचा फायदा जरूर घेईल. यासाठी शिवरामपंत म्हणतात त्याप्रमाणे ''कोणी कोणाच्या उखाळ्या–पाखाळ्या न काढता दोघांनी मिळून तिसऱ्यांच्या उखाळ्या–पाखाळ्या काढण्याकरिता एक झाले पाहिजे. तरच आपल्याला स्वराज्य मिळेल. व्यक्तींच्यासाठी देश नाही, देशासाठी आपण सर्व व्यक्ती आहोत ही उच्च आणि उदात्त भावना आपण आपल्या मनांत बाळगली तर परमेश्वर आपल्याला अजूनही स्वराज्याच्या सुखाचे दिवस खात्रीने लवकर दाखवील!

एकमेकांशी भांडत बसण्यापेक्षा एक वाक्यतेने प्रयत्न केले तर देशाला स्वातंत्र्य मिळणे अवघड नाही, असेच शि.मं. परांजपेंना वाटत आहे ते अगदी बरोबर आहे, असेच म्हणावे लागते.[३३]

## १८) गिधाडी आनंद (पृ. ९७ ते ९९)–

पेणच्या परिषदेनंतर गांधी की टिळक ही चर्चा मोठ्या प्रमाणात झाली. प्रचंड मतमतांतरे घडून आली. पुण्यातील वर्तमानपत्रांनी याचा असुरी आनंद घेतला. हा आनंद अजिबात चांगला नव्हता, म्हणून त्याला 'गिधाडी आनंद' असे म्हणण्यास हरकत नाही. कोणाला कशामध्ये आनंद मिळेल, हे सांगता येत नाही. प्राचीन काळातही राक्षसांना असा आनंद घेण्यात मजा वाटत होती. कौरव–पांडवांचे युध्द झाले. अनेकांना त्याचे वाईट वाटले. परंतु श्रीमती देवी

वसागंधी हिला मात्र गिधाडी आनंद वाटला. अशा प्रकारे दुसऱ्यांचे वाईट बघण्यात काय आनंद कोण जाणे?

ज्ञानप्रकाश हे पुण्यातील जुने पत्र. त्याने तरी चांगले वार्तांकन करण्याची आवश्यकता आहे. असहकार चळवळीच्या विरुध्द कोण-कोण आहे, याची माहिती ज्ञानप्रकाशने द्यायला नको होती. असहकार चळवळीतील बारीक-सारीक गोष्टींची चर्चा केली आहे. ब्रिटिश अधिकाऱ्यांपुढे गुडघे टेकविण्याचे काम करू नये. राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने चर्चा करण्याची गरज आहे. असहकारितेच्या भांडणात उडी घेणचे कारण नाही. ज्ञानप्रकाश पत्राने सारासार विचार मांडण्याची आवश्यकता आहे. असहकार चळवळीच्या भांडणाचा परामर्श घेण्याची गरज नाही. भारतामध्ये मतभेद आहेत, परंतु त्यामध्ये ऐक्य निर्माण करण्याची आवश्यकता आहे. दुसऱ्याच्या उखाळ्या-पाखाळ्या काढत बसण्यात काहीच अर्थ नाही. आपल्या मतभेदाचाच ब्रिटिश फायदा घेत आहेत. त्यामुळे सर्वांनी एकत्रित राहून एका विचाराने ब्रिटिशांना विरोध करणे गरजेचे आहे. असा गिधाडी आनंद कोणाला मिळू नये.[३४]

## २०) पेणच्या परिषदेतील दोन उपसूचना -

पेणच्या परिषदेमध्ये असहकार चळवळीच्या संदर्भात विविध चर्चा झाल्या. त्यामध्ये बरेच फेरफार करण्याच्या सूचना दिल्या गेल्या. विविध वर्तमानपत्रांमधून त्याची विस्तृत चर्चा झाली. त्यामधून काहीही निष्पन्न होणार नाही. तरीही काही मुद्दे चर्चेला आलेले आहेत. अहमदाबाद काँग्रेस व २४ फेब्रुवारी दिल्ली येथे झाल्या 'ऑल इंडिया काँग्रेस कमिटी' पुढे उपसूचना मांडण्यात आल्या. दिल्ली येथे फेटाळण्यात आलेली सूचना डॉ. मुंजे यांनी पुन्हा मांडली. दोन्ही उपसूचनांचा सारांश खालीलप्रमाणे होता.

१. ''असहकारितेची चळवळ ज्या तत्त्वांवर चालविण्यात आली, त्या तत्त्वांच्या व्यवहार्यपणाची छाननी करण्याची व नवीन कार्यक्रम आखण्याच्या दृष्टीने असहकारितेच्या कार्यक्रमास कितपत यश आहे आहे, हे पाहण्याची आता वेळ आली आहे, असे या कमिटीचे मत आहे.''

२. ''राष्ट्रीय सभेने ठरविलेल्या कार्यक्रमांत जरूर ते कोणते फेरफार करावे अगर करू नये, हे ठरविण्यासाठी व ते फेरफार करावे अगर करू नये, हे ठरविण्यासाठी व ते फेरफार

आॅल इंडिया काँग्रेस कमिटीपुढे व राष्ट्रीय सभेपुढे मांडण्यासाठी प्रांतिक काँग्रेस कमिटीपुढे व राष्ट्रीय सभेपुढे मांडण्यासाठी प्रांतिक काँग्रेस कमिटीने एक कमिटी नेमावी. सदर कमिटीने कोणता कार्यभाग यशस्वी झाला व कोणता झाला नाही, हे पहावे. इ.''

या दोन उपसूचनांचा अभ्यास करता म.गांधींची अहसकार चळवळ अयशस्वी झाली म्हणून लोकमान्य टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेच्या तत्त्वानुसार आपण कौन्सिलमध्ये प्रवेश केला पाहिजे. हा अट्टाहास येथे मोठ्या प्रमाणात जाणवतो. त्यासाठी एखादे कमिशन नेमून त्याची सखोल चौकशी करावी, असे सुचविण्यात आले. खरे तर हा विषय येथेच संपवायला पाहिजे होता. परत पेणच्या परिषदेत याची चर्चा होणे कितपत बरोबर आहे. म. गांधींच्या विरुध्द असला निंदाव्यंजक ठराव करण्याची आवश्यकता नव्हती. सध्याचे राष्ट्रीय सभेचे नेतृत्त्व म.गांधींकडे असताना त्यांना ठराव करून विरोध करण्यात काय हाशील आहे. म.गांधी हे लो.टिळकांच्या सारखे चांगले नाहीत, असे ठरवून मंडळी मोकळी झाली. सरकारला हेच पाहिजे आहे. असहकार चळवळ यशाची झाली किंवा नाही, या संदर्भात कमिट्या नेमून त्याच्या पुन्हा –पुन्हा चर्चा करण्यात काहीच अर्थ नाही. लोकमान्य टिळकांचे लोक गांधींना कमी मानत आहेत. त्यांची चौकशी करण्याचे आदेश देत आहेत. लोकमान्य टिळकांनी होमरुल लीगच्या माध्यमातून चळवळ निर्माण केली होती. लोकमान्य टिळक आणि म.गांधींच्या योग्यतेची आज माणसेआहेत का? त्यांनी दिलेल्या सूचना कितपत ग्राह्य मानायच्या हे ही महत्त्वाचे आहे. लोकमान्य टिळकांनी सन १९०६–०७ साली स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार ही चतुःसुत्री ठरविली होती. त्यानुसार चळवळीची आखणी करण्यात आली होती. परंतु या चतुःसुत्रीलाही विरोध करण्याचे औदार्य दाखविण्यात आले. परंतु सुचविणारे आहेत त्यांच्यावर कोणीतरी विश्वास ठेवायला पाहिजे. भालाकार भोपटकर यांनीही उपसूचनांच्या संदर्भात भरपूर कष्ट केलेले दिसतात. भारतामध्ये विविध ग्रंथाच्या, वर्तमानपत्रे, मासिके यांच्या माध्यमातून राष्ट्रीय जागृती होण्याची आवश्यकता आहे.

या सर्व घटकांचा विचार केल्यास असे अनुमान काढता यते की, सूचना बरोबर असतील तर त्यांचा स्वीकार करावा, बरोबर नसतील तर त्या कोणावरही लादू नयेत. लोकांना जे आवडेल, चांगले वाटेल त्यांनाच ते चांगले म्हणतील. अन्यथा म्हणणार नाहीत, याची दक्षता घ्यावी.[३५]

## २१) कौन्सिलांवरील बहिष्काराचा पूर्व आणि पूर्ण इतिहास! –

राष्ट्रीय काँग्रेसमध्ये झालेल्या ठरावांमध्ये बदल करणे, दोन पक्ष निर्माण करणे, अहमदाबादला झोल्या ठरावात बदल करणे हे प्रकार जोरदार चालू आहेत. भारतामध्ये एकवाक्यता न राहता दुही पसरविण्याचा प्रकार आहे. महाराष्ट्रात अकोला येथे प्रांतिक परिषद भरवून वेगळेपण दाखविण्याचा प्रयत्न केला गेला. म. गांधींच्या सर्व कार्याला विरोध करण्याचे प्रयत्न अकोल्याला केले आहे. कौन्सिल प्रवेशाचा मुद्दा महत्त्वाचा आहे. काहींना वाटते कौन्सिलमध्ये जाऊन सरकारला विरोध करावा, काहींना वाटते कौन्सिलमध्ये न जाता सरकारशी असहकार करावा. राष्ट्रीय सभा ही राष्ट्रीय स्वरुपाची असल्याने तिचा निर्णय महत्त्वाचा आहे. राष्ट्रीय हितालाच प्राधान्य दिले जाणार हे स्पष्ट आहे. रा. रा. भोपटकर हे या कौन्सिलबद्दल लिहितात, ''कायदे मंडळावरील बहिष्कार असहकारितेच्या कार्यक्रमांत कसा व केव्हा समाविष्ट झाला, याचा थोडासा पूर्व इतिहास समजावून घेणे जरूर आहे. पूर्ण इतिहास समजावून घेणे खरोखरच फार जरूर आहे! पूर्व इतिहास समजावून घेणे जरूर आहे! पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, तो इतिहास या अकोल्याच्या अकलमंद लोकांनी लक्षात घेतला नाही! रा. रा. भोपटकर यांनी असे सांगितले आहे की, ''या कौन्सिलवरील बहिष्काराची मूळ कल्पना म. गांधींची नसून लाला लजपतराय यांची आहे. परंतु लाला लजपतराय यांनी काही कारणाने ती मागे घेतली. परंतु जनतेला एकत्र करण्यासाठी या तत्त्वाचा वापर म. गांधींनी तात्काळ केला.'' कलकत्त्याच्या अधिवेशनामध्ये कौन्सिल बहिष्कारचा ठराव मान्य करण्यात आला. अकोल्याच्या प्रांतिक परिषदेमध्ये मात्र कौन्सिल प्रवेश करावा असे ठरविण्यात आले. संपूर्ण स्वराज्य मागणी ठराव त्यांना मान्य होता. पण कौन्सिल बहिष्काराचा ठराव अमान्य होता. कौन्सिलमध्ये प्रवेश करणे हा मुद्दा बरोबर आहे, परंतु ब्रिटिशांनी भारतीयांच्या कोणत्याच मागण्यांचा विचार केलेला नाही. खिलाफतीचा प्रश्न, स्वराज्याचा प्रश्न व पंजाब या प्रश्नांवर ठोस निर्णय देणे आवश्यक आहे. लो. टिळकांच्या विचारांवर अविश्वास दाखविण्यात आलेला दिसतो. लो. टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेला विरोध केला गेला. एका बाजूने गांधींना विरोध करण्यासाठी टिळकांचा पक्ष उचलून धरताना दिसतात. कधी टिळकांच्या विचारांचा विसर पडून गांधींचा पक्ष उचलून धरतात. म्हणजेच  टिळक आणि म.गांधी विचारांवर हे लोक उलटलेले दिसतात. केवढे आश्चर्य म्हणावे लागेल. ब्रिटिशांनाही भारतीयांनी कौन्सिलमध्ये प्रवेश करावा

असेच वाटत आहे. कौन्सिल बहिष्काराच्या निर्णयावर ते नाराज आहेत. परंतु काही लोक कौन्सिल प्रवेश करण्याच्या तयारीत आहेत. यावरून अकोल्याच्या प्रांतिक परिषदेने या गोष्टीचा विचार करण्याची आवश्यकता आहे.[३६]

## २२) महाराष्ट्रांतील प्रतिष्ठित अत्याचारी –

लोकमान्य टिळक़ांच्या मृत्युनंतर देशाचे राजकारण प्रामुख्याने म.गांधींकडे गेले. परंतु म. गांधींचा स्वराज्य मार्ग अहिंसेचा होता. जहालवादाचा त्याग करून स्वराज्य मिळेल का? हा फार मोठा प्रश्न होता. लढा दिल्याशिवाय स्वराज्य मिळणे दुरापास्त आहे. राज्यक्रांत्या, रक्तपाताशिवाय स्वराज्य मिळालेले नाही. सुरुवातीलाच कडक धोरणाचा अवलंब केला असता तर ब्रिटिशांची सत्ता निर्माणच झाली नसती.

म.गांधींचे असहकार, अहिंसा हे तत्त्व त्यावेळी लोकांना पटले नाही. दक्षिण अफ्रिकेत अहिंसा याच तत्त्वाचा अवलंब केल्यामुळे गांधींच्या चळवळीला विजय मिळाला होता. तोच प्रयोग ते भारतात करण्याच्या विचारात होते.

परंतु महाराष्ट्राचा विचार केल्यास जशास तसे वागण्याचा धर्म येथे आहे. शौर्य, साहस व धाडस हे गुण येथे लोकांच्या नसानसांत भरलेले आहेत. त्यामुळे महाराष्टातील काही प्रतिष्ठित अत्याचारी वर्गाला (जशास तसे वागणारे) म.गांधींच्या चळवळीच भिती वाटू लागली. परंतु म.गांधींनी गोड बोलून या लोकांना चळवळीत सामील करण्याचा प्रयत्न सुरू केला. परंतु महाराष्ट्रातील लोकांना अनत्याचार व अत्याचार यांतील फरकच समजत नव्हता. अनत्याचाराचे रुपांतर कधीना कधी अत्याचारामध्ये होणार असते. शि.म.परांजपे यांच्या म्हणण्यानुसार, ''अत्याचारांत जितके साहस आहे, तितकीच शक्ती अनत्याचारांतही आहे. अत्याचाराने मनुष्याच देह जिंकता येतो, परंतु अनत्याचाराने मनुष्याचे मन जिंकता येईल. आणि मन जिंकल्यानंतर त्या मनाचा देह जिंकण्याला कितीसा अवकाश लागणार आहे? अत्याचार हा धर्मबाह्य आहे. अनत्याचार हा धर्म संमत आहे.''

अहिंसा तत्त्वाने केलेले कार्य चिरंतन टिकेल. त्याबद्दल आदर वाटेल. म. गांधींनी 'एका वर्षात स्वराज्य मिळवू' अशी घोषणा केली. परंतु महाराष्ट्रातील अत्याचारी लोकांना त्यावर चटकन विश्वास बसला नाही. परंतु म.गांधी प्रचंड कल्पक व हुशार होते. अत्याचार व अनत्याचार ह्या दोन्हीही घटकांच्या मुळाशी प्रचंड शक्ती असल्याचे त्यांचे निदर्शनास आले.

ब्रिटिशांनी मात्र या देशात चाललेल्या स्वातंत्र्य चळवळीत फुट पाडण्याचे काम केले. अत्याचारी आणि अनत्याचारी लोकांमध्ये संघर्ष निर्माण केला. दोघांनीही एकमेकांना मदत करू नये, अशी योजना आखली. महाराष्ट्रातील जनतेने म.गांधींच्या चळवळीला आतुन बऱ्यापैकी विरोधच केला. त्यांचे दाखवायचे दात वेगळे व खायचे दात वेगळे आहेत. म.गांधींच्या चळवळीला महाराष्ट्रातील अत्याचारी, प्रतिष्ठित वर्गाने म्हणावा तसा पाठिंबा दिलेला दिसत नाही.

परंतु महाराष्ट्रातील अत्याचारी वर्गाने म.गांधींच्या अनत्याचारी चळवळीला पाठिंबा दिला असता तर स्वराज्याच्या दिशेने चांगले पाऊल पडले असते. आपांपसातील संघर्ष हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यामध्ये मोठी आडकाठी ठरत आहे. त्यामुळे स्वातंत्र्याच्या कार्यामध्ये दिरंगाई होत आहे. हे मान्यच करावे लागेल. [३७]

## २३) हृदयाविष्करण –

महाराष्ट्रात सेनापती बापटांच्या नेतृत्त्वाखाली मुळशी सत्याग्रह झाला. त्यावेळी प्रो. परांजपे, सी.के.दामले व डॉ.फाटक यांना शिक्षा झाल्या. या सर्वांचे अभिनंदन करण्यासाठी रे मार्केटच्या भव्य पटांगणात सभा झाली. भाऊसाहेब लवाटे यांनी या सभेत प्रास्ताविक केले. मुळशी सत्याग्रहात सामील होण्याची सूचना आली होती. परंतु आपल्यावर वेळ आल्यावर कोणी पुढे येत नाही. परंतु सत्याग्रहात सहभागी होणे, हे कौतुकास्पदच आहे. हे खरोखरच हृदयविष्करणच आहे. वादविवाह घालत बसण्यापेक्षा कार्य करणे हे महत्त्वाचे आहे. कोण कशा पध्दतीने वागला याचाही विचार करण्याची गरज नाही. उगीचच काहीतरी बडबड करीत बसण्यात काहीच अर्थ नाही. हृदयविष्करण चांगलेच असते. त्यामध्ये कोणत्याच प्रकारचा द्वेष आढळत नाही. हृदयविष्करणामध्ये सर्वांचा फायदाच होतो. हृदये हृदयांशी बोलू लागतात. चांगले विचार समाजात पुढे येतात. वाईट गोष्टी घडलेल्या असतील तर हृदयविष्करणाच्या माधमातून त्यातून बाहेर पडण्यास उपयोग होतो. थोड्या फार प्रमाणात पापक्षालन होण्यास मदत होते. चांगले मार्ग हाती घेता येतात. [३८]

## २४) महात्मा गांधी तुम्ही चुकलांत –

ब्रिटिशांच्या आगमनामुळे भारतीयांचे स्वातंत्र्य लुप्त झाले होते. सुरुवातीला संस्थानिक आपापले स्वराज्य टिकविण्याचा प्रयत्न करीत होते. परंतु पुढे ब्रिटिशांनी साम्राज्ये खालसा

करण्याचे धोरण हाती घेतले. 'फोडा आणि झोडा' या राजनीतीचा वापर करून भारतावर त्यांनी ताबा मिळविला. भारतामधील एकवाक्यतेचा ऱ्हास झाला. पुढे १८८५ साली भारतातील राष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रीय सभेची स्थापना झाली.

महात्मा गांधींनी अहिंसा तत्त्वाचा वापर करून 'भारताला एका वर्षात स्वराज्य मिळवू' असा नारा दिला. सर्वसामान्य समाजाला सुध्दा चळवळीत सहभागी करून घेतले. खादीला प्रधान्य दिले. मद्यपानाला विरोध केला. राष्ट्रीय शिक्षणाला महत्त्व दिले. असहकार चळवळीला निराळे वळण लागल्याने ३१ डिसेंबर १९२९ला सरकारने म.गांधींची ही चळवळ बंद पाडली. चळवळ अपयशी ठरली.

स्वराज्यप्राप्तीच्या कार्यात ब्रिटिशांनी आडकाठी निर्माण केली. सुरुवातीला गांधींच्या चळवळीने सरकारचे धाबे दणाणले होते. गांधीनी या चळवळीचा फायदा करून घ्यायला हवा होता. परंतु त्यांना फायदा घेता आला नाही. या ठिकाणी 'म.गांधी तुम्ही चुकलांत!' असेच म्हणायला हवे. एका वर्षात स्वराज्य मिळवून देण्याची शपथ घेतली होती. त्याचा काही उपयोग झाला नाही. तुमचे प्रयत्न कमी पडले. तुमच्या नेतृत्त्वाचा काहीच उपयोग झाला नाही. स्वराज्य मिळवून द्यायला एवढी घाई का केलीत तुम्ही? हिंदुस्थानला स्वराज्य नाही मिळाले तर कोणाचे काही बिघडत नाही. तुमचा जन्म गुजरातमध्ये झाल्याने तुमच्यामध्ये म्हणावे तेवढे शौर्य नाही. तुम्हांला तुरुंगात जाण्याची खूपच हौस आहे. तुम्ही ब्रिटिश धार्जिणेच आहेत. आगगाडीचा, घड्याळांचा वापर तुम्ही केला आहे. स्वराज्याचा बागलबोवा का दाखविलात ? उपास करून कुठे स्वराज्य मिळते काय ? तुम्ही स्वराज्य मिळवून दिले नाही. त्यामुळे तुमची चळवळच चुकली असे म्हणावे लागते. हिंदु-मुस्लीमांमध्ये एकी निर्माण करण्याचा आपला प्रयत्न फसला. तुम्ही आनंदाने तुरुंगवास भोगत होता. त्याचा काय उपयोग झाला. तुमचे सर्व स्वराज्य प्राप्तीचे कार्यक्रम असफल ठरले. एका वर्षाच्या आत स्वराज्य प्राप्त झाले नसल्याने तुम्ही फार मोठी चूक केली आहे, असेच म्हणावे लागते. 'लोकांना तर स्वराज्य तुम्ही मिळवून दिले नाहीच. पण स्वतःचे स्वराज्य घालवून बसलांत.'

शि.म.परांजपे यांनी जरी म.गांधींच्या चळवळीला पाठिंबा दिलेला असला तरी त्यांचे विचार पटले नाही तर ते विरोध करताना मागेपुढे पहातच नव्हते. सरळ टीका करीत असत. विचार पटले तर सहकार्य करीत अन्यथा शांत राहत. [३९]

## २५) एक देशभक्त विद्यार्थी –

एक देशभक्त विद्यार्थी आपल्या वडिलांना पत्र पाठवितो. त्याचा आशय या लेखात आलेला आहे. हा विद्यार्थी शहरात शिकण्यासाठी आलेला आहे. वडिलांना जवळ–जवळ एक दीड वर्षे या विद्यार्थ्याने पत्र पाठविले नव्हते. वडिलांची दिलगिरी व्यक्त करणारे हे पत्र असले तरी यातून म.गांधींनी सुरु केलेली असहकार चळवळ व त्यामधील विविध घटनांचा आढावा घेतलेला दिसतो.

विद्यार्थी आपल्या वडिलांना लिहितो..... म.गांधींनी देशात असहकार चळवळ सुरू केली होती. एका वर्षात स्वराज्य मिळवू, असा नारा त्यांनी देशवासियांना दिला होता. त्यामुळे मी ही भारावून गेलो. सरकारी शाळा सोडावी, असे माझे मन म्हणू लागले. तसे शिक्षण घेऊनही काय फायदा होणार आहे. कारण स्वराज्य प्राप्ती होणे महत्त्वाचे होते. एका वर्षात स्वराज्य मिळेल. त्यापुढे शिक्षण घ्यावे असे वाटू लागले. एक वर्ष वाया गेले तर बिघडणार नाही. लहान मुले आणि वृध्द व्यक्तींचा स्वातंत्र्यासाठी काय उपयोग? तरुणांनी यामध्ये मोठे योगदान देण्याची गरज आहे. सरकारी शाळा, कॉलेजांवर बहिष्कार घालणे, कौन्सिलवर बहिष्कार घालणे, सरकारी सनदा परत करणे, अशा प्रकारची घोषणा म.गांधींनी केली होती.

'एका वर्षात स्वराज्य' ही घोषणा फक्त घोषणाच ठरली. कारण वर्षात स्वराज्य मिळाले नाही. परंतु मी नाराज झालो नाही. पुढील वर्षी स्वराज्य मिळाल्याशिवाय राहणार नाही. मी शाळा सोडली म्हणून मी एकटाच देशभक्त होतो असे नाही. सरकारी शाळा, कॉलेज ही सुध्दा भारतीयांच्या पैशावरच चालतात. प्रत्येकाचा देशभक्ती हा गुण असतोच. स्वातंत्र्य मिळावे हे प्रत्येकाला वाटत असते. राष्ट्रीय शाळा, कॉलेजांतून शिक्षण घ्यावे, हा चांगला पर्याय आहे. म.गांधींनी शैक्षणिक चळवळींना आंदोलनात सहभागी करून घेतले. सर्वांनी राष्ट्रीय सभेचे सभासदत्व स्विकारावे, स्वातंत्र्य चळवळ जोमाने सुरू करावी. कोणालाही न घाबरता स्वातंत्र्यासाठी झटण्याचे आवाहन कले. ब्रिटिशांपेक्षा स्वतःला कमी मानण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांनी या विचारांचे आचरण करावे. यश कसे आणि किती मिळेल, हे ईश्वरास ठाऊक. परंतु राष्ट्रहितासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

विद्यार्थी वडिलांची माफी मागून म्हणतो, लहान तोंडी मोठा घास घेतला आहे. माझी कोणतीच काळजी करू नका. मी सुखी व समाधानी आहे. माझी प्रकृती उत्तम आहे. आपली ख्याली खुशाली पत्र अधूनमधून यावे, ही विनंती करून विद्यार्थी पत्र संपवितो.

हे पत्र खरोखर भारतातील सर्व विद्यार्थ्यांना आदर्शभूत आहे. सर्व विद्यार्थ्यांनी देशसेवेसाठी वाहून घेण्याची गरज आहे, हेच या लेखातून स्पष्ट होते.[४०]

## २६) एका चिनी बाईची गोष्ट –

एक चिनी तत्त्ववेत्ता सर्वत्र फिरून सृष्टीचे निरीक्षण करण्याच्या कार्यात मग्न असतो. फिरत–फिरत एका खेडेगावात येतो. तेथे त्याला एक स्त्री शोकमग्न अवस्थेत एका नवीनच रचलेल्या थडग्याला वारा घालत बसलेली दिसते. तेव्हा तत्त्ववेत्ता त्या स्त्रीला म्हणतो, ''तु असे वेड्यासारखे काय करत आहेस?'' या प्रश्नावर त्या स्त्रीला प्रचंड राग येतो. तिचे थडग्याला वारा घालण्याचे काम चालूच असते. त्याचवेळी तिचा नोकर तेथे येतो व त्या तत्त्ववेत्त्याला सांगतो, माझ्या मालकाचे नुकतेच निधन झाले आहे. त्याची ही पत्नी. दोघांचे एकमेकांवर जीवापाड प्रेम होते. त्यामुळे मरणाअगोदर मालकीण तिच्या नवऱ्याला म्हणते, ''जर या आजारात तुमचे काही झाले तर मी जोगीण म्हणून सारे आयुष्य जगेन.'' तुझ्या सारख्या सुंदर स्त्रीने जोगीण बनून जगणे हे खूप अवघड आहे. परंतु मालकीण मी पुन्हा कधीही विवाह करणार नाही, अशी शपथ घेते. परंतु यावर मालक म्हणतो की, ''मी मेल्यानंतर माझ्या शवावर उभारल्या जाणाऱ्या थडग्यावरील गवतमिश्रित मातीची लहान–लहान जलयुक्त ढेकळे जोपर्यंत वाळून कोरडी होणार नाहीत, तोपर्यंत दुसऱ्या लग्नाचा खटाटोप माझ्याकडून व्हावयाचा नाही.'' त्यामुळे ही स्त्री वचन पाळताना दिसत आहे. जिवंतपणी प्रचंड प्रेम करणाऱ्या स्त्रीला ही ढेकळे कधी वाळतील असे झाले आहे. म्हणजे थोडक्यात या स्त्रीला पुर्नविवाह करण्याची इच्छा आहे. हे सर्व ऐकून तत्त्ववेत्त्याचे समाधान झाले. थोडक्यात भारतात म.गांधी कारागृहात असताना बाहेरील वातावरण कसे प्रक्षुब्ध बनविले जात होते. तसाच प्रकार या चिनी बाईच्या संदर्भात आहे, असे म्हणावयास हरकत नाही.[४१]

## २७) राष्ट्रीय कामगिरी –

देवळातील पुजाऱ्याची कथा या लेखात सांगितली आहे. एका गावात मारुतीचे पडके देऊळ होते व या देवळात हा पुजारी काम करीत असे. परंतु आपल्या कामापेक्षा नुसत्या कुटाळ्या करण्यामध्येच या पुजाऱ्याचा वेळ जात असे. सतत दुसऱ्याची निंदा–नालस्ती करण्यामध्ये त्याला अभिमान वाटत असे. दुसऱ्यांचे दोष शोधण्यामध्ये त्याचा हात कोणी धरू शकत नव्हता. कृतीशून्य राष्ट्रीय कामगिरी करावी, असा त्याचा विचार होता. सर्व वाईट विचार त्याच्या मनामध्ये होते. दोन–चार प्रतिष्ठित लोक आपल्या हाताशी धरून आपला शहाणपणा दाखविण्यामध्ये हा पुजारी मश्गुल असे. हिंदुस्थानातील सर्व लहान–मोठ्या लोकांबद्दल त्याची मते ठरलेली होती. राजकारणात प्रत्येक वेळी लुडबुड करण्याची पुजाऱ्याची प्रवृत्ती होती. त्याला प्रचंड गर्व होता. कोणालाही पटकन बोलण्यामध्ये त्याला शहाणपणा वाटत असे. कोणत्याही गोष्टीचा विचार तो कधीच करीत नसे. गांवातील लोकांना तो एक प्रकारची कायम भिती घालत असे. हिंदुस्थानातील विविध चळवळी व त्यातील दोष दाखविण्यात तो वाकबगार होत.

म.गांधींची असहकार चळवळ चुकीची असून म.गांधींनी त्यामध्ये अनेक घोडचुका केलेल्या आहेत. लोक यावेळी कसे वागले? याची माहिती या पुजाऱ्याकडे आहे. गांधींच्या आवाहनानुसार शाळा–कॉलेजे ओस पडली नाहीत. असहकारिता चळवळ पूर्णपणे अपयशी ठरली. हिंदुस्थानी लोक सरकारी नोकरी करण्यामध्ये धन्यता मानत आहेत. सकाळची पूजा लवकर उरकून आपल्या देशबांधवांना उपदेश करण्यामध्ये हा पुजारी धन्यता मानत असे. त्याला याचा खुप अभिमान वाटत असे. गाभाऱ्यातील स्वयंभू मूर्तीप्रमाणेच आपली विघातक राष्ट्रीय कामगिरी स्वयंभू असल्याचे पुजाऱ्याला वाटत आहे. असा हा पुजारी स्वतःची पाठ थोपटण्यात धन्यता मानत असे. त्याची कामगिरी त्याला राष्ट्रीय कामगिरी वाटत होती, हे मात्र नक्की. [४२]

## २८) सशाचे शिंग –

सन १९१९ साली मॉंटेग्य–चेम्सफर्ड यांनी भारतीयांना सुधारणा जाहीर केल्या. भारतीयांना या सुधारणांचे फार कौतुक वाटले. कौन्सिलमध्ये प्रवेश करून प्रतियोगी सहकारिता अंमलात आणून स्वराज्य प्राप्ती करून घेण्यासाठी भारतीय लोक आसुसलेले होते. म.गांधींच्या

असहकार चळवळ साडून देऊन या नवीन मार्गांचा अवलंब करण्यासाठी सर्वजण तयार होते. परंतु ब्रिटिशांची निती एवढी निर्मळ असेल का? हा फार मोठा प्रश्नच होता. कुटील राजकारणामध्ये ब्रिटिशांचा हात कोणी धरू शकत नव्हते. आकडेवारीवरून भारतीयांचे डोळे दिपून गेले होते. लोकनियुक्त सभासदांचे प्रमाण शेकडा ७० एवढे ठेवलेले होते. जाती–धर्मासाठी जागा राखून ठेवल्या होत्या. थोडक्यात हिंदुस्थानमध्ये परस्परांमध्ये दुहीचे राजकारण निर्माण करण्याचा प्रयत्न ब्रिटिश करीत होते. उदा. युरोपियन, अँग्लो इंडियन, जमिनदार, व्यापारी, उद्योगधंदेवाले, इंडियन ख्रिश्चन, युनिर्व्हसिटी पदवीधर, मळेवाले, अल्पसंख्यांक अशा लोकांसाठी राखीव जागा ठेवण्यात आलेल्या होत्या. अशा जागांवर लोक निवडून आले तर देशाला स्वराज्य मिळाल्याशिवाय राहणार नाही, असे काही भारतीयांना वाटत आहे. हे कौन्सिलमध्ये जाणारे लोक सशाच्या शिंगाने हिंदुस्थानला स्वराज्य मिळविणार का ? हा चमत्कार होणार का? हा फार मोठा प्रश्न निर्माण होतो. परंतु कोणाच्या किंवा कोणत्याही मार्गाने हिंदुस्थानला स्वराज्य मिळावे, हीच गोष्ट महत्त्वाची आहे. असहकार चळवळीला या लोकांचा मोठा विरोध आहे. कौन्सिलमध्ये प्रवेश करून देशाला स्वातंत्र्य मिळविण्याचे त्यांचे स्वप्न आहे. त्यांना खूप–खूप सदिच्छा आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळणे, हे महत्त्वाचे आहे.[४३]

३) **साहित्य संग्रह – भाग १, २, ३ – शि. म. परांजपे**

i. साहित्य संग्रह भाग – १, २ – सन १९३७ । प्रकाशक –

ii. साहित्य संग्रह भाग – ३ – सन १९४६ । य. गो. जोशी, पुणे

साहित्य संग्रह भाग १, २, ३ यामध्ये शि.म.परांजपे यांनी जवळजवळ ३१ लेख किंवा निबंध लिहिले आहेत. त्यामधील बरेच लेख रत्नाकर व चित्रमय जगत या मासिकांमधून प्रसिध्द झालेले होते. 'काळ' आणि 'स्वराज्य' या दोन पत्रांतील लेखांपेक्षा साहित्यसंग्रहातील लेख वेगळे होते. साहित्यिक लेख असल्याने त्याचे महत्त्व अधिक आहे. त्याचा आढावा खाली घेण्याचा प्रयत्न केला आहे.[४४]

१) **मनाची मीमांसा –**

मनुष्याला घ्राण, चक्षु, श्रोत्र, जिव्हा आणि त्वक् ही पाच ज्ञानेंद्रिये होत. परंतु मन हे मनुष्याचे सहावे ज्ञानेंद्रिय महत्त्वपूर्ण मानले जाते. सुरुवातीला मन हे ज्ञानेंद्रिय हे सर्वात वर व

उघडे असावे. परंतु जगात अनेक परिवर्तने झाली, बदल झाले. त्यामध्ये मनाच्या प्रक्रियेतही अनेक बदल झाले. मनाचा खरोखरच कोणाला पत्ता लागेना. सुरुवातीला मन पाहता येत असे. पूर्वी मन हे मनन, चिंतन, विचार करीत असलेले असे बघायला मिळत असे. परंतु कालांतराने मनाला दडपून टाकण्यात आले. सुरुवातीला मन पारदर्शक होते. आजच्या सारख्या शंका–कुशंका त्यावेळी नव्हत्या. मनही इतर ज्ञानेंद्रियांप्रमाणेच स्वच्छ असे. सध्या मन शरीरात कोठेतरी दडलेले दिसते. प्रथम मनामध्ये पाप आणता येत नव्हते. मनामध्ये काही लपवून ठेवता येत नव्हते. पूर्वी एकमेकांच्या मनात काय आहे हे ओळखू येत होते. मन हे दडविले जाऊ शकत नव्हते. तो सत्ययुगाचा काळ होता. असत्याला थारा नव्हता. पूर्वी उघड्या दिसणाऱ्या मनाभोवती कवचे उत्पन्न झाली. मन झाकून गेले. त्याचा पत्ताच लागेना. जगामध्ये सुख–दुःखामध्ये बरीच वाढलेली दिसते. त्यामुळे मनामध्ये अनंत विचार येऊ लागले. सुरुवातीला मनामध्ये चांगले विचार होते. आता त्याचीच जागा वाईट विचारांनी घेतली. प्रथम चांगले–वाईट विचार दुसऱ्यांना समजत होते. मनाची कोणतीच गोष्ट लपून राहू शकत नव्हती. आरशाच्या प्रतिबिंबाप्रमाणे मने स्वच्छ होती. परंतु नंतर खोटेपणाने त्याची जागा घेतली. कोणाच्या मनात काय चालले आहे, हे पहिल्यांदा समजत नव्हते. पहिली मनाची पारदर्शी अवस्था न राहिल्याने असत्याचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला. सध्याचा काळ यंत्रयुगाचा आहे. नवीन–नवीन शोध लागत आहेत. यंत्र युगामध्ये मानवी मनापेक्षा गूढ अशा अनेक कल्पना पुढे येत आहेत. त्याचे अनेक फायदे व तोटे पहायला मिळतात. प्रत्येकाने प्रत्येकाच्या मनाचा विचार करावा. एकमेकांचा आदर करावा. एकमेकांना समजून घ्यावे, तरच जगात शांतता लाभो हाच संदेश शिवरामपंत परांजपेंना या लेखाद्वारे द्यावयाचा आहे, असे दिसते.[४५]

२) **भासाची भवितव्यता –**

प्राचीन काळातील सुप्रसिध्द कवी, नाटककार म्हणून 'भास' याचा उल्लेख सापडतो. 'भासनाटकचक्रेऽ पि छेकैः क्षिप्ते परीक्षितुम् । स्वप्नवासवदत्ताया दाहकोऽभून्न पावकः ।।'' यावरून भासाची नाटके जाळली गेली असावीत, असा तर्क मांडण्यात येतो. खरोखरच ही दुःखकारक घटना मानावी लागेल. भासाची सर्व नाटके दुर्मिळच होती हे खरे आहे. सध्या भासाची काही नाटके उपलब्ध झाली आहेत.

भासा तुझी नाटके नेमकी कोणी जाळली ? ते खरोखरचं राक्षसच असले पाहिजेत. असा कोणता उल्लेख 'तुझ्या नाटकात होता म्हणून तुझी नाटके जाळली गेली. तेव्हा भासा, तु होतास का? तुझ्या डोळ्यापुढे नाटके जाळली असतील तर तुझे मन, अंतःकरण किती होरपळून गेले असेल, याची कल्पना न केलेली बरी. 'तुझी दया कोणाला आली नसेल का? तुझे सात्वंन करायला कोणी आले नाही का? सर्व लोक नेमके दुर्बल का झाले? आकाशामध्ये संचार करणारे यक्ष, गंधर्व, किन्नर, सिध्द, विद्याधर हे कोणी नव्हतेच का? वनदेवता, जलदेवता या पृथ्वीवरील देवता काय करीत होत्या? भासाच्या कवितेतील सौंदर्य तुम्हां सर्वांचेच होते. खरे तर असे व्हायला नको होते. भासाच्या काव्यातील सौंदर्य जपण्यासाठी सर्वांनी एकत्र प्रयत्न करायला हवे होते. दुष्ट हात जेव्हा भासाची काव्ये जाळत होते तेव्हा सर्वांचे कष्ट कमी पडले. निसर्गाचे सुंदर वर्णन करताना भास किती वेळा पावसात भिजला असेल. पाण्याच्या काठी बसला असेल. डोंगरांशी, पर्वतांशी भासाने संवाद साधला असेल. एवढे सगळे सोसून काही उपयोग झाला नाही. तुझी नाटके, काव्य नष्ट झाल्यावर तू ''माझी नाटके! माझी नाटके!'' म्हणून रडला असशील. माझी नाटके परत पुन्हा मिळतील काय, यासाठी तु निश्चित प्रयत्न करीत असणार, यात शंका नाही, नाटके लिहिण्याला त्यामध्ये अलंकार, काव्ये घालण्यामध्ये तुझा किती वेळ गेला असेल. परंतु मोठ्या संग्रहालयामध्ये तुझा एकही ग्रंथ नसावा? याची खंत वाटते. परंतु भासा वारंवार प्रश्न पडतो तुझी नाटके, ग्रंथ का जाळले? स्वप्नवासवदत्त हे नाटक उत्कृष्ट ठरले असेल. भासा नुसता खेद करून काय उपयोग? वेद किंवा देवांचे ग्रंथही समुद्रामध्ये बुडविले होते. गुणाढ्याने रक्ताने लिहिलेला ग्रंथ सातवाहन राजाकडे पाठविला होता. परंतु राजाने दखल घेतली नाही. म्हणून गुणाढ्याने ग्रंथाचे एक-एक पान वाचून जाळण्यास सुरुवात केली होती. सातवाहन राजाला हे समजल्यावर त्याने गुणाढ्याचे पाय धरले. उरलेला ग्रंथ तरी आम्हांा द्यावा, अशी विनंती सातवाहन राजाने केली. तेव्हा गुणाढ्याने त्याला होकार दिला होता. त्यामुळे बृहत्कथेतील एक तरी ग्रंथ शिल्लक राहिलेला आहे.

दुष्ट लोकांनी तुकाराम महाराजांची अभंगांची गाथा पाण्यामध्ये बुडविली होती. दुष्टांना खरोखर शिक्षा होणे आवश्यक होते. परंतु होताना दिसत नाही. भासा तुझ्याकडून सुरुवातीला काही पाप घडले होते का? काही अपराध घडला होता का ? आकाशातील एखाद्या तेजस्वी

ताऱ्याच्या निसटून जाण्यासारखे तुझे झाले आहे. कालिदास, दण्डी, भवभूती, बाण या कवींनी आपल्या काव्य प्रतिभेचा अविष्कार दाखविताना तू नेमका कोठे होताय? तु नाहीसा झालेला दिसतो आहेत. पृथ्वीतलावर काही गोष्टी जशा कायमच्या टिकतात. त्याप्रमाणे तुझी कविता ही टिकायला पाहिजे होती. त्यावेळी तुझ्या काव्याचे महत्त्व लोकांना कळले असते. आपले जाळले गेलेले ग्रंथ परत मिळतील का? असेच विचार भासा, तुझ्या मनात येत असणार.

''पण हे भासाच्या आत्म्या, तू असा निराश होऊ नको. परमेश्वर जोपर्यंत या जगात आहे, तोपर्यंत दुष्ट लोकांनी कितीही अपकार केले तरी निराश होण्याचे काही कारण नाही. परमेश्वर तुझ्याही पाठीमागे उभा आहे. तो जगातील चांगली गोष्ट कधीच नष्ट होऊ देणार नाही. भासा, तुझी काही नाटके परमेश्वराच्या प्रेरणेने उपलब्ध झाली आहेत. वासवदत्ता नाटक उपलब्ध झाले आहे. तुझी नाटके पुनरुज्जीवित झाली आहेत. ती सर्व नाटके वाचून रसिकांना आनंद होत आहे. लोकांची मने प्रसन्न झाली आहेत. हे भासाच्या आत्म्या, आता तू शांत हो आणि ब्रह्मलोकांत आनंदामध्ये ऐस!''[४६]

## ३) वेदांतविषयक गोष्ट – कर्म –

एका ब्रह्माचारी व्यक्तीच्या जीवनात झालेल्या विविध घटनांच्या माध्यमातून कर्माचे महत्त्व सांगण्याचा परांजपे यांचा प्रयत्न खरोखरच स्तुत्य आहे.

ब्रह्मचाऱ्याला स्वप्न पडते. स्वप्नामध्ये एक पुरुष येतो व त्याला म्हणतो, ''तुला मी श्रीमंत करणार आहे. वेदाध्ययन, शास्त्राध्ययन, काव्यपरिशीलन, भगवच्चिंतन, प्रातःकाळी स्नान आणि माध्यान्हकाळी मधुकरी वृत्ती करून ब्रह्मचारी छान जीवन जगत असतो. त्याला अजिबात श्रीमंत होण्याची इच्छा नसते. प्राण गेला तरी चालेल पण मी मी श्रीमंत होणार नाही. तु नेमका कोण आहे? असा प्रश्न ब्रह्मचारी विचारतो, तेव्हा मी कर्माधिकारी आहे, असे उत्तर मिळते. स्वप्नातील सर्व गोष्टी विसरून तो पुन्हा नित्यनेमाने आपल्या कामाला सुरुवात करतो.

एका मोठ्या शहरात एक वृध्द मनुष्य राहत असतो. सर्व सुख–संपत्ती असते. परंतु त्याला संतती नसते. त्यासाठी अनेक खटपटी करतो. त्याच्या तीन बायका निपुत्रिक मरण पावल्या. चौथ लग्न करूनही काही पुत्रयोग संभवत नाही. दत्तकपुत्र घ्यावा या हेतुने वृध्द

फिरत–फिरत ब्रह्मचाऱ्याकडे येतो. तो ब्रह्मचारी त्याच्या नात्यांतीलच निघतो. ब्रह्मचाऱ्याची अजिबात इच्छा नसते. परंतु वृध्द मनुष्य ब्रह्मचाऱ्याला तुमचे उपकार परलोकापर्यंत जातील. तुमचा फायदा होईल. सर्व विचार करून दत्तक विधानाला तयार व्हा. दया, परोपकार, भीती या विचारांनी ब्रह्मचारी गांगरून गेला आणि हो म्हणण्याशिवाय त्याच्यापुढे दुसरा पर्यायच उरला नाही.

वृध्द मनुष्य आणि ब्रह्मचारी कमलापुरास आल्यावर दत्तकविधान झाले. ब्रह्मचारी दत्तक मुलाचे 'भोलानाथ' हे नाव ठेवण्यात आले. पुढे गिरीजाबाई या उपवर कन्येबरोबर भोलानाथचा विवाह झाला. भोलानाथची आई व पत्नी या दोन्ही समवयस्क होत्या. भोलानाथच्या बायकोचे मन कुढे होते व आईचे मन खुले होते. आई व मुलामध्ये चांगले वातावरण होते. परंतु गिरीजाबाईचा त्याचा संशय येत असे. वृध्द मनुष्याकडे भरपूर संपत्ती आहे. परंतु त्यावर भुता–खेताची वासना असते म्हणून तो आपल्या आईला म्हणतो, मला या संपत्तीतील एका कणाचीही अपेक्षा नाही. पुढे भोलानाथचे वडिलांचा मृत्यु होतो. त्याची आई गरोदर असते. परंतु पत्नीला त्याचाच संशय येतो. भोलानाथ या सर्व वातावरणाने कंटाळून जातो. श्रीमंतीचा गरीब करशील काय? असा प्रश्न विचारल्यावर त्याला नाही, असे उत्तर मिळते. मरणाशिवाय यातून सुटका नाही, याची जाणीव भोलानाथला होते. त्याच्या आईला मुलगा होतो. त्यांचीही जबाबदारी त्याच्यावरच येते. माझ्यावर अशी अनेक संकटे आली आहेत. त्याचवेळी त्याला पुन्हा कर्माधिकाऱ्याची आकृती दिसू लागते. त्यावेळी कर्माधिकारी त्याला डिवचण्याच्या हेतूने आलेला आहे, असे वाटते. ''तु नेमका माझ्यापुढे सारखा का येत आहे?'', असा प्रश्न विचारतो तेव्हा ती आकृती असा उल्लेख केल्याचा भास भोलानाथला होतो....... ''माझे नाव कर्माधिकारी, म्हणून मी तुला पूर्वी सांगितलेंच आहे. ज्याच्या त्याच्या कर्माप्रमाणे त्या त्या प्राण्याला फळ देण्याचा अधिकार माझ्याकडे सोपविण्यात आलेला आहे! मी तुझे कर्म आहे! तसेच तो उपाध्या. तो तुझा दत्तक बाप, ती तुझी दत्तक आई, ती तुझी बायको. तो तुझा नवीन भाऊ, ही सगळी अंशतः तुझ्या कर्माची फळे आहेत? ज्यांच्यापासून जसजसे सुख–दुःख प्राप्त व्हावयाचे असते, तसतसे कर्मानुसार योगायोग जुळून येत असतात! तेव्हा हे सारे तुझेच कर्म आहे आणि त्या कर्माची फळे तुला भोगली पाहिजेत!'' मी कोणतीही भयंकर कर्म नाहीत तर मला कडेलोटाची शिक्षा का होत आहे? या प्रश्न भोलानाथ विचारतो. यावर कर्माधिकारी

म्हणतो, ''या शंकेचे समाधान माझ्यापाशी नाही व मला एवढेच माहित आहे की, मनुष्याला सुख मिळते, त्यावेळेला हे माझ्या कोणत्या जन्मीच्या कर्माचे फळ आहे. याच्या स्मरणाची अपेक्षा बाळगण्याला तो कधी थांबत नाही. तर दुःखाच्या वेळींच त्याने हे आक्षेप का काढावे?'' असे सांगून कर्माधिकाऱ्याची आकृती नाहीशी झाली. शेवटी जाताना 'निष्ठुरा! निष्ठुरा! असे शब्द बाहेर पडले. भोलानाथला तुटलेल्या कड्यावर नेण्यात आले. त्याने 'राम, राम' देवाचे नाव घेतले. त्याला लगेचच कड्याच्या खाली ढकलून देण्यात आहे.

माणसाच्या जीवनात कर्माचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मनुष्याने सर्व कर्माची फळे भोगली पाहिजेत. चांगले कर्म करा, चांगले फळ मिळेल, असा संदेश शि.म.परांजपे देताना दिसतात. [४७]

## ४) दुसरी एक वेदांतविषयक गोष्ट – माया –

फार पुरातन काळातील गोष्ट आहे. सर्वत्र प्रलय झाला. नवीन सृष्टी निर्माण करण्याची वेळ जवळ आली होती. प्रथम श्री भगवान विष्णुंच्या नाभिकमलांतून ब्रह्मदेवाची निर्मिती झाली. ब्रह्मदेवाने आपल्या मनापासून उत्पन्न केलेल्या एका मनूला जवळ बोलावून नवी सृष्टी निर्माण करण्याची आज्ञा दिली. ती आज्ञा महत्त्वपूर्ण मानून मनू कामाला लागला. मनूने वाळलेल्या बिया गोळा करायला सुरुवात केली. सर्व बियांच्या पुड्यांमध्ये तो मात्र मायेची पुडी गहाळ करून बसला. पावसाळ्याच्या सुमारास बिया टाकून नवीन सृष्टी निर्माण करण्यासाठी पुढे सरसावला. हळूहळू नवी सृष्टी निर्माण व्हायला सुरुवात झाली. परंतु मनुला मनुष्य प्राण्याची निर्मिती करण्यासाठी थोडाच वेळ मिळाल्याने त्याची धांदल उडाली. त्याचा परिणाम मनुष्याला भोगावा लागला. त्यामुळे मनुने एक दिवस आपला जाहिरनामा प्रसिध्द केला. त्यामध्ये तो म्हणतो, ''सर्व मानव हो, श्री भगवान विष्णुच्या आज्ञेवरून मी हे जग तुमच्याकरिता निर्माण करून दिले आहे. या जगात तुम्ही आनंदाने रहा. येथील सर्व पदार्थ तुमच्या उपभोगाकरिता मी निर्माण करून दिले आहेत. त्यांचा उपभोग घेऊन तुम्ही या जगताचा व्यवहार यथापूर्ण अव्याहतपणे पुढे चालू ठेवा!''

जाहिरनामा झाल्यावर लोक कामाला लागतील, असे समजून मनू विश्रांतीसाठी निघून गेला व आपले कार्य कसे करतात, हे पाहण्याचे कार्य त्याने नारदाकडे दिले. परंतु लोकांचे

संसाराचे गाडे काही केल्या चालू होईनात. नारदाने खूप काही उपाययोजना केल्या, निरनिराळी रुपे धारण करून मनुने निर्माण केलेल्या वस्तुंमध्ये गोडी, आवड निर्माण करण्याचा प्रयत्न केला. लोकांना घरे–दारे बांधून राहण्याचा सल्ला दिला. परंतु काही उपयोग झाला नाही. सर्वत्र अव्यवस्था निर्माण झाली. जगामध्ये भुताटकीचा काही तरी प्रकार असावा, असे नारदाला वाटल्याने त्याने मनूला भेटण्याचे ठरविले. नारद म्हणाला, ''हे मनो, काय सांगावे! आपण एवढ्या कष्टाने ही सृष्टी निर्माण केली. परंतु ती काही चालत नाही. हे आपल्याला कळविण्यात मला खेद वाटत आहे. आपण एवढी सृष्टी निर्माण करून ती अगदी फुकट गेल्यासारखी वाटत आहे. परंतु मनुष्यप्राणी मात्र हातावर हात आणि पायावर पाय ठेवून स्वस्थ बसून राहिले आहेत. आपल्या सृष्टीचे सौंदर्य आणि मनुष्याचे उदासीनत्व ही पाहून मला मोठे आश्चर्य वाटते. हे मनो, पृथ्वीच्या पाठीवर मोठा हाहाकार चालला आहे. कोणी कोणावर प्रेम करीत नाहींत आणि कोणी कोणाचा द्वेष करीत नाहीत. अजून कोणाच्यामध्ये स्नेहभाव उत्पन्न होत नाही. अजून कोणामध्ये असाधारण स्नेहभाव उत्पन्न होत नाही. मत्सर, हेवा, द्वेष यांचा गंधही नाही. अजून कोणी एक सुध्दा लबाडी करीत नाही. मग त्यांच्यासाठी कलह आणि रणे माजण्याची गोष्ट तर लांबच राहिली! अशा प्रकारची अत्यंत खेदजनक स्थिती हल्ली जगाची झाली आहे !''

नारदाची ही कथा ऐकून मनूला काही समजेना, तेव्हा आपण ही स्थिती ब्रह्मदेवाला सांगुन याचे खरे कारण महाविष्णुला विचारू असे ठरले. त्यानुसार ते ब्रह्मदेवाचे गेले व पुढे विष्णुकडे आहे. नारद व मनू यांनी बियांच्या याद्या परत तपासून पाहिल्या. काही चूक सापडेना. परंतु शेवटी भगवान विष्णुंनी अंर्तदृष्टीने बघितले. तेव्हा त्यांना मायेच्या बियांची पुडी पेरण्याची राहिलेली आहे. ही गोष्ट ब्रह्मदेव, मनू व नारदालाही समजली. त्यानुसार ही चुक कशी दुरुस्त करावी, यासाठी विष्णुच्या सल्ल्याने एक विहीर तयार करण्यात आली आणि त्या वहिरीतील पाण्यात मायेच्या पुढीतील बी कालविण्यात आले. या विहिरीला 'मायेची विहीर' असे नाव ठेवण्यात आले व माणसांना रात्री झोपल्यावर त्यांच्या अंगावर, एक, दोन पाण्याचे थेंब शिंपडावेत, असे ठरले. विष्णुंनी या विहिरीतील पाणी कशी आटणार नाही, असे सांगितले. मुर्खपणाच्या पाण्याच्या एक–दोन थेंबांनी सर्वांमध्ये टवटवीतपणा आला. धर्मशास्त्र उदयाला आली. क्रोध, कलह, मोह, मत्सर, इ. गोष्टी निर्माण झाल्या. संसारचक्र सुरु झाले. समाजामध्ये राजे आणि रंक, अमीर आणि फकीर, उच्च आणि नीच असे अनेक भेदभाव निर्माण झाले. या

मायेच्या मोहजालांतून जरी सर्वांची सुटका होत नसली तरी, सर्वांना निश्चितच आधीची स्थिती बरी होती, असेच वाटत राहणार. समाधान ज्यांना मिळाले तेच या मायेतून उत्तीर्ण झाले. या मायाजालातून सर्वांची मुक्तता होवो, सर्वांना सुख–सौख्य लाभो ही भगवंतांच्या चरणी प्रार्थना आहे.

मोह–मायाजालापासून दूर राहून चांगले जीवन जगावे, असा संदेश शि.म.परांजपे देताना दिसतात. [४८]

५) **विष्णुसहस्त्रनाम –**

आपल्याकडे विष्णुसहस्त्रनाम अतिशय प्रसिध्द आहे. कितीतरी लोक विष्णुसहस्त्रनामाचा पाठ केल्याशिवाय अन्नग्रहण करीत नाहीत. महाभारताच्या १४९व्या अध्यायामध्ये विष्णुसहस्त्रनाम हे स्तोत्र आलेले आहे. विष्णुंची एक हजार नावे त्यामध्ये आलेली आहेत. सुरुवातीला वेद, ब्राह्मणे, उपनिषदांमधून त्याचा उल्लेख होता. ऋकसंहिता, तैत्तरीय संहिता, तैत्तरीय ब्राह्मण, ऐतोय कौषीतकी, तैत्तरीय आरण्यक, बृहदारण्यक , तैतरीय उपनिषद, कठकेन, मुंडक, प्रश्न, छांदोग्य, श्वेताश्वतर, ईशावास्य इ. मधून पुष्कळ नावे आलेली आहेत. विष्णुपुराण, हरिवंश, भगवतगीता, स्मृतीग्रंथ, रामायण आदींमधून पुष्कळ नावे आलेली आहेत.

विष्णुसहस्त्रनाम भगवान व्यासांनी निर्माण केले आहे. विष्णुसहस्त्रनामामध्ये शर्व, शिव, स्थानु, शंभु रुद्र, हे शिव या अर्थाने विष्णुवाचक नावे आलेली आहेत. शिव आणि विष्णु या दोन्ही देवतांना समान मानले जाते.

दश नामसहस्त्राणि देवेष्णाह पितामह:!
शर्वस्य शास्त्रेषु तथा दशनामशतानि च ।।
श्रृणु नाम्नां चयं कृष्ण यदुक्तं पद्मयोनिना ।
दशनामसहस्त्राणि यान्याह प्रपितामहः ।।

या श्लोकावरून दहा हजार नावांचेही संग्रह पूर्वी कदाचित असावेत, असे दिसते. परंतु हल्ली तरी निदान ती संख्या दसपटीने कमी होऊन एक हजाराच्या वर आलेली आहे.''

''अशा रितीने या सहस्त्रनामांतील शब्द एकत्र गुंफिताना भगवान व्यासांनी एका पेक्षा एक वरचढ आणि एकावर एक कडी करणारे असेही जे काही शब्द कित्येक ठिकाणी एका पुढे

एक मांडिले आहेत. त्यांच्यापासून उत्पन्न होणारी हृदयंगमताही वाखाणण्यासारखी आहे. तशा प्रकारची काही उदाहरणे –

गुरुर्गुसत्तमः सहस्त्रजिदनंतजित्ः, इज्यो महेज्यश्चः, सनात्सनातनतमा, योगो योगाविदां नेतां, भोजनं भोक्ता, अन्नमन्नाद एवच; योगी योगीशः, धाता विधाता धातुरुत्तमः ही शब्दरचना एखाद्या श्रेणीप्रमाणे पायरी–पायरीने चढत जात असल्यामुळे समुद्रातील एकापेक्षा एक उंच–उंच लाटांवरून पोहत जाणाऱ्या भक्तिसागरामध्ये पोहणाऱ्या मनाला होऊन चढत–चढत भगवच्चरणारविंदापाशींच आपण चाललो आहों, अशी उदात्त भावना बध्दमूल होत जाते.''

''परमेश्वर जरी आज, नित्य, शाश्वत आणि पुराणही आहे. तरी 'तत् सृष्ट्वा तदेवनुप्राविशत्' या श्रुतीप्रमाणे हे जग निर्माण केल्यानंतर त्यामध्ये त्याने सर्वत्र प्रवेश केलेला आहे. हे अत्यंत उदात्त तत्व स्वयंजात, विष्णु, विश्व, सर्व, सर्वग या शब्दांनी प्रतिपादिले आहे.

भगवान विष्णुंनी आपल्या भक्तांसाठी, दुष्ट लोकांच्या विनाशासाठी विविध अवतार धारण केलेले दिसतात. विविध शस्त्रास्त्रे हातात घेतलेली दिसतात.

'अहं ब्रह्मास्मी' या वाक्याने सर्वत्र प्रकाश पसरला आहे. ज्ञानरुपी भगवान विष्णु प्रत्येक जीवाला निःसंशयपणे मुक्ती देतील, हे वचन जगात नेहमी दुमदुमत आहे. [४९]

## ६) मेघदूतावरून कालिदासाविषयी –

प्राचीन काळातील एक महान कवी व नाटककार म्हणून कालिदास सर्वांना परिचित आहे. कालिदासांच्या कालखंडाबाबत अनेक मतप्रवाह आहेत. भोजराजा किंवा हुण लोकांच्या काळातील कालिदास असावेत, असे मत मांडतात. कालिदासाच्या मेघदूत काव्यावरून भूगोलविषयक गोष्टी प्रकाशात येतात. ''मेघदूतामधील गोष्ट अगदी साधी आहे. ती अशी की, कुबेराच्या शापामुळे अलकेंतील कोणी एक यक्ष एक वर्षभर तेथे असताना आषाढाच्या महिन्यांत अतिशय विरहोत्कंठित होऊन तो एका मेघाला दूत म्हणून आपल्या प्रिय पत्नीकडे अलकेला पाठविण्याला प्रवृत्त झाला आहे. एवढीच काय ती या काव्यांतील गोष्ट आहे. या मेघाने अलकेला जाताना कोणत्या वाटेने जावे हे कालिदासाने आपल्या मेघदूत काव्यांत सांगितले आहे.''

रामगिरी, माल, आम्रकुट, रेवा, दशार्ण, विदिशा, वेगवती, निचैर्गिरी, उज्ञयिनी, निर्विध्या, सिंधु, अवंति, सिप्रा, गंधवती, गंभीरा, देवगिरी, चर्मण्वती, दशपूर, ब्रह्मावर्त, कनखल, क्रौचरंध्र व कैलास या मार्गे मेघाने आपला प्रवास करावा, असे वर्णन आलेले आहे. सरळ वाट, सरळ रस्ता असताना वाकड्या–तिकड्या मार्गाने का जायला सांगितले असेल? असा प्रश्न उभा राहतो. परंतु या मार्गांचा कालिदासाला निश्चित परिचय असावा, असे दिसते. कालिदासाचे या प्रदेशांवर प्रेम असावे, असे समजते. या भूमीवर, प्रदेशावर त्याचे अनोखे नाते असावे, असे दिसते.

ज्या विदेशेचे वर्णन कालिदसाने मेघदूतामध्ये केलेले आहे, त्याच विदेशेचा उल्लेख कालिदासाच्या मालविकाग्निमित्र नामक नाटकामध्ये आलेला आहे. मेघदूतांतील आणि मालविकाग्निमित्रांतील विदिशा नगरी ही एकच होय, हे निर्विवाद आहे. विदिशेचा राजा अग्निमित्र हा ऐतिहासिक राजा आहे. अग्निमित्राला नायक कल्पून 'मालविकाग्निमित्र' हे नाटक लिहिलेले आहे. मेघदूतांतील बारीक–सारीक स्थळांच्या वर्णनांवरून कालिदास हा त्या प्रांतातील जन्मभूमींतील रहिवासी असावा, हे अनुमान काढण्याला जशी जागा मिळते, त्याचप्रमाणे अग्निमित्राच्या कारकिर्दीला बारीकसारीक गोष्टींचा उल्लेख मालविकाग्निमित्र नाटकांत आलेला असल्यावरून कालिदास हा अग्निमित्राच्या किंवा त्याच्या जवळच्या काळांतील रहिवासी असावा, असे अनुमान काढण्याला जागा मिळते.''

अगदी बारीकसारीक गोष्टी कालिदासाला माहित होत्या. यावरून अग्निमित्र राजाच्या काळाच्या जवळपासच्या काळात कालिदासाचा जन्म झालेला असावा. मेघदूतावरून वर्णन झालेले कालिदासाचे स्थळ आणि मालविकाग्निमित्र यावरून दिसलेली कालिदासाची वेळ सारखीच असून त्यामध्ये एकवाक्यता दिसते. मेघदूतावरून भूगोलविषयक व मालविकाग्निमित्र या नाटकावरून इतिहासविषयक अनेक गोष्टींचा अभ्यास होतो, यात शंका नाही.[५०]

## ७) चारुदत्त आणि मृच्छकटिक (पृ. १०२ ते १४०) –

भास कवीची नाटके पुनरुज्ञीवित झाल्याने सर्वांना मनःपूर्वक आनंद होत आहे. जवळ–जवळ बारा–तेरा नाटके आली आहेत. चारुदत्त हे त्यातील शेवटचे नाटक होय. चारुदत्त आणि मृच्छकटिक या नाटकाची तुलना होणे महत्त्वाचे आहे. चारुदत्त व मृच्छकटिक या दोन्ही

नाटकांतील पहिल्या चार अंकात भरपूर साम्य आढळते. दोन्ही नाटकांत थोडा–बहुत फरक आढळतो.

सर्व अंकांतील मुग्ध विनोद शूद्रकाने स्पष्ट करून जास्त प्रमाणात खुलविण्याचा प्रयत्न केलेला आहे. शूद्रकाच्या काव्यातून मार्मिकता स्पष्ट होताना दिसते. भासापेक्षा शूद्रकाच्या रचनेतून अधिक कुशलता स्पष्ट होते. हास्यरस ही प्रकट होतो. भासाच्या सुंदर कल्पना, उत्तम सौंदर्याने नटविण्याचे काम शूद्रकाने केलेले आहे. भास कवीच्या कल्पना नवीन रुपात मांडण्याचे काम केले आहे. विनोद आणि कल्पना अधिक उत्तमरितीने शूद्रकाने मांडलेल्या दिसतात. भासाच्या काव्यातून कल्पना घेऊन शूद्रकाने आपल्या लेखनात मौज आणलेली दिसते.

याप्रमाणे चारुदत्त आणि मृच्छकटिक या दोन नाटकांची तुलना करून पहाता त्यात जे विशेष महत्त्वाचे फरक दिसते, त्यापैकी काही वर सांगितले आहेत. त्यावरून असे दिसून येते की, भासाच्या कृतीमध्ये शूद्रकाने बऱ्याच चांगल्या नवीन सुधारणा केल्या आहेत. ह्या अशा किरकोळ सुधारणा शूद्रकाने काही काही भाषणांतून केलेल्या आहेत. तशा गोष्टींच्या रचनेमध्येंही त्याने सुधारणा केल्या आहेत. परंतु चारुदत्त नाटकाचे चारच अंक उपलब्ध झालेले असल्यामुळे या बाबतीमध्ये जास्त तुलना करून पाहण्याचा मिळावी तितकी जागा मिळत नाही.

शि.म.परांजपे यांच्या मतानुसार, ''आता जो शूद्रक भासाचे सगळे अंकच्या अंक उचलून घेतो. तो भासाच्या या वरील सर्व कल्पना घेऊन आपल्या मृच्छकटिक़ नाटकाच्या पुढील सहा अंकांतून घालू शकणार नाही, असे नाही. परंतु एवढ्याच कल्पना मात्र शूद्रकाने भासाच्या इतर नाटकांतून उचलून घेऊन मृच्छकटिकांत घातल्या असतील आणि बाकीचा भाग त्याने स्वतः लिहिला असेल, असे मानावे, तर या कल्पनांत असे काय मोठे अद्वितीय आहे की, ज्यासाठी त्या कल्पना उचलून घेण्याचा कोणालाही अनिवार मोह उत्पन्न झालाच पाहिजे? तसे त्यांच्यात काही विशेष सौंदर्य नाही. परंतु एकच कवि असला म्हणजे तेच तेच काही ठराविक विचार फिरून–फिरून त्याच्या निरनिराळ्या लेखांतून स्वाभाविकपणेंच येतात. अशी मात्र पुष्कळ उदाहरणे आढळतात. म्हणून ही वर दिलेली सर्व प्रमाणे एकत्र केली तर भासाचे पुढील अंक असणे असंभाव्य आहे, असे वाटत नाही. तरी याच्या उलट पुढल्या अंकातील गोष्टींच्या परिपूर्णतेसाठी रोहसेन, आर्यक, शकाराचा चेट, इ. जी पात्रे आधीपासून यावयाला पाहिजेत,

ती भासाच्या ‘चारुदत्त’ नाटकाच्या पहिल्या चार अंकात उल्लेखित केली गेलेली नाही. अशा काही गोष्टी वरील कल्पनेला विरोध करणाऱ्याही आहेत. त्यामुळे जास्त काही साधने उपलब्ध होईपर्यंत हा प्रश्न अशाच संशयात्मक स्थितीमध्ये सोडून हा विषय पूरा करणे भाग आहे. [५१]

## ८) प्रियदर्शिका, नागानंद ही नाटके कोणाची? –

भास कवीची अनेक नाटके प्रकाशात आलेली आहे. संस्कृत भाषेतील ही नाटके ओजस्वीपूर्ण भाषेत लिहिलेली आढळतात. भासाने लिहिलेल्या अनेक नाटकांमध्ये प्रियदर्शिका, नागानंद, रत्नावली या नाटकांचाही समावेश होतो, असे समजण्यात येते. शि.म.परांजपे यांनी म्हटल्याप्रमाणे ‘‘वर सांगितलेल्या तीन नाटकांचे कर्तृत्व त्या–त्या नाटकांतील प्रस्तावनेमधील निर्देशाप्रमाणे श्रीहर्ष नामक एका राजाकडे जाते. परंतु सुप्रसिध्द काव्य प्रकाशकार मम्मटभट्ट याने ‘काव्य’ यशसिऽकृते’ या काव्य प्रकाशांतील प्रारंभीच्याच एका कारिकेवर टीका लिहितांना काव्यरचनेपासून अर्थ प्राप्ति कशी होते, हे दाखविण्याकरिता ‘श्रीहर्षादर्धावकादीनामिव धनम्’ असे एक उदाहरण दिले आहे. या उदाहरणांतील भावार्थ असा आहे की – श्रीहर्ष नावाचा पूर्वी कोणी एक राजा होऊन गेला. त्याच्या पदरी धावक या नावाचा कोणी एक कवी होता. त्या धावक नावाच्या कवीने रत्नावली, प्रियदर्शिका आणि नागानंद अशी नाटके लिहून ती त्या राजाच्या नावाने प्रसिध्द केली आणि त्याबद्दल त्या हर्ष राजाकडून धावकाला पुष्कळ द्रव्य मिळाले.

या धावकासंबंधाने अशी एक हकीकत अलिकडे कित्येक टीकाविषयक लेखांतून प्रसिध्द झाली आहे की, भास कवी हाच धावक होय. ‘धावक’ म्हणजे कपडे धुणारा परीट. भास या जातीचा परीट होता. म्हणून त्याला ‘धावक’ असेही म्हणत असत. या धावकाने म्हणजे भासाने, पुष्कळ नाटके लिहिलेली असल्याचे उल्लेख पूर्वीच्या संस्कृत वाङ्मयामध्ये आढळतात. भासकवि हा धावक असूनही तो सर्व कवींमध्ये श्रेष्ठ होता. आणि त्याने प्रियदर्शिका, रत्नावली, नागानंद, उदात्तराघव, किरणावलि, इ. अनेक नाटके लिहिलेली आहे.

**प्रियदर्शिका –** हे नाटक भास कवीनेच लिहिलेले आहे, हे स्पष्ट होते. इतर नाटकांमध्ये भासाची लिखाणाची पध्दत, प्रसंग आदि प्रियदर्शिका नाटकामध्येही दिसतात.

नाटकाच्या चौथ्या अंकात प्रियदर्शिका ही विषप्राशनाच्या योगाने बेशुध्द झालेली असता तिच्यावर प्रेम करणारा नायक वत्सराज हा नागलोकांतून जाऊन आलेला असल्यामुळे त्याला विषविद्या  चांगली माहित असल्याकारणाने त्या विद्येतील मंत्राचा प्रयोग करून प्रियदर्शिकेला सावध करावे म्हणून सर्वजण त्याची विनंती करू लागतात. यावरून 'प्रियदर्शिका' ही दुसऱ्या कोणाची नसून वत्सराजाप्रमाणे ती फक्त भासाचीच असली पाहिजे. याबद्दल खात्री वाटते.

प्रियदर्शिकेमधील कित्येक शब्द कल्पना, वाक्ये आणि श्लोक रत्नावली आणि नागानंद ह्या नाटकांतून आढळून येत असल्याकारणाने जर प्रियदर्शिका भासाची आहे, तर रत्नावली व नागानंद हो नाटकेंही भासाचीच असली पाहिजेत.

**नागानंद –** शि.म.परांजपे यांच्या अभ्यासानुसार –

ध्यानव्याजमुपेत्य चिन्तयसि कामुन्यील्य चक्षुः क्षणं
पश्यानंगशरातुरं जनमिमं त्रातापि तो रक्षासि ।
मिथ्याकारुणिकोऽसि निघृणतरस्त्वत्तः कुतोऽन्यः पुमान्
सेर्ष्य मारवधुभिरित्यमिहितो बुध्दो जिनः पातु वः ।।

हा नांदीचा श्लोक म्हणून आलेला आहे. पंचतंत्र हा ग्रंथ ख्रिस्ती शकानंतरच्या सहाव्या शतकामध्ये झालेला असला पाहिजे, असे मानण्यात येते आणि श्रीहर्षाचे म्हणून मानले गेलेले नागानंद हे सातव्या शतकातील होय असे मानण्यात आलेले आहे. आणि म्हणूनच सातव्या शतकांतील नागानंदाच्या नांदीचा श्लोक सहाव्या शतकांतील पंचतंत्रामध्ये कसा जावा हा मोठा प्रश्न आहे. भासाच्या नाटकांच्या प्रसिध्दीमुळे हे सर्व प्रश्न दूर होतात. कारण आता नागानंद हे श्रीहर्षाचे नसून भासाचे आहे, हे सिध्द होत आहे.

स्वगृहोदयानगतेपि स्निग्धे पापं विशंक्यते स्नेहात् ।
किमु दृष्टबम्हपायप्रतिभयंकांतारमध्येस्थे।।

ही आर्या पंचतंत्रात उपयोगात आणलेली आहे. यावरूनही सातव्या शतकांतील श्रीहर्षाचे नागानंद हे नाटक असणे अशक्य आहे. यावरून नागानंद हे ही नाटक कवी भासाचेच आहे, हे आपल्याला कबुल करावे लागते. [५२]

## साहित्य संग्रह भाग २ –

### १) एक जुनी पुराणांतरीची नवीन सापडलेली गोष्ट –

'बहुरत्ना वसुंधरा' म्हणजेच पृथ्वीच्या पोटात काय सापडेल याचा नियम नाही. पृथ्वी आणि समुद्र हे दोन घटक अनंत आणि अगम्य आहेत. पृथ्वीवर व समुद्रात कित्येक गडप झालेल्या गोष्टी पुन्हा प्रत्यक्षात येतात. जुन्या गोष्टी वर्तमानकाळात प्रसिध्दीस येतात. त्यातून बरेचसे सत्य पुढे येत असते.

सर्व सृष्टीचा नियंता विष्णु आहे. सर्व सृष्टीचे कामकाज पाहण्याचे कार्य त्याच्याकडेच असते. विष्णुची दृष्टी दूर व कारकिर्द करडी असल्यामुळे कोणाला फारशी संधी मिळत नसे. पूर्वी पशूंनाही  मनुष्याप्रमाणे वागावे, असे वाटत होते. मनुष्यात आणि आपल्यात फरक ठेवलेला आहे, याला जबाबदार विष्णुच आहे, असे पशूंना सतत वाटत असे. ही परिस्थिती बदलण्यासाठी काही तरी करावे, असे पशूंना वाटत होते. शंकराकडे जाऊन आपल्याला चांगली वागणूक मिळावी, म्हणून प्रयत्न सुरू झाले. नंदी, बैल, टोणगे आणि गाढवांनी तशा प्रकारचे प्रयत्न केले. माणसांचा व पशूंचा सहवास दिवसेंदिवस वाढत गेला. माणसांनी आपल्यासाठी प्रतिष्ठित भाषा केली आहे. आपल्यासाठी अपशब्द वापरले जातात, याची जाणिव पशूंना झाली. 'अहो, पशु महाराज आपण जलपान करावे', अशी सभ्यपणे विनंती करावी. एखादे जनावर रस्त्यामध्ये उभे असेल तर त्याला हैक, हैक न म्हणता, ''अहो जनावर महाराज जरा बाजूला सरण्याची आपण तसदी घ्याल का? असे नम्रतापूर्ण विचारावे. अशा प्रकारामुळे जगात राहण्याला अवघड परिस्थिती निर्माण झाली. सर्व शहाणे लोक हताश झाले. अखेर सरस्वती देखील ब्रह्मलोकी जाण्यास निघाली. तिलाही जगणे असह्य झाले. पृथ्वीवर जिकडे–तिकडे काहूर माजले. विष्णुशिवाय या संकटाचे निवारण होणार नाही, याची सर्वांना जाणीव झाली. शंकराचे भोळेपण, पशूंचा व मुर्ख माणसांचा मूर्खपणा याची जाणीव विष्णुला झाली. विष्णूने प्रथम सर्व पशूंची बंधने काढून टाकली. नंतर बेलदार, वडारी, कुंभार, परीट, गवळी, शेतकरी लोकांचे संघ तयार केले. त्यानुसार नंदीबैल, टोणगे, यांना आपल्या कामाकरिता वापरा. त्यांच्याकडून शेतीची कामे करून घ्या. तुमच्या कामात नक्कीच यश येईल, असा विष्णुने आशिर्वाद दिला.

हळूहळू मनुष्य व पशू यांच्यातील अंतर सर्वांच्या लक्षात आले. पशूंचे बंड विष्णूने मोडून काढले. आपल्याला काही उःशाप मिळावा या हेतूने बैल विष्णुकडे गेले. तेव्हा वर्षातून एक दिवस तुम्ही तुमच्या मनाप्राणे वागा, असे सांगितले. तेव्हापासून या दिवसाला 'बैलपोळा' या नावाने ओळखले जाऊ लागले ते आजपर्यंत.[५३]

२) धर्मप्रसाराच्या पध्दतीचा बौध्द धर्मातील एक नमुना –

(भाग पहिला – पूर्व पक्ष, भाग दुसरा – उत्तर पक्ष)

गौतम बुध्द मोठा भिक्षु संघ घेऊन मनसाकट गावी आमराईमध्ये राहत होता. त्या गावात मोठी ब्राम्हणवस्ती होती. तो देय्य, चंकी, जानुश्रोणि, पोक्करसाति, तारुख्ख, इ. मोठ–मोठे श्रीमंत ब्राह्मण त्या गावात राहत असत. त्यांच्यामध्ये ब्रह्मप्राप्तीच्या मार्गाची चर्चा सुरू असते. त्या गावातील भारद्वाज व वसिष्ठ या दोन ब्राह्मणांमध्ये ब्रह्मप्राप्तीचा खरा मार्ग कोणता ? या विषयी वाद निर्माण झाला. हे दोघेही गौतमबुध्दांकडे आपल्या शंकेचे निरसन करण्यासाठी जातात. त्यांच्यामध्ये बरीच चर्चा होते. त्यानुसार ''या संसारामध्ये मनुष्याला बांधणाऱ्या पाच शृंखला आहेत. चक्षुरिंद्रिय, श्रोत्रेंद्रिय, घाणेंद्रिय, रसनेंद्रिय आणि त्वगिंद्रिय या पाच इंद्रियांचे जे विषय त्यांना बंधन किंवा शृंखला असे म्हणतात. या शृंखलेने हे त्रौविद्य ब्राह्मण बध्द झालेले असतात. असले ब्राह्मण मरणोत्तरकाली, ब्रह्मसायुज्याप्रत पावू शकतील ही गोष्ट घडून येणे कधीही संभवनीय नाही.'' तसेच मनुष्याला या संसारात पाच आवरणें आहेत. काम, मत्सर, आलस्य, गर्व आणि शंका ही ती पाच आवरणे आहेत. या पाच आवरणांनी हे त्रैविद्य ब्राह्मण अवगुंठित झालेले आहेत. आवृत्त झालेले ब्राह्मण मरणानंतर ब्रह्मसायुज्याप्रत जाऊन पोहोंचतील अशी स्थिती असणे, अगदी असंभवीनय आहे.

वरिष्ठ गौतम बुध्दाला म्हणतो की, ब्रह्मप्राप्तीचा मार्ग तुम्हाला माहित आहे. आम्हाला सांगितला तर ब्राह्मण जातीचा उध्दार होईल. अशाप्रकारे गौतम बुध्दांनी वसिष्ठांची विनंती मान्य केली व ब्रह्मप्राप्तीचे वरिष्ठाला निरुपण केले. त्यांचे सर्व ऐकून वसिष्ठाने पुढे बौध्द धर्माची दीक्षा घेतली.

गौतमबुध्दांनी अरण्यात जाऊन तपश्चर्या केल्यावर त्यांना ज्ञान स्फुरले. बौध्द धर्माची स्थापना करून वेदिक धर्माच्या विरुध्द बौध्द धर्माचा प्रसार करण्याचे काम त्यांनी केले आणि

थोड्याच काळात बौध्द, धर्म सर्वदूर पसरला. बौध्द, ख्रिस्ती व मुस्लीम धर्मियांनी अनुयायांची संख्या वाढविली व धर्माचा मोठ्या प्रमाणावर प्रसार केल्याचे दिसते. गौतम बुध्दाने काशी, भारद्वाज, अग्गिक भारद्वाज, कोसल देशांतील ब्राम्हण सुंदरिक भारद्वाज, समिय सेल, इ. ब्राह्मणांना बौध्द धर्माची दीक्षा घ्यायला भाग पाडले. वसिष्ठ– ब्रह्मप्राप्तीचा ब्राह्मणांनी सांगितलेला मार्ग बरोबर आहे की नाही हे विचारण्यासाठी गौतमाकडे गेला. तेव्हा गौतमाने केलेला युक्तिवाद – ब्रह्म हे ज्या अर्थी कोणालाही दिसलेले नाही, त्याअर्थी त्या ब्रह्माप्रत जाऊन पोहोचण्याचा मार्ग कोणीही ब्राह्मण दाखवू शकणार नाही? यातून ब्राह्मण धर्मापेक्षा बौध्द धर्म जास्त आहे, हे दाखवायचे होते. भृगु, कश्यप, वसिष्ठ, भारद्वाज, अंगीरस, जमदग्नि, विश्वामित्र, अशा दिग्गजांनी खूप मोठी तपश्चर्या केलेली आहे. ब्रह्म कोणीच पाहिले नसल्याने प्राप्तीचा मार्ग ब्राह्मण दाखवू शकत नाहीत, त्याचप्रमाणे गौतमबुध्दही हे दाखवू शकणार नाहीत, असेच म्हणावे लागते.

लेखाच्या शेवटी शि.म. म्हणतात, ''पाठीमागून उशिरा आलेल्या बहुतेक धर्म संस्थापकांचा इतिहास पहावा, जो तो उठतो तो आपल्या धर्माचा प्रसार करावयाला लागतो! परंतु ही धर्मांतरे करीत बसण्यात काही अर्थ नाही, हे तत्त्व फक्त आमच्या एका आर्यधर्माने जाणले आहे व अंमलातही आणले आहे. ''माझ्या धर्मात या, माझ्या धर्मात या, माझा माल दुसऱ्यापेक्षा चांगला आहे,'' असल्या दुकानदारी चढाओढी बहुतेक धर्म प्रचारकांनी केलेल्या आहेत. फक्त 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः!' हे उदार आणि उदात्त तत्त्व प्रतिपादन करणारा भगवान श्रीकृष्ण आमच्या एका आर्य धर्मामध्येंच निघालेला आहे! तो आपल्या या आर्य धर्माचे अखंड रक्षण करो!''[५४]

## ४) इफिजीनिआ आणि ऑरेस्टेस –

एशियामायनर हा एक प्रसिध्द देश होता. तेथील पश्चिम किनाऱ्यावर सुरुवातीला ट्रॉय नावाचे शहर होते. तेथे प्रायम या नावाचा राजा राज्य करीत होता. त्याच्या सर्व मुलांमध्ये पॅरिस नावाचा राजपुत्र अतिशय सुंदर, रुपवान असतो. ट्राय शहरापासून जवळच ग्रीस हा देश होता. पूर्वी ग्रीसमध्ये अनेक लहान–लहान संस्थाने होती. एका संस्थानावर मिनिलॉस हा राजा राज्य करीत होता. तर त्याचा भाऊ अगॅमेमनन हा राजा करीत होता. एकदा ट्रॉय येथील राजपुत्र

पॅरिस हा ग्रीसचा राजा मिनिलॉस याच्याकडे पाहुणा म्हणून आला आणि त्याने मिनिलॉस याची पत्नी राणी हेलन हिला पाहिले आणि दोघेही एकमेकांच्या प्रेमात पडले. पुढे पॅरिस याने हेलन हिला पळवून ट्रॉय येथे नेले.

हा प्रकार पाहून आणि ऐकून ग्रीसमधील सर्व राजांना व मिनिलॉस या राजाला प्रचंड संताप झाला. सर्वांनी मिळून ट्रॉयचे राज्य जिंकणे व राणी हेलनला परत आणणे हे ध्येय ठरविले आणि कामाला लागले. प्रत्येक राजा आपले सैन्य, शस्त्रास्त्रे, जहाजे, गलबते घेऊन समुद्रकाठी सज्ज झाला. मिनिलॉसचा भाऊ अगॅमेमनन हा सर्वात शूर असल्याने सर्व सैन्याचा सेनापती झाला. परंतु त्याला एक दृष्टांत झाला. ''तू आपली मुलगी देवतांच्याप्रित्यर्थ बळी देशील तरच तुझ्या हाताखालील सर्व सैन्य सुरक्षितपणे ट्रॉयला जाऊन पोहोचेल, नाहीतर तुझी गलबते समुद्रांत मधेच कोठेतरी अडकून पडतील.'' परंतु असा दृष्टांत झाल्यावर अगॅमेमननचे मन प्रचंड अस्वस्थ झाले. काय करावे हे त्याला आजिबात सुचेना. त्यातून तो आपल्या बायकोला पत्र लिहितो, आपली मुलगी इफिजिनीआ हिचे लग्न ॲकिलिस नावाच्या ग्रीसमधील एका अतिशय शूर राजा बरोबर करून द्यावयाचे आहे. या करिता तू आपल्या मुलीला घेऊन लवकर तेथे यावे.'' लग्नाच्या बहाण्याने बोलावून मुलीचा बळी द्यावा,असे त्याला वाटत असते. परंतु यामध्ये मिनिलॉस व अगॅमेमनन यांच्यामध्ये वाद होतात. परंतु एक गुप्तहेर माहिती देतो. महाराज, आपली मुलगी इफिजीनिआ हिला  आपले आज्ञेप्रमाणे मी घेऊन आलो आहे. तसेच राणीसाहेब, क्लायटेमनेस्ट्रेस ह्याही आपल्या आहेत आणि त्यांनी आपले धाकटे चिरंजीव ऑरेस्टेस यांनाही बरोबर आणले आहे. सर्वांमध्ये विविध संवाद होतात. लष्कर कंटाळून गेलेले असते. ते आपापल्या घरी जाण्याच्या तयारीत  असते. राणीला आणि मुलीला सर्व काही समजते. सर्व लष्करामध्ये गोंधळ माजलेला आहे. राजाने मुलीचा बळी दिलाच पाहिजे. इफिजीनिआ हिने सर्व गोष्टी ऐकल्या. सर्व ग्रीसदेश माझ्याकडे पाहत आहे. मी देह अर्पण केला नाही तर शत्रुचा सुड उगवला जाणार नाही. '' बाबा, चला उठा, द्या मला त्या देवतांना बळी आणि माझ्या देशबांधवांच्या सैन्याला जाऊ द्या. ट्रॉयच्या यशस्वी मोहिमेवर! ह्याच्याच योगाने माझे नाव अजरामर होईल!'' हे ऐकून ॲकिलिस प्रभावित झाला. परंतु मुलीच्या धाडसाचे कौतुक करून अगॅमेमनन मात्र रडू लागला. त्याला काही सुचेना. ''बाबा, तुम्ही का रडता? आपल्या देशांतील लोकांच्या विजयाकरिता मी आपल्या खुशीने आपल्या देहाचा बळी समर्पण

करण्याला सिध्द झाले आहे! आणि त्याबद्दल माझी परमेश्वरापाशी एवढीच प्रार्थना आहे की, त्याने आता तुम्हांला या लढाईमध्ये पूर्ण यश द्यावे आणि तुम्ही सर्वांनी विजयी होऊन सुखरुपपणे आपल्या घरी जावे! तेव्हा आता कोणी माझ्या आड येऊ नका आणि देवीला बळी देण्याकरिता मला आपली मान संतोषाने पुरे करू द्या!'' पुढे मोठा चमत्कार घडून आला. कॅलकसच्या तलवारीचा आवाज सर्वांनी ऐकला. परंतु त्याच क्षणी राजकन्या अदृश्य झाली. ती कोणालाही दिसली नाही. ती कोठे गेली? तिचे काय झाले? ते कोणालाही कळले नाही, मात्र तिच्या जागी एक हरिणी त्या तलवारीचा घाव लागून विव्हळ होऊन पडलेली दिसली. राजकन्येऐवजी दुसरा बळी घेऊन देवीनेच राजकन्येचा जीव वाचविला आहे. तिच्यावर दया केली आहे. हा सर्व विधी झाल्यावर ग्रीक सैन्याने कूच केले. ट्रॉयचा पूर्ण पराभव झाला. ग्रीस देशाचा पूर्णपणे विजय झाला. परंतु अगॅमेमनन याच्या घरची स्थिती पूर्णपणे बदलेली हाती. त्याची बायको क्लायटेमनेस्ट्रा हिचे मनात एजिस्थसबद्दल प्रेम निर्माण झाले होते. अगॅमेमनन याचे स्वागत करण्याऐवजी क्लायटेमनेस्ट्रा एजिस्थसच्या मदतीने अगॅमेमनन याचा खून करते. त्याचा मुलगा ऑरेस्टेस याचाही खून होणार होता. परंतु त्याची बहिण इलेक्ट्रा ही त्याचे प्राण वाचविते व अगॅमेमनन याच्या एका मित्राच्या घरी ठेवते. तेथेच तो लहानाचा मोठा होतो. मोठ्या झाल्यावर बापाच्या सुडाचा बदला घेण्याचे तो मनाशी पक्के ठरवितो. त्यानुसार वेषांतर करून आरगॉस या शहरात येतो. त्याच्याबरोबर एक जुना नोकर, पिलॅडिस हा त्याचा मित्र, असे तिघे एकत्र येऊन योजना आखतात. ऑरेस्टेस मरण पावला आहे असे भासविण्याचा ते प्रयत्न करतात. ऑरेस्टेसची बहिण इलेक्ट्रा व तिच्या आईचे आजिबात पटत नसते. तुझ्या बापाचे कृत्य मला अजिबात पटले नाही, म्हणून मी त्याला संपविले, असे सांगते. दोघींमध्ये बराच काळ भांडणे होत राहतात. त्याच दरम्यान एक नोकर येऊन तुमचा मुलगा ऑरेस्टेस मरण पावला आहे, अशी बातमी देतो. ती बातमी खरी आहे का? असे विचारते. त्याच्या बापाला मी मारल्यामुळे कदाचित माझा सुड घेण्यासाठी तो येऊ शकतो. पण बातमी खरी असेल तर मी काळजीतून मुक्त होईल, असे राणी म्हणते. ऑरेस्टेसची बहिण इलेक्ट्राला मात्र खूपच वाईट वाटजे. ऑरेस्टेस तू येण्याची मी मनापासून वाट पाहत होते .मला फार दुःख झाले आहे. ज्यांनी आपल्या वडिलांचा खून केला आहे, त्यांच्याबरोबरच मला रहावे लागत आहे. ऑरेस्टेस वेष बदलून आपल्या बहिणीला बोलत असतो. शेवटी ऑरेस्टेस आपली खरी ओळख सांगतो.

त्यावेळी इलेक्ट्राला खूप आनंद होतो. सुड कसा घ्यायचा, याची दोघांमध्ये खूप चर्चा होते. राजा एजिस्थस राजवाड्यात नाही, हे पाहून तो आपली आई क्लायटेमनेस्ट्रा हिला ठार मारतो. राणीचे प्रेत पाहिल्याबरोबर राजा एजिस्थस म्हणतो, ''तर मग तू ऑरेस्टेसच असला पाहिजेस!'' यात काय संशय? मी ऑरेस्टेसच आहे. आणि तू माझ्या बापाला जेथे मारिलेंस तेथे तुझा खून पाडण्याकरिता मी आलो आहे!' असे म्हणून त्याला आत ओढून नेतो व त्याला ठार मारतो. बापाच्या खुनाच्या सुडाचा बदला घेण्याची प्रतिज्ञा पूर्ण करतो. या कथेमध्ये बहिण इफिजीनिआ व ऑरेस्टेस या दोन भावा-बहिणीच्या योगदानाची चर्चा केलेली दिसते. [५५]

५) श्रध्दा -

मनुष्याच्या जीवनामध्ये 'श्रध्दा' या धर्माला अनन्यसाधारण महत्त्व असते. श्रध्दा आणि संशय या दोन्ही गोष्टी अगदी विरुध्दच्या असतात. ज्या ठिकाणी संशय आहे, त्या ठिकाणी श्रध्दा कधीही उत्पन्न होणार नाही. प्रामाणिक आणि लबाड मनुष्य श्रध्दा आणि संशय या दोन घटकांपासून ज्ञात होतात. 'संशय' हा मनाचा पहिला धर्म आहे आणि श्रध्दा हा मनाचा दुसरा धर्म आहे.' जसे फुल आधी, मग फळाची निर्मिती होते. त्याचप्रमाणे आधी संशय उत्पन्न होतो. मग श्रध्देची निर्मिती होते. प्रत्येक व्यक्तीचे विषयाचे ज्ञान समजते. संशयाचे निरसन होते. प्रत्येकाच्या मनात प्रथम संशय उत्पन्न होतच असतो. श्रध्देसाठी कोणाच्या पुढे-पुढे करण्याची गरज वाटत नाही.

''ज्ञानाच्या बाजारात श्रध्दा हे एक गरीबीचे पण प्रामाणिकपणाचे लक्षण आहे. जो सर्वज्ञ परमेश्वर आहे किंवा जे त्याच्याच कृपेने सर्वज्ञ महात्मे झालेले आहेत आणि त्यामुळे ज्यांना सर्व गोष्टी प्रत्यक्ष दिसत आहेत. त्यांना ज्ञानाच्या बाजारांतील त्या धनाढ्यांना - त्या लक्षाधीशांना त्या कोट्याधीशांना - श्रध्देची काही किंमत नाही. ज्यांच्यापाशी रोज पैसा असतो, त्यांना उधारीची काय जरूर ? त्यांना श्रध्देच्या उधारीची कधी गरज पउत नाही. मनुष्याला परमेश्वराने पाचच ज्ञानेंद्रिये दिलेली आहेत. मानवाचे सहावे इंद्रिय श्रध्दा हे होय. श्रध्देपासून ज्ञानाला खरी सुरुवात होते.''

ज्याप्रमाणे मनुष्याच्या जीवनात श्रध्देला स्थान आहे, त्याप्रमाणे त्याचे जीवन घडत असते. श्रध्दा आणि संशय या दोन घटकांचा विचार केल्यास जाणवते. मनाची संशय ही अत्यंत

नीच वृत्ती आहे. श्रध्दा ही मनाची अत्यंत उदात्त आणि उच्च वृत्ती आहे. संशय घेणे हे फार सोपे काम आहे. परंतु एखाद्यावर श्रध्दा ठेवणे हे फार कठीण काम आहे. विवेकी मनुष्याला श्रध्दा ठेवणे सोपे जाते. अविवेकी मनुष्याला श्रध्दा ठेवणे अवघड जाते. जसे पेराल, तसे उगवेल. संशय ठेवला तर संशय वाढेल. श्रध्दा ठेवली तर श्रध्दा वृध्दींगत होईल.

''अजश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ।
नाथं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः।।
अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परन्तप।
अप्राप्य मां निवर्तन्ते मृत्युसंसार वर्त्मनि।।
अश्रध्दया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतंच यत् ।
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह।।

या वर दिलेल्या भगवदुक्तीमध्ये संशयी वृत्तीचे आणि अश्रध्देचे फार भयंकर परिणाम वर्णिले आहेत. अध्यात्मविषयक प्रश्नांच्या बाबतीमध्ये अश्रध्दा असल्याच्या योगाने जी पारलौकिक फलें ती तर अंतरतातच, परंतु ऐहिक सुखाचाही त्यापासून नाश हातो. ''नाशं लोकोऽस्ति न परः'', ''निवर्तन्ते मृत्युसंसारवर्त्मनि'', ''न च तत्प्रेत्य नो इह'' या वचनांत इह–पर अशा दोन्ही ठिकाणच्या सुखांचा नाश होत असल्याबद्दल स्पष्ट उल्लेख आहे. तेव्हा असले भयंकर परिणाम जिच्यापासून उत्पन्न व्हावयाचे, ती संशयी वृत्ती टाकून देऊन शास्त्र वचनांवर आणि सृष्टि धर्मावर श्रध्दा ठेवणे, हेच श्रेयस्कर होय.''

प्रत्येकाने संशायाचा त्याग करावा. श्रध्देचा आदर करावा. मनुष्याच्या मनामध्ये तात्काळ बदल होणार नाही. मनच संशयी असेल तर संशयच मनात येणार. संशयी विचाराचा प्रत्येकाने नाश करण्याची गरज आहे. अनेक आपत्ती, संकटे निर्माण झाल्यानंतरच श्रध्देचे महत्त्व कळते. प्रत्येकाच्या मनात शंका समाधान तर उत्पन्न होतातच. मनुष्याच्या मनाची उत्क्रांती दर जन्मी वाढलेली आहे.[५६]

## ६) प्रस्थानत्रयीची एकवाक्यता –

विषयानुरुप प्रत्येक विषयाचे विविध ग्रंथ उपलब्ध असतात. काही सिध्दांतत्त्वे असतात. वेदकाळ व त्यावरील ग्रंथ महत्त्वपूर्ण आहेत. ''उपनिषदे, ब्रह्मसुत्रे व भगवद्गीता या तीन ग्रंथांच्या समुच्चयाला प्रस्थानत्रयी असे म्हणण्याचा परिपाठ आहे.

आपल्या हिंदुधर्मात आचार्य हे पद महत्त्वपूर्ण मानले जाते. उपनिषदे, ब्रह्मसुत्रे व भगवद्गीता या तिन्ही ग्रंथांवर भाष्ये करून एकवाक्यता दाखविण्याचे कार्य व समप्रमाण सिध्दता दाखविण्याचे कार्य करणाऱ्याला आचार्य ही पदवी, उपाधी मिळत असे. शंकराचार्य रामानुजाचार्य, मध्वाचार्य आणि वल्लभाचार्य हे विविध पंथाचे विद्वान आचार्य या पदावर आरुढ झालेले आहेत. उपनिषद हा वेदांचा महत्त्वपूर्ण भाग मानला जातो. त्यामध्ये ज्ञानकांड सांगितलेले आहे. उपनिषदांतील भाग समजावा, यासाठी ब्रह्मसुत्रे निर्माण केली गेली. महाभारतामधील भगवद्गीता हा महत्त्वाचा भाग आहे. महाभारत एक पौरुषेय इतिहास मानला जातो. भगवद्गीतेमध्ये श्रीकृष्ण ही महत्त्वपूर्ण देवता मानली जाते. ब्रह्मसुत्रामध्ये ब्रह्माचे निरुपण केलेले आहे. सर्व घटकांमध्ये एकवाक्यता निर्माण करणे, म्हणावी तेवढी सोपी गोष्ट नसते. शब्दांचे अर्थ, स्वाभाविकपणा आहे तसा राहतोच असे नाही. श्रीकृष्णांनी अर्जुनाला अतिशय उत्तम उपदेश केला आहे. जीवात्मा–परमात्मा हे एकच आहे. जीव कधीही मरत नाही. ज्ञानाने त्याला मुक्ती प्राप्त होते. हेच वेदांतावरील सामान्य आणि सर्वमान्य सिध्दांत मानले जातात. उपनिषदे आणि भगवद्गीता या दोघांमधील कल्पना, सिध्दांत, भाषा या भिन्न–भिन्न आहेत. वेदाच्या संहिता, ब्राह्मणे (ब्राह्मणग्रंथ) आरण्यके व उपनिषदे या प्रकारे निर्मिती झालेली आहे. त्याच्यानंतर सूत्रग्रंथ, स्मृतिग्रंथ, इतिहास, पुराणे, उपपुराणे यांची निर्मिती झालेली दिसते. त्यानंतर सर्व कर्मकांड, रुज्ञ, होमहवन यांचे आगमन झाले. देवतांची स्तुती मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. भक्ती पुढे ज्ञान कमी वाटू लागले. भगवद्गीता, उपनिषदे, ब्रह्मसुत्रे यांच्या एकवाक्यतेमध्ये अनेक अडचणी दिसून येऊ लागल्या. भगवद्गीतेतील कल्पना या उपनिषदांमध्ये दिसत नाहीत. महाभारतात श्रीकृष्णाला परमात्म्याचा अवतार मानले जाते. उपनिषदांमध्ये तसे मानले गेल्याचे दिसत नाही. परंतु अग्नीचे जाळण्याचे काम आहे आणि पाण्याचे आर्द्र करण्याचे काम आहे. ते सतत चालूच राहणार. काही केले तरी त्यांच्या कार्यात फरक पडणार नाही. कितीही वर्षे अगदी, शंभर वर्षे भक्ती करून निखाऱ्यांवर ठेवलेल्या हाताला

चटका बसू देऊ नको, असे सांगितले तरी अग्नी दाह देण्याचे बंद करणार आहे का? समुद्राची भक्ती करून मला बुडवु नको, असे सांगितल्यावर न पोहता येणाऱ्याला समुद्र बुडवायचा थांबणार आहे का? तर नाहीच. ज्या गोष्टी होणार त्या होतच राहतात. यातून एकच गोष्ट पुढे येते. भक्तीचा आणि कर्माचा सिध्दांत अगदी परस्पर विरुध्द आहेत. भक्ती आणि कर्म या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. भक्ती केली म्हणजे आपले सर्व पापांतून मुक्त होतो, असे वाटणे स्वाभाविक आहे. परंतु कर्म चांगले करा, फळ चांगलेच मिळेल, अशी विचारसरणी मनी ठेवावी. अवतार कल्पना, भक्ती, फळ यामुळे मनुष्य अपंग बनतो. भक्तीचे महत्त्व आहे. परंतु त्याचे स्तोम माजवून उपयोग होत नाही.

''प्रस्थानत्रयीच्या एकवाक्यतेच्या विरुध्द पौरुषेयत्त्व भेद, काल भेद, कल्पना भेद, सिध्दांत भेद, इ. अनेक कारणे दाखविण्यात आलेली आहेत. उपनिषदे व वेदांत सूत्रे यांनी सांगितलेला धर्म वैदिक आहे, म्हणून स्त्रीशूद्रादिकांना यामध्ये अधिकारच पोहोचत नाही. 'भक्ती ही सौम्य आणि सुंदर अशी एक कात्री आहे.'' प्रत्येक मनुष्य जगण्याचा एक नियम करतो. त्याप्रमाणे जीवन जगत असतो. परंतु एखाद्याने विनंती केली तर त्यावर दया दाखवून तो नियम मोडतो. यावरून भक्ती हा घटक महत्त्वाचा आहे, हे दिसते. ज्ञान आणि भक्ती हे दोन घटक अनन्यसाधारण आहेत. 'अहं ब्रह्मासी' म्हणजे मीच ब्रह्म आहे. या तत्त्वातून मोक्षाची निर्मिती होते. ज्ञान, भक्ती अगर दुसऱ्या कोणत्याही मार्गाने त्याला शेवटी मुक्तीकडे वाटचाल करावीच लागते. उपासना आणि भक्ती यांच्यामध्ये थोडे साम्य दिसते. भक्तीची कल्पना भगवद्‌गीतेमध्ये आहे. परंतु उपनिषद व ब्रह्मसुत्रांमध्ये दिसत नाही. त्यामुळे या सर्वांमध्ये एकवाक्यता निर्माण होणे अशक्यच आहे. उपनिषदे, ब्रह्मसुत्रे एका बाजूला तर भगवद्‌गीता दुसऱ्या बाजूला असे चित्र आहे. प्रत्येक मानवाने शांतपणे विचार करून आपण कोठे आहोत, हे ठरवावे, अशी विनंती शि.म.परांजपे यांनी वाचकांना केलेली दिसून येते. [५७]

### ७) दुसरे बाजीरावसाहेब स्वाधीन होण्याच्या वेळची मालकमसाहेबांची कारस्थानें –

पेशवाईतील शेवटचे पेशवे दुसरे बाजीराव यांचा इतिहास अतिशय हालाखीचा व दुःखकारक होता, असेच म्हणावे लागेल. ब्रिटिशांबरोबर कोरेगाव आणि खडकी येथील झालेल्या युध्दात बाजीरावांचा पराभव झालेला होता. प्रचंड नैराश्यग्रस्त अवस्थेत कोठेतरी आश्रयासाठी

भटकत होते. नागपूरच्या भोसले यांच्याबरोबर त्यांचे सुत जमत नव्हते. माळव्यात जाण्याची त्यांनी तयारी केली. शिंदे, होळकरांकडे आपल्याला आश्रय मिळेल, असे त्यांना वाटले. १८१८ मध्ये ते ब्रिटिशांना स्वाधीन झाले, हा हृदद्रावक इतिहास आहे. गव्हर्नर सर जॉन मालकम यांनी बाजीरावांना पूर्णपणे जाळ्यात अडकविले होते. ब्रिटिश लोकांचे खायचे दात वेगळे व दाखवायचे दात वेगळे, हे नक्कीच याबाबतीत खरे ठरले. वरून गोड बोलतात आणि आतून विविध कटकारस्थाने सुरू असतात. फोडा आणि झोडा, या राजनीतीचा पुरेपूर वापर करून माणसांमध्ये एकवाक्यता राहणार नाही, याची चांगली काळजी ब्रिटिश घेत असत.

बाजीराव दुसरे माळव्यात येत आहे, याची चाहूल मालकम साहेबांना लागल्यावर त्यांनी तात्काळ बाजीरावाला विरोध करण्यासाठी हालचाली सुरू केल्या. ब्रिटिशांनी नुकतेच माळव्यातील पेंढारी लोकांचे बंड पूर्णतः मोडून काढले होते. शिंदे, होळकर, पेंढारी लोक बाजीरावाला मदत करतील म्हणून बाजीरावाला माळव्यात येऊच द्यायचे नाही, यासाठी चारी बाजूंनी कडक बंदोबस्त मालकमसाहेबांनी वाढविला. लष्करी छावण्या उभ्या केल्या. लेफ्टनंट कर्नल रसेल, जनरल वॉटसन यांच्याकडे चोख बंदोबस्ताची जबाबदारी दिली. त्यानुसार आपल्यावरील संकट नष्ट करण्यासाठी १६ मे १८१८ रोजी बाजीरावाने आनंदराव यशवंत चंदीचंदावरकर यांना तहाची बोलणी करण्याकरिता इंग्रजांकडे पाठविले. बाजीरावाला मालकमसाहेब आपले मित्र नसून शत्रु आहेत, हे समजायला खूपच उशीर लागला. मालकमसाहेबांनी आपल्या छावणीत बोलणी करण्यासाठी यावे, असे बाजीरावाला वाटत होते. परंतु तो मालकमसाहेबांना कमीपणा वाटत होता. म्हणन लेफ्टनंट लो व ले. मॅक्डोनल्ड या दोघांना बाजीरावाकडे पाठविण्याचे ठरविले. त्या दोघांनी पेशव्यांच्या छावणीतील सैन्यव्यवस्था, सैन्यस्थिती पाहून यावी असेही ठरले. त्यानुसार १८ मे रोजी लेफ्टनंट लो मंडलेश्वराच्या मार्गे बाजीरावाच्या भेटीस निघाले. पुढे २७ मे ला मालकम साहेबांनी मेटावल या ठिकाणी आपली छावणी टाकली. लो यांना बाजीरावाकडे पाठविण्यात आले. त्यानुसार ''बाजीरावसाहेबांनी आता उगीच दिवस फुकट घालविण्यात अर्थ नाही. एक लढाई तरी करणे किंवा दुसरा मार्ग म्हणजे स्वाधीन होणे, ह्याच्याशिवाय तिसरी तोड आता काही उरलेली नाही. पण हल्लीच्या स्थितीत लढाई करणे हे अशक्य असल्यामुळे पेशव्यांनी इंग्लिशांच्या कृपा कुंपणावर अवलंबून राहून त्यांच्या स्वाधीन व्हावे व तेही शक्य तितक्या लवकर व्हावे, हाच उत्तम मार्ग होय.''

मालकमसाहेबांनी असा निरोप बाजीरावाला पाठविला होता. २९ मे १८१८ रोजी बाजीराव व लो यांच्यात बोलणी झाली. मालकमसाहेब पुण्याच्या गादीवर पुन्हा आपल्याला बसू देतील, अशी आशा बाजीरावाला होती. परंतु वाटाघाटीत तशी चिन्हे दिसेनात. शेवटी ३१ मे भेटीचा दिवस ठरला. परंतु १ जून रोजी बाजीराव व मालकमसाहेब यांच्यात भेट घडून आली. बाजीरावाला आपल्या सुरक्षिततेची भिती वाटत होती. त्यामुळे त्यांनी काही हत्यारबंद सैन्य बरोबर ठेवले होते. दोघांमध्ये जवळ–जवळ २–३ तास चर्चा झाली. त्यामध्ये बाजीरावाने आपल्या दुर्दैवाची कहाणीच मालकमसाहेबांना सांगितली. बाजीराव म्हणाले, ''तुमच्या इंग्लिश लोकांत माझे एकंदर काय ते तीन स्नेही! एक कर्नल क्लोजसाहेब, दुसरे जनरल वेलस्ली आणि तिसरे तुम्ही! त्यापैकी क्लोजसाहेब हे तर मरून गेले आहेत आणि वेलस्लीसाहेब जवळ नाहीत. अशा स्थितीत माझे सगळे जुने नोकर–चाकर मला सोडून चालले आहेत. अशावेळी तुम्ही माझे जे बाकी राहिलेले खरे मित्र आहात. त्या तुमच्यावर आता माझा सर्व भरवसा आहे!'' यावर मालकमसाहेबांनी बाजीरावाला स्पष्ट सांगितले की, ''ब्रिटिश सरकारकडून तुमचे राज्य तुम्हाला परत मिळणे शक्य नाही व त्याच्याबद्दल तुमच्या मनांत उगीच खोट्या आणि भ्रामक आशा उत्पन्न करण्यात तुमचा एक स्नेही या नात्याने मला काही एक अर्थ दिसत नाही. तेव्हा सरकारकडून तुम्हाला जे काही देण्यात येईल, ते मुकाट्याने पत्करून तुम्ही ताबडतोब माझ्या स्वाधीन व्हावे, ह्यातच हल्ली शहाणपणा आहे! बाजीरावाला ब्रिटिशांची रणनिती समजली. त्यानुसार बाजीरावाने पुण्यावरील गादीचा हक्क सोडून ब्रिटिशांच्या छावणीत यावे. तरच त्यांचा योग्य मानमरातब राखला जाईल व पुढे काशी किंवा उत्तर हिंदुस्थानातील पवित्र क्षेत्री त्यांना पाठविले जाईल. वार्षिक ७ ते ८ लक्ष पेन्शन दिली जाईल. या अटी मान्य करून बाजीरावाने २४ तासाच्या आत मालकमसाहेबांच्या छावणीत यावे अन्यथा लढण्यास तयारीत रहावे, असा निरोप दिला. मालकमसाहेब धमक्या देत होता. बाजीराव त्यामुळे फार गोंधळून गेले. काय करावे सुचत नव्हते. ३ जूनला ब्रिटिश छावणीत दाखल होण्याचे आदेश दिले. परंतु धार्मिक योग चांगला नाही म्हणून बाजीरावाने जाण्याचे टाळले. परंतु मालकमसाहेब खूप रागावले आहेत, हे बाजीरावाला समजले. त्यानुसार ३ जून १८१८ रोजी सकाळी ठीक ११ वाजता बाजीराव मालकमसाहेबांच्या छावणीत दाखल झाले. म्हणजेच मराठ्यांचे राज्य इंग्रजांच्या ताब्यात गेले. परंतु ब्रिटिशांची रणनिती, राजनिती, कुटील होती. कट–कारस्थाने, गुप्त हालचाली, फोडा

आणि झोडा या नीतीचा अवलंब करून महाराष्ट्रातील एक वाक्यता नष्ट केली व पेशव्यांचे राज्य ताब्यात घेतले, हा इतिहास खरोखरच अतिशय दुःखकारक आहे, असेच म्हणावे लागते. [५८]

## ८) शब्दांच्या वाढीचा इतिहास –

जड आणि चेतन असे सृष्टीचे दोन विभाग आहेत. या दोन घटकांमध्ये उत्क्रांती होत गेली. सृष्टीची निर्मिती झाली. बिंदू निर्माण झाल्यानंतर हळूहळू विविध घटकांची, वस्तुंची निर्मिती झाली. बायबल धर्मग्रंथामध्ये याचे सविस्तर वर्णन आहे. आपल्या हिंदु धर्मात श्रृती, स्मृती व पुराणांमधून अनेक गोष्टींची उत्पत्ती समजते. त्यानुसार सृष्टीचे व संसाराचे एक चक्र बनलेले दिसते. त्यानुसार जग अनादि आहे, हा सिध्दांत अजुनही कायम आहे, हे मान्यच करावे लाते. त्यामध्ये सृष्टीच उत्पत्ती हा घटक महत्त्वाचा आहे. एक एक जड वस्तु निर्माण करून मनुष्याची निर्मिती केली गेली. ''मनुष्याच्या आश्चर्यातून निर्माण झालेला पहिला ध्वनी म्हणजे शब्द होय.'' हळूहळू नवीन–नवीन शब्दांची निर्मिती होत गेली. उपनिषदांमध्ये 'नामरुपे व्याकरवाणि' या वचनावरून नामकरण विधीचा उल्लेख करण्यात आला आहे. सुरुवातीला शब्दांची संख्या अल्पच असणार. नंतर दिवसेंदिवस त्यामध्ये वाढ होताना दिसते. परशमेश्वराने निर्माण केलेल्या सृष्टीत वस्तुंची संख्या वाढली. तशीच शब्दांच्या संख्येतही वाढ झालेली आहे. प्रथमतः रानटी अवस्थेत राहणाऱ्या लोकांची शब्दसंख्या कमीच होती. नंतर एका–एका शब्दाचा शोध लागल्याने शब्दसंचय वाढत गेला.

जिव्हा शब्दाच्या उत्पत्तीचे महत्त्वाचे स्थान मानले जाते. कान, डोळे, हात, पाय या इंद्रियांच्या हालचालींमधून शब्द निर्माण करण्याची प्रक्रिया सुरू होती. अशाप्रकारे शब्द हा घटक महत्त्वपूर्ण मानला गेला.

व्याकरणामध्ये धातूपासून शब्द तयार होतात, असे मानले जाते. रानटी अवस्थेत राहणाऱ्या मनुष्याला सुरुवातीला निसर्ग, दऱ्या–खोरे, डोंगर रांगा, पाऊस, सृष्टी यांच्याबद्दलचे शब्द सुचले असतील. नंतर उत्क्रांतीमुळे व्याकरण, लिंग, वचन, नाम, विभक्ती यांचा शास्त्रीय वापर करून विविध शब्द व्यवहारात आले असावेत. रानटी मनुष्याने पशु–पक्षांचे अनुकरण करून शब्द उच्चारायला सुरुवात केली असेल. 'अस्मात् शब्दादयमर्थो बोध्दव्य इति ईश्वरेच्छा संकतः' अशी संकेताची व्याख्या आपल्यातील शब्दशास्त्रवेत्ते देतात. संकेत बनविण्यात

ईश्वराच्या अर्थाअर्थी काही संबंध नसतो. सर्व गोष्टी मनुष्यच निर्माण करीत असतो. एका शब्दाला अनेक पर्यायी शब्द उपलब्ध होऊ लागले.

नामवाचक आणि क्रियावाचक शब्दांना अनेक अर्थ देण्याच्या प्रक्रियेतून अनेक शब्द निर्माण झाले. शब्दांची संख्या वाढली. 'शब्दांच्या विभक्तींचा लोप होऊन अनेक शब्द एकत्र जोडले गेले म्हणजे तो सामासिक शब्द होतो', एका शब्दापुढे दुसरा शब्द ठेवून त्यांचा सामासिक शब्द बनविण्याचा प्रकार पुढे आला. 'निःस्वो वष्टि शतं शती दशशतं' भर्तृहरीने श्लोकात म्हटल्याप्रमाणे एखाद्याकडे शंभर रुपये झाले, तर तो हजार मिळण्याची इच्छा करतो, त्याचप्रमाणे शंभर पदार्थांना शंभर शब्द अस्तित्वात आले.

आजच्या काळात शब्दकोष किंवा डिक्शनरीमध्ये एका शब्दाला अनेक प्रतिशब्द मिळतात.

''लघु अक्षरांचे शब्द, गुरु अक्षरांचे शब्द, कोमल वर्णाचे शब्द, कठोर वर्णाचे शब्द, लहान शब्द, मोठे शब्द, समान वर्णनात्मक शब्द, द्वयर्थी शब्द, इ. एकाच अर्थाचे अनेक शब्द जिव्हाग्री असले, म्हणजे हा शब्द नाही तर तो शब्द अशा रितीने योग्य शब्द पसंत करून यमके, अनुप्रास, श्लेष, इ. अलंकार आणि वैदर्भी, गौडी, लाटी, पांचाली वगैरे रीती यांचा पूर्णपणे उपयोग करून आपल्या काव्याला सौंदर्य आणण्याची संधी कविंना जितकी सापडते, तितकी दुसऱ्या भाषेतील लेखकांना क्वचितच सापडत असेल व याचे महत्त्व काव्याच्या प्रांतामध्ये फार मोठे आहे.'' असे शि.म.परांजपे म्हणतात.

अशाप्रकारे शब्दांच्या वाढीची प्रक्रिया अस्तित्वात आली. शब्दाच्या उच्चारावरून ध्वनि उत्पन्न होतात. शब्दस्वरुप निर्माण होतो. तेच शब्द ब्रह्म होय. शब्दब्रह्मामध्ये सर्व सृष्टीतील अनंत शब्दांचा समावेश होतो. शब्दाच्या निर्मितीमध्ये एक विशिष्ट प्रकारचा आनंद आहे.[५९]

## ९) महाराष्ट्र भाषेंतील वेदान्तपर ग्रंथ –

### लिहिण्याच्या पध्दतीचे पर्यालोचन –

प्राचीन काळातील 'वेदान्त' या विषयाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. वेदांतावरून मनुष्याला आपल्या जीवनाचे ध्येय ठरविता येते. आपले सर्व व्यवहार वेदांताच्या कल्पनेवर

आधारित असतात. वेदांतशास्त्रानुसार स्वार्थ आणि परमार्थ या दोन गोष्टींचा विचार करता येतो. संस्कृत भाषेमध्ये या संदर्भात अनेक ग्रंथ उपलब्ध आहेत. परंतु आज महाराष्ट्राच्या मराठी भाषेमध्येही अनेक ग्रंथांची निर्मिती होत आहे.

संस्कृत ग्रंथ हे विद्वानांसाठी होते तर मराठी ग्रंथ स्त्रीशूद्रादिक जे अल्प (कमी) बुध्दीचे लोकांसाठी होते. मराठीमध्ये जे नवोदित लेखक होते, त्यांच्याकडून संस्कृत भाषेचा उपमर्द किंवा अगौरव झाला. त्यामुळे मराठी श्रेष्ठ हे दाखविताना संस्कृतचे महत्त्व कमी झाले. संस्कृतमधील गोष्टीच मराठी भाषेमध्ये मांडण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

मराठी लेखकांमध्ये 'भक्ती' हा गुण महत्त्वाचा होता. त्यांच्या काव्यातूनही भक्ती ओतप्रोत भरलेली होती. लेखाकांनी आपल्या काव्यामध्ये हास्य, शृंगार, वीर, करूण आदी रस मांडले आहेत. शुक, उध्दव, वाल्मिकी व नारद इ. विद्वानांनी भक्तीरसपूर्ण काव्य निर्माण केले. अनेक प्रतिभावंत कवींचा उदय झाला. महाराष्ट्रामध्ये भागवत भक्तीपंथ निर्माण झाला. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम यांनी आपल्या अभंग सुक्तांमधून उत्तम काव्याची निर्मिती केली. 'साधुत्व हे ईश्वरीय आहे आणि कविता हे मानवीय आहे. साधुत्व हे परलोकोपयोगी आणि कवित्व हे केवळ ऐहिक आहे. असा फरक असल्यामुळे कवित्वापेक्षा साधुत्व हे लोकांना जास्त पूज्य होते.'' यात शंकाच नाही. ज्ञानदेव व नामदेव, तुकाराम, एकनाथ या संतांची परंपरा महाराष्ट्रात महत्त्वाची मानली गेली. या संतांनी उत्तम प्रकारचे काव्य लिहून समाजातील दांभिकतेवर हल्ला केला. समाजाचे प्रबोधन करण्याचा चांगलाच प्रयत्न केला.

परंतु नंतरच्या काळात निर्माण झाले कवी देवाच्या नावाने स्वतःमध्ये साधुत्व निर्माण करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यांचे काव्य कमी दर्जाचे होते. त्यातून कोणतेही संस्कार समाजावर होत नाही. पुढे गुरुशिष्याची परंपरा निर्माण झाली. त्यामध्ये मोठ्या प्रमाणावर स्तोम माजलेले दिसते. ढोंगी गुरु आणि मूर्ख शिष्य परंपरा वाढतच गेली.

अशाप्रकारचे विद्वत्ता आणि भक्ती यांच्यामध्ये फार मोठे अंतर निर्माण झाले. लेखनामध्ये विद्वता असायलाच हवी. मराठी भाषेतील काही भारूडे प्रबोधनपर आहेत. वेदांताचे आद्य प्रवर्तक आद्य शंकराचार्य हे भक्त कोटीमधील नव्हते. परंतु संत ज्ञानेश्वर विद्वान व भक्त हे दोन्हीही होते. पुढे पुढे लोकांमधील विद्वत्ता कमी होत गेली. ढोंगीपणा वाढत गेला. विद्वत्ता ही

कठीण आहे तर भक्ती ही फार सोपी आहे. विद्वत्तेचा वेदांत मागे पडला भक्तीचा अशिक्षितपणा पुढे आला.

महाराष्ट्रामध्ये संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराजांनी सांगितलेल्या तत्त्वामध्ये एकवाक्यता निर्माण होणे गरजेची आहे. ब्रह्म, माया, जगाची उत्पत्ती, जीवात्मा, मोक्ष या मतांचा निष्कर्ष काढून संगतवार चांगल्या ग्रंथाची निर्मिती होणे आवश्यक आहे. परंतु ग्रंथ लिहिताना योग्य साधने, प्रमाणे, सिध्दांत घेऊन प्रामाणिकपणे लिहिणे महत्त्वाचे आहे. सत्य लेखनावर भर द्यावा. ईश्वर, मनुष्य, परमात्मा, जीवात्मा, यांच्या संदर्भात ज्या गोष्टी साधारण असतील त्याच सिध्दांतरुपाने घ्याव्यात. स्वतंत्रपणे वेदांतावर लिहावे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत रामदास यांच्या विविध ग्रंथांमधून चांगले निष्कर्ष काढून चांगले लेखन समाजापुढे मांडावे. खरोखरच समाजाचा खूप फायदा झाल्याशिवाय राहणार नाही. [६०]

## १०) पूर्वजन्म आणि पुर्नजन्म –

संत परंपरेतील एक महान स्त्री संत म्हणून बहिणाबाई यांचे नाव घेतले जाते. त्यांनी अनेक काव्य, अभंग, ओव्या लिहिल्या आहेत. त्यामुळे बहिणाबाईंच्या साहित्याकडे बरेच जणांचे लक्ष लागले आहे. समाजामध्ये आस्तिक आणि नास्तिक असे दोन वर्ग असतात. पुर्नजन्म नाही असे मानणारे लोक नास्तिक म्हणतात. तर पूर्वजन्म आणि पुर्नजन्म दोन्हीही गोष्टी आहेत, असे मानणारे लोक आस्तिक लोक होत. पूर्वजन्म आणि पुर्नजन्म हा विषय अतिशय गुंतागुंतीचा आणि महत्त्वाचा आहे. बहिणाबाईंनी यावर उत्तम प्रकारे प्रकाश टाकलेला दिसतो.

संत ज्ञानेश्वर, निवृत्ती, सोपान व मुक्ताबाई यांच्या बरोबरच संत नामदेवांचे अभंग अतिशय महत्त्वपूर्ण मानले जातात. बहिणाबाईंनी निर्माणाच्या जवळजवळ ३४–३५ अभंगातून आपले मत सांगितले आहे. त्यांच्या वयाच्या ७२व्या वर्षी त्यांनी आपल्या मुलाला आपला मृत्यु कधी होणार हे सांगितलेले आढळते. अश्विन शुध्द १ ला देह ठेवणार आहे, असे सांगून त्यांच्या अभंगातून एकूण तेरा जन्मांचा उल्लेख केलेला आढळतो. बहिणाबाईंनी आपल्या मुलाला मागील बारा जन्मांची कहाणी सांगितलेली आहे. तेराव्या जन्माच्या शेवटी ती मुक्त झालेली दिसते.

बहिणाबाईंच्या तेरा जन्माची कहाणी अभंगातून त्यांनी अगदी सविस्तर दिलेली आहे. तेरा जन्मांमध्ये त्यांच्यामध्ये दिवसेंदिवस प्रगती झाल्यासारखे दिसते. तिच्या जीवनामध्ये सांसारिक सुख तिला मिळाले. पतीसुख, पुत्रसुख तिला मिळाल्याचे दिसते. बहिणाबाईंच्या जीवनात अध्यात्मिक प्रगती झाली असली तरी ऐहिक सुख मात्र म्हणावे तेवढे लाभलेले दिसते नाही.

तेराव्या जन्मात बहिणाबाईंवर संत तुकाराम महाराजांचा अनुग्रह झाला व त्या मुक्त झाल्या.

'बहिणाबाईंच्या तेरा जन्मांची हकीकत मानवी बुध्दीला थोडी विचार करायला लावणारी आहे. मानवी बुध्दीला काही शंका निर्माण होतात. एका जन्माचा मृत्यु व एका जन्माचा आरंभ याबाबतही प्रश्न निर्माण होतात. बहिणाबाईंचे तेरा जन्म लवकर लवकर होत गेले असे तिच्या सर्व अभंगांवरून स्पष्ट होते.

''बहिणाबाईने आपल्या तेरा जन्मांच्या जिवंतपणाच्या आयुष्याची म्हणून एकंदर बेरीज तीन शतें आणि वरुषे एकावन्न । आयुष्य निर्माण तेरा जन्मी।। या चरणांत ३५१ वर्षांची असल्याबद्दल सांगितले आहे. त्या त्या जन्मांच्या त्या त्या आयुष्यमानांची बेरीज केली असतां ती ३५१ होते, हे खरे आहे. बहिणाबाईने पहिल्या जन्माचे ठिकाण बेटावुद तापी तीरी म्हणजे खानदेशातील सध्याचे बेटावद हे गाव होय.'' एकंदरीत सर्व चर्चेवरून बहिणाबाईंचे तेरा जन्म झाले असावेत, असे अनुमान काढता येते. [६१]

**११) मदन दहन –**

गुरु आणि शिष्य यांच्यामध्ये झालेल्या संवादामधून मदनदहन नावाची कथा लिहिली गेली आहे. साधुंच्या वर्णनाबद्दल शिष्याला विचार करूनही उत्तर सापडत नाही, म्हणून गुरु आपल्या शिष्याला प्राचीन इतिहास सांगतो व ऐकून याचे मनन, चिंतन करण्यास सांगतो.

प्राचीन काळी मानवाची युध्दे सुरू होण्यापूर्वी देव आणि दैत्य यांच्यामध्ये युध्दे सुरु झाली. अशाच एका युध्दात तारकासूराचा बंदोबस्त कसा करावा हा देवांपुढे फार मोठा प्रश्न पडतो. महादेव शंकराच्या सामर्थ्याची जाणिव देवांना होती. त्याच्याकडून पार्वतीच्या पोटी पुत्र

प्राप्ती करावी, असा विचार देवांच्या मनात आला. महादेव कैलास पर्वतावर समाधिस्त बसलेले होते. त्यांच्याकडून पुत्रप्राप्ती करून घेणे जवळजवळ अशक्यप्रायःच होते. इंद्रदेवाने यावर एक उपाय शोधून काढला. शंकराच्या शरीरामध्ये संचार करून त्याची समाधी भंग करण्याची आज्ञा मदनाला दिली. त्याने तात्काळ आज्ञा मान्य केली.

त्यानुसार हिमालय पर्वतावरील वातावरणात हळूहळू बदल होत गेला. पक्षी, कोकिळा, किलबिलू लागले. हिमालयामधये अप्सरांचे नृत्य सुरू झालने. पार्वतीलाही शंकराच्या जवळ आणून उभे केले. सर्व काही चालू असतानाच शंकराचे चित्त स्थिर होत नव्हते. समाधी ढळू लागली. समाधी भंग झाल्याने शंकराचा राग अनावर झाला. सर्व अंग लाल झाले. शंकराच्या तिसऱ्या डोळ्यातून आगीच्या ज्वाळा बाहेर पडू लागल्या. आपला आणि आपल्या समाधीचा अपमान कोणी केला हे पाहत असतानाच शंकराला मदन दिसतो. मदनाच्या अंगावर शंकराच्या डोळ्यातील आगीच्या ज्वाळा पडतात व क्षणार्धात मदनाचे शरीर जळून भस्म होते.

मदनाचा अवतार संपल्याने सगळीकडे हाहाःकार माजतो. शृंगार रस संपल्याचे सर्वांना जाणवते. पार्वतीचा मनोभंग होतो. पुत्रप्राप्ती हा विषयच बाजूला पडतो. परंतु मृत्युलोकांत मदन दग्ध झाल्याची बातमी आलेली नसते. सर्वजण आनंदी, उत्साही असतात. वधु–वर, प्रियकर–प्रेयसी यांच्यातील हळूवार नाते उत्तम पध्दतीने सुरू असते. शृंगार रसांनी सर्व परिसर रोमांचित झालेला होता. तर दुसऱ्या बाजूला मदनदहनाची क्रिया पूर्ण झालेली हाती.

मदन हा कामदेव म्हणूनही ओळखला जातो. संपूर्ण जगातील प्रेमाचे आगर म्हणजे मदन होय. त्याच्या बीजभूत आद्य मूर्तीचे पौराणिक वास्त्व्य स्वर्गलोकामध्ये आणि प्राणीमात्राच्या मनामध्ये होते. सृष्टीमध्ये मदनाचे महत्त्व खूप होते. परंतु शंकराच्या क्रोधाने मदनाचे दहन झाल्याने पृथ्वीवर सर्वत्र हाहाःकार निर्माण झाला. ''मदनाचा देह तिकडे दग्ध झाल्याबरोबर इकडे पृथ्वीतलावर मोठे अनर्थ गुदरु लागले. विलक्षण चमत्कार होऊ लागले. व्यवहारांमध्ये भलभलत्याच उलथापालथी होऊ लागल्या आणि फिरून असे का होते, याचे कारणही कोणाला कळेना!''

प्रेमावरील विश्वास उडाला. प्रियकर–प्रेयसी, वधु–वर यांची नाते तुटण्याची वेळ आली. जणू काही शृंगार रसच संपला. एवढा बदल कसा झाला? कोणालाच काही कळेना. तारुण्य

संपले. विवाहसंस्था ओस पडू लागल्या. चराचर सृष्टीमध्ये नैराश्यरुप वातावरण निर्माण झाले. संसारामध्ये सुध्दा शिथिलता आली. मदनाच्या गैरहजेरीत मोठी क्रांतीच झाली. लोकांनी ब्रह्मचर्य घेण्याला सुरुवात केली. शृंगाररस संपून शांतरस पुढे आला. सर्व जग एकदम बंद पडते की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली.

या सर्व बिकट परिस्थितीची बातमी ब्रह्मदेवाच्या कानावर गेली. ब्रह्मदेवाला आश्चर्यही वाटले आणि खेदही वाटला. शंकराच्या अविचारी कृत्यामुळे काही फायदेही झालेले होते. लोकांच्या अंगामध्ये शौर्य आलेले होते. क्षयरोग बंद झाला. गर्भपात, बालहत्या संपली होती. पण दुसऱ्या बाजूला जगच चालू राहिले नाही तर काय करायचे? हा फार मोठा प्रश्न ब्रह्मदेवापुढे होता. त्यानुसार श्रीविष्णुंशी विचार–विनियम करण्यासाठी ब्रह्मदेव वैकुंठलोकी गेले.

ब्रह्मदेव पुन्हा मदनाला जिवंत करेल, अशी आशा मृत्युलोकांत निर्माण झाली. कारण पुन्हा सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण होईल. विष्णुलाही मदनाचे अस्तित्व मान्य झाले. प्रजोत्पत्तीसाठी मदन गरजेचा असल्याचे समजले. विष्णुदेव ब्रह्मदेवाला म्हणतो, ज्याप्रमाणे शंकराने मदनाला जाळून भस्म केले, त्याचप्रमाणे तो फिरून जिवंतही करू शकतो. कारण शंकराच्या तपश्चर्येमधून सृष्टीची पुन्हा निर्मिती होऊ शकेल. ज्या हिमालय पर्वतावर मदन दग्ध झाला होता, त्याच हिमालयपर्वतावर तो परत जिवंत झाला. लगेचच विश्वामध्ये सर्वत्र विजेप्रमाणे त्याचा संचार झाला. जगातील सर्व गोष्टी पुन्हा सुरळीत सुरू झाल्या. स्वर्गामध्ये तारकासूर राक्षसाचा वध झाल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

गुरुंनी शेवटी शिष्याला उत्तर दिले की, ''मदन दग्ध झाला होता. त्यावेळच्या धांदलीत ज्यांनी साधुपणाचा आव साधून घेतला होता आणि मदन परत जिवंत झाला, तरीही साधुपणाच्या किफायतीवरील आपला हक्क सोडून देण्याविषयी गुप्त मार्गाच्या भरवशांवर ज्यांनी काही दूराग्रह कायम ठेविला होता, अशा साधुंची त्यावेळी एक जात निघाली होती. त्या जातीपैकी हे काही अवशिष्ट राहिलेले साधु कोठे–मोठे आढळतात. हे मदनाच्या गैरहजेरीत झालेल्या साधूंपैकी  आहेत, असे समजून त्यांची उपेक्षा करणे आपल्या चित्ताला चांगले वळण लागावे, सर्वांचे कल्याण व्हावे, अशी परमेश्वरापाशी प्रार्थना करणे, हेच आपले पवित्र कर्तव्य कर्म आहे!''

मदन दहनामुळे सृष्टीमध्ये झालेला हाहाःकार व मदनाच्या पुनरागमनामुळे सृष्टीमध्ये निर्माण झालेला आनंद या दोन्ही गोष्टी शि.म.परांजपे यांनी अतिशय विस्तारपूर्वक मांडल्याचे दिसत आहे.[६२]

## १२) नवी सृष्टि (पृ. १७२ ते १९२) –

फार पूर्वी सूर्यवंशामध्ये त्रिशंकु या नावाचा राजा झाला. आपण यज्ञयाग करून स्वगलोकाला जावे, अशी त्याची इच्छा होती. ती पूर्ण करण्यासाठी तो आपले गुरु वसिष्ठाकडे गेला. मनुष्याने सदेह स्वर्गास जाणे अशक्य असल्याचे वसिष्ठ सांगतो. परंतु आपला गुरू आपले काम करीत नाही, म्हणून राजा गुरुच्या शंभर मुलांकडे जातो, परंतु गुरुची मुलेही ही गोष्ट अशक्यप्राय असल्याचे सांगतात.

परंतु राजा पुढे ऋषी विश्वामित्राकडे जातो. ही गोष्ट गुरुच्या मुलांना समजल्यावर ''तू चांडाळ होशील'', असा शाप देतात. विश्वामित्र राजाला अभय देतात. विश्वामित्र यज्ञयागाची तयारी सुरू करतात. सर्व ऋषींना ही बातमी समजली. विश्वामित्राने यज्ञाला सुरुवात केली. तरीही कोणत्याही देवता येईनात. विश्वामित्राला त्यामुळे प्रचंड संताप झाला. तो म्हणतो, ''देव जरी तुला स्वर्गलोकाला नेत नसतील तरी माझ्या तपश्चर्येमुळे तू स्वर्गाला जाशील. माझ्या तपश्चर्येचा महिमा तुला समजेल.

इंद्राला विश्वामित्राची ही कृती मान्य झाली नाही. 'त्रिशंकु तू वर येऊ नकोस. तुला येथे जागा मिळणार नाही, असे इंद्र सांगतो. त्रिशंकूची अवस्था अगदीच बिकट होते. त्रिशंकु खाली पडू लागला. तेव्हा विश्वामित्र क्रोधाने संतप्त होऊन त्रिशंकुला म्हणतो की, ''त्रिशंकु तू भिऊ नकोस. तुला स्वर्गात घेत नसतील तर आठ दिवसात मी नवी सृष्टी निर्माण करतो. दुसरा इंद्र निर्माण करून त्याच्याजवळ तुला बसवितो.'' विश्वामित्र त्रिशंकु राजाला धीर देताना दिसतो. विश्वामित्र क्रोधाने संतापलेल्या अवस्थेत नवी सृष्टी निर्माण करतील, याची खात्री सर्वांना होती.

पहिल्या सृष्टीबद्दल सुध्दा अनेकांच्या तक्रारी होत्या. गरीबांना वाटायचे आम्हाला गरीब का केले? दुःख लोकांना वाटायचे आम्हीच दुःखी का? कुरुप लोकांना वाटायचे कुरुपपण

आपल्याकडेच का आले ? अशा तक्रारी ऐकून वेदान्ती पुढे येऊन म्हणतात, तक्रारी काय करताय? तुम्ही कर्मे चांगली करा, फळे चांगलीच मिळतील. जसे कर्म तसे फळ.

जगामध्ये सर्वत्र दरी पसरल्याचे दिसते. गरीब, श्रीमंत, सुख, दुःख असे दिसते. सर्वत्र असंतोषाचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसते. परंतु लोकांना विश्वामित्र नवीन सृष्टी निर्माण करत असल्याची बातमी समजली. विश्वामित्र हा सर्व सृष्टीचा मोठा मित्र असल्याचे वाटू लागले. नवीन सृष्टी कशी असावी? याबाबत नवीन सूचना देण्याचे सर्वांनी ठरविले. त्यानुसार नवी सृष्टी कशा प्रकारची असावी, या विचारात विश्वामित्र असतानाच त्याच्याकडे सूचना सांगण्यासाठी आलेल्या लोकांची संख्या प्रचंड होती. नव्या सृष्टीमध्ये अनेक सुधारणा करणे गरजेचे आहे. विश्वामित्राच्या या घोषणेमुळे स्वर्गातील इंद्राला खूपच भिती वाटली. दुसरा इंद्र निर्माण केला तर काय होईल? याची चिंता इंद्राला वाटू लागली.

विश्वामित्राच्या आश्रमाभोवती प्रचंड गर्दी निर्माण झाली. त्याचे चौसष्ट हजार शिष्य लोकांचे म्हणणे लिहून घेऊ लागले. झाडे, वेली, पर्वत, मासे, साप, हत्ती, बगळे, पशू, प्रत्येकाने आपल्या मागण्या मांडल्या. प्रत्येकजण त्यांच्या जणू स्थितीला कंटाळला होता. नवीन काही तरी निर्माण होईल, याची प्रत्येकाला खात्री होती. पदार्थ, रसायन, ज्योतिष आणि गणित या शास्त्रांतील तत्त्ववेत्ते विश्वामित्राला येऊन भेटले आणि त्यांनीही आपल्या मागण्या मांडल्या.

कणाद, गौतम, कपिल, जैमिनी, व्यास, याज्ञवल्क्य, इ. महान लोक विश्वामित्राकडे आले आणि त्यांनी ''तू सृष्टी कशी तयार करू शकशील?'' तू नवी सृष्टी कशी करणार? जुनी सृष्टी कशी तयार केली हे कोणाला आणि तुला तरी कळले आहे का ? सत्त्व, रज, तम, हे गुण तू कोठून आणणार आहेस? जीवात्मे आणि परमात्मे कसे उत्पन्न करणार? कोणाला श्रीमंत करणार? कोणाला गरीब करणार? कोणाला सुखी करणार? कोणाला दुःखी करणार? कर्म, भक्ती आणि ज्ञान या गुणांनी संसार चक्रामध्ये बुडालेल्यांसाठी नसती उठाठेव करण्यापेक्षा त्यांना आहे त्या अवस्थेत राहू दे. त्रिशंकूला वर नेण्यासाठी नव्या सृष्टीचा विचार करतो आहेस, परंतु जुन्या सृष्टीचा विचार कोणाच्याही मनात येत नाही. तेव्हा तू आमच्या शंकांचे समाधान करावेस आणि म्हणून आम्ही तुझ्याकडे आलो आहोत. तेवढ्यात ''धाव, धाव विश्वामित्रा पडलो रे पडलो!'' असे आकाशांतून त्रिशंकुचे शब्द कानावर पडले. पुन्हा विश्वामित्र संतापला.

आलेल्या विद्वानांना विश्वामित्र रागाने म्हणतो, ''मी तुमचे सगळे म्हणणे समजलो. पण माझ्या प्रतिक्षेपासून मी परावृत्त होणार नाही. त्रिशंकुला मी वचन दिले आहे. कितीही अडचणी आल्या तरी मी दुसरी नवी सृष्टी निर्माण करणारच. मी कोणत्याही अडचणींना घाबरणार नाही.एक तपाने साध्य झाले नाही. शंभर तपे करीन पण नवीन जग निर्माण करील व त्रिशंकुला स्वर्गात बसविल्याशिवाय स्वस्थ राहणार नाही!'' हे शब्द ऐकून तत्त्ववेत्त्यांना भिती वाटू लागली. देवही घाबरले. इंद्रासहित सर्व देव भूतलावर आले. त्रिशंकुला त्याचे समाधान वाटले.

सर्व देव इंद्राला पुढे करून विश्वामित्रासमोर आणले आणि म्हणाले, ''हे विश्वामित्रा आम्ही तुला शरण आलो आहोत. तुझा महिमा आम्हाला माहित आहे. तु म्हणशील ते तु तपाने करणार, याची आम्हाला खात्री आहे. परंतु आमची तुला विनंती आहे, प्रतिसृष्टी, निर्माण करण्याची गोष्ट इच्छा सोडून दे, तुला त्रिशंकु सदेह स्वर्गात न्यायचे आहे. याला आमची काही हरकत नाही. आम्हाला तुझे म्हणणे मान्य आहे. त्रिशंकु हल्ली नक्षत्र मंडळामध्ये वास्तव्य करीत आहे. त्याला तेथेच राहू दे, आम्ही त्याच्या वाटेस जाणार नाही. तेथे तो स्वर्गात असल्यासारखेच आहे. तो स्वतेजाने चमकत राहील. जी नक्षत्रे तू निर्माण केली आहे, तीही तशीच राहतील. या देवांच्या मागण्यांमुळे त्रशंकुनेही संमती दिल्याने विश्वामित्राने आपला आग्रह सोडला. सर्वांना अतिशय आनंद झाला. स्वर्गलोकांत वाद्याचा गजर झाला. गंधर्व गायन सुरू होऊन अप्सरा नृत्य करू लागल्या. विश्वामित्रांच्या मस्तकावर पुष्पवृष्टी झाली.

अशाप्रकारे विश्वामित्राच्या तपश्चर्येच महत्त्व मोठे आहे. हेच या कथेतून सांगावयाचे आहे असे दिसते. [६३]

## साहित्य संग्रह भाग ३ –

### १) महाराष्ट्र साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण –

सन १९२९ साली बेळगाव येथे चौदावे महाराष्ट्र साहित्य संमेलन भरले. या संमेलनाचे अध्यक्ष म्हणून शि.म. परांजपे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांचे अध्यक्षीय भाषण खरोखरच मुद्देसुद, अभ्यासू व मराठी भाषेचे महत्त्व व्यक्त करणारे होते. सुरुवातीला साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद दिल्यामुळे शि.मं.नी सर्वांचे आभार मानले.

शि.म.परांजपे यांनी पहिल्या तेरा साहित्य संमेलनाचा अभ्यासपूर्ण आढावा घेतला. सन १८५ साली पुण्यामध्ये कै. माधवराव रानडे यांच्या अध्यक्षतेखाली पहिले साहित्य संमेलन भरविण्यात आले होते. पहिले संमेलन भरविण्याची उद्दिष्ट्ये, उद्देश ठरविले होते. त्यामध्ये चांगल्या इंग्रजी ग्रंथांची भाषांतरे करणे, जुने पेशव्यांचे दफ्तर तपासणे व नवीन नवीन ग्रंथ मराठीत आणणे, इ. रानड्यांच्या या कृतीमुळे भाषा हा घटक महत्त्वाचा हे समजले. दुसरे साहित्य संमेलन सन १९०६ साली सातारा येथे भरविण्यात आले. श्री. रा. रा. दादासाहेब करंदीकर हे संमेलनाध्यक्ष होते. तिसरे साहित्य संमेलन कै. गोविंद वासुदेव कानिटकर यांच्या अध्यक्षतेखाली पुण्यातच भरले होते. ''झालेल्या सर्व साहित्य संमेलनाचा आढावा घेताना सन १९०७ साली कै. विष्णु मोरेश्वर महाजनी यांच्या अध्यक्षतेखाली चौथे , सन १९०८ला रा. रा. चिंतामणराव वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली पाचवे, सन १९०९ साली अकोले येथे कै. हरिभाऊ आपटे यांच्या अध्यक्षतेखाली सातवे, सन १९१५ साली मुंबई येथे श्री. बाळासाहेब वर्तक यांच्या अध्यक्षतेखाली आठवे, सन १९१७ साली इंदूर येथे कै. गणेश जनार्दन आगाशे यांच्या अध्यक्षतेखाली नववे, सन १९२१ मध्ये बडोदा येथे श्री. नरसोपंत केळकर यांच्या अध्यक्षतेखाली दहावे, सन १९२६ साली मुंबई येथे सरदार माधवराव किबे यांच्या अध्यक्षतेखाली अकरावे, सन १९२७ साली पुणे येथे श्री. कृ. कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखाली बारावे तर सन १९२८ साली ग्वाल्हेर येथे श्री. माधवराव अणे यांच्या अध्यक्षतेखाली तेरावे अशी साहित्य संमेलने पार पडली.''

सर्व साहित्य संमेलने भरविण्यामध्ये मराठी भाषेविषयी असणारे प्रेम, मराठी भाषेची वृध्दी होणे, हा मुख्य उद्देश होता. समाजामध्ये एकवाक्यता निर्माण करण्यासाठीच मराठी साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत होते. इंग्लिश भाषा बोलणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात वाढत असताना मराठी भाषेचे अस्तित्त्व टिकविणे हे ही खूप महत्त्वाचे होते. आज मराठीचा प्रसार संपूर्ण हिंदूस्थानात सुरू झालेला आहे. मराठी सरदारांनी ज्या ठिकाणी आपली सत्ता स्थापन केली तेथे मराठीचा प्रसार सुरू झाल्याचे दिसते. दक्षिणेप्रमाणे उत्तरेतही मराठी भाषेची महती वाढू लागली. हळूहळू शिक्षणाचा प्रसार वाढल्याने मराठी भाषा व वाङ्मय मोठ्या प्रमाणात निर्माण होऊ लागले. हळूहळू नागरी लिपीचा विकास होत गेला. त्याचवेळी भाषावार प्रांत रचना हे तत्त्व पुढे आले होते. त्यानुसार शब्दसंग्रह वाढत गेला. संत ज्ञानेश्वरांच्या

ज्ञानेश्वरपासून लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्यापर्यंत फार मोठे साहित्य मराठी भाषेमध्ये उदयाला आले. समर्थ रामदासस्वामींनी मराठी साहित्याची मोठी सेवा केलेली दिसते. संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ज्ञानेश्वर या ग्रंथाच्या अगोदर विविध शिलालेख, ताम्रपटांच्या माध्यमांतून मराठी भाषा आढळते. शि.म.परांजपे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात पुण्याच्या इतिहास संशोधक मंडळाचाही उल्लेख केलेला आढळतो. प्राचीन मराठी भाषेचे संशोधनासाठी अशा क्षेत्रांची आवश्यकता बोलून दाखविली.

चक्रधर, मुकुंदराज, निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, एकनाथ, दासोपंत, निरंजनमाधव, रामदास, मुक्तेश्वर, तुकाराम, वामन पंडित, रघुनाथ पंडित, मोरोपंत यांनी आपल्या रचना मराठी भाषेत निर्माण केल्या, हे आपले भाग्य समजले पाहिले. ''मराठी भाषेतील पुस्तकांची संख्या ४१२६ एवढी आहे, असे शि.म. सांगतात. मराठी भाषेतील वाङ्मय संपदा वाढत आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर, विनायक दामोदर सावरकर यांचे मराठी साहित्य अधिक प्रेरणादायी होते. गद्य आणि पद्य यामधून साहित्याची निर्मिती होऊ लागली. नऊ रसांची निर्मिती झाली. त्यामधून सुंदर, मनोहारी काव्यांची निर्मिती झाली. त्यातून शुध्दलेखनावर भर दिला गेला. व्याकरण शास्त्राची महती समजली. मोडी लिपी पटकन लिहिता येते. जुन्या काळातील महत्त्वपूर्ण लिपी मानली जाते.

''शि.म.परांजपे यांनी अध्यक्ष या नात्याने काही सूचना दिलेल्या होत्या –

१) संमेलनाच्या वर्षामध्ये निर्माण झालेल्या नवीन ग्रंथांचे प्रदर्शन भरवावे. त्यामुळे ग्रंथकर्त्याची प्रसिध्दी व वाचकवर्गाची सोय होईल.

२) गॅझेटमध्ये येणाऱ्या रिपोर्टचे साहित्य संमेलनामध्ये दरवर्षी एखादे पुस्तक तयार करावे, ही मोठी कामगिरी होऊ शकेल.

३) मराठी भाषेच्या प्रोत्साहनासाठी निर्माण झालेल्या संस्थांमध्ये एकसुत्रीपणा आणावा, कोणती पुस्तके मागवावी, कोणत्या ग्रंथांना प्रोत्साहन द्यावे, याविषयी विचारविनिमय करावा.

४) विविध भाषांतील रिपोर्ट एकत्र करून आपल्याकडे ठेवावेत.

५) मराठी भाषेच्या उन्नतीकरिता सर्व संस्थानांनी प्रयत्न करावेत, अशी त्यांना विनंती करावी.

६) मराठी वाङ्मय निर्मिती, व्यासंग आणि सार्वत्रिक ज्ञानप्रसार यासाठी एक मध्यवर्ती संस्था, (अखिल महाराष्ट्र शारदा मंडळ ॲकॅडमी) स्थापन करण्यात यावी.

७) हिंदी, बंगाली, गुजराथी, कानडी या भाषांचे साधारण ज्ञान विद्यार्थ्यांना देण्याची गरज साहित्य संमेलनाने लक्षात आणून द्यावी.

८) साहित्य संमेलनामध्ये होणारे ठराव, भाषणांपेक्षा वाचण्याकरिता आलेल्या निबंधांना महत्त्व द्यावे. व्युत्पत्तिशास्त्र, तत्त्वज्ञान, प्राचीन वस्तु संशोधनशास्त्र, मानव उत्क्रांती शास्त्रे आदी मराठी भाषेशी संलग्न विषयांवरील निबंध मागवावेत व त्यांची शास्त्रीय चर्चा याकडे लक्ष द्यावे.

अशा प्रकारे विविध सूचना करून मराठी भाषेचा विधायक हेतू साध्य व्हावा, असे मत व्यक्त केले.

मराठी भाषेच्या उन्नतीकरिता श्रीमंत राजांपासून ते अगदी सामान्य मनुष्य झटत आहे. नवीन साहित्याचे लेखनाचे स्वागत होत आहे. मराठी भाषेची किर्ती सर्वत्र पसरत जाईल, यात शंका नाही.

अध्यक्षीय भाषणाच्या शेवटी शि.म.परांजपे म्हणतात, ''सभ्य गृहस्थ हो, आपल्या भाषेची उन्नती व्हावी, अशी तुमच्या सर्वांच्या अंतःकरणामध्ये उत्कट इच्छा उत्पन्न झालेली असून आपण सर्वजण त्यासाठी अशारितीने परिश्रम करण्याला उद्युक्त झाला आहां. त्या अर्थी सृष्टीच्या नियमाप्रमाणे परमेश्वर आपल्या सर्वांच्या या सदिच्छा परिपूर्ण करील, यात तीळमात्रही संशय नाही!''

अशा प्रकारे चौदाव्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान मिळालेल्या शि.म.परांजपे यांनी मराठी भाषेचा उगम, विकास, लिपी, व्याकरण, साहित्य या सर्व घटकांचा अतिशय अभ्यासपूर्ण आढावा घेऊन मराठी भाषेच्या उन्नतीसाठी सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न करायला हवेत, असे आवाहन केले. [६४]

## २) चित्रें व चित्रकलेची टीका –

जगातील सर्वोत्कृष्ट कला म्हणून चित्रकला ही महत्त्वपूर्ण मानली जाते. वेगवेगळ्या पुस्तके व मासिकांमधून चित्रे काढण्याची प्रथा पुढे येत आहे. चित्रकलेची प्रगती चांगली होत आहे. रत्नाकर मासिकाच्या जुलै अंकात 'प्रणयिणिचा मनोभंग' नावाचे सुंदर चित्र काढलेले आहे. त्या चित्राचा इतिहासही थोडक्यात दिलेला आहे.

भारतातील महत्त्वपूर्ण संस्थांनांपैकी औंध हे संस्थानिक याबाबत अधिक महत्त्वाचे मानले जाते. कारण तेथील संस्थानिक श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे उत्कृष्ट चित्रकार होते. त्यांनी स्वतः काढलेल्या चित्रांचे संग्रहालय खूपच मनोहारी आहे. त्यांचा राजवाडा चित्रमय राजवाडाच आहे. श्रीमंतांच्या संग्रहालयामध्ये राजा रविवर्माच्या चित्रांच्या मूळ प्रती आहेत. सुप्रसिध्द कारागीर भिवा सुतार यांच्या हातची रामपंचायतन मूळ प्रत पहायला मिळते. चांदीचे भव्य देव्हारे, स्फटिकाच्या सुंदर मूर्ती, संगमरवरी दगडांचे पुतळे, चंदनाच्या लाकडावर कोरलेले रामायणाचे कथानक आहे. अशा अनेक वस्तु या संग्रहालयात पहायला मिळतात. या संग्रहामधूनच 'प्रणयिनी मनोभंग' हे चित्र 'रत्नाकर' च्या अंकात प्रसिध्दीसाठी घेण्यात आलेले आहे. 'प्रणयिनीचा मनोभंग' हे चित्र अगदी वेगळेच आहे. ''एखाद्या लेखांतील भावार्थ व्यक्त करण्याकरिता काढलेली नसून या चित्रांतील भावार्थ व्यक्त करण्याकरिता लेख लिहिले पाहिजेत, अशा योग्यतेची या वर्गातील चित्रे असतात.''

भारतामध्ये चौदा विद्या आणि चौसष्ट कला यांना महत्त्वाचे स्थान दिले जाते. संगीत, चित्रकला, मूर्तीकला, स्थापत्यकला, या सर्वांचा त्यामध्ये समावेश होतो. चित्रकलेला साहित्याची आवश्यकता आहे. चित्रकला, हस्तकौशल्याचा महत्त्वपूर्ण अविष्कार मानला जााते. ''एखाद्या काव्याच्या स्पष्टीकरणासाठी एक वेळ चित्रे नसली तरी चालतील, पण चित्रांच्या स्पष्टीकरणासाठी काव्य असणे अत्यंत आवश्यक आहे.'' चित्रकाराने काढलेल्या चित्राची भाषा समजली पाहिजे. फार प्राचीन काळापासून चित्रकला, शिल्पकला, मूर्तीकला या कला

अस्तित्वात आहेत. जुनी देवळे, प्राचीन गुहा, राजवाडे यामधूनही चित्रकारीचे दर्शन घउते. बौध्द, जैन, मुस्लीम, हिंदू धर्मियांच्या विविध देवता मूर्तींवरून त्यांच्या धार्मिक भाव–भावना समजतात. चित्रही एखाद्या कवितेप्रमाणे, काव्याप्रमाणेच महान मानले जाते. चित्रकार आपल्या भावना चित्रातून व्यक्त करतो. चित्रातील गुण–दोषांवर जर टीका झाली तर चित्रामधील दोष नक्कीच दूर होतील.

प्राचीन काळातील कवी कालिदास महान नाटककार होऊन गेला. ‘शाकुंतल’ या नाटकामध्ये दुष्यंताने शकुंतलेचे चित्र काढलेले आहे.

चित्र हे एक काव्यच असते. चित्रकार आपल्या भावभावना चित्रांतून व्यक्त करीत असतो. प्रतिभा आणि कल्पनाशक्तीचा वापर करून चित्रे काढली जातात. औंधचे संस्थानिक बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी चित्रकलेचा वारसा जपलेला आहे. त्यामुळे चित्रमय वाङ्मय निर्माण होईल. आपल्याकडे चित्रकला व शिल्पकला आहेत. पण म्हणावा तेवढा त्याचा प्रसार झालेला नाही. त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. [६५]

### ३) प्रणयिनीचा मनोभंग या चित्रावरील टीका –

सन १९२८च्या ‘रत्नाकर’ नावाच्या मासिकामध्ये ‘प्रणयिनीचा मनोभंग’ नावाचे सुंदर चित्र प्रसिध्द करण्यात आले होते. त्या चित्रावरील टीका हा या कथेचा विषय आहे. चित्र जुलै १९२८च्या अंकात दिले आहे. परंतु टीका मात्र जानेवारी १९२९च्या अंकात प्रसिध्द झालेली दिसते. ‘प्रणयिनीचा मनोभंग’ हे चित्र श्री. ठाकुरसिंग कलकत्ता येथील चित्रकारांनी काढलेले आहे. ही प्रणयिनी नैराश्यपूर्ण अवस्थेत असल्याचे चित्रातून स्पष्ट होते. चित्र हे खरोखरच काव्यच असते. काव्यातून त्या चित्रातील भावभावना व्यक्त होत असतात. ‘प्रणयिनीचा मनोभंग’ या चित्रातून शृंगार आणि करुण रस व्यक्त होताना दिसतात. चित्रांना बोलके करण्याच काम सर्वांचे असते. चित्रे अबोल असतात.

प्रणयिनी शृंगार केलेली असून कानातील कर्णफुले, शेंदूर लावलेला असून दोन्ही दंडामध्ये कडी आहेत. अंगावरचा बुरखा अंगावरून काढून पलंगावर ठेवलेला आहे. ही नायिका नायकासाठी वाट पाहत आहे, असे वाटते. हा प्रसंग कदाचित दिवसाचा असावा, असे वाटते.

अतिशय सुंदर वदन असलेली प्रणयिनी खुलून दिसत आहे. ''मी आज तुझ्याबरोबर फिरावयाला जाण्यासाठी येऊ शकत नाही'' अशा आशयाचे पत्र तिला मिळत असल्याने तिचा मनोभंग झालेला आढळतो. त्या स्त्रीच्या अंगावर थोडेसेच दागिने आहेत. परंतु तिने हे वाचलेले पत्र तिने पलंगावरच बुरख्यावर टाकलेले दिसते. तिचे मन नाराज झालेले आहे, तिची मनोभंगाची कथा चित्रातून व्यक्त होताना दिसते. या चित्रातील युवतीच्या मनातील भावभावना शृंगाररसापासून करुण रसापर्यंत गेलेल्या सर्व गोष्टी या चित्रातून व्यक्त होताना दिसतात. प्रणयिनीचे डोळेही निस्तेज झालेले दिसतात. प्रणयिनीचे डोळे अश्रुंनी भरलेले दिसतात. तिचा चेहरा म्लान झालेला दिसत आहे. ती दीर्घ श्वास घेत आहे, असा भास होताना दिसतो.

या चित्रातून काही गोष्टी आपल्याला समजतात. प्रणयिनी सुरुवातीला आनंदी होती. परंतु एका पत्रावरून तिची मुद्रा, चेहरा अतिशय दुःखकारक होती. शृंगाररसाचे करुण रसामध्ये रुपांतर झालेले दिसते. नटण्या-मुरडण्याच्या, शृंगाराच्या गोष्टी आहे तिथेच राहिल्या. एका पत्रामुळे प्रणयिनीचा मनोभंग झालेला होता. दुर्दैवापुढे कोणाचेही काही चालत नाही. ईश्वरी कृपेवाचून काहीही साध्य होत नाही. म्हणून आपलेल्या संकटाचा योग्य सामना केला तर जीवन सुसह्य होईल, असे या कथेतून समजते. [६६]

## ४) श्रीमद्‌भगवद्‌गीतेतील एक शंकास्थान (पृ. ८३ ते ९५) -

मनुष्याच्या जीवनातील अंतिम सत्य म्हणजे मोक्ष. मोक्षाप्राप्ती संदर्भात अतिशय उत्तम विवेचन या कथेमध्ये केलेले आहे. श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेला श्लोक भगवद्‌गीतेच्या आठव्या अध्यायामध्ये २३ वा श्लोक आहे. त्यामध्ये श्रीकृष्ण सांगतात, ''अमुक एका काळी मरण आले तर मुक्ति प्राप्त होते आणि त्याहून भिन्न काळी मरण आले तर प्राण्याला पुन्हा जन्म प्राप्त होतो. '' म्हणजेच मृत्यु आणि पुर्नजन्म माणसाच्या मृत्युच्या वेळेवर अवलंबून असतात का? प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानामध्ये 'मोक्ष' या घटकाला अन्यसाधारण महत्त्व होते. माणसाच्या मृत्युनंतर त्यात जन्म, पुर्नजन्म हा घटक महत्त्वाचा मानला जात होता. चांगला मोक्ष मिळावा यासाठी प्रत्येकाची धडपड चालू असते. मरणाच्या काळ आणि वेळेवरही मोक्षप्राप्ती अवलंबून असते. मनुष्याची अंतकाळी चांगली वासना, विचार असणे गरजेचेआहे. तरच चांगली गती किंवा मोक्ष मिळेल. भगवद्‌गीतेत म्हटल्याप्रमाणे ''उत्तरायणाच्या काळात मरण येणे हे शुभ

मानले जाते.'' रात्री मरण आलेल्या व्यक्तीवर सूर्यकिरणे पडत नसल्याने त्याला वर जाता येत नाही, असेही मानले जाते. परंतु सूर्य मावळला असला तरी त्याची किरणे मागे असतातच. ते आपल्याला दिसत नाहीत. दक्षिणायनात मरण आले तरीही त्याला ब्रह्मविद्येमुळे मोक्षप्राप्ती होतच असते. मोक्षाला जाण्याचा आणि पुर्नजन्म येण्याचा काळ महत्त्वाचा मानला जातो. परंतु मरण हे शुभ किंवा चांगल्या काळी यावे, अशी प्रत्येकाचीच इच्छा असते.

मोक्षप्राप्ती मृत्युच्या वेळेवर ठेवायची का ज्ञानावर अवलंबून ठेवायची हा फार मोठा प्रश्न मानला जातो. अनेक संस्कृत ग्रंथांतून याविषयी चर्चा झालेली आढळते. मराठी ग्रंथांतून याविषयी फार काही गोष्टी आढळत नाहीत. संत ज्ञानेश्वरांनी आपल्या ओव्यांच्या माध्यमातून अनेक मुद्दे मांडले आहेत. समर्थ रामदास स्वामींनी आपल्या दासबोधामध्ये याविषयी परखड मते व्यक्त केलेली आढळतात.

संस्कृत ग्रंथकारांनी मोक्षासंदर्भात अनेक मतमतांतरे व्यक्त केलेली आढळतात. परंतु मराठी भाषेतील संतकवींनी या विषयी फारसे मत ताणलेले दिसत नाही. फक्त एवढेच मत व्यक्त होताना दिसते. कर्म चांगले करा, फळ चांगले मिळेल. म्हणजे जीवनात चांगल्याच गोष्टींचा अवलंब करा. सर्व काही सुकर होईल. एवढाच संदेश यामधून प्राप्त होताना दिसतो.[६७]

## ५) दोन काळोखांत तीन काजव्यांचा लुकलुकाट –

मनुष्याच्या जन्माच्या अगोदरची स्थिती व मनुष्याच्या निधनानंतरची स्थिती हे कोणालाही माहित नसते. मनुष्याचा आदि आणि अंत एवढेच माहित असते. मनुष्य हा चराचरातील अत्यंत बुध्दीमान प्राणी आहे. त्याने बरेच यश मिळविले आहे. त्याच्या डोळ्याने जेवढे पाहता येते, तेवढे तो पाहतोच. पण त्याहीपेक्षा जास्त दूर पाहण्याचा प्रयत्न करतो. कानाने ऐकण्याचेही काम मनुष्य करत असतो. एखादी गोष्ट प्रत्यक्ष करणे आणि त्याचे अनुमान काढणे या दोन गोष्टी मनुष्याची प्रमुख साधने आहेत.

''मनुष्य जन्मास येतो, त्याच्यापूर्वी त्याच्या पूर्वजन्मांतील काहीतरी कारणे अस्तित्त्वात आली पाहिजेत की, ज्यांच्यामुळे हल्लीचा जन्म हे पूर्वीच्या जन्माचे कार्य उत्पन्न होते, असे अनुमान मनुष्य बांधतो व अशा रितीने तो पूर्वजन्माची सिध्दता करतो.''

पूर्वजन्माप्रमाणेच आपल्याला पुर्नजन्मही असावा, असे अनुमान मनुष्य काढताना दिसतो.

म्हणजेच मनुष्याने पूर्वजन्म आणि पुर्नजन्म या दोन गोष्टी मानायला सुरुवात केली. परंतु हा प्रकार न मानणारेही लोक आहेत. त्यातून आस्तिक आणि नास्तिक या दोन पंथांची सुरुवात झालेली दिसते. पुर्नजन्माच्या संदर्भात थोडी भिती मनुष्याच्या ठिकाण असते. काही काळ तो व्यवस्थित वागतो, परंतु नंतर तो क्रूर श्वापदाप्रमाणे वागतो.

शाब्दप्रमाण हा घटक महत्त्वाचा आहे. 'शाब्दप्रमाण' या शब्दाचा अर्थ शब्दप्रमाण होय. कोणाचा शब्द प्रमाण (योग्य) मानावयाचा हे ही महत्वाचे ठरते. कारण मनुष्य स्वतःच्या मनाला जेवढे ओळखतो ते दुसरे त्याचे मन ओळखू शकत नाहीत. त्यामुळे शब्दप्रमाणाला मान न देता प्रत्यक्ष कृतीकडे लक्ष द्यायला हवे. प्रत्यक्षप्रमाण म्हणजे प्रत्येकाचे स्वतःचे प्रमाण होय. मनुष्याने प्रत्यक्ष डोळ्याने पाहिलेली गोष्ट महत्त्वाची असते. त्यावरून त्याने काढलेले अनुमान तेवढेच महत्त्वाचे असते. स्वतःचे ज्ञान अधिक महत्त्वाचे ठरते. परंतु लोक स्वतःच्या अनुमान आणि ज्ञानापेक्षा दुसऱ्याच्या सर्व गोष्टींवर विश्वास ठेवताना दिसतात. परमेश्वराने सृष्टी निर्माण केलेली आहे. ''पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश, पर्वत, जरायुज, अंडज, उद्भिज आणि स्वेदन असे चतुर्विध प्राणी, इ. सर्वांनी मिळून झालेला जो ग्रंथ तो त्या परमेश्वराचा धर्मग्रंथ होय.'' परमेश्वराने जगण्याची काही तत्त्वे निर्माण केली आहेत. त्याप्रमाणे मनुष्याने आपले जीवन जगत रहावे. निर्गुण, निर्विकार परमेश्वराचे अस्तित्त्व मनुष्याला महत्त्वपूर्ण आहे.

अनुमाना प्रमाणे अनन्यसाधारण मानली जातात. वर्तमानकाळाप्रमाणे भूतकाळाला म्हणजे प्राचीनतत्त्वाच्या गोष्टींवर चटकन विश्वास बसतो. तेच ग्राह्य मानले जाते. गतकाळ महत्त्वाचा मानला जातो. त्या काळात चमत्कार मोठ्या प्रमाणावर होताना दिसतात. प्रत्यक्ष अनुमाने आणि शब्दप्रमाण या विचारात बऱ्याचदा मनुष्य गोंधळून जातो. मृत्युनंतरच्या काळाची मानवाला विशेष माहिती झालेली दिसत नाही. बाह्यइंद्रियांपेक्षा अंतरइंद्रिय म्हणजेच मन महत्त्वाचे असते. चित्तवृत्ती स्थिर असेल तर आत्म्यापेक्षा ऐक्यभाव निर्माण होतात. अंतःकणामध्ये स्फुर्ती निर्माण होते. सर्वांचा नियंता, सर्वशक्तीमान परमेश्वर जे दाखवेल ते सप्रमाण मानणे गरजेचे आहे. यामध्ये मनुष्यप्राणी फार काही करू शकणार नाही. इतकेच यातून समजते.[६८]

## ६) ज्ञानेश्वरीतील षड्दर्शने –

संत ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात वैदिक वाङ्मयावर आरोप करून सुंदर वर्णन केलेले आहे. गणपतीच्या वंदनाने ग्रंथाला सुरुवात केलेली आहे. संस्कृत ग्रंथामध्ये गणपतीला सहा हात असल्याचा उल्लेख आला आहे. सहा हात व सहा दर्शन यावर ज्ञानेश्वरांनी आरोप केलेला आहे. श्री. चिंतामणराव वैद्य यांनी पंजाबमध्ये सहा हातांचा गणपती असल्याचा उल्लेख केलेला आहे. यावरून सहा हाताच्या गणपतीच्या मूर्ती सुरुवातीला अस्तित्वात होत्या असे दिसते. संत ज्ञानेश्वरांनी १) न्याय २) वैशेषिक ३) वेदांत ४) बौध्दमत ५) सांख्य व ६) पूर्व मीमांसा अशी षड्दर्शने व्यक्त केलेली आढळतात. हा क्रम थोडा उलटसुलट वाटत आहे. खऱ्या अर्थाने १) न्याय २) वैशेषिक ३) सांख्य ४) योग ५) पूर्वमीमांसा आणि ६) उत्तर मीमांसा अथवा वेदांत ही सहा दर्शने मानली जातात. दृश धातुपासून दर्शन हा शब्द आलेला आहे. तत्त्वज्ञान म्हणजे दर्शन होय. वैदिक काळात श्रृतीला मानणारा वर्ग होता. परंतु नंतरच्या काळात स्वतंत्रपणे तत्त्वज्ञानाचा विचार होऊ लागला.

समाजामध्ये वेद, धर्मग्रंथ मानणारे व न मानणारे असे दोन पंथ निर्माण झाले. प्रत्यक्ष, अनुमान आणि श्रृती ही तीन प्रमाणे मानली जातात. श्रृति मानणारा आस्तिक व न मानणारा नास्तिक म्हणून संबोधला जाऊ लागला. परमेश्वराचे अस्तित्त्व मानणारा आस्तिक व परमेश्वराचे अस्तित्त्व न मानणारा नास्तिक म्हणून ओळखला जाऊ लागला. आस्तिक वर्ग १) न्याय २) वैशेषिक ३) सांख्य ४) योग ५) पूर्व मीमांसा ६) उत्तर मीमांसा ही दर्शने मानतात. तर नास्तिक वर्ग १) बौध्द २) नैयायिक ३) सांख्य ४) जैन ५) वैशेषिक व ६) जैमिनीय ही दर्शने मानतात.

सहा दर्शनांच्या संख्येतही विविध मतप्रवाहांमध्ये बराच भेद आढळतो. विद्यारण्य स्वामींनी सोळा दर्शनांचा उल्लेख केलेला दिसतो. ज्ञानेश्वरा महाराजांच्या दर्शनांच्या यादीत बौध्द दर्शनाचा उल्लेख आलेला आहे. ते नास्तिक पंथातील एक दर्शन आहे. ज्ञानेश्वरांनी नास्तिक पंथातील दर्शनाचा उल्लेख का केला असावा? असाही प्रश्न उभा राहतो. ज्ञानेश्वरांच्या विविध ओव्यांमधून 'दर्शने' या शब्दाव्यतिरिक्त फार काही माहिती आलेली दिसत नाही. आस्तिक व

नास्तिक भेदाचा उल्लेख आलेला आहे. जैन अनुयायांची निंदा केलेली आढळते. व बौध्द दर्शनाचा आस्तिकांच्या बरोबर उल्लेख केलेला आढळतो. याचा उलगडा होत नाही. [६९]

## ७) ध्रुवाची गोष्ट खोटी असली पाहिजे –

सुरुवातीला देवभोळे आणि धर्म भोळे लोक असल्याने मनोरंजनाकरिता काहीही केले तरी ते त्याच्यावर पटकन विश्वासत ठेवत होते. जुन्या गोष्टींचा शोध घेण्याकरिता बरेच प्रयत्न सुरू आहेत. विविध निबंधांचे लेखन सुरू आहे. त्यामध्येच एका संस्थेने 'धृवाची गोष्ट खोटी असली पाहिजे!' या आशयाचा निबंध वाचण्यात आला. हा निबंध सन १९२६ साली वाचण्यात आला होता. त्याचा आढावा....

उत्तानपाद नावाचा राजा सूर्यवंशामध्ये होता. त्याला सुरुचि आणि सुमती या दोन राण्या होत्या. सुमतीला धृव पुत्र झाला. त्यामुळे दोन राण्यांमध्ये सवतीमत्सर जागा झाला. धृव लहानाचा मोठा होत होता. साधारण तो सात–आठ वर्षांचा असेल. राजवाड्यामध्ये खेळत असताना राजा उत्तानपाद याला त्याच्याबद्दल प्रेम उत्पन्न झाल्याने राजाने धृवाला मांडीवर घेतले. त्यामुळे राणी सुरुचि हिला प्रचंड द्वेष व संताप उत्पन्न झाला. तिने ध्रुवाला लाथ मारून खाली ढकलून दिले. या गोष्टीचे ध्रुवाला वाईट वाटले. पुढे ईश्वराला प्रसन्न करून घेऊन त्याने स्वतःला अढळपद प्राप्त करून घेतले. अशी ही गोष्ट आहे. ध्रुवाची गोष्ट वाचून अनेकांना खूप वाईट वाटले.

परंतु अनेक जणांनी ध्रुवाची गोष्ट खोटी ठरविली आहे. कारण त्यांच्याकडे तसे भक्कम पुरावेही उपलब्ध आहेत. ध्रुवाच्या सावत्र आईने त्याला एकापेक्षा अनेक लाथा मारल्या, असा उल्लेख कोठेही आलेला नाही. एक लाथ मारल्यानंतर ध्रुवाला एवढा संताप का येतो? हा प्रश्न निर्माण होतो. शि.म.परांजपे यांनी अतिशय उत्तम मत व्यक्त केलेले आढळते. ते म्हणतात, ''आम्ही इतक्या लाथा खातो, तरी आमच्या मनावर परिणाम होत नाही. आम्ही निर्लज्जपणाने ब्रिटिशांच्या नोकऱ्या करतो. स्वराज्यप्राप्ती काय वाटेवर पडली आहे का ? ध्रुवाला एका लाथेने एवढा राग यायचे कारण काय? ध्रुव एकटा मनुष्य बाकी आम्ही काय जनावरे आहोत का? इतक्या लाथा खातो तरी आम्हाला राग येत नाही. सात–आठ वर्षाच्या मुलाला एवढा राग का यावा? त्याला राजकारणाचे काय कळते? त्याने स्वतःला अढळपद प्राप्त करून घेतले. इतकी

वर्षे आम्ही लाथा खात आहोत, पण आमच्या मनामध्ये असे काही विचार येत नाहीत. ध्रुवाला तर त्याच्या एकट्या आईनेच लाथ मारली आहे. आम्हांला आई–वडील, सरकार सर्वच जण लाथा मारत आहेत. आम्हाला काही फरक पडत नाही. ज्यांना स्वातंत्र्याची खरच तळमळ असेल त्यांच्या मनामध्ये राग, त्वेष निर्माण होईल. स्वराज्यप्राप्तीसाठी लाथा खात आहोत. तरीही त्यांच्या नोकऱ्या करण्यात धन्यता मानत आहोत. ध्रुवाने एक लाथ खाल्ली तर त्याचा पुरुषार्थ जागा झाला? आमचा केव्हा होणार?'' हा प्रश्न शि.मं.नी विचारलेला दिसतो.

सुरुचिसारख्या मातेकडून लाथ बसल्यामुळे भेकड ध्रुवाने एवढे गोंधळून जायला नको होते. धैर्याकडे, पर्वताकडे शूर योध्दे यांच्याकडे ध्रुवाने पहायला हवे होते. एका लाथेने डगमगून जाण्यापेक्षा स्वराज्याच्या लढाईसाठी तयार व्हायला हवे. स्वराज्यप्राप्तीचा कोणी विचार करीत नाही. ब्रिटिशांच्या लाथा खाऊन नोकरी करण्यामध्ये धन्यता मानली जाते. त्यामुळे ध्रुवाची गोष्ट खोटी असली पाहिजे, असेच वाटते.

याशिवाय आकाशामध्ये सप्तऋषी फिरत असतात. परंतु ध्रुव तारा मात्र अढळ किंवा स्थिर आहे. सर्व ऋषी फिरत असताना धृव एकटाच अढळ कसा ? हा प्रश्न निर्माण होतो. पृथ्वी सुध्दा झपाट्याने फिरत आहे तर ध्रुव स्थिर कसा? सर्व घटकांमध्ये चंचलपणा आहे म्हणून ध्रुवाचे अढळपद थोडेसे बरोबर वाटत नाही. त्यामुळे ध्रृवाची ही गोष्ट चुकीच्या पध्दतीने रचण्यात आलेली आहे, असे वाटते. एका लाथेने त्याला एवढा राग आला म्हणून ''ध्रृवाची गोष्ट खोटी असली पाहिजे!'' असेच मत व्यक्त करावे वाटते. [७०]

## ८) शाकुंतलाच्या पाचव्या अंकातील एक श्लोक –

कालीदासाच्या शाकुंतल नाटकाच्या पाचव्या अंकामध्ये एक चांगला श्लोक आलेला आहे.

''स्त्रीणामशिक्षितपटुत्वममानुषीषु
संदृश्यते किमुत या प्रतिबोधवत्यः ।
प्रागन्तरिक्षगमनात्स्वमपत्यजातमन्यै र्द्विजैः
परभृताः खलु पोषयन्ति ।।''

या श्लोकाचा अर्थ – ''शकुंतला दुष्यंत राजाकडे येते. परंतु दुर्वास ऋषीच्या शापाने त्याची पूर्वस्मृती नाहीशी झाल्याने तो शकुंतलेचा स्वीकार करू शकत नाही. शकुंतला राजाला अंगठी दाखविण्याचा प्रयत्न करते. परंतु अंगठी अगोदरच शचीतीर्थात पडून हरवलेली असल्याने ती आपल्याजवळ नाही हे तिला त्याचवेळी समजते.''

पुढे शकुंतला दीर्घापांग नावाच्या हरिण बालकाची कथा राजाला सांगते. परंतु अशा गोष्टी सांगण्यात बायका हुशार असतात, असे राजा म्हणतो. त्यावेळी गौतमीला त्याचा राग येतो. राजाने स्त्रियांच्या कुशलतेसाठी हा श्लोक केलेला दिसतो. शकुंतलेच्या जन्माची कथा राजाला आठवते व स्वतःशी झालेला विवाह आठवत नाही. त्यामुळे राजा खोटे बोलत आहे, असा शकुंतलेचा भ्रम होतो.

शकुंतलेची आई मेनका हिने कण्व ऋषींकडून मुलीचे पालनपोषण करवून घेतले. जशी कोकिळा आपल्या पिलांना आकाशात उडता येण्यापर्यंत कावळ्यांकडून त्यांचे पोषण करून घेते. त्याचप्रमाणे मेनकेने केलेले दिसते.

दुर्वास ऋषीने दिलेल्या शापाची गोष्ट सांगितलेली आहे. कालिदासाने आपल्या काव्यामध्ये देऊन अरसिकपणा व आत्मघातकीपणा दाखविलेला दिसतो.

परंतु शकुंतलेला दुर्वासाच्या शापाची माहिती नसते. त्यामुळे मेनकेविषयी तिच्या मनात शंका येते. दुष्यंताबरोबर झालेला गांधर्व विवाह शकुंतलेला आठवत आहे. तिला तसे दुष्यंताकडून कबुल करून घेता आले असते. परंतु शकुंतला मारीच ऋषीच्या आश्रमात जाऊन तपश्चर्या करीत बसली आहे. यावरून शकुंतलेला मेनकेच्या कार्याचा अर्थच समजलेला नव्हता. जशी कोकिळा दुसऱ्या पक्षांकडून आपल्या अपत्यांचे पालनपोषण करून घेते. त्याचप्रमाणे ह्या अंकाचा अर्थ मानावा लागणार आहे. [७१]

## ९) कालिदासाने न लिहिलेले नाटक –

प्राचीन काळातील अतिशय सुंदर संस्कृत काव्ये, नाटके लिहिणारा लेखक व कवी म्हणून कालिदासाची ख्याती जगविख्यात आहे. रघुवंशादिक काव्ये, विक्रमोर्वशीय, मालविकाग्निमित्र व शाकुंतल अशी एकापेक्षा एक सरस अभिजात काव्ये, नाटके यांचा निर्माता

म्हणून कालिदासाचे स्थान अद्वितीय आहे. शाकुंतल नाटकातून करुण आणि शृंगार रसाची अनुभूती येते. कण्व ऋषींच्या आश्रमामध्ये राजा दुष्यंत व शकुंतला यांची प्रेमकहाणी फुलून त्यांच्यामध्ये गांधर्व विवाह झालेला होता. पुढे दुष्यंताला भरत नावाचा पुत्र होऊन तो मोठा सम्राट झाला. पुढे राजा दुष्यंताने भरत व शकुंतलेचा स्विकार केला.

कालिदासाने आपल्या शाकुंतला नाटकामध्ये साधारण चौथ्या अंकापासून सुरुवात केलेली आहे. शकुंतला ही एकदम चिंताग्रस्त अवस्थेत बसलेली आहे. कण्व ऋषींच्या आश्रमात दुर्वास ऋषी शकुंतलेला शाप देतो. आपल्या प्रिय राजाच्या विरहाने शकुंतला चिंतीत असते. शकुंतला दुष्यंताकडे निघालेली असते. तेव्हा राजने तिला खुणेची अंगठी दिलेली असते. परंतु दुर्दैवाने  शकुंतलेच्या हाताच्या बोटातून ती अंगठी पाण्यात पडते. परंतु शकुंतलेला ऐनवेळी ती अंगठी राजा दुष्यंताला दाखविता येत नाही, म्हणून ओळख पटत नाही. राजा दुष्यंत शकुंतलेचा स्विकार न करताच निघून जातो. शकुंतलेला काय करावे, काही सूचत नाही. ती दैवाला दोष देते व पृथ्वीला दुभंगून तू मला आपल्या पोटात घे, असे विनविते. येथून नाटकातील करुणरसाची निर्मिती होते.

गरोदर शकुंतला चिंताग्रस्त अवस्थेत असतानाच एका ज्योतीने तिला आकशात नेले. ती ज्योत म्हणजे तिची आई मेनका होती. येथूनच कालिदासाने न लिहिलेल्या नाटकाला खरी सुरुवात होते.

कारण शकुंतलेला कोणी परपरुषाचा स्पर्श न होता एका ज्योतीने म्हणजे मेनकाचे मातृत्त्व जागे झाले. आपल्या मुलीच्या संकटाच्या काळात आईने तिला मदत केल्याचे दिसते.

परंतु हा पुढील भाग रंगमंचावर दाखविला जात नाही. ज्याप्रमाणे रामायणामध्ये रामने सीतेचा त्याग केला, त्याचप्रमाणे दुष्यंताने शकुंतलेचा त्याग केलेला आहे. इंद्राच्या सांगण्यावरून मेनकेने विश्वामित्राची तपश्चर्या भंग पावली होती. विश्वामित्राला कामवश केले होते. त्यामुळे विश्वामित्राचा संताप अनावर झाला होता. तो शकुंतलेवर काय प्रेम करणार? मेनकेला आता मृत्युलोकामध्ये राहता येणार नव्हते. त्यामुळे शकुंतलेला कण्व ऋषींच्या आश्रमात ठेवून मेनका स्वर्गात निघून जाते. परंतु आपली कन्या शकुंतला हिच्यावर तिचे बारीक लक्ष असते. तिची पूर्ण

काळजी घेण्याचे काम मेनका करीत असते. शकुंतला लहानाची मोठी होत असताना तिच्यावर अनेक संकटे येतात व मातृत्वाच्या प्रेमामुळे त्या संकटांवर शकुंतला मात करताना दिसते.

पुढे दुष्यंत व शकुंतला यांचा गांधर्व विवाह होतो. पुढे दुष्यंताला शकुंतलेशी विवाह झाल्याचे आठवत नाही. दुष्यंताने दिलेली अंगठी शकुंतलेच्या बोटातून कुठेतरी पडलेली दिसते. त्यामुळे ती ही ओळख दाखवू शकत नाही. स्त्रियांना खोटे बोलायची सवयच असते, असे दुष्यंत म्हणतो. तेव्हा मेनकेला प्रचंड क्रोध निर्माण होतो. मेनका विश्वामित्राला, आपल्या मुलीची संकटातून मुक्तता करा, अशी विनंती करते. तशीच इंद्रालाही विनंती करते. परंतु विश्वामित्र आणि इंद्र दोघेही मदत करीत नाहीत. शकुंतला मात्र चिंताग्रस्त अवस्थेत धरणीमातेला उदरांत घेण्याची विंनती करीत असते. तेव्हा मेनकेचे आईचे हृदय उचंबळून आले आणि तेजोमय अवस्थेत खाली येऊन शकुंतलेला अंतरिक्षामध्ये मेनका घेऊन जाते.

पुढे शकुंतला आणि तिची आई मेनका यांची एकमेकींशी ओळख होते. दोघही आपल्या गोष्टी एकमेकींना सांगतात. पुढे इंद्र या दोघींना भेटतो. शकुंतलेला तुझ्या पतीची आणि तुझी भेट घडवून आणतो, असे आश्वासन इंद्र देतो. हिमालयामध्ये देवमाता आदिती यांच्याकडे शकुंतलेला नेण्याचा सल्ला मेनकेला देतो. मारीच ऋषींच्या आश्रमामध्ये तपश्चर्या केल्यास दुष्यंत, तुझा पुत्र आणि तुझी भेट निश्चित होईल, असे आश्वासन इंद्र देतो. [७२]

## १०) रायगड किल्ल्याची दोन स्थित्यंतरे –

मराठ्यांचे छत्रपती शिवाजी महाराजांनी मोठ्या कष्टाने विविध मोहिमा, लढाया करून हिंदवी स्वराज्याची निमिती केली. ६ जून १६७४ हा दिवस प्रत्येक मराठी माणसासाठी महत्त्वाचा होता. कारण, याच दिवशी स्वतः शिवाजी राजे मराठ्यांचे छत्रपती बनले. ६ जून १६७४ रोजी शिवाजी महाराजांनी याच रायगडावर स्वतःला राज्याभिषेक करवून घेतला. मराठ्यांचा राजा मिळाला. रायगड किल्ला या घटनेचा साक्षीदार झाला. म्हणजे हे एक महत्त्वपूर्ण स्थित्यंतर मानले जाते. प्रत्येक मराठी जनतेच्या मनात किल्ले रायगड आणि शिवाजी महाराजांबद्दल अभिमान वाटू लागला.

परंतु रायगडवरील दुसरे स्थित्यंतर प्रत्येक मराठी जनतेला सुन्न करणारे म्हणावे लागेल. सन १८१८ला हाच रायगड किल्ला इंग्लिश लोकांच्या हातात गेला. केवळ १४४ वर्षात हा बदल झालेला होता.

दुसरे बाजीराव हे पेशवे होते. परंतु त्यांच्या चंचल व धरसोड वृत्तीमुळे त्यांनी सन १८१७ मध्ये पुणे सोडण्याचा निर्णय घेतला. पुणे आणि आसपासच्या प्रदेशावर, किल्ल्यांवर आक्रमणे करण्याचे धोरण ब्रिटिशांनी स्विकारले. रायगड हा अभेद्य किल्ला. परंतु याही किल्ल्यावर संकट कोसळले. बाजीराव पेशव्यांच्या पत्नी वाराणशीबाई रायगड किल्ल्यावर येऊन दाखल झाल्या. रायगड किल्ला ताब्यात घेण्याची जबाबदारी लेफ्टनंट कर्नल प्रॉथर यांच्यावर दिलेली होती. त्यांनी रायगडाकडे येताना वाटेत तळे–घोसाळे हे दोन किल्ले ताब्यात घेतले. मेजर हॉल यांच्याबरोबर चारशे लोकांची तुकडी ब्रिटिशांनी रायगडाच्या पायथ्याशी तयार ठेवली होती. महाराष्ट्रात सर्वात उंच किल्ला म्हणून रायगड प्रसिध्द आहे. ब्रिटिशांना याचा निश्चितच त्रास होणार होता. कर्नल प्रॉथर यांच्या मदतीला ६७ व्या पलटणीतील सहा कंपन्या मदतीला पाठविल्या होत्या. ब्रिटिशांनी तोफा डागण्याची संपूर्ण तयारी केलली होती. परंतु मराठ्यांनी ब्रिटिश किल्ल्यावर येणार नाही व तोफा डागणार नाहीत, याची काळजी घ्यायला हवी होती. महाराष्ट्रामध्ये औरंगजेबाचे सैन्य उच्छांद मांडत असताना संताजी आणि धनाजीची कामगिरी खरोखरच अतुलनीय अशीच होती. हाच आदर्श मराठ्यांनी घ्यायला हवा होता. शत्रुला अडचणीत आणण्यासाइी गनिमी कावा या युध्द तंत्राचा मराठ्यांनी वापर करायला हवा होता. परंतु सुरुवातीपासून मराठ्यांना फितुरीचा शाप लागलेला होता. रायनाका महार या माणसाने फितुरी करून रायगडावर तोफांचे गोळे कसे टाकायचे हे सांगितले होते. विश्वासघातकीपणा, फितुरी करून मराठे लोक ब्रिटिशांना मदत करीत होते.

रायगडाचा किल्लेदार शेख हा अरबी मनुष्य होता. त्याला व त्याच्या सहकाऱ्यांना सौ.वाराणशीबाई मनापासून प्रोत्साहन देत होत्या. ब्रिटिशांना किल्ल्यावर एक निरोप पाठविला व 'बाजीरावाच्या पत्नी व त्यांच्या नातेवाईकांना किल्ल्यातून सुरक्षित ठिकाणी जाऊन रहावे', असा सल्ला दिलेला होता. जेणेकरून मराठ्यांमध्ये फुट पडेल असे इंग्रजांना वाटत होते. परंतु सौ. वाराणशीबाई यांनी किल्ला न सोडण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे मराठी सरदारांमध्ये व किल्लेदार शेख अब्दुला याच्या मनामध्ये लढण्याचा उत्साह निर्माण झाला. फितुरीच्या

सल्ल्यावरून ब्रिटिशांनी रायगडावरील एक–एक इमारती नष्ट करण्याचा सपाटाच लावला. ''आम्हाला खायला नसेल तरी चालेल, परंतु आमच्याकडे दारुगोळा जोपर्यंत आहे, तोपर्यंत आम्ही लढतच राहणार'', असा निर्धार किल्लेदार शेख अब्दुल याने वाराणशीबाईंकडे व्यक्त केला.

रायनाक महाराच्या फितुरीमुळे एक गोळ मात्र दारुगोळ्याच्या कोठारावर आदळला आणि किल्ल्यावर प्रचंड भडका उडाला. रायगडावर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. किल्ला हादरून गेला. आग आणि धुरांचे लोट सर्वत्र पसरले. मराठ्यांना बाहेरच्या शत्रुपेक्षा फितुरी हाच मोठा शत्रु होता. रायगड ब्रिटिशांनी जाळला नसून फितुराने जाळला होता. रायगडावरील विविध देवळांचे, महादेवाच्या मंदिराचे रुप छिन्न–विछिन्न झालेले होते.

दारूच्या कोठारालाच आग लावल्याने किल्लेदार व त्याचे साथीदार यांनी आशाच सोडली. ७ मे १८१८ रोजी दोन्ही पक्षातील लोक तहाच्या वाटाघाटी करण्यासाठी एकत्र आले. किल्लेदार शेख अब्दुल याने अनेक अटी ब्रिटिशांपुढे ठेवल्या. त्यानुसार ८ मे १८१८ रोजी उभयतांत तह झाला. त्यानुसार ...१) किल्ल्यावर असलेल्या सर्व शिपाई लोकांना आपली हत्यारे आणि आपली खाजगी मिळकत बरोबर घेऊन जाण्याला परवानगी असावी. २) किल्लेदार शेख अब्दुल याला आपल्या नोकरांसह, हत्यारांसह पुण्यात राहण्याची परवानगी असावी.

या अटींवर किल्ला खाली करण्यास सांगण्यात आले. दि. १० मे १८१८ रोजी सायंकाळी ब्रिटिश लेफ्टनंट कर्नल प्रॉथर याने रायगड हा मराठ्यांचा किल्ला ताब्यात घेतला. सर्व इमारती उध्वस्त झाल्या होत्या, इंग्लिशांनी मात्र पाच लाख रुपये रोख सापडल्याची माहिती दिली आहे.

अशाप्रकारे अभेद्य रायगड किल्ल्याने दोन स्थित्यंतरे जवळून पाहिली होती. ६ जून १६७४ ला महाराजांचा झालेला राज्याभिषेक हा गौरवशाली प्रसंग होता. परंतु १० मे १८१८ला ब्रिटिशांनी याच रायगड किल्ल्याचा घेतलेला ताबा मात्र निराशाजनक होता. फक्त १४४ वर्षात्र अशो दोन स्थित्यंतराला म्हणजे बदलाला रायगड किल्ल्याला सामोरे जावे लागलेले होते. १८१८ला मराठ्यांचा भगवा ध्वज ब्रिटिशांनी खाली काढला होता. हा केवढा मोठा

दैवदुर्विलास म्हणावा लागेल. मराठ्यांच्या फितुरीमुळे रायगड राजधानीचा किल्ला ब्रिटिशांच्या ताब्यात गेला होता. शि.म.परांजपे यांनी या कथेतून रायगड या किल्ल्याला दोन बदलांना कसे सामोरे जावे लागले, हे अतिशय समर्पक शब्दात वर्णन केलेले दिसते. [७३]

## ११) रायगडावरील संपत्ती –

मराठ्यांच्या राजधानीचे ठिकाण म्हणून किल्ले रायगडाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. ६ जून १६७४ ला शिवाजी महाराजांनी रायगडावर स्वतःला गागाभट्टांच्या हस्ते राज्याभिषेक करवून घेतला. हा एक भाग झाला. परंतु १० मे १८१८ रोजी ब्रिटिशांनी रायगड हा किल्ला मराठ्यांच्या ताब्यातून हिसकावून घेतला, हा दुसरा भाग होय.

रायगड किल्ला ताब्यात घेतला. ब्रिटिशांच्या तोफगोळ्यांचा मारा किल्ल्यावर झाला. सर्व रायगडावरील इमारती जमीनदोस्त करण्यात इंग्रज यशस्वी झाले. शिवाय किल्ल्यावर पाच लाख रुपये रोख रक्कम इंग्रजांना मिळाली. सुरुवातीला असणारे राजवैभव नष्ट झालेले होते. सर्वत्र अवशेष उरलेले होते. परंतु राजगडाच्या खाली पायथ्याशी असणाऱ्या खेडेगावातील लोकांना रायगडावर मोठी संपत्ती आहे, असे समजल्यावर प्रत्येक जण गडावर जाऊन खोदकाम करून काही संपत्ती मिळते का? याचा शोध घेऊ लागले. सन १८१८ ला इंग्रजांनी रायगडावर शेवटचा प्रहार केल्यावर आपल्याला काय मिळेल का? याचा लोकांनी विचार करायला हवा होता.

रायगड हा सर्वात उंच किल्ला होता. अतिशय आल्हाददायक वारा, सुंदर रमणीय सौंदर्य हा या किल्ल्याचा वारसा होता. परंतु सोने मिळण्याच्या आशेने अनेक लोक रायगडावर रोज जात होते. त्यापैकीच छत्री निजामपूर गावातील दौलती नावाचा साधारण १८–२० वर्षांचा मुलगा ज्याचे आई–वडिलांचे छत्र हरवलेले आहे, तो सुध्दा रायगड किल्ल्यावर जाऊन काही संपत्ती मिळते काय ? आपले नशीब उजळेल काय ? या विचाराने एका रात्रीच रायगडावर जाण्याचे ठरवितो. पहार, कुदळ घेऊन जातो. बऱ्याच ठिकाणी खोदतो. पण त्याला द्रव्य किंवा सोने कोठेही सापडत नाही. महाराजांचे सिंहासन जेथे होते, तेथील दगड तो हलवून बघतो. पण काहीही मिळत नाही. उलट तो थकून जातो. त्यामुळे त्याला झोप लागते. सकाळ झाल्यावर आजुबाजुच्या खेड्यातील व रायगड किल्ल्यावरील पक्षांच्या आवाजाने त्याला जाग येते. जिकडे–तिकडे त्याने खोदलेल्या गोष्टी दिसतात. त्याच्या मनाला खूप वाईट वाटते.

सकाळच्या मनमोहक सृष्टीसौंदर्याने रायगड हा किल्ला न्हाऊन गेलेला असतो. रायगडावरून खाली असलेली खेडी सुंदर, नयन मनोहर दिसत होती. रायगडावरून डोंगराच्या कड्यावरून महासमुद्र जणू काही स्वर्गासारखा दिसत होता. पर्वत, शिखरे, सोन्याने मढवलेली वाटत होती. जणू सारा रायगडच सोन्याने अलंकृत झाल्यासारखे वाटत होते. दौलती या मुलाला फार मोठा प्रश्न पडला ? आपण खोदले तरी आपल्याला सोने सापडले नाही. परंतु आता रायगडावर सोने पांधरले आहे, असे दिसत आहे. त्याने सूर्याला हात जोडून नमस्कार केला व त्याला आपल्या मनोवृत्तीची लाज वाटू लागली. रायगडावरील संपत्ती, माती किंवा दगडांच्या खाली नसून रायगड व त्याच्या सभोवार पसरलेली आहे. इंग्रजांनी जरी रायगडावरील संपत्ती लुटून नेली असली तरी रायगडावरील निसर्ग, सृष्टीसौंदर्य ही संपत्ती कोणालाही लुटून नेता येणार नाही.

रायगडावर सृष्टी संपत्तीला काही कमी नाही. उगीच शिवाजी महाराजांनी रायगड किल्ला आपला राजधानीचा किल्ला बनविला होता का? रायगडावर सिंहासनाची निर्मिती केली होती. कारण रायगडावरील सृष्टी, निसर्ग संपत्ती कायम टिकणारी होती. ही संपत्ती कोणीही लुटू शकत नव्हते. जमिनीत पुरलेली संपत्ती ही खरी संपत्ती नसून परमेश्वराने रायगडावर निसर्ग निर्मित भरपूर संपत्ती निर्माण केली होती.

रायगडावर शिवाजी महाराजांनी स्वातंत्र्य प्राप्तीच्या साधनांची संपत्ती ठेवलेली होती. महाराजांच्या उदात्त कल्पना या रायगडाने पाहिलेल्या होत्या. हे सर्व दौलती या मुलालास समजले. त्यावेळी त्याला आपण केलेल्या कृत्याने शरमल्यासारखे वाटले. देशाच्या स्वातंत्र्याला आवश्यक असलेली ऊर्जा या रायगडावर असल्याचे समजले. तेथील महादेवाच्या देवळात पूजा करीत राहिला. पुढे काही दिवसांनंतर तो खाली आला. परंतु छत्री निजामपूर या आपल्या गावात फार काळ न राहता तो उत्तर हिंदुस्थानात गेला. कारण दक्षिणेतील काही तरुण टोळ्या-टोळ्या करून उत्तर हिंदुस्थानात जात होते. त्या एका टोळीमध्ये हा दौलती सहभागी झाला. त्यानंतर मात्र त्याचा ठावठिकाणा कोणालाच समजला नाही.

या कथेमधून शि.म.परांजपे यांना रायगडावर असणाऱ्या सृष्टीसौंदर्याचे माहेरघर हीच खरी रायगडावरील संपत्ती वाटली आणि ते खरोखरच अगदी बरोबर आहे. सृष्टी सौंदर्यस्थित रायगड हा शिवाजी महाराजांचा राजधानीचा महत्त्वाचा किल्ला होता.[७४]

४) **शि.म.परांजपे यांची नाट्यसंपदा –** शि.म.परांजपे यांना अगदी लहानपणापासून नाटकाची आवड होती. ते नऊ–दहा वर्षांचे असताना 'सरस्वती' या पात्राचे त्यांनी काम केले होते, असे श्री. बाबा पोतदार यांनी सांगितले होते. 'मीराबाई' या नाटकातील दुसरा अंक शि.मं.नी मृत्यूपूर्वी दोन दिवस आधी लिहिला होता. यावरून त्यांचे नाट्यप्रेम दिसून येते. शिवराम परांजपे यांनी – १) संगीत कादंबरी २) मानाजीराव ३) भीमराव ४) रामदेवराव ५) पहिला पांडव ६) संगीत मीराबाई ७) महाराष्ट्र लक्ष्मी ८) राजसिंह आणि पद्मिनी, अशी एकापेक्षा एक दर्जेदार नाटके लिहिली.

या सर्व नाटकांमधील 'राजसिंह आणि पद्मिनी' आणि 'महाराष्ट्र लक्ष्मी' या दोन नाटकांच्या माध्यमातून स्वातंत्र्यप्रेम व देशभक्ती उत्पन्न करण्याचा प्रयत्न शि.म.परांजपे यांनी केलेला आहे, असे मत शंकर मोरो रानडे यांनी व्यक्त केले होते. ही नाटके सरकारी कायद्याच्या दृष्टीने धोकादायक आहेत, अशा त्यांच्या मतामुळे ही दोन नाटके लोकांपुढे व रंगभूमीवर कधी आलीच नाहीत. ही नाटके स्वतः शि.मं.नीच नष्ट केली असावीत, असा अंदाज त्यांचे चरित्रकार ओगले–बर्वे यांनी मांडला आहे.[७५]

शिवराम परांजपे यांच्या नाटकांचा परामर्श खालीलप्रमाणे घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

१) **संगीत कादंबरी –**

सन १८९२ साली इंदौर येथील होळकर यांनी जाहीर केलेल्या स्पर्धेसाठी कवी बाणभट्टाच्या कादंबरीवर आधारित 'संगीत कादंबरी' नावाचे नाटक शि.म.परांजपे यांनी लिहिले. या नाटकामध्ये १२१ पदे आहेत. शि.मं चे हे नाटक सहा अंकामध्ये आहे. पुढे नाट्य कलाप्रवर्तक मंडळीने ह्या नाटकाचे विविध प्रयोग केले. या नाटकात पुंडरिक व महाश्वेता आणि चंद्रपीड व कादंबरी यांच्या प्रणयाचे चित्रण आहे. बाणभट्टाच्या नाटकात थोडा फेरफार करून नाटकाची रचना केलेली दिसते. महाश्वेता आणि पुंडरिक यांची प्रेमकथा सांगितली आहे. शिवाय

चंद्र व पुंडरिक यांनी एकमेकांना दिलेल्या शापाची कहाणी सांगितली आहे. चंद्र हा चंद्रापीड नावाने तारापीड राजाच्या पदरी जन्माला येतो. वैशंपायन या नावाने पुंडरिक त्याच्या प्रधानाच्या शकुनास जन्माला येतो. तरुणपणात चंद्रपीड व महाश्वेता यांची भेट होते. पुढे वैशंपायन महाश्वेताला प्रेमयाचना करतो. तेव्हा ती प्रचंड संतापते व त्याला शाप देते – ''तू पोपटासारखा बोलतोस, पोपटाच्याच जन्माला जा'', या शापामुळे तो मरतो. मित्राच्या मृत्यूनंतर चंद्रपीडाचा मृत्यु होतो. पुढे चांडालकन्या शुद्रक राजाच्या भेटीला पोपटाचा पिंजरा घेऊन येते. पोपटाकडून शूद्रक राजाला त्याच्या व पोपटाच्या पूर्वजन्माची हकीकत समजते. शेवटी पुंडरिक महाश्वेता आणि कादंबरी – चंद्रापीड यांचे मिलन होते व नाटकाचा शेवट होतो. शि.मंनी. मूळ नाटकामध्ये फेरफार केलेले नाहीत.[७६]

२) **रामदेवराव –**

ब्रिटिश लेखक ऑडिसनच्या 'केटो' नाटकावरून शि.म.परांजपे यांनी 'रामदेवराव' हे नाटक लिहिले आहे. केटो हा ज्युलियस सीझर याच्या लष्करातील श्रेष्ठ अधिकारी असून त्याचा कल लोकशाही शासनाकडे असतो. परंतु सीझर हा हुकूमशाहीचा पुरस्कर्ता असतो. त्यामुळे दोघांमध्ये तात्विक मतभेद होतात. दोघांमध्ये पुढे युध्द होते. सीझरपुढे आपला टिकाव लागणार नाही, याची जाणीव झाल्याने केटो आत्महत्या करतो, असे कथानक ऑडिसनच्या केटो नाटकात आहे. त्यावरून शि.मं.नी नाटक रचले आहे. शि.मं.च्या नाटकातील रामदेवराव प्रमुख पात्र आहे. यादव काळातील समृध्दता रामदेवरावाच्या काळात झालेली होती. मुस्लिम आक्रमण रोखण्याचे काम रामदेवरावाने केले होते. सुलतान अल्लाउद्दीन खिलजीने अचानक आक्रमण केल्याने रामदेवरावाला किल्ल्याचा आश्रय घ्यावा लागतो. पण त्याचा काही उपयोग होत नाही, म्हणून रामदेवरावाला शरणागती पत्करावी लागते. परंतु रामदेवरावाचा मुलगा शंकरदेव शरण जात नाही, म्हणून अल्लाउद्दीन खिलजी त्याचा वध करतो. त्याचवेळी रामदेवरावाचा जावई व तेलंगणाचा राजकुमार हरपाळदेव हा सुध्दा बंड करण्याच्या मनःस्थितीत असतो. परंतु बादशहाचे अधिकारी त्यालाही ठार मारतात. अशाप्रकारे सुलतान अल्लाउद्दीन खिलजी आणि रामदेवराव यांच्यात झालेल्या युध्दावर आधारित नाटकाची रचना केलेली दिसते.[७७]

३)　　भीमराव –

'दि रॉबर्स', या नाटकाचा जर्मन लेखक शिलर याच्या नाटकावरून शि.मं.नी 'भीमराव' हे नाटक सन १९०७ ला प्रसिध्द केले.

शिवाजी महाराजांच्या स्वराज्य मार्गाचा वापर करून 'भीमराव' नावाचे कथानक साकारले आहे. बापुसाहेब शिर्के हे चंद्रनगरचे जहागिरदार असून त्यांना भीमराव व  खंडेराव ही दोन मुले असतात. भीमराव मोठा असल्याने वारस असतो. परंतु तारुण्यात त्याच्या हातून अनेक चुका होतात. परंतु पुढे त्याला पश्चाताप होऊन भीमराव आपल्या वडिलांना माफीचे पत्र पाठवतो. परंतु खंडेराव हा वाईट प्रवृत्तीचा व स्वार्थी असतो. तो आपल्या मोठ्या भावाविषयी वडिलांना अनेक चुकीच्या गोष्टी सांगून त्यांचे मन कलुषित करतो. कारण खंडेरावाला वडिलांकडून जहागिरी मिळवायची असते. खंडेराव वडिलांबद्दल तिटकारा उत्पन्न करणारे पत्र भीमरावाला पाठवितो. वडिलांनी आपल्याला माफी दिली नाही म्हणून भीमराव चिडतो व बरोबरच्या सहकार्याने दरोडे घालतो.

भीमरावाची प्रेयसी मनोरमा हिला खंडेराव आपल्या बाजूला वळविण्याचा प्रयत्न करतो. पण त्यात तो अपयशी ठरतो. शेवटी खंडेराव भीमरावाच्या मृत्यूची खोटी बातमी हिरोजीकडून आपल्या वडिलांना बापूरावाला कळवितो. बापूराव घेरी येऊन पडतात. खंडेराव बापूरावांना म्हणजे आपल्या वडिलांना अंधार कोठडीत टाकून त्यांच्या मृत्यूची खोटी बातमी सर्वत्र पसरवतो.

पश्चाताप झालेला भीमराव वेष घालून चंद्रनगरला येतो. खंडेरावाचे कटकारस्थान त्याच्या लक्षात येते. परंतु शेवटी खंडेराव भीमरावाची माफी मागतो. वडिल बापूसाहेब व बायको मनोरमा यांच्या इच्छेनुसार स्वराज्यप्राप्तीच्या कार्यामध्ये सहभागी होतो. [७८]

अशा प्रकारे शि.म.परांजपे यांनी भीमराव नाटकाचे कथानक रचलेले आहे.

४)　　मानाजीराव –

महाकवी शेक्सपिअरकृत 'मॅकबेथ' नाटकाच्या आधाराने 'मानाजीराव' नावाचे नाटक शि.म.परांजपे यांनी लिहिले होते. सन १८९८ मध्ये मॅकबेथ नाटकाचे भाषांतर प्रसिध्द झाले.

मानाजीरावाची भूमिका गणपतराव जोशी तर दर्याबाईची लेडी मॅकबेथची भूमिका बाळाभाऊ जोग करीत असत. हॉलिनशेडच्या बखरींतून शेक्सपिअरने ही मॅकबेथची गोष्ट आपल्या नाटकाकरिता निवडून घेतलेली आहे. शि.म.परांजपे यांनी नाटकाच्या प्रास्ताविकात म्हटल्याप्रमाणे – ''या हॉलिनशेडच्या बखरीवरून असे दिसून येते की, डंकन (दमाजी) या नावाचा एक राजा इ.स. १०४०च्या सुमारास स्कॉटलंड देशामध्ये राज्य करीत होता. त्याच्या राज्यातील काही भागांवर शत्रुंनी स्वारी केली असता त्याचा एक नातेवाईक सरदार मॅकबेथ (मानाजीराव) आणि दुसरा एक सरदार बँको (व्यंकोजीराव) या दोघांनी मिळून त्या शत्रुंचा पराजय केला. त्यानंतर त्या लढाईवरून ते दोघे माघारी येत असता, वाटेत त्यांना तीन चेटक्या भेटतात. चेटक्या या दोघां सरदारांच्या संबंधाने काही भविष्य कथन करतात. पुढे काही वेळाने डंकन (दमाजी) या राजाचा खून होतो व त्याचे मुलगे दोहोंकडे भीतीने पळून जातात. थोरला मुलगा मालकम (मल्हारराव) हा इंग्लंड (मगधदेश) मध्ये जातो व दुसरा मुलगा डोनाल्बेन (धनाजी) हा आयर्लंड (रत्नपूर) मध्ये आश्रय घेऊन राहातो. त्यानंतर मॅकबेथ (मानाजीराव) याच्या मनामध्ये बँको (व्यंकोजीराव) याच्याबद्दल विकल्प उत्पन्न होऊन तो बँको (व्यंकोजीराव) आणि त्याचा मुलगा फ्लीअन्स (गुलाब) याही दोघांचा खून करण्याचा प्रयत्न करतो. परंतु तो प्रयत्न बँको (व्यंकोजीराव)च्या बाबतीत तेवढा सफल होतो. पुढे मॅकबेथ (मानाजीराव) हा आपला सरदार मॅकडफ (मुकुंदराव) च्या कुटुंबातील माणसांची त्यांच्याकडून कत्तल करण्यात येते. त्यानंतर पुढे काय होईल, याविषयी प्रश्न विचारण्याकरिता मॅकबेथ (मानाजीराव) त्या चेटक्यांची फिरून गाठ घेतो. इकडे मॅकडफ (मुकुंदराव) आपल्या किल्ल्यांतून जो निसटून निघाला होता. तो इंग्लंड (मगधदेश)च्या राजाच्या आश्रयाला जाऊन राहिलेल्या मालकम (मल्हारराव) ला भेटतो व मॅकबेथ (मानाजीराव) च्या जुलमांतून आपल्या देशाची सुटका करण्याविषयी तो त्याचे मन वळवितो. त्याप्रमाणे मालकम (मल्हारराव) ला भेटतो व मॅकबेथ (मानाजीराव)च्या जुलमांतून आपल्या देशाची सुटका करण्याविषयी तो त्याचे मन वळवितो. त्याप्रमाणे मालकम (मल्हारराव) आपल्या देशांत येऊन आपल्या बापाचा खून करणारा जो मॅकबेथ (मानाजीराव) त्याच्यावर पूर्ण सूड उगवून त्याच्या जुलमापासून अखेरीस आपल्या देशाला स्वतंत्र करतो.''[७९]

प्रस्तावनेतच शि.मं.नी नाटकाचे सार उत्तमप्रकारे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

## ५) पहिला पांडव –

शि.म.परांजपे यांचे हे शेवटचेच नाटक मानले जाते. शि.मं.च्या मृत्यूनंतर मुंबईचे प्रसिध्द बुक सेलर श्री. तुकाराम पुंडलिक शेट्ये आणि पुस्तक छपाई विजय प्रेसचे मालक आप्पासाहेब गोरवले यांनी सन १९३१ साली पुस्तकरुपाने वाचकांच्या पुढे आणले.'पहिला पांडव' हे पौराणिक नाटक आहे. महाभारतातून ही कथा घेतलेली आहे. महाभारतात कर्ण हा उदात्त, असामान्य, हुशार कर्तबगार असतो. या नाटकामध्ये कर्णाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. महाराणी कुंतीचा पंडू राजाशी विवाह होण्यापूर्वीच सूर्यदेवांपासून तिला कर्णाची प्राप्ती होते. पुढे कुंती आणि पंडू राजाला धर्म, भीम, अर्जुन, नकुल व सहदेव हे पाच पुत्र – पाच पांडव या नावाने ओळखले जातात. कौरव–पांडवांच्या युध्दात दुर्दैवाने कर्ण कौरवांची बाजू घेतो. गुरु द्रोणाचार्यांच्या वधाने संतप्त झालेला कर्ण अर्जुन वधाची प्रतिज्ञा करतो. तेव्हा कुंती कर्णाला त्याच्या जन्माची कथा सांगते. कुंती कर्णाला म्हणते – 'माझे मुलगे जे पांडव त्यांच्यातला तू पहिला पांडव असून त्यांचा तू भाऊही झाला असेल!'' यावर कर्ण प्रचंड संतापतो आणि कुंतीला म्हणतो, ''माझ्या पूर्वजन्मीच्या दुष्कृत्यामुळे सुर्याच्या मंत्राची प्रचिती कौमार्यामध्येच पाहण्याची तुला दुर्बधी आठवली!'' नाहीतर मी पहिला पांडव आणि धर्माचा थोरला भाऊ झालो असतो.''

परंतु कौरव–पांडवांमध्ये झालेल्या युध्दात कर्णाचा दुर्दैवाने मृत्यू होतो. अशाप्रकारे महाभारतातील पौराणिक कथेवरील हे शि.म.परांजपे यांचे 'पहिला पांडव' हे नाटक उत्तम आहे. यात शंका नाही. या नाटकासंदर्भात वा. कृ. परांजपे म्हणतात, – ''पहिला पांडव हे परांजप्यांचे स्वतंत्र पौराणिक नाटक. त्यात करुण, वीर, श्रृंगार व हास्य असे रस असून ते चांगले रंगत असे.... कर्णाच्या चरित्रावर हे नाटक आधारित आहे. या वीरश्रेष्ठाच्या दुर्देवाने कोडे हा पहिल्या पांडवाचा विषय आहे. यात एका बाजूला पराक्रमी व धाडसी वीरवृत्ती तर दुसऱ्या बाजूला दुर्देव असा झगडा चित्रित केला आहे.''[८०]

## ६) संगीत मीराबाई –

शि.म. परांजपे यांच्या आयुष्यातील हे शेवटेचच लिखाण म्हटले तरी चालेल. २७ सप्टेंबर १९२९ रोजी परांजपे यांचे निधन झाले. त्या अगोदर दोन–तीन दिवस आधी म्हणजे

२४ सप्टेंबरला या अंकातील काही भाग त्यांनी लिहिला. सन १९२९च्या 'रत्नाकर' मासिकाच्या अंकामध्ये 'संगीत मीराबाई' अंक थोडक्यात दिलेला आहे. मीराबाई मेडत राठोडाची कन्या होती. पुढे मेवाडच्या राणा कुंभाशी तिचा विवाह होतो. श्रीकृष्ण भक्तीमध्ये मीराबाई गढून गेलेली असते. संसारात तिचे लक्ष लागत नाही. कृष्ण भक्तीमुळे मीराबाईला अनेक यातना सहन कराव्या लागतात. श्रीकृष्णाला शोधण्याकरिता मीराबाई रानावनांतून फिरण्याचा निर्धार करते. अशाप्रकारे 'मीराबाई' हे नाटक शि.म.परांजपे यांच्या मृत्युमुळे अपूर्ण राहिले आहे. तरी लिहिलेल्या आशयावरून उत्तम कथानक होते, असे म्हणावयास हरकत नाही.

विविध नाटकांच्या माध्यमातून शि.म.परांजपे यांनी नाट्य लेखनाचा नवीन मार्ग चोखाळला होता. वेगळ्या आशयाचा हा लेखनप्रकार करण्याचा त्यांचा हा प्रयत्न चांगलाच होता. नाट्यसंपदा सफल करण्याचा त्यांचा प्रयत्न उत्तम होता, असे म्हणावे लागेल. [८१]

## ५) शि.म.परांजपे यांच्या कादंबऱ्या –

शिवराम परांजपे यांनी 'गोविंदाची गोष्ट' आणि 'विंध्याचल' या दोन कादंबऱ्या लिहिल्या. या दोन्ही कादंबऱ्या सन १९१८ व १९२४ साली 'चित्रमय जगत' या मासिकातून क्रमशः प्रसिध्द झाल्या. नंतर चित्रशाळा प्रकाशन, पुणे यांनी पुस्तकरुपाने प्रसिध्द केल्या.

### १. गोविंदाची गोष्ट –

गुलामगिरीच्या कचाट्यात अडकलेल्या व्यक्तीचे जीवन कसे संपुष्टात येते याचे सुंदर वर्णन या कादंबरीमध्ये आलेले आहे.

गोविंदा हा या कादंबरीचा नायक आहे. तो स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता होता. निसर्गाची त्याला प्रचंड आवड होती. सागरामध्ये मासे पकडायला गेलेल्या गोविंदाची होडी फुटते. तो वाहत चाललेला पाहून गलबतावरील चाचे लोक त्याला वाचवितात. परंतु ते नंतर त्याचे खूप हाल करतात. तेथे रोशन नावाची मुलगी त्याच्यावर प्रेम करू लागते. अशाप्रकारे जवळ–जवळ १२ वर्षांनी अनेक हाल अपेष्टा सहन करून गोविंदा आपल्या मायभूमीत परत येतो. परंतु इकडे गोविंदा नाहीसा झाला, या धक्क्याने त्याच्या आईला मृत्यू येतो. वडिलांना वेड लागते. प्रेयसी नर्मदा मुस्लिमांच्या अत्याचाराला बळी पडते. गोविंदाला मायभूमीला आल्यावर समजते की

आपले आई–वडील व बालपणीची मैत्रिण, प्रेयसी नर्मदा या सर्वांच्या मृत्यूची बातमी त्याला ऐकावी लागते. त्यामुळे त्याला आयुष्यात नैराश्य व अंधार दिसू लागतो. गोविंदाच्या मुखातून गुलामगिरीविषयी तिरस्कार व स्वातंत्र्य प्रेम या विषयी माहिती मिळते. गोविंदाला अनेक अडी–अडचणींमधून  मार्ग काढावे लागतात. याही कादंबरीतून शि.म.परांजपे यांनी गुलामगिरीविषयी तिटकारा याचे चित्रण केलेले दिसते.[८२]

२. विंध्यांचल –

विंध्य पर्वताच्या जवळपासच्या प्रदेशात ठगांचा सुळसुळाट सुरू होता. याचे वर्णन 'विंध्याचल' या कादंबरीत शि.मं.नी केलेले दिसते. झाशीचे जहागिरदार भैय्यासाहेब आपली गरोदर पत्नी गंगाबाई हिला कोकणात सोडण्याकरिता चाललेले  असता करीमबक्षाची टोळी त्यांच्यावर छापा घालते. या सर्व गोंधळात भैय्यासाहेब व गंगाबाई यांची ताटातुट होते. पुढे भैय्यासाहेब ठगांच्या बंदोबस्तातून सुटका करून घेतात. गंगाबाईला सुध्दा अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. शेवटी विंध्यवासिनीच्या जत्रेत भैय्यासाहेब व गंगाबाई यांचे मिलन होते. गंगाबाईचे हरवलेले बाळही परत मिळते. असा 'विंध्याचल' कादंबरीचा आशय आहे.

'काळ' बंद पडल्यानंतर शि.म.परांजपे नैराश्यवादात होते. त्या काळात 'गोविंदाची गोष्ट' व 'विंध्याचल' या कादंबऱ्यांचे लेखन केले. गोविंदाच्या हाल अपेष्टा व विंध्याचलमधून भैय्यासाहेबांपुढील समस्या व्यक्त करताना जणू त्यांनी आपला निराशावाद स्पष्ट केलेला दिसतो. वर्णनात्मक स्वरुपामध्ये त्यांनी या कादंबऱ्यांचे लेखन केलेले दिसते. त्यामुळे हे वर्णन शि.म.परांजपे यांच्या मनःस्थितीचे आहे, असे वाटते. या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये स्वातंत्र्य प्रेम व गुलामगिरीविषयी चीड सतत व्यक्त होताना दिसते. दोन्ही कादंबऱ्या उत्तम आहेत.[८३]

## ६) शि.म.परांजपे यांचे ऐतिहासिक लेखन – मराठ्यांच्या लढायांचा इतिहास –

सन १८०२ ते १८१८ या काळातील 'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' शि.म.परांजपे यांनी लिहिला आहे. प्रथम यातील चौदा लेख चित्रमय जगत मधून लिहिले. पुढे ते एकत्र करून 'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' (१८०२ ते १८१८) या नावाने चित्रशाळा प्रकाशन, पुणे यांनी सन १९२८ मध्ये प्रकाशित केले.

'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' या पुस्तकाच्या प्रस्तावनेतच शि.म.परांजपे यांनी मराठ्यांच्या पराभवाची मीमांसा केलेली आहे. प्रस्तावनेत शि.म.परांजपे म्हणतात, ''आपल्यापाशी चांगली हत्यारे नव्हती किंवा आपण कवायती कंपू तयार करून लढू लागलो, म्हणून आपले हे पराजय झाले. ही कारणमीमांसा बिलकुल चुकीची आहे, हे आपले पराभव आपल्या नैतिक अधःपतनाने घडवून आणलेले आहेत. ज्या लोकांच्या मनावर आपल्या धर्माच्या किंवा देशाच्या बंधनांचा मुळीच दाब उरलेला नसतो आणि ज्यांना केवळ स्वार्थाशिवाय दुसरे काही दिसतच नसते. असेच नीच आणि निमकहराम लोक असली ही फितुरीची कामे करण्याला उद्युक्त होतात. असले लोक पेशवाईच्या शेवटच्या दिवसात आपल्याकडे फार झालेले होते. आपल्या देशाचे आणि आपल्या राजाचे काही का होईना, आपल्याला एखादे इनाम मिळाले म्हणजे झाले. असा मनोवृत्तीच्या अधम आणि अप्पलपोट्या फितूर लोकांनी आपल्या स्वातंत्र्याच्या लढायांतून आपले पराभव करून घेतले आणि राज्य बुडविली. ही स्थिती आपल्याला यापुढे तरी बदलावयाची असेल तर आपली नैतिक उन्नतीच झाली पाहिजे. आपला धर्म, आपला देश, आपले स्वातंत्र्य, आपले राज्य, आपले ऐक्य, आपले बंधुत्व या गोष्टी ज्यांना आपल्या प्राणांपेक्षाही प्रिय होतात, त्या लोकांनाच लढायांतून विजय मिळतात. त्यांचीच राज्ये प्रस्थापित होतात आणि त्यांचेच स्वातंत्र्य कायम टिकते.''

शि.म. परांजपे यांचे बालपण महाडला गेले. तेथूनच जवळ रायगड किल्ला होता. शिवजयंती महोत्सव टिळकांनी सुरू केला त्यावेळी शि.म.परांजपे यांनी रायगडावर आपले पहिले जाहीर व्याख्यान दिले. शिवाजी महाराजांची महती स्पष्ट केली. मराठ्यांच्या इतिहासाविषयी शि.मं.ना कमालीचा अभिमान होता. मराठे लढाईत लढण्यापेक्षा इतर गोष्टींमध्ये कमी पडले म्हणून मराठे पराभूत झाले असे मत त्यांनी मांडले. मराठ्यांच्या वैभवशाली इतिहासाचाही त्यांनी मागोवा घेतला आहे. 'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' यामधील काही लढायांचा आढावा खालीलप्रमाणे घेतलेला आहे.[८४]

## १. **खडकीची लढाई –**

मराठ्यांचे शेवटचे पेशवे दुसरे बाजीराव व इंग्रज यांच्यात ५ नोव्हेंबर १८१७ रोजी खडकी येथे लढाई झाली. ब्रिटिशांनी पैसा वाटून मराठ्यांना फितुर केले. सोहनीकृत पेशव्यांच्या

बखरीमध्ये इंग्लिशांनी चालविलेल्या फितुरीच्या संबंधाने पुढीलप्रमाणे स्पष्ट उल्लेख आहे – ''श्रीमंतांनी लढाईची तयारी केली. परंतु मसलतदार कोणी नाही. अवघे मंडळ नवेच. त्यात इंग्रजांचा फितुर सगळ्या सरदारात जहालेला. कोणी इंग्रजांचा पैका खाल्ल्याशिवाय राहिला असे नाही... सारे सरदार फितुरलेले. इंग्रजांचा पैका खाल्लेला तेव्हा ती फौज इंग्रज याशी म्हणजे लढते असे घडत नाही.''

बाळाजी पंत नातू व यशवंतराव घोरपडे हे दोघे पेशव्यांच्या दरबारातील सर्व वृत्तांत ब्रिटिशांना देत असत, असे ग्रँट डफनेही सांगितले होते.

अशाप्रकारे खडकीच्या लढाईत मराठ्यांचे राज्य व सत्ता ब्रिटिशांना मिळविणे सोपे झाले. पेशवाईचा अस्त मराठ्यांच्याच चुकीच्या धोरणामुळे झाला. फंदफितुरीचा मोठा फटका मराठ्यांना बसल्यामुळे पेशवाईचा शेवट झाला.[८५]

## २. येरवड्याची लढाई –

खडकीच्या लढाईनंतर ब्रिटिशांनी चांगलीच तयारी केली. जनरल स्मिथ इंग्रजांचे नेतृत्त्व करीत होता. पेशव्यांनी युध्दाची तयारी करेपर्यंत ब्रिटिश फौजा येरवड्याला येऊन पोहोचल्या. बापू गोखले मराठ्यांचे नेतृत्त्व करीत होता. खडकी आणि येरवड्याच्या लढायांनी पेशव्यांची सत्ता संपुष्टात आली. बाजीरावाने या युध्दात नेटाने लढणे अपेक्षित होते. परंतु दुर्दैवाने दुसऱ्या बाजीरावाने दिवे घाटामार्गे सासवडला जाण्याचा निर्णय घेतला. त्याचा पुणे सोडण्याचा निर्णय चुकीचा होता. युरोपियनांनी बापू गोखलेंच्या युध्द नेतृत्त्वाचे कौतुक केले. खडकीच्याच लढाईतील सैन्य बापू गोखलेंच्या हाती होते. त्यामुळे विजय मिळणे दुरापास्त झाले. बापू गोखले एकनिष्ठेने, शौर्याने लढला. परंतु ब्रिटिशांपुढे त्याचे काही चालले नाही. म्हणून येरवड्याच्या लढाईतही मराठे पराभूत झाले.[८६]

## ३. अष्टाची लढाई –

२० फेब्रुवारी १८१८ रोजी अष्टाच्या लढाईला सुरुवात झाली. बापू गोखले यांनीही मराठेशाही वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. दुसऱ्या बाजीरावाची सर्व भिस्त बापू गोखलेंवर होती. परंतु शेवटच्या अंतापर्यंत बापू गोखलेंनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. परंतु दुर्दैवाने अष्टाच्या

लढाईत बापू गोखलेंचा अंत झाला. जणू काही दुसऱ्या बाजीरावाचे सामर्थ्यच नष्ट झाले. अष्टाच्या लढाईतही मराठे पराभूत झाले. [८७]

## ४. असईची लढाई –

सन १८०३ साली असईची लढाई झाली. ती लढाई इंग्रजांसाठी महत्त्वाची ठरली. कारण प्लासीच्या लढाईने ब्रिटिशांनी बंगालमध्ये पाय रोवले. तसे असईच्या लढाईने मराठ्यांवर साम्राज्य निर्माण करणे सोपे झाले. फितुरी हा मराठ्यांना लागलेला शाप होता. अहमदनगर गॅझेटियरमधील पुढील उल्लेख महत्त्वपूर्ण आहे – When after capturing the town General Wellesley reconnoitred the fort on the 9th August. The complete protection, which the glacis afforded to the wall made it difficult to fix on a spot for bombardement Raghurao Baba the Deshmukh of Bhingar received a bribe of Rs. 4,000/- and advised an attack on the east face."

अशाप्रकारे इंग्रजांनी ८ ऑगस्ट रोजी अहमदनगर ताब्यात घेतले. परंतु अहमदनगरचा किल्ला मजबूत असल्याने तोफांचा मारा कसा करावा हे वेलस्लीला समजेना. भिंगार गावाजवळ किल्ला असल्याने तेथील रघुरावबाबा देशमुखाने ४०० पौंड म्हणजे ४ हजार रुपयांची लाच घेतली आणि पूर्वेकडून हल्ला करावा असा सल्ला दिला.

महाराष्ट्राला लाचखोरीचा मोठा शाप होता. अशा अधिकारी लोकांनीच लाच घेतली तर देशाचे स्वातंत्र्य टिकणे अवघडच होते. म्हणूनच असईची लढाई सुध्दा ब्रिटिशांनीच जिंकली. [८८]

## ५) अलीगडची लढाई –

४ सप्टेंबरला अलीगडच्या लढाईला सुरुवात झाली. अलीगडच्या किल्ल्यात शिंद्यांच्या सैन्याने आश्रय घेतला होता. इंग्रज येत आहेत, असे समजल्यावर दोन दिवस अगोदरच शिंद्यांच्या सैन्याने किल्ला सोडला. लेक या ब्रिटिश अधिकाऱ्याने ब्रिटिश सैन्यातील लोकांना फितुरीच्या कामावर पाठविले होते. हिंदु लोक लाच घेण्यात पुढे असतात, याची खात्री ब्रिटिशांना पटली. त्यानुसार अलीगडचा किल्ला घेण्यात व अलीगडच्या लढाईत ब्रिटिशांना यश मिळाले.

ब्रिटिशांना महाराष्ट्रात जास्त कष्ट करावे लागले नाहीत. फंदफितुरी, लाचखोरी, या मार्गाने संपूर्ण महाराष्ट्रावर त्यांना आपले वर्चस्व निर्माण करता आले. [८९]

## ६) दिल्लीची लढाई –

दिल्लीचा मोगल बादशहा शहाआलम याला अगोदरच ब्रिटिशांनी आपल्या बाजूला वळवून घेतले होते. परंतु दुर्दैवाने मराठे मोगलांच्या बाजूने लढत होते. दौलतराव शिंदे यांचे सैन्य महत्त्वाकांक्षेने लढत होते. ''हर हर महादेव!'' गर्जना देऊन मराठे जीवाच्या आकांताने लढत होते. मराठ्यांनी चांगली कामगिरी केली होती, असे ब्रिटिश अधिकारी लेकने नमुद केले आहे. परंतु याही लढाईत इंग्रजांनाच विजय मिळाला.[९०]

## ७) होळकरांशी युध्द –

यशवंतराव होळकर व दौलतराव शिंदे या दोघांमध्ये वैमनस्य निर्माण झाले, याचा फायदा घेण्याचे ब्रिटिशांनी ठरविले. परंतु धुर्त यशवंतराव होळकरांनी ब्रिटिशांकडे काही मागण्या केल्या त्या मागण्या –

i. ''वाडवडिलांचा चौथाई वसुलीचा हक्क मिळावा.

ii. गंगा–यमुना प्रांतातील बारा प्रांत, परगणे व इटावा व बुंदेलखंडातील काही भाग मिळावा.

iii. होळकरांच्या अंमलाखाली मुलखावर वर्चस्व गाजविण्याची परवानगी मिळावी.''

ब्रिटिशांनी या मागण्या मान्य केल्या नाहीत. तेव्हा यशवंतराव होळकराने सर्व राजांना पत्रे पाठवून लढण्याची तयारी केली. यशवंतरावाने गनिमीकावा या युध्द तंत्राचा वापर केला. ब्रिटीशांनी सुरुवातीच्या लढायांमध्ये लाच देऊन लढाया जिंकल्या होत्या. परंतु यशवंतराव होळकराने स्वतःच्या शौर्य व पराक्रमाने ही लढाई जिंकली.[९१]

## ८) भरतपूरचा किल्ला आणि इंग्लिशांचे तेथील चार पराभव –

दीगच्या लढाईनंतर यशवंराव होळकरांचे सैन्य भरतपूरच्या किल्ल्यात आश्रयाला आले होते. भरतपूरच्या रणजितसिंग राजाने यशवंतरावाला पाठिंबा दिला होता. म्हणून इंग्रजांनी भरतपूरच्या राजाशी लढाई करण्याचे ठरविले. २ जानेवारी १८०५ रोजी ब्रिटिश अधिकारी लेक

लढण्याच्या तयारीत होता. भरतपूरचा किल्ला वाचविण्यासाठी मराठ्यांनी प्राणपणाने लढा दिला. मराठ्यांनी चार वेळा इंग्रजांचे हल्ले परतवून लावले. चार वेळा इंग्रजांचा पराभव केला. ९ जानेवारी, २९ जानेवारी, २० फेब्रुवारी व २१ फेब्रुवारी अशा झालेल्या चारही हल्ल्यात मराठ्यांनी ब्रिटिशांचा दारूण पराभव केला. अशाप्रकारे मराठ्यांच्या यशवंतराव होळकर व भरतपूरचा राजा रणजितसिंग यांनी पराक्रमाची शर्थ करून ब्रिटिशांना धुळ चारली. भारताच्या इतिहासात हे पराक्रम फार महत्त्वाचे मानले जातात.

'मराठ्यांच्या लढायांचा इतिहास' या पुस्तकामध्ये शि.म.परांजपे यांनी मराठे व इंग्रज यांच्यात झालेल्या विविध महत्त्वपूर्ण लढायांचा आढावा घेतलेला दिसतो. ऐतिहासिक दृष्टीकोनातून ह्याला अतिशय महत्त्वपूर्ण स्थान दिले जाते. यावरून त्यांची इतिहासाची आवड दिसून येते. [१२]

## ७) शि.म.परांजपे यांचे स्फुटलेखन –

- **सूर्याच्या गैरसोयी – (एक गद्यकाव्य)**

शिवराम परांजपे यांनी 'सूर्याच्या गैरसोयी' नावाचे एक गद्यकाव्य सन १९२० मध्ये लिहिले. सूर्याला सुध्दा अनेक व्यथा असतात, त्या व्यथांचे वर्णन त्यांनी 'सूर्याच्या गैरसोयी' मध्ये केलेले दिसते.

भूवैज्ञानिक (भौगोलिक) गोष्टींचा दाखला देत अमावस्येला सूर्य आणि चंद्र एकमेकांच्या जवळ येऊन त्यांची भेट होते. त्यांच्यातील संवादाचे वर्णन शि.मं.नी दिलेले आहे. 'सूर्य' हा सर्वात महत्त्वाचा ग्रह असून त्याच्याही अनेक गैरसोयी असल्याचे शि.मं.नी दाखवून दिले आहे. सूर्याच्या व्यथा सांगताना शि.म.परांजपेंनी काही घटकांचा आढावा घेतलेला दिसतो.

i. ''सूर्यच जर नसेल तर वनस्पती व प्राणी यांचे जीवन धोक्यात येईल. सूर्य हा सर्वांचा मित्र आहे. सूर्य हा अग्नीचा गोळा आहे. त्यामुळे त्याच्याजवळ जाण्याचे कोणी धैर्य करीत नाही. त्यामुळे त्याला मित्र नाहीत. म्हणून सूर्य दुःखी असतो.

ii. सूर्याला विश्रांती मिळत नाही. त्याला दिवसभर काम करावे लागते. काळोख त्याला जवळसुध्दा उभा करीत नाही. म्हणून त्याला खूप वाईट वाटते.

iii. ब्राह्मण लोक सूर्योपासक मानले जातात. परंतु सूर्याच्या उष्णतेने आपल्या हाताला भाजू नये, म्हणून त कदाचित अर्घ्य देत असावेत.

iv. कमळे सुध्दा आपल्यावर मर्यादित प्रेम करतात असे सूर्याला वाटते.''

या सर्व व्यथांमुळे सूर्य व्यथित झाला आहे. त्यामुळे सूर्याला आपल्याला मृत्यु यावा असे वाटत आहे. सूर्याचा असा समज आहे की चंद्राकडे अमृत आहे. तो निरंतर राहणार आहे. पण आपण चंद्राकडे गेलो तर अमृतबिंदुंचा स्पर्श झाला तर आपल्यालाही अमरत्व येईल. म्हणून सूर्य चंद्राजवळ जाण्याला उत्सुक नाही.

अर्थात सूर्याच्या या गोष्टी काल्पनिक आहेत. त्यामुळे त्या ऐकून चंद्राला हसू येते. चंद्र सूर्याला सांगतो, 'हे भ्राता माझेही जीवन तुझ्यावरच अवलंबून आहे. तू नसशील तर, सगळीकडे अंधार व काळोख पसरले... या गोष्टी तू फारशा मनावर घेऊ नकोस......'

शिवराम परांजपे यांनी कल्पनाविलासाच्या माध्यमातून एक वेगळा विषय मांडलेला दिसतो. सूर्याला सुध्दा व्यथा, दुःख आहे हे आपल्याला गद्यकाव्यातून सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

शि.मं.चे चरित्रकार ओगले–बर्वे म्हणतात, ''हे राजकारणापासून किंवा लौकिक व्यवहारापासून शंभर टक्के अलिप्त असे नितांत मनोहर गद्यकाव्य आहे.''

खरोखरच एक नवीन कल्पना अगदी संवादरुपात मांडण्याचा चांगला व आगळावेगळा प्रयत्न शि.म.परांजपे यांनी केलेला दिसतो.[९३]

## ८) शि.म.परांजपे यांची काव्यसंपदा –

शि.म.परांजपे यांना शालेय जीवनापासून कविता करण्याचा छंद होता, असे बाबा पोतदार हे त्यांचे सहकारी सांगतात. लहानपणापासून संस्कृत भाषेत लिहिलेल्या कवितांची दोन–तीन बाडे होती. परंतु 'काळ' कार्यालयाच्या झडतीत पोलिसांनी ती बाडेही जप्त केली. पुढे काव्यरचनेचा नाद आण्णासाहेबांना (शि.मं.ना) राहिला नाही. पद्याऐवजी गद्यलेखन करायला त्यांनी सुरुवात केली.

शि.म.परांजपे यांच्या दोनच कविता, काव्ये उपलब्ध आहेत. पहिले 'अहल्याजार' या नावाचे खंडकाव्य त्यांनी डेक्कन कॉलेजच्या क्वार्टरलीच्या पहिल्याच अंकात प्रसिध्द केले, तर दुसरे वर्षावर्णन नावाचे रम्य काव्य उपलब्ध आहे.[९४]

१. अहल्या जार –

'डेक्कन क्वार्टरली' या त्रैमासिकात शि.म.परांजपे यांनी अहल्या–जार नावाने लहानसे खंडकाव्य प्रसिध्द केले होते. पुढे सन १९२४ साली गोवर्धन प्रेसमध्ये शि.मं.नी पुस्तकरुपाने प्रसिध्द केले. संस्कृत भाषेमध्ये लिहिलेल्या खंडकाव्यामध्ये शि.मं.चे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व समजते. ''अहिल्या हिला गौतमाच्या शापाने शिळा व्हावे लागले'', हा या खंडकाव्याचा विषय आहे. गौतमाची पत्नी अहिल्या हिच्याबद्दल इंद्राच्या मनात अभिलाष उत्पन्न झाल्याचे वर्णन आहे. मनाची अवस्था प्रेमपूर्ण झाल्यामुळे इंद्र भूलोकी गौतम ऋषीच्या आश्रमात जातो. गौतमऋषी बाहेर गेलेला असतो. तेव्हा इंद्र आश्रमात येऊन अहिल्येपुढे आपली अभिलाषा व्यक्त करतो. अहिल्या प्रचंड संतापते, ''तुला अशी इच्छा झालीच कशी? तुझी सुंदर पत्नी शची एवढे जिवापाड तुझ्यावर प्रेम करते, तिचा असा विश्वासघात करू नकोस,'' असे इंद्राला अहिल्येने सांगूनही काही परिणाम होत नाही. अहिल्या संतापते व म्हणते, ''माझ्या शरीराला तुला स्पर्श करू देणार नाही.'' अहिल्येचा संताप पाहून पश्चाताप झाल्याचे दाखवून इंद्र माफी मागून निघून जातो. इंद्राने माफी मागितली व त्याला पश्चाताप झाल्याचे पाहून ही गोष्ट अहिल्या आपला पती गौतमाला सांगत नाही.

काही दिवसांनी इंद्र गौतमाचे रुप घेऊन आश्रमात येतो. गौतमऋषी स्नानासाठी गेलेले असतात. अहिल्येला हे समजत नाही. इंद्र हाच गौतमऋषींचे रुप घेऊन आलेला आहे, इंद्र अहिलेल्या वश करून घेण्याचा प्रयत्न करणार तेवढ्यात गौतमऋषी येतात. अहिल्या इंद्राला म्हणते, माझे पती असताना आलास ते बरे झाले, अपराधास, शिक्षेस तयार हो, परंतु दार उघडल्यावर खरे गौतमऋषी दिसतात. खिडकीतून मांजराच्या रुपाने इंद्र जाताना दिसतो.

''जुन्या वस्त्राला जशी छिद्रे पडतात तशी तुझ्या शरीराला पडतील,'' असा शाप गौतमाने इंद्राला दिला आणि अहिल्येलाही त्यांनी ''तू मुठासारखी वागलीस म्हणून शिळा होऊन

पड'', असा शाप दिला. परंतु अहिल्येने खूप विनवणी केल्यानंतर ''प्रभु रामचंद्राच्या पदस्पर्शाने तुला तुझे मुळ रुप प्राप्त होईल'', असा उःशाप दिला.

या काव्यातून स्त्रीलंपट इंद्राची मनोविकृती दाखविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. पतिव्रता अहिल्या इंद्रावर संतापलेली दिसते. गौतमऋषी मात्र इंद्र आणि आपली पत्नी अहिल्या दोघांनाही शाप देतात. यातून शि.म. परांजपे चुकणाऱ्यांना शिक्षा झालीच पाहिजे, असा संदेश देताना दिसतात. संस्कृत भाषेतील हे पद्यकाव्य त्याकाळात महत्त्वपूर्ण ठरले. शि.मं.चे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व समजते.[१५]

२) **वर्षा वर्णन –**

हा प्रमोद गगनात गर्जतो । फुल्ल होय विपिनांत सर्जतो
अंबुद प्रचुद उंबु वर्षती । मानसांतरि मयूर हर्षती
रंगभूमी नभ, वीज नाचते । कोण वर्णु शकणार नाच ते
मेघ ते मृदु मृदुंग वाजवी । तो प्रसंग मनिं मोद माजवी
भृंगाचिया व्याकुलिता कुलांनी । वेली पहा या फुलल्या फुलांनी
कदंबशीर्षी मुकुलावलीला । सेवूनि दावीति अपूर्व लीला
दावदग्ध गतजीव जीवनें । सिंचिली अमृत तुल्य जीवनें
शुष्क काष्ठ नव पल्लवे लवे । ईश्वरी कृति कुणा न वर्णवे
त्याज्य होति पथ हे चिखलाने । साधु दूषित जसे चिखलानें
गर्जताति बहु दुर्दरगानी । सोडिले स्वबिल ते उरगांनी
रंगवूनि धनु हे बहुरंगी । ठेविले कुणि नभोऽगणरंगी
जानकी फिरुनी राघवएया । चित्ति इच्छि अजि काय वराया
शैव हे न धनु ऐंद्रधनुष्य । मोहती बघुनि ज्यास मनुष्य
भग्नशंकर घनुःस्वन हा न गर्जतो गगनिंमेघ महान
भृंग कुड्मलभरें लवलीला । हा कठोर लववी लवलीला
दाविली कधि दया मधुपांनी । कामिनीवदनिंच्या मधु पानी ?
ग्रीष्मातपें तृषित भूमिस नीर–दानी । दावीयली सदयता अति नीरदांनी

की पाणपाये जणुं घातलि देवतांनी । प्यावेजल मुदें तरुंनी लतांनी
स्पर्श होतिजंव या पवनाचे । नर्तकी परि लता तंवनाचे
धर्म येइनटवे पेटे सदाही । वरूनी रवी उग्र शीर्षास दाही
अशा सेवुनीयां तया शैलराज । व्रतांनी करी स्नान हा काय आज
शुष्का करांहि करणेच धरा जयाला
कोंडूनि त्या घनतमी दिन राजयाला
देवर्षि भूमितलिं या सकलोनीतातें
धारा जलांहि अभिषकिती भूभृतातें''

वर्षा वर्णन ही शि.म.परांजपे यांची स्फुट कविता महत्त्वपूर्ण मानली जाते. २६ ओळीच्या या कवितेमध्ये मोहक अलंकारीक वर्णन केलेले आहे. उन्हामुळे पोळलेली झाडे पाण्यामुळे बहरतात. नवीन पालवी फुटते. फुले येतात. फुलांवर भुंगे बसतात. पावसाच्या धारांनी वातावरण सुगंधित होते. वर्षा ऋतुतील रम्य वातावरणाचे उत्कृष्ट वर्णन केले आहे. आकाशात चमकणाऱ्या विजांचे जणू नर्तनच चालू आहे, असे वाटते. आकाशामध्ये या पावसामुळे इंद्रधनुष्य अवतरले आहे. अशा निसर्गरम्य वर्षाऋतुमुळे होणाऱ्या बदलांचे आल्हाददायक वर्णन शि.म.परांजपे यांनी 'वर्षावर्णन' या काव्यात केलेले दिसते. [९६]

## ९) शि.म.परांजपे यांचे महत्त्वपूर्ण लेख –

शि.म.परांजपे यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक, परिस्थितीवरील लेख उत्तम पध्दतीने लिहिले. त्यातील बरेचसे लेख 'काळ' पत्राच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला. स्वातंत्र्यप्रेम, बेकारी, दारिद्र्य, गुलामगिरी अशा अनेक विषयांवर ज्वलंत लेख लिहिण्याचे उत्तम कार्य केले. अशा लेखांच्या माध्यमातून शि.मं.नी आपली परखड मते मांडून ब्रिटिशांवर सडेतोड टीका करताना मागेपुढे पाहिले नाही. त्यापैकी काही महत्त्वपूर्ण लेखांचा (कथा) आढावा खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

१. आम्रवृक्ष (एका गिरणीतील कामगाराची गोष्ट) –

गिरणी कामगारांच्या मनामध्ये उद्‌भवलेले विचार यामध्ये सांगितले आहेत. गावाकडील शेत विकून गिरणीत काम करणाऱ्यांची व्यथा मांडली आहे. त्यांच्या शेतातील आम्रवृक्षाची स्थिती पाहून त्याला देशाबद्दलही तेच वाटते. आम्रवृक्षाची पाने जशी गळून खाली पडत आहे, त्याप्रमाणे भारतीय लोक आपली आसवे गाळत आहेत. पुढे वसंत ऋतुत झाडाला पालवी फुटते, पक्षी झाडावर बसतात, गाणे गातात, त्याचप्रमाणे देशाला लवकरच स्वातंत्र्य मिळेल, असा आशावाद गिरणी कामगारांच्या माध्यमातून शि.म.परांजपेंनी दिला आहे.[९७]

२. प्रभाकरपंतांचे विचार –

प्रभाकरपंतांना काही मुले खेळत असलेली दिसतात. मुले सुंदर बागडत होती. त्या मुलांपैकी, एका मुलाला इतर मुले 'तुझ्यावर राज्य आलेले आहे' असे चिडवत असतात. परंतु हे राज्य एका मुलावर आलेले नसून आपल्या सर्वांवर आलेले आहे, हे आपल्याला समजत नाही. आपण सर्वजण गुलामगिरीत जगत आहोत, आनंदी जीवन जगता येत नाही. खेडेगाव व तेथील निसर्गाचे उत्तम वर्णन या लेखात शि.मं.नी केलेले दिसते.[९८]

३. पिंजऱ्यातील पोपट – (पोपट आणि परशुराम)

परशुरामाचा बाप श्रीमंत सावकार असतो. त्याचे सर्व लक्ष पैसे मिळविण्यामध्ये असते. परंतु परशुराम वेगळ्या स्वभावाचा असतो. त्याला बापाच्या पैशाचा हव्यास नसतो. एका सुंदर पिंजऱ्यातील पोपटाकडे पाहून त्याला गुलामगिरीबद्दल तीव्र संताप होतो. पोपटाला तो स्वतंत्रतेचे धडे देतो. एक दिवस परशुराम पिंजऱ्याचे दार उघडतो व पोपट उडून जातो व परशुराम तो पिंजरा जवळच्या खांबावर आपटतो. अशाप्रकारे गुलामगिरीला झुगारून देण्याचा प्रयत्न परशुराम करताना शि.मं.नी. या लेखात दाखविले आहे.[९९]

४. एका खडी फोडणाऱ्याची गोष्ट –

ही कथा उपरोधिक पध्दतीने लिहिलेली आहे. खेडेगावातील सुखवस्तु शेतकऱ्याची मुले शहरात येऊन कशी बिघडतात? याचे वर्णन आहे. दुष्काळात शेतकऱ्यांचे कसे हाल होतात. बेकारांचे प्राण वाचविण्यासाठी सुरु केलेल्या रिलीफ कामात कामकऱ्यांना किती निदर्यतेने

पिळून काढतात हे लिहिले आहे. गुलामगिरीतून आपली सुटका करून न घेता तिला घट्ट कवटाळून त्यातच समाज आनंद मानतो, याचे चित्रण केलेले दिसते. तात्पर्य, हिंदी जनतेची स्थिती अतिशय हीन–दीन झालेली असून देखील ही वाईट स्थिती सुधारावी, असा विचार जनतेच्या मनात येत नाही. मग ती परिस्थिती सुधारण्यासाठी प्रयत्न करणे तर दूरच राहिले! हिंदी जनतेची ही मानसिक अवनतीच आपल्या हातून स्वातंत्र्यप्राप्तीचे प्रयत्न होण्याच्या आड येत आहे, हे तत्त्व या लेखातून शि.म.परांजपे यांनी दिग्दर्शित केलेले दिसते.[१००]

५. **विषासाठी कंठशोष –**

सरकारी नोकरी करण्यात भारतीयांना कृतकृत्य वाटते. साहेबांची मर्जी सांभाळण्यात भारतीयांना अभिमान वाटतो. उपरोधिक लेखन करून शि.मं.नी हिंदी जनतेच्या मानसिक अवनतीचे वर्णन केलेले आहे. पारतंत्र्याचे विष आपण आधीच प्यायले आहे. त्यामुळे विषासाठी कंठशोष करण्यापेक्षा देशाच्या स्वातंत्र्यासाठी सर्वांनी एकत्रित झटले पाहिजे, अशा हेतूने शि.मं.नी हा उपरोधिक लेख लिहिलेला आहे.[१०१]

६. **सोळाशे सत्तावीसपूर्वी पाच वर्षे –**

शि.मं.च्या या कथेतून इतिहासाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे. शिवाजी महाराजांच्या जन्माच्या आधी पाच वर्षे मृत्यू झालेल्या एका पैठणकर देशभक्ताचे वर्णन केले आहे. मुस्लिम धर्मियांकडून हिंदूवर होणारे अत्याचार, गायी व ब्राह्मणांचा अनन्वित छळ, मंदिरांचा होणारा विध्वंस, अशा सर्व घटकांमुळे या देशभक्ताला प्रचंड दुःख होते. कधीतरी या देशाला स्वातंत्र्य मिळेल, अशी आशा देशभक्तांच्या मनात आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या कार्यासाठी मला पुन्हा जन्म दे, अशी प्रार्थना हा देशभक्त परमेश्वराला करताना दिसतो. देशभक्ती, स्वातंत्र्य हे विषय शि.मं नी या लेखात हाताळलेले दिसतात.[१०२]

७. **एक नवीन कारखाना –**

ही एक काल्पनिक कथा आहे. 'सभ्य गृहस्थ तयार करण्याचा कारखाना अशी एक पाटी लावलेली असते. म्हणजे या कारखान्यात सभ्य गृहस्थ बनविणे हे कार्य सुरू असते. या कारखान्यात इतर कोणालाही प्रवेश दिला जात नाही. सभ्य गृहस्थ बनताना त्याच्याकडे

देशभक्तीचा थोडासुध्दा अंश शिल्लक राहत नाही. कारण इंग्रजांची तरफदारी करणारे व इंग्रजी पोषाख घालून स्वतः साहेब म्हणविणारे अनेक आहेत. ते स्वतःला समाजसुधारक समजतात. अशा इंग्रजधार्जिण्या समाजसुधारकांची खिल्ली उडविण्याचा प्रयत्न शि.मं.नी केलेला आढळतो. अयोग्य माणसे स्वतःला सभ्य गृहस्थ मानतात. हे एका सुंदर कल्पनेच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न शि.मं.नी केलेला आहे. [१०३]

८. **एका चिनीबाईची गोष्ट –**

ही स्वातंत्र्यप्रेमाची गोष्ट आहे. महात्मा गांधींना तुरुंगवास झाल्यानंतर राजकीय वातावरण कसे झाले, याचे चित्रण आहे. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आवश्यक तत्त्वज्ञान या लेखात सांगण्याचा प्रयत्न केला आहे. वेगवेगळ्या राजकीय पक्षांच्या विविध सांप्रदायिक कल्पना उत्तम प्रकारे चित्रित करण्याचे काम शि.मं.नी केले आहे. [१०४]

९. **इफिजिनिया आणि ऑरेस्टेस –**

शि.म. परांजपे हे संस्कृत भाषेचे गाढे अभ्यासक होते. धार्मिक विचार मांडतांना शि.म. बौध्द धर्मातील एक नमुना सांगतात. त्या संदर्भात इफिजिनिया आणि ऑरेस्टेस ही अंगावर काटा आणणारी ग्रीक कथा सांगताना करूण व वीर रस ओतप्रोत भरलेला दिसतो. अशी वेगळी कथा रंगविण्याचा प्रयत्न शि.मं.नी केलेला दिसतो. [१०५]

१०. **मदनदहन –**

ही एक धार्मिक कथा आहे. ही कथा वाचताना वाचक वर्ग मग्न होतो. कारण मानवाला स्वर्गाच्या वर्णनाने सत्य सृष्टीचा विसर पडतो व आपण तेथेच वावरतो असे वाटल्यावाचून राहवत नाही.

याशिवाय 'मनाची मीमांसा' या लेखात मन हे मानवाचे सहावे ज्ञानेंद्रिय मानले आहे. मनामध्ये कोणतेही पाप न ठेवता चांगले कर्म करण्याचा सल्ला शि.मं.नी दिलेला दिसतो.

त्याचप्रमाणे 'नवी सृष्टी' या लेखात जुन्या चुकीच्या कल्पना सांगितल्या आहेत. या लेखांतून शि.मं.नी आपली स्पष्ट मते मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या व्यतिरिक्त शि.म.परांजपे यांनी चित्रमय जगत, रत्नाकर, लोकशिक्षण, यशवंत अशा विविध मासिकांमधून लेखन केलेले दिसते. कवी, लेखक, नाटककार, इतिहासकार, ललित लेखक, कादंबरीकार, अशा अनेक उपाध्या शि.म.परांजपे यांना देण्यास हरकत नसावी. सर्व स्तरातील लेखन करून देशामध्ये स्वातंत्र्यासाठी पूरक वातावरण निर्माण करणे हा त्यांचा प्रांजळ उद्देश होता. त्यामुळे शि.म.परांजपे यांचा गौरव करावा तेवढा कमीच आहे.[१०६]

## – संदर्भग्रंथ –


१. परांजपे शि.म., 'काळातील निवडक निबंध, भाग १' य. गो. जोशी प्रकाशन, पुणे–२, पुनर्मुद्रण–२७ सप्टेंबर १९४६, पृ.१२८

२. परांजपे कृष्णाजी शिवराम, 'स्वराज्यातील निवडक निबंध, वर्ष दुसरे' प्रथमावृत्ती–१९२२, गोवर्धन प्रेस, पुणे, पृ.१२३ ते १२५

३. हृदयविष्कारण – काळ अग्रलेख ७.१०.१९०४

४. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', चित्रशाळा प्रेस, पुणे, आवृत्ती पहिली १९४५, पृ. ३०७

५. परांजपे शि.म., 'साहित्यसंग्रह भाग–३', य. गो. जोशी प्रकाशन, पुणे–२, सप्टेंबर १९४६, पृ.१ ते ४७

६. मुद्राराक्षस, काळ अग्रलेख २.०८.१९०१

७. बेळगांव साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण १९२९

८. डॉ. मोरे सदानंद, 'लोकमान्य ते महात्मा' राजहंस प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती २६ जाने.२००७ पृ.७२–७५

९. ओगले शि.ल., बर्वे द. के, 'शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र' (जीवन कार्य व आठवणी), य.गो.जोशी प्रकाशन, पुणे–२, २७ सप्टेंबर १९३६, पृ.५५,५६

१०. परांजपे वामन कृष्ण, 'शिवरामपंत परांजपे व्यक्ती–वक्तृत्व वाङ्मय' प्रस्तावना लेखक– अणे माधव श्रीहरी, चित्रशाळा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, पृ.८,९,१०

११. काळावरील राजद्रोहाचा खटला १९०८, प्रकाशक–दंडवते गोविंद धोंडदेव, मुंबई, पृ. १५,१६

१२. ओगले शि.ल., उपरोक्त पृ.५३,५४

१३. तत्रैव पृ. ५५,५६

१४. परांजपे शिवराम महादेव, 'काळातील निवडक निबंध' भाग–१ ते १०, य. गो. जोशी प्रकाशन, २७ सप्टेंबर १९४६,– पृ.१ ते६

१५. परांजपे कृष्णाजी शिवराम, उपरोक्त पृ.१२३ ते १२५

१६. परांजपे कृष्णाजी शिवराम, ‘स्वराज्या’तील निवडक निबंध, वर्ष–२रे, प्रथमावृत्ती १९२२, गोवर्धन प्रेस, पुणे, पृ. १ ते १०

१७. तत्रैव पृ.१० ते १९

१८. तत्रैव पृ. १९ ते २६

१९. तत्रैव पृ. २६ ते ३२

२०. तत्रैव पृ. ३२ ते ३९

२१. तत्रैव पृ. ३९ ते ४२

२२. तत्रैव पृ. ४३ ते ४८

२३. तत्रैव पृ. ४९ ते ५४

२४. तत्रैव पृ. ५४ ते ५७

२५. तत्रैव पृ. ५७ ते ५९

२६. तत्रैव पृ. ५९ ते ६६

२७. तत्रैव पृ. ६७ ते ६८

२८. तत्रैव पृ. ६९, ७०

२९. तत्रैव पृ. ७० ते ७२

३०. तत्रैव पृ. ७३ ते ७८

३१. तत्रैव पृ. ७९ ते ८२

३२. तत्रैव पृ. ८३ ते ८९

३३. तत्रैव पृ. ९० ते ९६

३४. तत्रैव पृ. ९७ ते ९९

३५. तत्रैव पृ. ९९ ते १०६

३६. तत्रैव पृ. १०७ ते ११५

३७. तत्रैव पृ. ११५ ते १२३

३८. तत्रैव पृ. १२३ ते १२५

३९. तत्रैव पृ. १२६ ते १३३

४०. तत्रैव पृ. १३३ ते १४३

४१. तत्रैव पृ. १४४ ते १४५

४२. तत्रैव पृ. १४६ ते १४८

४३. तत्रैव पृ. १४८ ते १५१

४४. परांजपे शि.म. 'साहित्यसंग्रह भाग– १ ते ३', य. गो. जोशी प्रकाशन, पुणे–२, प्रस्तावना–जोगळेकर स.आ., सप्टेंबर १९४६,– पृ. ७ ते ९

४५. परांजपे शि.म. 'साहित्यसंग्रह भाग– १, य. गो. जोशी प्रकाशन, पुणे–२, पृ. १ ते १८

४६. तत्रैव पृ. १८ ते ३२

४७. तत्रैव पृ. ३३ ते ५४

४८. तत्रैव पृ. ५४ ते ६६

४९. तत्रैव पृ. ६७ ते ८८

५०. तत्रैव पृ. ८८ ते १०२

५१. तत्रैव पृ. १०२ ते १४०

५२. तत्रैव पृ. १४० ते १८६

५३. परांजपे शि. म. 'साहित्यसंग्रह भाग–२', य. गो. जोशी प्रकाशन, पुणे–२, पृ. १ ते १४

५४. तत्रैव पृ. १४ ते ३१

५५. तत्रैव पृ. ३२ ते ६०

५६. तत्रैव पृ. ६० ते ७४

५७. तत्रैव पृ. ७५ ते ९१

५८. तत्रैव पृ. ९१ ते ११०

५९. तत्रैव पृ. ११० ते १२७

६०. तत्रैव पृ. १२८ ते १४०

६१. तत्रैव पृ. १४० ते १५४

६२. तत्रैव पृ. १५५ ते १७१

६३. तत्रैव पृ. १७१ ते १९२

६४. परांजपे शि. म., 'साहित्यसंग्रह भाग – ३', य. गो. जोशी प्रकाशन, पुणे – २, पृ. १ ते ४८

६५. तत्रैव पृ. ४९ ते ६०

६६. तत्रैव पृ. ६० ते ८२

६७. तत्रैव पृ. ८३ ते ९५

६८. (अ) तत्रैव पृ. ९५ ते ११४ (ब) चित्रमय जगत – फेब्रुवारी १९२७

६९. (अ) तत्रैव पृ. ११४ ते १२२ (ब) चित्रमय जगत – डिसेंबर १९२८

७०. तत्रैव पृ. १२३ ते १३२

७१. (अ) तत्रैव पृ. १३३ ते १३९, (ब) चित्रमय जगत – ऑगस्ट १९२९

७२. तत्रैव पृ. १४० ते १७१

७३. (अ) तत्रैव पृ. १७२ ते १८८, (ब) रत्नाकर – जानेवारी १९२६

७४. (अ) तत्रैव पृ. १८९ ते २००, (ब) रत्नाकर – ऑगस्ट १९२६

७५. परांजपे शि.म. 'साहित्यसंग्रह', भाग–२ य.गो. जोशी प्रकाशन, प्रस्तावना – जोगळेकर स.आ., पुणे–२, १९४६, पृ. ७ ते ९

७६. डॉ. पांढरे नीला, शि. म. परांजपे – वाङ्मयीन अभ्यास, पुष्प प्रकाशन लि., पुणे ७, प्रथमावृत्ती – जून १९९३, पृ. ११५ ते ११९

७७. तत्रैव पृ. ११९ ते १२४

७८. तत्रैव पृ. १२४ ते १२८

७९. परांजपे शिवराम महादेव, मानाजीराव, प्रकाशक–शंकर नरहर जोशी, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती –२री, १९२८, प्रस्तावना – शि.म., पृ. ३ ते ३०

८०. परांजपे शिवराम महादेव, पहिला पांडव अथवा महारथी कर्ण, प्रकाशक–तुकाराम पुंडलिक शेटे, बुकसेलर व पब्लिशर, मुंबई ४, पृ.१२ ते ३१

८१. (अ) ओगले शि.ल., बर्वे द. के, 'शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र (जीवन कार्य व आठवणी)', य.गो.जोशी प्रकाशन, पुणे–२, २७ सप्टेंबर १९३६, पृ. ८८, ८९

(ब) रत्नाकर – १९२९

८२. चित्रमय जगत १९१८

८३. चित्रमय जगत १९२४

८४. परांजपे शि.म. 'मराठ्यांचा लढायांचा इतिहास १८०२ ते १८१८' प्रकाशक–शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस,१९२८, पुणे, प्रस्तावना पृ. १ ते १३

८५. तत्रैव पृ. १ ते २४

८६. तत्रैव पृ. २५ ते ३२

८७. तत्रैव पृ. ४१ ते ५९

८८. तत्रैव पृ. ११२ ते १८४

८९. तत्रैव पृ. २०६ ते २१७

९०. तत्रैव पृ. २१८ ते २२४

९१. तत्रैव पृ. २३८ ते २७८

९२. तत्रैव पृ. २९५ ते ३२७

९३. (अ) डॉ. पांढरे नीला, शि. म. परांजपे – वाङ्मयीन अभ्यास, पुष्प प्रकाशन लि., पुणे ७, प्रथमावृत्ती – जून १९९३, पृ. १४४ ते १४६

(ब) तत्रैव पृ. ६१, ६२

९४. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', चित्रशाळा प्रेस, पुणे, आवृत्ती पहिली १९४५, पृ.४७, ४८

९५. तत्रैव पृ. ४८ ते ५४

९६. परांजपे वामन कृष्ण, 'शिवरामपंत परांजपे व्यक्ती–वक्तृत्व वाङ्मय' प्रस्तावना लेखक– अणे माधव श्रीहरी, चित्रशाळा प्रकाशन, सदाशिव पेठ, पुणे, पृ.३०४, ३०५

९७. काळ अग्रलेख – ८.११.१९०१

९८. काळ अग्रलेख – ४.७.१९०२

९९. काळ अग्रलेख – ८.८.१९०२

१००. काळ, स्वतंत्र कथा – २.३.१९०६

१०१. काळ, स्वतंत्र लेख – ९.२.१९०६

१०२. परांजपे शिवराम महादेव, 'काळातील निवड्क निबंध' भाग–७, य. गो. जोशी प्रकाशन, २७ सप्टेंबर १९४६,– पृ.१२७ ते १३६

१०३. परांजपे शिवराम महादेव, 'काळातील निवडक निबंध' भाग–२, य. गो. जोशी प्रकाशन, २७ सप्टेंबर १९४६, निबंध क्र.१६, पृ. ८६ ते ९४

१०४. परांजपे कृष्णाजी शिवराम, 'स्वराज्या'तील निवडक निबंध, वर्ष–२रे, प्रथमावृत्ती १९२२, गोवर्धन प्रेस, पुणे, पृ. १८ ते १९

१०५. परांजपे शि.म. 'साहित्यसंग्रह', भाग–२ य.गो. जोशी प्रकाशन, प्रस्तावना – जोगळेकर स.आ. पुणे–२, १९४६,– पृ. ३२ ते ६०

१०६. तत्रैव पृ. १५५ ते १७१

# प्रकरण – ६

## धार्मिक कार्य

शिवरामपंत परांजपे यांचे स्वातंत्र्यपूर्व काळातील कार्य अवर्णनीय आहे. राजकीय, सामाजिक, त्यांच्या लेखन कार्याबरोबर त्यांचे धार्मिक कार्य महत्त्वाचे आहे. आपल्या काळ पत्राच्या माध्यमातून त्यांनी समाजाचे सामाजिक प्रबोधन केलेले आहे. याशिवाय लो.टिळकांबरोबर शिवजयंती उत्सव व गणपतीउत्सव यांच्या माध्यमातून विविध व्याख्यानांतून महाराष्ट्रात नवीन चळवळीची सुरुवात केली. महाराष्ट्रात एका नव्या युगाला सुरुवात झाली. धर्माच्या माध्यमातून लोकांच्या विचारात बदल करता येतो, याची जाणीव शि.मं.ना होती. म्हणून 'काळ' पत्रातून धार्मिक बाबतीत आपले विचार व्यक्त केलेले दिसतात. हिंदु लोक धर्माला पवित्र आणि आदराचे स्थान देतात. ख्रिश्चन, हिंदु, मुस्लीम, जैन, बौध्द अशा अनेक धर्माच्या चर्चेतून लोकांमध्ये एकवाक्यता निर्माण करण्याचा प्रयत्न परांजपेंनी केलेला दिसतो. ब्रिटिश सत्तेविरुध्द आवाज उठविण्याचे काम शि.मं.नी केलेले दिसते.

विविध धार्मिक लेखांचा आढावा घेताना काळ पत्रातील काही लेखांचा आढावा घेतलला आहे. तो खालीलप्रमाणे –

### १) ईश्वराची लीला अगाध आहे ! –

परमेश्वर किंवा ईश्वराला मानवाच्या जीवनात अनन्य साधारण स्थान आहे, हे सर्वश्रुत ओह. ईश्वराचे कर्तृत्व अनंत व अमर्याद आहे. मानवाच्या संकटकाळात हाच ईश्वर मनुष्याला मदतीला धावून येतो, हे काव्याच्या आधारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न शि.मं.नी केलेला आहे.

ईश्वराची लीला अगाध आहे, म्हणजेच सर्व शक्तीमान आहे. परमेश्वराला अशक्यप्राय काहीच नाही. आपल्या सारख्या सर्वसामान्य लोकांना ईश्वराचा कायम आधार वाटत असतो. परंतु भारतात ब्रिटिशांच्या आगमनामुळे सर्वत्र निराशेचे वातावरण निर्माण झालेले आहे. भितीचे वातावरण झालेले आहे. भारतीयांना कोणत्याच प्रकारचे यश येण्याची चिन्हे नाहीत. परंतु हे काम परमेश्वर निश्चित करेल, असे वाटत आहे. अनादी, अनंत व सर्वशक्तीमान परमेश्वर

भारतीयांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सदैव तत्पर कार्य करेल, यात अजिबात शंका नाही. परमेश्वराकडे मोठी शक्ती आहे, हे सर्वांनाच मान्य आहे.

उदाहरण पहायचे झाले तर हिरण्यकशिपू व भक्त प्रल्हाद यांच्या क्रोधातून परमेश्वराचे खांबामध्ये दर्शन झाले होते. दुर्योधनाने द्रौपदीचे वस्त्रहरण सुरू केले तेव्हा परमेश्वर कृष्णाच्या रुपात तिचे संरक्षण करतो. रावणाचा रामाकडून वध झाल्याने येथेही परमेश्वराची लीला अगाध आहे, असे वाटते. अशक्य गोष्टी परमेश्वराच्या हातून घडत आहेत.

येशू ख्रिस्ताच्या मृत्युनंतर तीन दिवसांनी त्याचा पुर्नजन्म होऊन ख्रिस्ती लोकांना उपदेश करण्याचे कार्य येशूने केले. गौतम बुध्दांच्या विचारांचा प्रसार व प्रचार सर्व भारत व परदेशातही झालेला दिसतो. आद्य शंकराचार्यांनी हिंदु धर्मातील तत्त्वे स्पष्ट करून दाखविली. या व्यक्तींच्या रुपात परमेश्वराची लीला जगाला समजली. ज्या ज्या वेळी मानव किंवा सजीव प्राणी संकटात आहे, त्या त्या वेळी परमेश्वराने आपल्या अस्तित्वाने संकटाचे विमोचन केलेले दिसते. परमेश्वराच्या अस्तित्वामुळे समाजाची प्रगती व उन्नती झालेली आहे.

ब्रिटिशांनी जरी भारतावर आपली सत्ता निर्माण केली असली तरीही हिंदुस्थानी लोकांना नक्की यश येईल, याची खात्री वाटत्रे. भविष्यात संपूर्ण भारत आपल्याच ताब्यात येणार आहे. त्यामुळे कोणीही निराश  न होता परमेश्वरांच्या कर्तृत्वावर विश्वास ठेवावा. आपले कर्म, कर्तृत्व दाखवावे, ईश्वराला शरण जाऊन चांगले देशासाठी  झटावे, स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय राहणार नाही. कारण ईश्वराची लीला अगाध आहे. हे सर्वांना मान्यच करावे लागेल.[१]

## २) अक्षय्य तृतीया –

हिंदु लोक अक्षय्यतृतीया हा सण उत्सव महत्त्वाचा मानतात. कारण या दिवशी आपल्या पितरांना अन्न–पाणी देणे, यातच पुण्यकर्म व पूज्यकर्म मानतात. वर्षातून एकदा हे पवित्र कार्य करण्यामध्ये सर्वजण मनःपूर्वक धन्यता मानतात.

परशुराम हा एक अलौकिक पुरुष मानला जातो. परशुराम ब्राह्मण जातीचा असला तरी सर्व क्षत्रिय धर्माचे गुण त्याच्यामध्ये होते. शस्त्रास्त्र ज्ञान त्याला अधिक होते. परशुरामाचे नाव अजरामर झालेले होते. क्षत्रियांचे नाव रसातळाला नेणे व क्षत्रियांचा निःपात करणे हे परशुरामाचे

ध्येय होते. परशुरामाचे बालपण अरण्यांमध्ये गेलेले होते. जमदग्नीचा हा सर्वात लहान मुलगा होता. कार्तवीर्य याने त्याच्या पित्याचा अपमान केलेला होता. अरण्यांतील त्यांच्या वस्तुंचा नाश केलेला असतो. म्हणून परशुरामाचा क्रोध अनावर झाला व त्याचा नाश करण्यासाठी परशुराम बाहेर पडला. परशुरामाने कार्तवीर्य याच्याशी युध्द करून त्याला ठार मारले. त्याच बरोबर परशुरामाने २१ वेळा पृथ्वी निःक्षत्रिय बनविला. त्यामुळे अक्षय्यतृतयेला पिर्ततर्पण करण्याची पध्दती  आहे. मृत व्यक्तींना श्राध्द रुपाने तिलांजली देणे हे महत्त्वाचे मानतात. परशुरामाने अशाप्रकारे पितृतर्पण केले होते. शत्रुच्या रक्ताने पितृतर्पण करण्याचे काम परशुरामाने केलेले होते. परशुरामाने क्षत्रियांचा निष्पात केलेला असला तरी भारतात पुन्हा क्षत्रिय निर्माण झालेले होते. त्यामुळे अक्षय्यतृतीयेच्या निमित्ताने आपण पशुरामाचे स्मरण करीत असतो. रामायण व महाभारतासारखे अमोल ग्रंथ भारतीयांची दैवते आहेत. विविध ऋषिमुनींनी त्याची महती आपल्या अद्‌भुत वर्णनातून सांगितली आहे. त्यामुळे अक्षय्यतृतीयेच्या दिवशी श्राध्द करून पूर्वजांचे स्मरण करण्याची प्रथहा आजही पाळली जाते. श्राध्द आणि उद्‌कुंभ दानधर्म हे परशुरामाचेच अनुकरण मानले जाते. तपश्चर्या करून, दानधर्म करून आपल्या पूर्वजांचे स्मरण करण्यासाठी अक्षय्यतृतीया हा सण उत्सवाच्या रुपाने प्रत्येक हिंदू साजरा करताना दिसतो. [२]

## ३) ख्रिस्ती धर्माची वाढ –

येशू ख्रिस्तामुळे ख्रिश्चन धर्माचा प्रसार जगात सर्वत्र वाढलेला दिसतो. सुरुवातीला ख्रिश्चन धर्माचे नाव कोठेही नव्हते. परंतु येशू ख्रिस्ताच्या जन्मानंतर ख्रिश्चन धर्मामध्ये प्रचंड वाढ सुरू झाली. हिंदूस्थानमध्येही ख्रिश्चन धर्म स्विकारणाऱ्यांची संख्या अधिक आहे. हिंदु, मुस्लीम, बौध्द, जैन, शीख, यहुदी या धर्मातील लोकही ख्रिश्चन धर्म स्विकरताना दिसत आहेत. ‘सर्व धर्मातील लोकांना ख्रिस्ती करा म्हणजे एक राष्ट्र सिध्द होईल, असा जणु नाराच दिलेला होता. दररोज किमान १०० लोक आपला धर्म सोडून ख्रिश्चन धर्म स्विकारत आहेत. शुद्र, अतिशुद्र लोकांना बाटविण्याचे काम सुरू आहे. सध्या धर्म स्वातंत्र्य दिलेले असल्याने कोणीही कोणताही धर्म (बहुधा ख्रिश्चन) स्विकारतो आहे. ख्रिश्चन धर्म स्विकारला म्हणजे नाकऱ्या मिळतात. सैनिक म्हणून नाव कमावता येते. पगार मिळतो. मदत मिळत आहे. म्हणून दिवसेंदिवस ख्रिश्चन धर्मियांची संख्या प्रचंड वाढत आहे. धर्मगुरु आपली भूमिका अगदी

व्यवस्थित बजावीत आहेत. आद्य शंकराचार्यांनी हिंदू धर्म टिकावा, यासाठी विविध मठांची स्थापना केली असूनही त्याचा काही उपयोग होत नाही, ही फार मोठी शोकांतिका आहे. धर्मगुरु पैशाच्या राशींमध्ये लोळत आहेत. तोच पैसा एखाद्या कर्तृत्त्ववान व्यक्तीच्या हातात दिला तर त्याच्याकडून चांगली कार्ये झाल्याशिवाय राहणार नाही. लोक अन्नासाठी धर्मांतर करीत आहेत. आमचा पैसा आहे परंतु त्याचा वापर कसा करावा, हे आम्हांला कळत नाही. शेवटी परमेश्वराच्या मनात असेल तेच होणार, यात काही शंका नाही.[३]

### ४) ख्रिस्ताची आज्ञा –

येशू ख्रिस्त यांनी ख्रिश्चन धर्माचा प्रसार करा, अशी आज्ञा दिलेली होती. त्याचप्रमाणे महंमद पैगंबरांनी मुस्लीम धर्माचा प्रसार करा, अशी आज्ञा दिलेली होती. त्यामुळे संपूर्ण जगभर ख्रिश्चन आणि मुस्लीम धर्माचा प्रसार करण्यासाठी लोकांचा मोठ्या प्रमाणावर संचाल झाला होता. ख्रिश्चन मिशनरी सर्व जगामध्ये ख्रिश्चन धर्माचा नारा देत होते. हिंदुस्थानातील बऱ्याच लोकांना बाटवून ख्रिस्ती करण्याची मोहिमच त्यांनी काढलेली होती. चीनमध्ये सुध्दा ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्याचे कार्य मिशनऱ्यांनी केले. त्यांचा धर्मग्रंथ बायबलचा प्रसार करावा, असे म्हटले होते. देवळांपुढे उभे राहून मिशनरी लोकांना आपल्या धर्माकडे नेत होते. बायबलच्या गोष्टी मिशनरी सांगत होते. जिजस् देवळे, शाळा, धार्मिक संस्था यांमधून ख्रिश्चन धर्म व बायबलचे वर्णन गाताना दिसत होते. 'बायबलचा प्रसार व ख्रिश्चन धर्माचा प्रसार करा', अशी येशूची आज्ञा होती. मुस्लिमांची 'कुराणाचा प्रसार करा', अशी आज्ञा होती. मग भारतात हिंदू, जैन, बौध्द, यहुदी, शीखांना अशी आज्ञा देता येत नव्हती का? पण भारतामध्ये असे धाडस कोण करणार? हाही मोठा प्रश्न होता. भारतामध्ये वेद, उपनिषदे, ही महाकाव्ये नव्हती काय? फक्त बायबलच ईश्वरप्रणित होते. बाकीचे ग्रंथ ईश्वरप्रणित नव्हते असे नाही. शुभवर्तमान सांगणाऱ्या ख्रिस्ती मिशनरींनी सर्व धर्मांचा विचार करणे आवश्यक आहे. 'ख्रिस्ती धर्म स्विकारा' असे सांगण्याचा त्यांना अजिबात अधिकार नाही. हिंदू आणि मुस्लीम लोकांनी या गोष्टीचा गांभीर्याने विचार करायला हवा. त्यांची व्याख्याने व इतर गोष्टींवर बहिष्कार टाकावा. ख्रिश्चन धर्म स्विकारल्याने आपले चांगले होणार आहे, असे मुळीच नाही. सर्व धर्म सारखेच आहेत म्हणून हिंदूस्थानातील लोकांना बाटविण्याचे प्रकार ख्रिश्चनांनी बंद करावेत. श्रेष्ठ आणि कनिष्ठ

असे धर्माचे प्रकार नसतात. ख्रिश्चन, मुस्लीम व हिंदू हे सर्वच धर्म आपापल्या परीने योग्य त्या जागेवर आहेत. प्रत्येक धर्मामध्ये परमेश्वराचे स्थान उच्च आहे. उगीच धर्मावरून कलह निर्माण करण्यात काहीच अर्थ नाही. कारण परमेश्वर अनादी, अनंत व सर्व शक्तीमान आहे, हे अगदी बरोबर आहे.[४]

५) **परमेश्वराचे अभिवचन –**

'यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजात्महम् ।।'

जेव्हा धर्माची ग्लानि होते तेव्हा अधर्माचे प्राबल्य वाढते. तेव्हा अवतार धारण करतो, असे परमेश्वरोन अभिवचन दिलेले आहे. पण सध्या असे कधी होईल, याची वाट पहावी लागत आहे.

हल्ली मानव संकटात सापडला आहे. सर्वत्र दुःखाची छाया पसरलेली आहे. सर्वत्र नैराश्य आहे. त्यामुळे परमेश्वर आपले अभिवचन पूर्ण करेल का? असे सारखे वाटत आहे. हिंदूस्थानमध्ये सर्वत्र दुःख पसरलेले आहे. जुन्या रुढी, प्रथा, परंपरा, सण समारंभ नित्य चालू आहेत. दरवर्षीप्रमाणे गुढी पाडव्याला गुढ्या दारोदारी उभारल्या जात आहेत. शालीवाहन शकापेक्षा सर्वत्र ख्रिश्चन धर्माचा दबदबा निर्माण झाला आहे. सणाच्या पूर्वीचा आनंद शिल्लक राहिलेला नाही. गुढ्या, तोरणे, खरेतर विजयाची प्रतिके आहेत. परंतु भारताला असा विजय कधी मिळणार, हेच कळत नाही. सर्व प्रजा हताश, दुःखी झाली आहे. जेव्हा भारताला पूर्ण स्वातंत्र्य मिळेल, तोच पाडवा महत्त्वाचा ठरेल. ब्रिटिशांच्या आगमनामुळे हिंदूस्थानचे पूर्वीचे वैभव नष्ट झाले आहे. दयनीय स्थिती निर्माण झाली आहे. भारतीयांवर प्रचंड अन्याय, अत्याचार सुरू आहेत. धर्माचा अधर्म सुरू आहे. धर्माची वाढ न होता धर्माची अधोगती सुरू आहे. हिंदुस्थानात फक्त ख्रिश्चन धर्मिय लोकांची संख्या वाढविण्यावर भर दिला जातआहे. परमेश्वरा, खरा धर्म राहिला नाही, धर्माची ग्लानी झाली आहे. तेव्हा तू यामध्ये लक्ष घालशील का? हिंदूस्थानातील गरीब लोकांची तुला दया येऊ दे. चांगला अवतार धारण करून या लोकांची तू पाठराखण करायला हवी. हिंदूस्थानातील लोकांना तुझ्या मदतीची गरज आहे. सर्व जनता

संकटात सापडली आहे. त्यामुळे ईश्वरा आता आम्हांला वाट पहायला लावू नकोस. तूच आम्हाला आश्वासन दिले आहे. मनुष्य संकटात आल्यावर तू मदतीला येणार आहेस.

सर्व शक्तीमान परमेश्वरा, दयाघना, आमच्यावर तुझी कृपा कधी होईल? हिंदुस्थान देश, तेथील लोक खूप संकटात आहेत. अधर्म मोठ्या प्रमाणात वाढला आहे. कधी काही हिंदूस्थानातून सोन्याचा धूर निघत होता. म्हणजे हिंदूस्थान समृध्द, संपन्न होता. परंतु आज इंग्रजांनी देशाचे दिवाळे काढले आहे.आमचा देश आमचा राहिला नाही. याचे खूप दुःख होते. परमेश्वरा हे दुःख केव्हा संपणार? आमच्या मागणी संकटे संपत नाहीत. त्यामुळे परमेश्वरा आमचा अंत पाहू नकोस. हिंदुस्थानातील लोकांना दुःखातून बाहेर काढ. तुझे अभिवचन पूर्ण करून सर्वांना सुखा–समाधानाने जगायला मदत कर, हीच तुला प्रार्थना आहे.[५]

## ६) धर्म कल्पनांचा परिणाम –

विचार आणि आचार या दोन गोष्टी एकमेकांवर अवलंबून असतात. हेच या अग्रलेखात सांगण्यात आले आहे. विचार चांगले असतील तर आचार चांगला होईल. मनुष्याला चांगल्या आचाराची व विचाराची आवश्यकता आहे. 'धर्म म्हणजे दुसरे–तिसरे काही नसून चांगल्या विचारांचा समुह होय.' काही लोकांना वाटते धर्म ईश्वराने निर्माण केला आहे. काही लोकांना धर्म ईश्वराने नाही तर मनुष्याने निर्माण केला आहे, असे वाटते. बौध्द धर्मात अहिंसा या तत्त्वाचे पालन करण्यात येते. परंतु सर्वच धर्मांना अहिंसा हे तत्त्व मान्य नाही. सध्याच्या काळात हा धर्म काहीच कामाचा नाही. 'जशास तसे', या तत्त्वाचा वापर करावा. माणसांच्या जीवनाचे अंतिम सत्य म्हणजे मोक्ष होय. हिंदू धर्मात लढता लढता मरण आले तर वीरगती प्राप्त झाली, असे मानतात. तो खरा योध्दा मानला जातो. त्याला खरे स्वर्गसुखाची प्राप्ती होते, असेही मानले जाते. हिंदू धर्मीय योध्दाचे सर्वत्र कौतुकच होईल. कारण तो आपल्या स्वातंत्र्यासाठी, देशासाठी, धर्मासाठी आणि कुटुंबासाठी लढलेला आहे. परंतु बौध्द धर्मात हिंसेला थारा नाही. हिंदू सैनिक जीवावर उदार होऊन लढेल. क्षत्रिय धर्माचे पालन करून सर्वांचे रक्षण करण्यावर त्याचा भर असेल. मरण ही गोष्ट वाईटच आहे. पण शौर्याने मरण आले तर त्याचे सर्वत्र अभिनंदन होईल. रणामध्ये क्षत्रिय धर्माचे पालन करणे महत्त्वाचे आहे. शौर्य, साहस, धाडस या गुणांनी युक्त क्षत्रियाला मरणाची भिती कधीही वाटत नाही. मानवाच्या अंगात

ताकद व हिंमत पाहिजे. धर्मापासून मनुष्याला सुखाची प्राप्ती व्हायला हवी. दुःख भोगण्याची वेळ मनुष्यावर यायला नको. [६]

७) ईश्वरी सूत्र काही निराळेंच असते –

**(Man proposes and God Disposes)**

परमेश्वराच्या मनामध्ये योजलेल्या गोष्टीच प्रत्यक्षात होताना दिसतात. कोणाचे कसलेही प्रयोजन असले तरी त्यामध्ये बदल होतोच. परमेश्वरी इच्छा हीच अंतिम असते, हे मान्यच करावे लागते. इंग्लंडच्या राणीसाहेबांचा मृत्यू झाल्यानंतर एडवर्डसाहेबांच्या राज्यरोहणाची तयारी पूर्ण झाली होती. परंतु ईश्वराच्या मनात काही तरी वेगळेच होते. २६ जून ही तारीख राज्यरोहणासाठी ठरविण्यात आली होती. सर्व तयारी पूर्ण झाली होती. इंग्लंडमध्ये रस्ते सजविण्यात आले होते. रस्त्यांच्या दुतर्फा प्रेक्षक, सैनिक हजारोंच्या संख्येत उभे होते. विदेशात आमंत्रणे दिलेली होती. सैन्यदल, आरमार, सर्व लष्कर सज्ञ होते. भारतातील काही संस्थानिक कार्यक्रमाला हजर राहण्यासाठी जातीने उपस्थित होते. इंग्लंडच्या राष्ट्रगीताची जय्यत तयारी सुरू होती. राज्यरोहणाची सर्व तयारी जवळ–जवळ पूर्ण झाली होती. राजांची तब्येत चांगली आहे, अशी बातमी अधिकाऱ्यांना द्यावी लागली. परंतु राजांची तब्येत सुधारण्यासाठी बराच काळ कदाचित लागेल, असे वाटत होते. त्यामुळे राज्यरोहणाचा कार्यक्रम काही दिवस तहकूब करावा लागला. राज्यरोहणाची सर्व केलेली तयारी आहे तशीच राहिली. राजाला व त्याच्या तब्येतीला आराम पडावा, अशी प्रार्थना करण्याची वेळ आली. शेवटी ईश्वराच्या मनात असेल त्याप्रमाणेच गोष्टी घडत असतात. मनुष्याने कितीही काहीही ठरविले तरी परमेश्वरी इच्छा हीच अधिक महत्त्वाची असते. प्रत्येकाने ईश्वराला शरण यायलाच पाहिजे. ह्या जगामध्ये ईश्वराची लीला अगाध आहे, हे मात्र मान्यच करावे लागते. [७]

८) गोवध –

हिंदूस्थानमध्ये गाय हे पवित्र दैवत मानले जाते. परंतु भारतावर ब्रिटिशांचे राज्य चालू आहे. त्यामुळे भारतात गोवधाचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर वाढले आहे. एडवर्डसाहेब यांनी गोवध बंद करण्यासाठी पुढाकार घ्यावा. म्हणजे शेती उत्पादनात मोठी भरभराट होईल. गाईंचा वध झाला नाही तर गायींच्या दुधामुळे सर्वत्र भरभराट होईल. हिंदुस्थानातील जनतेमध्ये समृध्दता

निर्माण होईल. गायींचा वध करून त्यांचे मांस खाण्याचे महापातक भारतात होत आहे. यावर ब्रिटिशांनीच प्रतिबंध घालणे आवश्यक आहे. गायीचे दूध सर्वांना मिळाल्यावर त्यांचे आरोग्य उत्तम राहील. जवळ जवळ दीड लाख गायींची कत्तल करण्यात येते. त्यामुळे प्राण्यांबद्दल दयाभाव दाखवून गोवध बंद करण्यात यावा. गायीची हत्या हे महापातक व पाप मानण्यात येते. हिंदूस्थानातील गोवध बंद करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. हिंदूस्थानच्या संरक्षणाची जबाबदारी ब्रिटिशांवर असल्याने त्यांनी दक्षता घ्यावी. हिंदूस्थानचे संरक्षण त्यांनी केलेले आहे. परंतु त्यांचे होणारे नुकसान ब्रिटिशांनी थांबवावे. हिंदूस्थानातील फक्त गायीच मरतात असे नाही, लोकही मरतात. शेतकऱ्यांची कामे करावीत. दुष्काळग्रस्तांना सरकारने मदत करावी. गाय या प्राण्याला आत्मा असतो, हे प्रत्येकाने लक्षात ठेवावे. गायींचे हंबरडे ऐकून तरी दया यायला हवी. म्हणून ब्रिटिश सरकारने गोवधाकडे दुर्लक्ष न करता कायदा करून गोवध बंद करावा. आत्म्याचा आवाज परमेश्वराला तर निश्चित ऐकू येईल. त्यामुळे हिंदुस्थानातील गायींचा वध बंद करावा, असे सर्वांनाच वाटत आहे. [८]

## ९) ते साधुसंत गेले कोठे? –

हिंदुस्थानची सर्व सत्ता मुस्लमांनी ताब्यात घेतला आह. सर्वत्र अन्याय, अत्याचार, देवळांचा विध्वंस, गोवध, ब्राह्मण वध असे एक ना अनेक गोष्टी भारतात होत आहेत. महिलांवर अत्याचार राजरोस सुरू आहेत. धर्म बुडविले जात आहेत. हिंदुस्थान संकटमय अवस्थेत सापडलेला आहे. सुरुवातीच्या काळात संतांनी खूप चांगले कार्य केले. श्रीकृष्ण, ब्रह्मदेव यांनी अनेकांना संकटातून मुक्त केले होते. नंतर संतकवींनी समाजाचे प्रबोधन केले. ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम, एकनाथ, समर्थ रामदास, तुळशीदास, नरसीमेहता, आदींनी भारताला स्वातंत्र्याचा मूलमंत्र दिला. स्वराज्य, देशभक्ती, स्वधर्म यांची खरी शिकवण दिली. समाजामध्ये चांगले वातावरण तयार केले. दांभिकतेवर प्रहार करून समाजामध्ये सामाजिक ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. संत कवी वेगवेगळ्या जाती धर्माचे असले तरी देशाचे ऐक्य हे त्यांचे प्रतिक होते. जात, धर्म, पंथ बाजूला ठेऊन सर्वजण एकवाक्यतेसाठी झटले. आपल्या अभंगातून, किर्तनातून त्यांनी लाखो लोकांमध्ये विचारांची शिदोरी पसरविली.

गोरा कुंभार, सावतामाळी, संत कबीर, नागनाथ, चोखामेळा, संत बहिणाबाई, संत मीराबाई, यांना समाजामध्ये सुधारणा आवश्यक वाटत होती. प्रत्येकाने आपापल्या परीने समाजाची सेवा केलेली होती.

परंतु आज हिंदुस्थान संकटात असताना ते साधुसंत गेले कोठे? हा प्रश्न आपल्यापुढे येतो. हिंदुस्थानात आज चांगल्या साधुसंतांच्या विचारांची, त्यांच्या मार्गदर्शनाची, स्वदेशभक्तीची गरज सर्वांना आहे. धर्म, देश, बांधव, यांच्या रक्षणार्थ साधुसंतांनी पुन्हा आपल्या नामगजराचा नारा द्यावा व हिंदुस्थानवरील संकट दूर करावे, हीच इच्छा आहे. [९]

## १०) परमेश्वराची प्रार्थना –

जगामध्ये परमश्वराचे अस्तित्व अनन्य साधारण मानले जाते. प्रत्येक जण परमेश्वराची प्रार्थना कोणत्या ना कोणत्या रुपात करताना दिसतो. परमेश्वर आणि मनुष्य यांचे नाते अतुट आहे. परमेश्वराने या सृष्टीची, विश्वाची निर्मिती केलेली आहे. पंचमहाभुते म्हणजेच पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश परमेश्वराने निर्माण केली आहे. परमेश्वर, अनादी, अनंत व सर्वशक्तीमान आहे. परमेश्वराच्या कर्तृत्वाला सीमा नाही. विविध मूर्ती, मंदिरांमधून मनुष्य परमेश्वराचे अस्तित्व मान्य करतो. आपल्या अडीअडचणी, समस्या या परमेश्वरासमोर मांडतो. पूजा–अर्चा करून प्रसन्न वातावरण निर्माण करतो.

आता देवी–देवतांची प्रार्थना करण्याची वेळ आली आहे. पूर्वीच्या राजांनी काही ठेवी ठेवल्या आहेत. त्या आता आम्हांला द्या. देश बांधवांचे संरक्षण करा. देवळांचे, धर्माचे संरक्षण करा. सृष्टी सौंदर्याने नटलेल्या भारतभूमीचे संरक्षण तुम्हाला करावयाचे आहे. देव–देवताच भारताला सुखाचे दिवस दाखवतील, असे सर्वांना वाटत आहे.

आपला देश पारतंत्र्यात गेला आहे. या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कामी देवतांनो आम्हांला मदत करा. देवतांचा शोध घेत मनुष्य, पर्वत, नद्या, नाले, गुहा, डोंगर रांगा कोठेही जातो. तुमचा शोध घेतो. परमेश्वराची आमची प्रार्थना ऐका, अन्याय, जुलूम, जबरदस्ती यावर काही तरी उपाय शोधून काढा. सर्वत्र समान अशी वागणुक मिळायला हवी. सर्व बिघडलेले कालचक्र सुरळीत करण्यासाठी आम्ही सर्वजण परमेश्वरा तुमची प्रार्थना करीत

आहोत. आम्हांला तु सतत मदत करून आमच्यावरील संकटे दूर करशील, अशी आम्हांला खात्री आहे. [१०]

## ११) वेदान्त वृक्ष –

परमेश्वर हा सृष्टीचा नियंता आहे. परमेश्वराने मनुष्याला अनेक देणग्या दिल्या आहेत. मनुष्याला नुसता देह न देता विविध गोष्टी चैतन्यरुपी दिलेल्या आहेत. मनुष्याला मन, बुध्दी, अहंकार, वासना, जीवात्मा अशी अनेक रुपे दिलेली आहेत. शिवाय या सर्वांवर नियंत्रण ठेवणारे धर्म हा घटक महत्त्वाचा आहे. धर्म हा ईश्वर निर्मित आहे, ही गोष्ट सर्वांनाच मान्य आहे. यासाठी परमेश्वराचे अस्तित्व अनादी–अनंत आहे. चराचर सृष्टीचा निर्माता ईश्वरच आहे.

धर्म हे मानसिक आजारावरील मोठे औषध आहे. धर्मशास्त्रांचे आचरण केल्यास मनुष्याच्या जीवनात आनंद मिळतो. सर्वसामान्य लोकांना धर्मशास्त्राप्रमाणे वैद्यशास्त्रही महत्त्वाचे असते. धर्मशास्त्रामध्ये मनु, गौतम बुध्द, महंमद पैगंबर, येशू ख्रिस्त अशा महनीय व्यक्तींची विचारसरणी महत्त्वपूर्ण आहे. यांनी मांडलेले सिध्दांत परमेश्वराचेच आहेत. सर्व धर्म जरी वेगवेगळे असले तरील सर्वांचे ध्येय मात्र एकच आहे. परमेश्वर एक आहे, हे तत्त्व महत्त्वाचे आहे. कोणत्याच धर्मात भेद नाहीत. परंतु मनुष्यानेच धर्मामध्ये भेद केलेला दिसतो. परंतु खरे भेद नाहीत. कारण वेदान्तांने अनेक प्रश्नांची उत्तरे मिळाली आहेत. वेदांतातून अनेक गोष्टींची महती व ज्ञान मिळते. वेदांतशास्त्र हे कोणत्या धर्माकरिता, जातीकरिता किंवा व्यक्तीकरिता अजिबात नाही. वेदांत हा सर्व धर्मांचा धर्म आहे. त्यामधून तुमच्या मनाचे समाधान होते. कारण त्यामध्ये सत्याचा विचार मांडला आहे. स्वामी विवेकानंदांनी वेदांतील विचार व धार्मिक अधिष्ठान अमेरिकेतील धर्मपरिषदेत मांडले. त्यातून वेदांची व्यापकता समजली. मनुष्याच्या जीवनाचे अंतिम सत्य मोक्ष याची जाणीव सर्वांना झाली. वेदाच्या अंती उपनिषदांची महती आहे. पुढे यज्ञकर्म, पशुहत्या मोठ्या प्रमाणावर झाल्यो वेदांताचा अस्त होण्याची वेळ येत असताना शंकरांनी अवतार ग्रहण करून वेदांतविषयीचे मत प्रस्थापित केले. त्यातून बद्रीकेदार, जगन्नाथ, द्वारका व शृंगेरी अशा चार मठांची स्थापना करण्यात आली.

'करवीर आणि संकेश्वर या मठांची मूळ पीटिका आहे.' या मठांच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्ये पार पाडलेली दिसतात. विधवांच्या पुर्नविवाहाचा मुद्दा येथे चर्चेला आला होता.

परंतु पुण्यातील लोकांना ही गोष्ट आवडली नाही. परदेशगमनाबद्दल असणारा गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला गेला. अशाप्रकारे या मठांच्या माध्यमातून अनेक धार्मिक, सामाजिक व राजकीय कार्ये मोठ्या प्रमाणात घडवून आणली होती. यापुढेही होत राहतील, यात शंका नाही.[११]

## १२) जसे लोक तसे त्यांचे देव –

परमेश्वराच्या विविध रुपांचे दर्शन या अग्रलेखात केलेले दिसते. परमेश्वराचे रुप हे निर्गुण, निराकार, स्वतंत्र, निष्कलंक, निर्विकार व निर्विकल्प असल्याचे दिसते. वेद, उपनिषदांनी परमेश्वराचे अस्तित्व मान्य केले आहे. परमेश्वराची विविध रुपे आणि त्याचे गुण याबाबत मनुष्याने हस्तक्षेप केलेला आहे. देवांबद्दल मनुष्याने वेगवेगळ्या कल्पना केलेल्या आहेत. मूर्तीचे प्रकार विभिन्न असतात. मूर्तीचे रंग, आकार, लांबी, रुंदी, प्रत्येकाच्या कल्पनेप्रमाणे वेगवेगळी असते. कोणी मूर्ती दगडाच्या, मातीच्या, धातुच्या, लाकडाच्या बनवितात. पूजापाठ करण्याच्या पध्दतीत, नैवेद्य दाखविण्याच्या पध्दतीमध्ये बदल असतो.

परमेश्वर हा सर्वगुण संपन्न, सर्वश्रेष्ठ व सर्वोत्कृष्ट आहे. पण प्रत्येकाचा त्याच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन वेगवेगळा आहे. म्हणून 'जसे लोक तसे त्यांचे देव' हे तत्त्व अगदी बरोबर वाटते. कारण लोक आपल्या कल्पनेप्रमाणे मूर्ती बनविताना दिसतात. सत्य लोकांचे देव सत्य, गुलाम लोकांचे देव गुलाम, जे लोक स्वतंत्र त्यांचे देवही स्वतंत्रच असतात. आपण स्वतंत्र होतो तेव्हा देवता स्वतंत्र होत्या. आपण गुलामगिरीत गेलो तर आपल्या देवताही गुलामगिरीतच गेल्या अहेत. त्यामुळे जसे लोक तसे त्यांचे देव हे मान्य करावेच लागते.

युरोपातही धार्मिक चळवळी झाल्या. कॅथॉलिक आणि प्रोटेस्टंट चळवळी झाल्या.

परमेश्वरा तू गुलामांबरोबर गुलामच बनला. तुझ्यामध्ये असणाऱ्या सद्गुणांचा आम्हांला प्रकाश दे. आमच्यातील दोष नष्ट होऊन चांगले गुण निर्माण करा. आम्हांला आमच्या देशाची आवश्यकता आहे.[१२]

## १३) दासबोध –

शंकर श्रीकृष्ण देव यांनी 'दासबोध' नावाचे नवीन पुस्तक लिहिले आहे. समर्थ रादास स्वामींच्या अस्सल दासबोधाप्रमाणे देवांनी हे पुस्तक लिहिले आहे. रामदास पंथामधील काही अप्रकाशित भागांवर देवांनी प्रकाश टाकला आहे.

''दास म्हणजे रामदास त्यांनी लोकांना केलेला बोध ज्या ग्रंथामध्ये ग्रंथित आहे, तो दासबोध होय''.

किंवा 'दास म्हणजे गुलाम व त्यांना गुलामगिरीतून बाहेर पडण्यासाठी केलेला बोध म्हणजे दासबोध होय.'

समर्थ रामदास स्वामींनी दासबोधात वेदांतांची माहिती दिली आहे. देवांनी जुन्या दासबोधामध्ये काही उत्तम माहिती जोडलेली अहेत. समर्थ रामदास स्वामींचे चरित्र कथन केले आहे. समर्थ रामदासांची योग्यता खूप मोठी होती. समर्थ रामदासांनी आपल्या वचनांतून हिंदुस्थान देश स्वतंत्र, स्वधर्म यांचा उपदेश रामदासांनी केलेला होता.

रामदासांनी केलेल्या उपदेशानुसार....

''म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिवसांचे माजले बंड ।
या कारणे अखंड । सावधान असावे ।।''
धर्मासाठी मरावे । मरोनि अवघ्यांस मारावे ।
मारतां मारतां घ्यावे । राज्य आपुले ।।''

रामदासांनी  आपले राज्य घेण्यासाठी कष्ट घेण्याची आवश्यकता प्रतिपादन केलेली आहे. राामदास स्वामीनी प्रबोधनाचे कार्य सुरू केले. कष्ट केल्याशिवाय कोणतेही फळ मिळत नाही, हे ही दासबोधात स्पष्ट केले होते. प्रत्येक भारतीयाने स्वातंत्र्यासाठी कष्ट करावेत, हाच संदेश रामदास स्वामींनी दिल्याचे दिसते. [१३]

## १४) विश्वेश्वरापाशी विनंती –

महाराष्ट्रात वर्षारंभ हा गुढीपाडव्यापासून सुरू होतो. प्रत्येक जण गुढ्या, तोरणे, माळा लावून नवीन वर्षाची सुरुवात उत्साहात करीत असतो. नवीन शकाची सुरुवात होत असते. परंतु ब्रिटिशांचे नवीन वर्ष १ जानेवारीला सुरू होते. सैन्याची परेड व तोफांचा कडकडाट होतो. लोकांना पदव्या देऊन त्यांना सन्मान करण्याची पध्दती आहे. पण भारतातील विक्रम आणि शालीवाहन राजांची गोष्ट वेगळी आहे. भारतातील प्रत्येक व्यक्तीला चैत्र शुध्द प्रतिपदेला म्हणजे गुढीपाडव्याला आनंदच होतो. कारण हा दिवस स्वतंत्रतेचा दिवस मानला जातो. कारण त्यावेळी गुलामगिरी झुगारून देऊन स्वतंत्रतेची गुढी उभारली होती. आजही गुलामगिरी झुगारून देऊन स्वातंत्र्यासाठी सर्वांनी एकत्र काम करण्यसाची आवश्यकता आहे. आज गुलामगिरीचे वाढदिवस साजरे करण्याची मुळीच आवश्यकता नाही. परंतु आज नुसत्या गुढ्या उभ्या करूनही फायदा नाही. स्वतंत्रता या गोष्टीसाठी सर्वांनी लढा द्यायला हवा. सुरुवातीला हिंदुस्थान देश वैभवाच्या शिखरावर होता. आज दुःखाच्या गर्तेत गेलेला आहे. हिंदुस्थानातील सर्व पैसा, ब्रिटिशांनी ताब्यात घेतलेला आहे. आज सर्व देशामध्ये नैराश्यपूर्ण वातावरण आहे. देवा, आमच्या देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी तु जरूर प्रयत्न करावेत. तु आमच्या देशाचे, धर्माचे, लोकांचे रक्षण कर. भारतीयांना यश द्यावे. देशामध्ये सर्व गोंधळाचे वातावरण आहे. अन्याय, अत्याचार चालले आहेत. सर्वांनी देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्नांची शिकस्त सुरू केली आहे. सामान्यांच्या या प्रयत्नांना विश्वेश्वरा तू नक्की यश देशील. तु इतर देशांना जरी मदत केलीस त्याप्रमाणे भारत देशाला सुध्दा मदत करावी. देशाला स्वातंत्र्य मिळवून द्यावे.[१४]

## १५) अर्जुनाचा वेडेपणा –

महाभारतामध्ये कौरव आणि पांडवांचा इतिहास हा प्रत्येकालाच माहित आहे. पांडवांचे राज्य कौरवानी जिंकून घेतले. पांडवांना युध्द करून ते राज्य परत मिळवावे लागले. त्यातूनच महाभारताची निर्मिती झाली. अर्जुनाला श्रीकृष्णांनी समजावून सांगून अर्जुनाच्या रथाचे सारथ्य केले. अर्जुनाचे लक्ष कौरवांकडे गेले व त्याला आपण युध्द करू नये, असे वाटले. परंतु कृष्णाने पृथ्वीवरील चराचरामध्ये काय चांगले? काय वाईट या गोष्टींचे मार्गदर्शन केले. परंतु अर्जुनाचा वेडेपणा त्यावेळी दिसून आला. राज्य घेऊन आपण काय करणार? हा प्रश्न अर्जुनाला पडला

होता. धर्माचे पालन व्हायला पाहिजे, आपल्या भावांचा मृत्यु व्हायला नको, असा विचार अर्जुनाच्या मनात येऊ लागला. अर्जुनाचे हे विचार त्यावेळी काही कामाचे नव्हते. राज्य मिळविण्यासाठी मी कोणाचा वध करू शकत नाही. अनेक राजांनी अनेक लोक युध्दात मारलेले आहेत. कसले पाप आणि कसले पुण्य? चुकीचे वागणाऱ्यांना शिक्षण झालीच पाहिजे. देव, स्वर्ग, नरक, पाप-पुण्य या कल्पना अस्तित्वात आहेत का? हा ही प्रश्न निर्माण होतो.

प्रत्येकाच्या जीवनामध्ये भोग हा महत्त्वाचा असतो. युध्दाला सुरुवात होण्या अगोदरच अर्जुनाची स्थिती वाईट झालेली आहे. त्याला फार भिती उत्पन्न झाली आहे. शरीराला कंप सुटला आहे. हातातील शस्त्रास्त्रे खाली पडल्यासारखी वाटतात. काही तरी अपशकुन झाल्यासारखे वाटत आहे. परंतु अर्जुनाचा हा वेडेपणा आहे. स्वातंत्र्य आणि स्वदेश भक्तीच्या आड येणाऱ्याला शासन केलेच पाहिजे. हे अर्जुनाला न कळल्यामुळे त्याच्या मनामध्ये अनेक शंका-कुशंका निर्माण झाल्या. परंतु अर्जुनाचा हा वेडेपणा पाहून अनेकांना अचंबा वाटला. त्यावेळी या अर्जुनाला काही गोष्टी समजल्या नाहीत. परंतु आजच्या अर्जुनाला मात्र सर्व काही समजत आहे. त्यामुळे जगामध्ये अंदाधुंद निर्माण झाल्याचे दिसते. परंतु ईश्वराने या सर्व गोष्टींचा विचार करून चांगल्या गोष्टींना प्राधान्य द्यावे. [१५]

## १६) मिशनरी बाबा आणि त्याचा लुच्चेगिरीचा कावा -

धर्माच्या नावाखाली हल्ली लोक काय-काय करतील ते सांगता येत नाही. मिशनरी लोक सर्वत्र ख्रिस्ती धर्माचा प्रसार करतात. त्यांच्या कार्याचे पडसाद संपूर्ण जगभर पडलेले दिसतात. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी संपूर्ण लोकांवर आपले वर्चस्व निर्माण केले. त्यांच्याविरुध्द कोणताही आवाज काढण्याची हिंमत नाही. जगातील प्रत्येक देशांत त्यांनी आपले कार्य सुरू केले आहे. इंग्लिश मिशनरी व रशियन मिशनरी यांच्यापैकी इंग्लिश मिशनरी चांगले असतात. रशियन मिशनरी हे विश्वासघातकी वाटतात. परंतु नक्की कोणावर विश्वास ठेवायचा? परंतु धर्माच्या बाबतीत सर्वत्र ढोंगीपणा बोकाळला आहे. मिशनरी जगातून धर्मप्रसाराचे कार्य करता करता गुप्त बातम्या आपल्या देशबांधवांना पाठवत आहेत. अतिशय धूर्त ब्रिटिश गुप्तहेर आहेत. त्यांच्याजवळ कोणत्याही प्रकारची साधने नसतात. अतिशय गुप्तता राखून संदेश पाठविण्याची कला त्यांच्याकडे असते. ब्रिटिश धर्मगुरू ख्रिश्चन धर्मप्रसाराचे कार्य करीत आहेत. परंतु आज

या मिशनऱ्यांबद्दल अनेक लोकांना राग आहे. पूर्वी धर्मप्रसाराचे कार्य करता करता हे लोक गुप्तहेरी करीत होते. परंतु कोणतेही पुरावे न ठेवता त्यांचे गुप्तहेराचे काम चालू आहे, याची दखल आपण सर्वांनी घ्यायला हवी.[१६]

## १७) रामदासांच्या शब्दांत स्वराज्यासाठी प्रार्थना –

रामदासस्वामींनी देशासाठी केलेली प्रार्थना अतिशय महत्त्वपूर्ण आहे. ती खालीलप्रमाणे होती ......

''जनी भक्ती नाही, मनी भाव नाहीं
मला युक्ति ना बुध्दि कांहीच नाही !
कृपाळूपणे राज्य रंकासि द्यावें
समर्था तुझे काय उत्तीर्ण व्हावे ।।''

रामदास स्वामींनी केलेली ही प्रार्थना आपणा सर्वांसाठी स्वदेशाभिमान व्यक्त करणारी आहे. सुरुवातीला भारतावर मुस्लीमांची सत्ता स्थापन झाली. हिंदू धर्मावर, देवालयांवर, स्त्रियांवर अनेक अन्याय, अत्याचार होऊ लागले. हिंदूस्थान देश हिंदूंचा राहिला नाही. दडपशाही व गुलामगिरीत या भारतीयांना जगावे लागत होते. गुलामगिरीसारखी वाईट प्रथा नाही. गुलामगिरी नष्ट करून स्वातंत्र्य मिळविणे महत्त्वाचे आहे. साधु–संत आपल्या वचनांतून स्वतंत्रेचे धडे समाजाला देताना दिसतात. सामान्य लोकांना आपल्या पोटा–पाण्याची चिंता आहे. रामदास स्वामींनी सामान्य लोकांना परतंत्र्यात न राहता स्वतंत्र होण्याचा सल्ला दिलेला दिसतो. परंतु रामदास स्वामी एकटे तरी काय करणार! समर्थांनी 'राघवाचा अनंत पंथ' काढून स्वदेशभक्ती आणि स्वातंत्र्यप्राप्तीचा सर्वांना उपदेश देण्याचे काम सुरू केले होते. स्वराज्यप्राप्ती हे फार मोठे कार्य होते. कारण ते सहजासहजी प्राप्त होणार नाही. रामदासस्वामी परमेश्वराला म्हणतात, स्वराज्य मिळविण्यासाठी पैशाची आवश्यकता आहे. जो पैसा माझ्याकडे नाही. परंतु आमचा देश स्वतंत्र व्हावा, ही माझी इच्छा आहे.  तु कृपा करून हे राज्य देशील अशी आशा रामदास स्वामी व्यक्त करतात. कारण त्यांना परमेश्वराखेरीज कोणाचाही आधार दिसत नाही. कारण या कामी एकटा काहीच करू शकत नाही. म्हणून वेगवेगळे संघ स्थापन करावेत. कारण त्यासाठी लागणारा पैसा इंग्रजांनी अगोदरच लुटून नेलेला आहे. आपल्याकडे योग्य साधनेही

नाहीत. परंतु प्रत्येक भारतीयांच्या मनात स्वराज्यासाठी वातावरण तयार झालेले आहे. स्वराज्याच्या प्राप्तीसाठी सर्वांनी एकत्र झटले पाहिजे. समर्थ रामदास स्वामींच्या प्रार्थनेप्रमाणे सर्वांनी परमेश्वराला शरण जायला पाहिजे. आमचे राज्य आम्हांला दे अशा प्रकारची विनंती केली पाहिजे. त्याशिवाय भारतीयांना स्वराज्य प्राप्ती होणे अशक्यप्राय आहे.[१७]

- **ब्रह्मसुत्रे व गीता यांची एकवाक्यता–**

गणपती ही देवता सर्वांना आवडते. सुख देणारा, दुःख हरण करणारी देवता म्हणून मंगलमूर्ती महत्त्वपूर्ण देव मानला जातो. कोणत्याही कार्याची सुरुवात करताना प्रथम गणपतीची पूजा केली जाते. मनुष्य प्रथम गणपतीलाच वंदन करतो. मानवाच्या जीवनात सर्व उपाय संपल्यावर मानव अध्यात्मशास्त्राकडे वळतो. आपल्या इच्छा,आकांक्षा पूर्ण करण्याचे काम देवताच करतात. प्राचीन काळातील ब्रह्मसुत्रे व गीता हे दोन ग्रंथ अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. आद्य शंकराचार्यांनी ब्रह्मसुत्रे व गीता या दोन्ही ग्रंथांमध्ये एकवाक्यता निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे. दोन्ही ग्रंथांमध्ये परमेश्वराची महती सांगितलेली आहे. महाभारतामध्ये श्रीकृष्ण अर्जुनाला गीता सांगाते. श्रीकृष्ण ईश्वराचा अवतार आहे. श्रीकृष्णाने सृष्टीचे विविध नियम सांगितलेले आहेत. जगामध्ये प्रत्येक घटक आपापली भूमिका बजावत असतो. प्रत्येकाने आपल्या धर्माचे पालन  करावयाचे. मानवाने जे केले त्याप्रमाणे त्याला फळ मिळणारच आहे. 'जसे करावे, तसे भरावे' असे म्हटले जाते. म्हणजे तुमच्या कर्माप्रमाणे तुम्हांला फळ मिळणारच आहे. श्रीकृष्णाने समाजातील वाईट प्रवृत्तींचा विनाश करण्यासाठी अर्जुनाला लढण्याचा सल्ला दिला आणि अर्जुनालाही त्याशिवाय पर्यायच नव्हता. चांगले कार्य करण्यासाठी लढाईशिवाय दुसरा पर्याय नव्हता. पाप, पुण्य ही कर्माची फळे महत्त्वपूर्ण मानली जातात. कोणत्याही फळची उपेक्षा न करता काम केले पाहिजे. त्यासाठी गणपतीची म्हणजेच मंगलमूर्तीची पूजा करावी. आपल्यातील सर्व दोषांचे क्षालन होईल. दोष नाहीशे होतील. आपले कार्य चांगले करू, आपण चांगले व मोठे होऊ, अशी भावना संपूर्ण महाराष्ट्रभर निर्माण व्हावी, अशी प्राथर्कना शिवरामपंत करताना दितसात. गजानन महाराजांच्या कृपेने सर्वांना चांगले दिवस येतील, याचीही खात्री पंतांना वाटते. [१८]

- **ऋषीपंचमी –**

गणपती उत्सवाचा सर्वांना आनंद असतोच. पण यावर्षी पाऊसपाणी व्यवस्थित झाल्याने आनंद अधिक आहे. परंतु प्लेगच्या साथीच्या कारणाने थोडे दुःख आहे. कारण गणपतीचे वाहन 'उंदीर' प्लेग निवारणामध्ये सर्रास मारले जात आहेत. प्लेगची साथ कमी झाली असती तर अजुन बरे झाले असते. गरीब शेतकऱ्यांच्या जमिनी जशा कमी होतात, त्याचप्रमाणे आजचे सण–उत्सव कमी कमी होत चालले आहेत. त्यामध्ये धर्म हा विषय अधिक महत्त्वाचा आहे. 'धर्म' या विषयावर विस्तृत विवेचन करता येईल. दुःख, दारिद्र्य व चिंता या काळात मनुष्य परमेश्वराची आराधना करताना दिसतो. परमेश्वर सर्वांना का सुखी ठेवीत नाही? हा प्रश्न शिवरामपंतांना पडलेला दिसतो. परंतु तो सर्वांना सुखी ठेवेल, असा आशावाद वाटतो. गणपती किंवा गणेशोत्सवामध्ये दहा दिवस सर्वत्र मांगल्याचे वातावरण असते. ''गणेश चतुर्थी, ऋषीपंचमी, गौरी अष्टमी, वामनद्वादशी व अनंत चतुर्दशी हे पाच सण'' अधिक महत्त्वाचे मानले जातात. त्यामध्ये ऋषीपंचमीच्या संदर्भातील विचार शिवरामपंतांनी मांडले आहेत. ऋषीपंचमी म्हणजे सप्तऋषी होत. शतपथ, ब्राह्मण, ज्योतिग्रंथ व महाभारतमध्ये सप्तऋषींची महती दिलेली आहे. प्रत्येकामध्ये ऋषींची नावे भिन्न भिन्न आहेत. शुक्र, गुरु, सुर्यादय, चंद्रोदय यांचा संबंध धर्मने सांगितला आहे. शारदापौर्णिमा हा सण सुध्दा महत्त्वाचा मानला जातो. पहिले ऋषी सूर्याच्या जवळ एका रेषेत येतात. म्हणून ऋषीपंचमी हा सण साजरा करण्याची पध्दत आहे. ऋषी पंचमीच्या दिवशी नेमके काय खावे हा प्रश्न असतो. शाक, कंदमुळे, फळे ऋषींना आवडतात म्हणून तेच खावे. बैलांनी नांगरलेली शेतीतील धान्ये खाऊ नयेत, असा एक नियम केलेला दिसतो. ऋषींनी मोठमोठे ग्रंथ लिहिले आहेत. ऋषींचे विचार उदात्त आहेत. त्यामुळे ऋषीपंचमी हा सण महत्त्वपूर्ण मानला जातो. ऋषींबद्दल पूज्य भक्ती दाखविणे, त्याप्रमाणे आचरण करणे, हा त्यामागील हेतु आहे. झाडाची कंदमुळे खाऊन ऋषींनी मोठे कार्य केलेले असल्यामुळे, ऋषींबद्दल आदरभाव दाखविण्यासाठी त्यांनी सेवन केलेल्या गोष्टींचेच सेवन करावे, त्यांचे विचार आचरणात आणावेत. [१९]

- **आमच्या राजकीय पुरुषांचा धार्मिक इतिहास –**

शिवरामपंत परांजपे यांनी एक वेगळाच विषय मांडलेला किदसतो. त्यामध्ये राजकीय पुरुषांच्या धार्मिक इतिहासाचे वर्णन केलेले दिसते. मानव जीवनात ज्या दृष्टीकोनातून एखादी गोष्ट बघतो, तशीच त्याला ती दिसते. व्यक्ती तितक्या प्रकृती असतात. राजकीय पुरुषांनी धार्मिक बाबतीत कोणते कार्य केले आहे, याचे विवेचन केले आहे. राजकीय पुरुषांनी केलेली धार्मिक कामे व्याख्याता सांगू शकत नाही व श्रोतासुध्दा ऐकू शकत नाही. भूतकाळाचे ऐतिहासिक व प्रागैतिहासिक असे दोन भाग पडतात. काही काळाचा इतिहास उपलब्ध नाही. ऐतिहासिक काळाचा इतिहास उपलब्ध आहे. वेदांचा काळ महत्त्वपूर्ण मानला जातो. वेद अनादी अनंत मानले जातात. प्राचीन काळातील वैदिक वाङ्मय हे अनन्यच साधारण मानले जाते. ऐतिहासिक काळाची सुरुवातच मुळी वेदांपासून सुरू होते. वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे, उपपुराणे, रामायण, महाभारत हे सर्व वाङ्मय त्या काळाची महती सांगते. सॉक्रेटिस हा देखील त्याच्या काळातील महत्त्वपूर्ण तत्त्ववेत्ता होता. आपल्याकडे इतिहास नाही, असे म्हणतात. परंतु परदेशातील जास्त असलेला इतिहास नष्ट करण्यासाठी माणसे नेमली जातात. सुरुवातीचे राजे फार चांगलेही नव्हते आणि फार वाईटही नव्हते. आपली किर्ती सदैव चांगली रहावी, यासाठी ते प्रयत्न करीत असत. त्यापैकी एक राजा म्हणजे राम होय. वसिष्ठ ऋषींच्या, गुरुंच्या म्हणण्याप्रमाणे राम वागताना दिसतो. एकवचनी, एकबाणी व एकपत्नी असा राजा म्हणून त्याचा नावलौकिक मोठा होता. चांगल्या राजांचे ऋषी चांगले होते. विश्वामित्र व दुर्वास हे त्यापैकीच एक म्हणायला हवेत. राजकीय गोष्टींबरोबर धार्मिक गोष्टीही धडत होत्या. छत्रपती शिवाजी महाराज व पेशव्यांच्या काळात राजकीय गोष्टींबरोबरच धार्मिक गोष्टीही घडलेल्या होत्या. ब्रिटिशांनी सुध्दा भारतीयांना धार्मिक स्वातंत्र्य ठेवलेले दिसते. या सर्वांची मदत धर्माला निश्चितच होईल. राजकीय कार्य करणाऱ्या व्यक्तींनी धार्मिक बाबतीतही कार्य केलेले दिसते. तोच त्यांचा धार्मिक इतिहास होय.[२०]

- **वेदांत –**

'वेदांत' या विषयावर अनेकांनी अनेक वेळा आपली मते व्यक्त केली आहेत. परंतु प्रत्येक व्यक्तीचे विचार, दृष्टीकोन, अभ्यास यावरून अनेक गोष्टी समजतात, त्यातून नवीन

गोष्टी पुढे येतात. मानवाच्या जीवनात 'मन' अतिशय महत्त्वाचे आहे. मन का निर्माण झाले? कोणी निर्माण केले? असे अनेक प्रश्न निर्माण होतात. बाल्यावस्था, तारुण्यावस्था व वृध्दापकाळ या सर्व काळातील गोष्टी घटना डोळ्यासमोर येतात. परंतु वृध्दापकाळात सर्व मागील गोष्टी आठवून त्रास होतो. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यावर अनेक गोष्टी तुच्छ वाटतात. काही गोष्टींचा कंटाळा येतो. जनक राजालाही त्याचा प्रत्यय आलेला होता. वैराग्य, नैराश्य यामुळे तो त्रस्त झाला. शुक्राचार्यांना देखील जगातील अनर्थ जाणवले. अनेक बिकट प्रश्न निर्माण झाले. त्यामुळे परमेश्वराने हे जग का निर्माण केले आहे? असा प्रश्न निर्माण होतो. परमेश्वराला असे खेळ करायला का सुचते? ते कळत नाही. मानवाची जिज्ञासा हा घटक महत्त्वाचा आहे. विरक्ती ही गोष्ट वेदांत शास्त्रातील समस्या सोडविण्याची महत्त्वाची आहे. हिंदू लोकांची मने वैराग्य स्विकारण्यासाठी तयार असतात. हिंदू लोकांचे मन खूप चांगले आहे म्हणून त्यांच्यामध्ये सत्त्वगुण निर्माण होतात. उपभोगाची अपेक्षा न करता चांगले कार्य केल्यावर चांगल्या गुणांची वाढ होणार आहे. संतकवींची वचने वाचून जीवनामध्ये चांगले कार्य करावे. चांगले कर्म करणारे अनेक महान आत्मे म्हणजेच महात्मे निर्माण व्हावेत, हीच प्रार्थना. [२१]

## – संदर्भग्रंथ –


१. काळ अग्रलेख – १२.४.१९०१

२. काळ अग्रलेख – १९.४.१९०१

३. काळ अग्रलेख – २६.४.१९०१

४. काळ अग्रलेख – २६.७.१९०१

५. काळ अग्रलेख – ११.४.१९०२

६. काळ अग्रलेख – २५.४.१९०२

७. काळ अग्रलेख – २७.४.१९०२

८. काळ अग्रलेख – २१.११.१९०२

९. काळातील निवडक निबंध, भाग–६, परांजपे शि.म., य.गो.जोशी प्रकाशन, पुणे २, पृ. १ ते १०

१०. काळ अग्रलेख – १.४.१९०४

११. काळ अग्रलेख – १३.५.१९०४

१२. काळ अग्रलेख – ७.४.१९०५

१३. काळ अग्रलेख – २.२.१९०६

१४. काळ अग्रलेख – ६.४.१९०६

१५. काळ अग्रलेख – १३.४.१९०६

१६. काळ अग्रलेख – ८.३.१९०७

१७. काळ अग्रलेख – ५.४.१९०७

१८. काळ अग्रलेख – १२.४.१९०१

१९. काळ अग्रलेख – २५.४.१९०२

२०. काळ अग्रलेख – १३.५.१९०४

२१. परांजपे शिवराम महादेव, 'काळातील निवडक निबंध, भाग–७', य.गो.जोशी प्रकाशन, पुणे, १९४६, प्रस्तावना–लेखक करंदीकर शि.ल., पृ. १ ते १६

# प्रकरण – ७

## निष्कर्ष

स्वातंत्र्यपूर्व काळात भारतामध्ये ब्रिटिश राजवट होती. त्यावेळी लोकमान्य टिळकांचे अनुयायी शिष्य  म्हणून ज्यांचा नावलौकिक मोठा होता, असे व्यक्तिमत्त्व म्हणून शिवराम महादेव परांजपे यांच्या नावाचा उल्लेख केला जातो. कोकणामध्ये महाड, रत्नागिरी येथे प्राथमिक शिक्षण घेऊन पुण्यात शिकण्यासाठी आलेल्या शिवरामपंतांवर पुण्याच्या वातावरणाचा परिणाम झाला. लोकमान्य टिळकांच्या रुपाने शाळा, महाविद्यालयात गणित व संस्कृत विषय शिकविणारे गुरु मिळाले. त्यामुळे शालेय जीवनापासून लोकमान्य टिळकांच्या विचारांचा प्रभाव शिवरामपंतांवर पडलेला दिसतो.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये मवाळ, जहाल व क्रांतीकार या सर्व विचारसरणींचा शिवरामपंतांनी बारकाईने अभ्यास केला. ब्रिटिश सत्ता भारतावर अन्याय व अत्याचारी धोरणांचा अवलंब करीत असताना मवाळ पक्षीय नेते ब्रिटिश सरकारला दैवत मानत असल्याचे पंतांच्या लक्षात आले. लोकमान्य टिळकांचे विचार शि.मं.ना आवडले. कारण टिळकांनी जहालवादी विचारसरणी निर्माण केली. सरकारवर टीका करून सरकारला स्वातंत्र्य देण्यासाठी प्रवृत्त करणारा जहालवाद पंतांना भावला. परंतु, जहालवादापेक्षा कडक असा क्रांतीकारी विचार पुढे येऊ लागला. वि.दा.सावरकर, वासुदेव बळवंत फडके, चाफेकरबंधू यांनी क्रांतीकारक विचार मांडून अनेक ब्रिटिश अधिकाऱ्यांना यमसदनी पाठविण्याचे काम केले होते. देशाला स्वातंत्र्य मिळविणे या ध्येयापायी क्रांतीकारकांनी ब्रिटिशांना जबरदस्त दहशत दाखविली. अर्थात अनेक क्रांतीकारकांना ब्रिटिशांनी फासावर चढविले. तरी क्रांतीकारकांचे गुप्त कार्य चालूच होते. या क्रांतीकारी विचारांचा चांगलाच प्रभाव परांजपे यांच्यावर पडलेला दिसतो. बऱ्याच वेळा शि.मं.ना क्रांतीकारी विचार जवळचे वाटायचे. क्रांतीकरून देशाला स्वातंत्र्य  मिळाले तर हरकत नाही, असे त्यांचे मत होते.

लोकमान्य टिळकांच्या नेतृत्त्वाखाली जहालवादी विचारांच्या कार्यात जरी शि.मं.नी भाग घेतला असला तरी 'काळ' पत्राच्या माध्यमातून क्रांतीकारी विचारांचा प्रसार आणि प्रचार

करण्याचे काम केले. केसरीमधून 'काळ' पत्राची जाहिरात करून काळाची लोकप्रियता थोड्याच काळात शिखरावर पोहोचली. यावरून शि.म.परांजपे यांचे कार्य स्पष्ट होते.

शिवराम महादेव परांजपे यांचा जन्म २७ जून १८६४ रोजी महाड येथे झाला. भारताच्या स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासात शिवराम परांजपे यांचे स्थान अद्वितीय मानावे लागते. महाविद्यालयीन जीवनापासून त्यांनी देशभक्तीचे धडे गिरविले. सुरुवातीला शि.मं.नी केसरीतून आपले लेखन सुरू केले. त्यांनी पुढे २० मार्च १८९८ रोजी 'काळ' साप्ताहिक पत्र सुरू कले. दर शुक्रवारी 'काळ' या पत्राची लोक आतुरतेने वाट पाहत असत. शि.मं.नी लोकमान्य टिळकांपेक्षाही जहाल विचार मांडून सरकारला सळो की पळो करून सोडले. एकवेळ लोकमान्य टिळक परवडले पण शिवरामपंत नको अशी अवस्था निर्माण झाली.

लोकमान्य टिळकांच्या मार्गदर्शनाखाली शि.म.परांजपे यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या गणेशोत्सव व शिवजयंती उत्सवात शेकडो व्याख्याने देऊन समाज जागृती करण्याचे महान कार्य शि.मं.नी केले. रायगडावर शिवजन्मोत्सव साजरा करण्यासाठी जमलेल्या श्रोत्यांसमोर शि.म.परांजपे यांनी ''शिवाजी महाराज निर्माण झाले त्यावेळची महाराष्ट्रीयांची स्थिती व महाराजांनी पुढे आपल्या सामर्थ्याने दाखविलेले दोन सुखाचे दिवस'' या विषयावर व्याख्यान दिले. शिवाजी महाराजांच्या कर्तृत्त्वाचा आढावा घेतला. स्वराज्य मिळविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित येऊन प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन त्यांनी केले.

लोकमान्य टिळकांना गुरुस्थानी मानून त्यांनी सुरू केलेल्या प्रत्येक चळवळीत शि.मं.नी सहभाग नोंदविला. उदा. सार्वजनिक सभेअंतर्गत दुष्काळी प्रजेसाठी मदत करणाऱ्यांमध्ये शिवरामपंत अग्रभागी होते. सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी म्हणून त्यांची निवड झाली. दुष्काळी प्रजेसाठी फंड गोळा करण्याच्या कार्यातही त्यांनी भाग घेतला. स्वदेशी, बहिष्काराच्या चळवळीतही त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते. परदेशी कपड्यांच्या होळीच्या आंदोलनातही शि.म.परांजपे सहभागी झाले होते.

लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या होमरुल चळवळीतही ते प्रामाणिकपणे सहभागी झाले. टिळक स्वराज्य फंडाला त्यांनी स्वतः रुपये पाचशे दिले. दुष्काळी चळवळीसाठी त्यांनी

संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे केले. जनतेची सुखदुःखे जाणून घेतली. विविध व्याख्यानांच्या माध्यमातून त्यांनी समाजाचे सामाजिक प्रबोधन केले. सामाजिक कार्याला चांगलाच हातभार लावला.

दुर्दैवाने १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांचे निधन झाले. जहाल चळवळीची जणू काही समाप्तीच झाली होती. कारण महात्मा गांधींच्या भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत उदय झाला होता. म. गांधींनी सन १९२०ला असहकार चळवळीची सुरुवात केली. देशाला स्वातंत्र्य मिळविणे हे ध्येय असल्याने शि.म.परांजपे यांनी महात्मा गांधींच्या असहकार चळवळीत सहभाग नोंदविला. एवढेच नव्हे तर सुरुवातीच्या ऐटबाज कपड्यांचा त्याग करून जाडीभरडी खादीची वस्त्रे अंगावर परिधान केली. म्हणजेच एखाद्या चळवळीशी ते समरस होऊन काम करीत असत.

सामाजिक, राजकीय, ऐतिहासिक, आर्थिक व धार्मिक विषयांची निपःक्षपातीपणे चर्चा करणारे 'काळ' नावाचे साप्ताहिक शिवरामपंतांनी २० मार्च १८९८ रोजी सुरु केले. ब्रिटिश सरकारवर प्रचंड टीका करताना त्यांचे अभ्यासपूर्ण लेख महत्त्वाचे होते. 'चाफेकर व रानडे', 'लोकमान्य आणि राजमान्य' व 'हिंदुस्थानात बॉम्बगोळे येण्याला मूळ कारण इंग्लिश लोकच!' असे अनेक क्रांतीकारी विचार व्यक्त करणारे लेख लिहिले. म्हणून सरकारने इंडियन पीनल कोडचे कलम १२४अ व १५३अ या कलमांखाली शि.मं.वर आरोप ठेवला व त्यांना १९ महिन्यांची देशद्रोहाची शिक्षा दिली. पुढे १९०८ ला काळा पत्र शि.मं.ना बंद करावे लागले.

पुढे बऱ्याच वर्षानंतर १२ ऑगस्ट १९२० गुरुवार रोजी 'स्वराज्य' पत्र शि.मं.नी सुरू केले. 'काळ' व 'स्वराज' या दोन्ही पत्रामध्ये कमालीचा फरक होता. काळाची कडक भाषा स्वराज्यपत्रात नव्हती. तरीसुध्दा 'महात्मा गांधी तुम्ही चुकलात?' अशा प्रकारचा लेख स्वराज्यपत्रात लिहून गांधींना त्यांच्या चुकांची जाणीव करून दिली.

शिवरामपंत यांचे लेखनकार्य अफाट होते. मराठी भाषेवर त्यांचे प्रचंड प्रेम होते. त्यांच्या लेखनाची प्रतिभा पाहून सन १९२९ ला बेळगाव येथे भरलेल्या 'महाराष्ट्र साहित्य संमेलना'च्या अध्यक्षपदी शिवराम परांजपे यांची निवड झाली. साहित्यसंग्रह भाग १, २, ३, विविध नाटके,

कादंबरी, स्फुट लेख, ऐतिहासिक लढायांचे वृत्त इत्यादींमधून त्यांनी आपले विचार व्यक्त केले. परंतु प्रत्येक लेखन शैलीतून ब्रिटिश सत्तेविरोधात केलेले व्यक्तव्य स्पष्टपणे जाणवते.

शिवरामपंत परांजपे यांच्या जीवन कार्याचा अभ्यास करताना सर्व चळवळी, आंदोलनांचा अभ्यास झाला. कारण भारतामध्ये आणि महाराष्ट्रामध्ये झालेल्या जवळजवळ सर्व नेत्यांच्या सर्वच चळवळीत शि.म.परांजपे यांनी उत्स्फुर्तपणे भाग घेतला. देशाला लवकरात लवकर स्वातंत्र्य मिळाले. देश परकियांच्या जोखडातून लवकर मुक्त व्हावा, असे पंतांना वाटत होते.

शिवराम महादेव परांजपे यांच्या जीवनकार्याचा चिकित्सक अभ्यास करताना काढलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे –

१) शिवरामपंत परांजपे यांनी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि मोहनदास करमचंद गांधी म्हणजेच महात्मा गांधी या दोन्ही नेत्यांच्या चळवळीत भाग घेऊन देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कार्यात अद्‌भुत कामगिरी केलेली आढळते. शाळा आणि कॉलेजमधील गणित आणि संस्कृत या विषयांचे गुरु असलेले टिळक़ यांचे स्थान शि.मं.च्या हृदयात होते. लो. टिळकांचा जहालवाद शि.मं.ना अधिक जवळचा वाटला. कारण सरकारवर केसरीमधून टीका करून लो. टिळकांनी ब्रिटिश सरकारला धारेवर धरलेले होते. लोकमान्य टिळकांनी होमरुल चळवळ, स्वदेशी चळवळ, वंगभंग चळवळ व सार्वजनिक सभेच्या माध्यमातून महाराष्ट्रात ब्रिटिशांविरोधी वातावरण निर्माण केले होते. लोकमान्यांच्या प्रत्येक चळवळीत सहभागी होऊन शि.मं. नी त्यांच्या विचारांना पाठिंबाच दिलेला दिसतो.

१ ऑगस्ट१९२० ला लो. टिळकांचे निधन झाले. भारतातील विविध चळवळी संपुष्टात येण्याची चिन्हे होती. परंतु भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्त्व म.गांधी यांनी हाती घेतले. परंतु मवाळ विचार, असहकार, सविनय कायदेभंग, चले जाव अशा चळवळींच्या माध्यमातून सरकारवर निशाणा केला. परंतु सरकारला विरोध करणारी एक नवीन चळवळ सुरू होते आहे. त्या चळवळीत सहभागी होऊन देशाला स्वातंत्र्य मिळविण्याचे ध्येय शिवरामपंतांसमोर असल्याने त्यांनी म.गांधींच्या चळवळीत सहभाग घेतला. त्यांच्यावर झालेल्या टीकेकडे दुर्लक्ष

करून देशाचे स्वातंत्र्य हा घटक महत्त्वाचा मानला. टिळक व गांधी दोघांच्या चळवळीत मनःपूर्वक सहभाग नोंदविला.

२) भारतातील पुणे जिल्ह्याचा उल्लेख स्वातंत्र्यपूर्व काळात आवर्जून केला जातो. कारण देशातील अनेक समाजसुधारक पुण्यामध्ये उदयाला आले. स्वातंत्र्य लढ्यातील मवाळ, जहाल व क्रांतीकारकांचा काळ या तिन्ही काळांचा प्रभाव, पुणे जिल्ह्यावर पडलेला दिसतो. गोपाळ गणेश आगरकर, महादेव गोविंद रानडे यांनी मवाळांचे नेतृत्त्व केले. लोकमान्य टिळकांच्या माध्यमातून जहाल विचारसरणी प्रस्थापित झाली. वि.दा.सावरकर, बाबाराव सावरकर, नारायणराव सावरकर, वासुदेव बळवंत फडके, चाफेकर बंधू, यांनी क्रांतीकारी विचारांचा प्रभाव पुण्यामध्ये निर्माण केला. प्रत्येकाचे विचार, क्रांती करण्याची पध्दती वेगळी असली तरी प्रत्येकोच ध्येय 'भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे', हेच होते. त्यामुळे मवाळ, जहाल व क्रांतीकारक अशा सर्व विचारांचा प्रभाव पुणे जिल्ह्यातील समाजावर झाला. प्रत्येक चळवळीमध्ये पुण्यातील लोकांनी सहभाग घेऊन स्वातंत्र्य जवळ आणण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

३) सन १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्यावर संपूर्ण देशामध्ये एक राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली. भारतामध्ये ब्रिटिशविरोधी वातावरण तापू लागले. त्यानुसार ब्रिटिशांना विरोध करण्यासाठी विविध चळवळी, आंदोलने, भारतात उदयाला आली. वंगभंग चळवळ, होमरुल चळवळ, स्वदेशी चळवळ, सार्वजनिक सभा आंदोलन, असहकार आंदोलन, दांडी यात्रा, बार्डोली सत्याग्रह, सविनय कायदेभंग चळवळ, अशा अनेक चळवळी व आंदोलनाने भारतामध्ये स्वातंत्र्य चळवळ सतत तेवत ठेवण्याचे काम समाजसुधारकांनी केले. सर्व देशात येणाऱ्या या आंदोलनांचा प्रभाव, परिणाम पुणे जिल्ह्यावर निश्चितच झाला. पुण्यातील तरुणांनी प्रत्येक चळवळीत सहभाग नोंदवून ब्रिटिश सत्तेला विरोध करण्याचे सत्र चालूच ठेवले. त्यामुळे स्वातंत्र्य लढ्यातील पुणे जिल्ह्याचे योगदान महत्त्वाचे आहे. शिवराम पंतांच्या रुपाने एक जाज्वल्य देशभक्त पुण्याला आणि देशाला मिळाल्याचे दिसून येते.

४) शिवरामपंत परांजपे यांच्यावर लो.टिळकांचा व म.गांधींच्या विचारांचा प्रभाव दिसतो. शि.म.परांजपे सुरुवातीला लो.टिळकांच्या नेतृत्त्वाखाली स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाले.

शाळा, कॉलेज व विविध चळवळींच्या माध्यमातून टिळकांचा त्यांच्यावर प्रभाव होता. टिळकांचे जहालवादी विचार त्यांना आवडले होते. त्यांच्यापेक्षाही कडक भाषा वापरून 'काळ' पत्राच्या माध्यमातून ब्रिटिश सरकारवर टीका करण्याचे काम शि.मं.नी केलेले आढळते. मवाळांच्या विचारांपेक्षा जहाल विचाराने देशाला स्वातंत्र्य लवकर मिळेल, असा आशावाद शि.म.परांजपे यांना होता. त्यामुळे लोकमान्य टिळकांच्या सर्व चळवळी, आंदोलनात सहभागी होऊन टिळकांचे विचार पुढे नेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. परंतु १ ऑगस्ट १९२० राजी टिळकांचा मृत्यु झाला. स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्त्व म.गांधींकडे आले. आपल्या मवाळ विचारांनी निःशस्त्र आंदोलन केले तरी सरकारला स्वातंत्र्य द्यावेच लागेल, याच विचाराने म.गांधींनी १९२० ते १९४७ या काळात विविध चळवळी केल्या. लोकमान्य टिळकांनंतर भारतीय स्वातंत्र्य चळवळ सुरू ठेवण्याचा प्रयत्न करणाऱ्या म.गांधींच्या चळवळीत सहभागी होण्याचा विचार पंतांनी व्यक्त केल्यावर त्यांच्यावर टीका झाली. परंतु त्याचा विचार न करता म.गांधी यांच्या चळवळीला साथ देण्याचे शि.मं.नी ठरविले. म.गांधींची चळवळ महाराष्ट्रात आणण्याचे कार्य शि.मं.नी केले. 'स्वराज्य' पत्रातून गांधींची चळवळ समाजात पोहोचविण्याचे काम केले. शिवरामपंत परांजपे यांच्यावर लोकमान्य टिळकांचा व म.गांधींच्या विचारांचा प्रभाव सारखाच होता. दोघांच्या काळात त्यांनी मनःपूर्वक कार्य करून देशाच्या स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

५) शाळा, कॉलेजपासूनच शिवरामपंतांवर स्वातंत्र्य लढ्याचा प्रभाव होता. भारत देश ब्रिटिशांच्या पारतंत्र्यात आहे. त्याला मुक्त करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न केले पाहिजेत, असे त्यांना वाटत होते. एकवाक्यता झाली तर ब्रिटिशांना स्वातंत्र्य द्यावेच लागेल, असा शि.मं.ना विश्वास होता.

शि.म. परांजपे यांनी लोकमान्य टिळक व म.गांधी या दोघांच्याही चळवळीत सहभाग घेतलेला असला तरी ते त्यांच्या विचारांच्या आहारी कधीच गेले नाहीत. लोकमान्य टिळक व म.गांधींचे सर्वच विचार पंतांना पसंत पडत होते, असे नाही. दोघांबद्दल त्यांच्या मनात सारखाच आदर होता. 'बळवंतराव वैद्याने गोळी दिली आहे म्हणजे ती घ्यावीच लागेल, असे लो.टिळकांबाबत म्हणत असत. ''एका वर्षात स्वराज्य मिळवू'', अशी घोषणा करणाऱ्या म. गांधींनी असहकार चळवळ अचानक स्थगित केल्याने ''महात्मा गांधी तुम्ही चुकलांत!'' असा लेख स्वराज्यपत्रात लिहून शि.मं.नी म.गांधींवर टीका केल्याचे दिसते.

लोकमान्य टिळक मोठे की म.गांधी मोठे असा वाद त्यावेळी निर्माण झाला होता. परंतु शि.मं.नी या वादात न पडता देशाचे स्वातंत्र्य हा घटक महत्त्वाचा असलयाचे आवर्जून सांगितले होते. लोकमान्य टिळक व म.गांधी दोघेही सर्वांना सारखेच वंदनीय आहेत, असेही शि.मं.नी. नमुद केले होते. शिवरामपंत परांजपे यांनी टिळक़ व गांधी यांच्या चळवळीत, कार्यात सहभाग घेतला असला तरी त्यांचे स्वतःचे स्थान खरोखरच वेगळे होते. स्वतःचे वेगळे अस्तित्व, स्वतःचे विचार होते. त्यांनी कधीही दोघांबद्दल चुकीचे विधान केल्याचे दिसत नाही. दोघांनाही सारखेच महत्त्व दिले. कारण, भारतीय स्वातंत्र्य चळवळीत लोकमान्य टिळक व म.गांधींचे स्थान अनन्यसाधारण होते. परंतु, त्या दोघांपेक्षा आपले वेगळे विचार शेवटपर्यंत टिकवून ठेवण्याचे काम शिवरामपंतांनी केले. आपल्या लेखनाचा, व्याख्यानांचा, वक्रोक्तीचा वेगळा ठसा उमटविला. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील शि.मं.चे स्थान अद्वितीय आहे, असेच म्हणता येईल.

'काळ' वृत्तपत्राच्या कामगिरीला मराठी वृत्तपत्रसृष्टीत दुसरी तोड नाही. शिवरामपंतांचे लेखन, संपादकीय योगदान, मराठी वृत्तपत्राच्या इतिहासात जिवंत राहील, इतके महत्त्वपूर्ण आहे. 'भारत इतिहास संशोधन मंडळ, पुणे' व 'केसरीवाडा, पुणे' येथे अनुक्रमे 'काळ' व 'केसरी' चे मूळ अंक मिळाल्याने नवीन पिढीला अधिक माहिती मिळाली.

देशाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी शिवराम महादेव परांजपे यांनी अथक प्रयत्न केले, असे प्रस्तुत संशोधनाच्या सुरुवातीला मत मांडले आहे. परंतु संशोधनाच्या अंती असे लक्षात येते की, शिवराम महादेव परांजपे यांनी शेवटच्या श्वासापर्यंत भारताच्या स्वातंत्र्यासाठी कार्य केले. परंतु दुर्दैवाने वयाच्या ६४व्या वर्षी २७ सप्टेंबर १९२९ रोजी त्यांचे पुण्यात देहावसान झाले. स्वातंत्र्यपूर्व काळात शिवरामपंत परांजपे यांनी केलेल्या कार्याला इतिहासात तोड नाही, असेच मत नोंदवावेसे वाटते.

# संदर्भसूची

**प्राथमिक साधने –**


- **काळाचे मूळ अंक** – (परांजपे शि.म., मनोहर छापखाना, काळ ऑफिस, पुणे)
  (अ) १ डिसेंबर १९०५ – स्वदेशी चळवळ व राष्ट्रीय सभेवरील आक्षेप
  (ब) २ नोव्हेंबर १९०८ – बंगालातल्या विलक्षण बातम्या व आणखी एक बॉम्बस्फोट, टिळकांचा जयजयकार
- **काळातील अग्रलेख –**

१. काळ अग्रलेख – २५.०३.१८९८

२. काळ अग्रलेख – १२.०४.१९०१

३. काळ अग्रलेख – १९.०४.१९०१

४. काळ अग्रलेख – २६.०४.१९०१

५. काळ अग्रलेख – १०.०५.१९०१

६. काळ अग्रलेख – २६.०७.१९०१

७. काळ अग्रलेख – ०६.०९.१९०१

८. काळ अग्रलेख – ०८.०२.१९०१

९. काळ अग्रलेख – २४.०१.१९०२

१०. काळ अग्रलेख – ११.०४.१९०२

११. काळ अग्रलेख – २५.०४.१९०२

१२. काळ अग्रलेख – २७.०४.१९०२

१३. काळ अग्रलेख – ०४.०७.१९०२

१४. काळ अग्रलेख – ०८.०८.१९०२

१५. काळ अग्रलेख – २१.११.१९०२

१६. काळ अग्रलेख – ०१.०४.१९०४

१७. काळ अग्रलेख – २२.०४.१९०४

१८. काळ अग्रलेख – १३.०५.१९०४

१९. काळ अग्रलेख – ०२.०९.१९०४

२०. काळ अग्रलेख – ०७.१०.१९०४

२१. काळ अग्रलेख – ०७.०४.१९०५

२२. काळ अग्रलेख – ०२.०२.१९०६

२३. काळ स्वतंत्र लेख – ०९.०२.१९०६

२४. काळ स्वतंत्र लेख – ०२.०३.१९०६

२५. काळ अग्रलेख – ०६.०४.१९०६

२६. काळ अग्रलेख – १३.०४.१९०६

२७. काळ अग्रलेख – ०५.०४.१९०७

२८. काळ अग्रलेख – १२.०७.१९०७

● **वर्तमान पत्रे –**

१. केसरी १४, २२, २९ सप्टेंबर १८९६

२. केसरी – १५ जानेवारी १८९७

३. केसरी – १ फेब्रुवारी १८९८

४. केसरी – २७ सप्टेंबर १९०४

५. सकाळ – १८ सप्टेंबर २०१६

६. सकाळ –२५ सप्टेंबर २०१६

७. लोकसत्ता – १० डिसेंबर २०१६

८. Times of India, 19 Sept. 1904

● **मासिके –**

१. 'चित्रमय जगत' – १९१८, १९२४,

२. 'रत्नाकर' – जानेवारी १९२६

३. 'रत्नाकर' – ऑगस्ट १९२६

४. 'रत्नाकर' – सप्टेंबर १९२६

५. 'चित्रमय जगत' – डिसेंबर १९२८

६. 'चित्रमय जगत' – जुलै १९२९

७. 'यशवंत' – ऑक्टोबर १९२९

- **संदर्भ –**


१. हृदयाविष्करण, का. नि. नि. भाग – ७/१६

२. कै. प्रो. शि. वा. म. महादेव परांजपे यांचेवरील १९०८ सालचे खटल्यातील बचावाचे प्रभावी भाषण, पृ. ४ ते १२

३. दक्षिण अमेरिका, का. नि. नि. भाग –४, २१

४. पेणची परिषद, स्वराज्यातील निवडक निबंध

५. गिधाडी आनंद, स्वराज्यातील निवडक निबंध

६. पेणच्या परिषदेतील दोन उपसूचना, स्वराज्यातील निवडक निबंध, पृ. १०३

७. महात्मा गांधी तुम्ही चुकलात, स्वराज्यातील निवडक निबंध, पृ. १३०

८. नाकाशी क्लोरोफॉर्म आणि पायावर ऑपरेशन, स्वराज्यातील निवडक निबंध भाग२

९. गरिबांचे गुप्त कट, स्वराज्यातील निवडक निबंध १७

१०. गुलामगिरीच्या महोत्सवाचा तिरस्कार की अंगीकार, स्वराज्यातील निवडक निबंध ४

११. मवाळांच्या प्रयत्नांना निराळे वळण, स्वराज्यातील निवडक निबंध १

१२. इंग्लिश अधिकारी, नेटिव राजे  व इंडियन रयत, स्वराज्यातील निवडक निबंध ८

१३. आर्य चाणक्य व हल्लीचे नवप्रधान, स्वराज्यातील निवडक निबंध ५

१४. चाफळचे स्वामी, स्वराज्यातील निवडक निबंध ९ व संस्कृत आशिर्वाद, नि. १०

१५. मराठी वॉर मेमोरियल, स्वराज्यातील निवडक निबंध ७

१६. गरिबांचे गुप्त कट, स्वराज्यातील निवडक निबंध १७

१७. ईश्वरी सूत्र काही निराळेच असते, काळातील निवडक निबंध, भाग ५, नि. ४

१८. वेदांतवृक्ष, काळातील निवडक निबंध, भाग  ७, ५

१९. ख्रिस्ताची आज्ञा, काळातील निवडक निबंध भाग ४, ८

२०. धर्मकल्पनांचा परिणाम, काळातील निवडक निबंध भाग ५, २

२१. धर्मप्रसाराच्या पध्दतीचा बौध्द धर्मातील एक नमुना, साहित्य संग्रह भाग १

२२. जसे लोक तसे त्यांचे देव, काळातील निवडक निबंध भाग ८१

२३. परमेश्वराचे अभिवचन, काळातील निवडक निबंध भाग ५, १

२४. पोपट आणि परशुराम, काळातील निवडक निबंध ५, नि. ९

२५. बेळगाव साहित्य संमेलन अध्यक्षीय भाषण, साहित्य संग्रह भाग ३

२६. राज्यापहार आणि न्याय, काळातील निवडक निबंध भाग १, नि.क्र. १५ ते१७

२७. एक नवीन कारखाना, काळातील निवडक निबंध १६

● **शिवराम महादेव परांजपे यांची ग्रंथ संपदा –**

१. रामदेवराव, प्रकाशक – शि.म. परांजपे १९०६

२. भीमराव, प्रकाशक – शि.म. परांजपे १९०७

३. सूर्याच्या गैरसोयी, प्रकाशक – शि. म. परांजपे, १९२०

४. स्वराज्यातील निवडक निबंध, वर्ष – दुसरे, कृ. शि. परांजपे प्रकाशन, पुणे, १९२२

५. अहल्याजार, शि. म. परांजपे, १९२४

६. मानाजीराव, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९२८

७. मराठ्यांच्या लढायांचा इतिहास, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, १९२८

८. पहिला पांडव, प्रकाशक – तु. पु. शेट्ये, मुंबई, १९३१

९. साहित्य संग्रह भाग १ व २, य. गो. जोशी प्रकाशन, १९३७

१०. काळातील निवडक निबंध, भाग १ ते १०, य. गो. जोशी प्रकाशन, पुणे, १९४६

११. साहित्य संग्रह भाग ३, य. गो. जोशी प्रकाशन, पुणे, १९४६

१२. विंध्याचल, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, १९४८

१३. गोविंदाची गोष्ट, चित्रशाळा प्रकाशन, पुणे, चौथी आवृत्ती, १९५०

१४. स्वातंत्र्यसुक्ते, शि. म. परांजपे, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे २, पहिली आवृत्ती, १९५२

● **दुय्यम साधने मराठी –**

१. प्रकाशक – दंडवते गोविंद धोंडदेव – काळावरील राजद्रोहाचा खटला, १९०८

२. ओगले शि.ल., बर्वे द. के., 'शिवराम महादेव परांजपे यांचे चरित्र' (जीवन कार्य व आठवणी), य.गो.जोशी प्रकाशन, पुणे–२, २७ डिसेंबर १९३६

३. परांजपे वामन कृष्ण, 'काळकर्ते शिवरामपंत परांजपे जीवन', चित्रशाळा प्रेस, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९४५

४. परांजपे वामन कृष्ण, 'शिवरामपंत परांजपे व्यक्ति–वक्तृत्त्व–वाङ्मय', चित्रशाळा प्रकाशन, पुणे २, पहिली आवृत्ती, १९५४

५. परांजपे विष्णू विनायक (संपा.) परांजपे कुलवृत्तांत आ.–२, शंकर रामचंद्र दाते, यशवंत छापखाना, पुणे–२

६. जोशी वि. कृ., लेले रा. के., वृत्तपत्रांचा इतिहास खंड–१, (१७८० ते १८८०) युगवानी प्रकाशन, मुंबई १९७१

७. गायकवाड प्रा., थोरात प्रा., 'भारताचा राजकीय आणि घटनात्मक इतिहास', राविल पब्लिकेशन, सातारा, १९७२

८. केळकर न.चि., 'लोकमान्य टिळक यांचे चरित्र, प्रकाशक – न.चि.केळकर, पुणे

९. केळकर न. चि., 'गतगोष्टी अर्थात माझी जीवन यात्रा', प्रकाशक–यशवंत नरसिंह केळकर, सदाशिव पेठ, पुणे.

१०. जावडेकर शं. द., आधुनिक भारत, काँटिनेंटल प्रकाशन, आवृत्ती–४थी, २६ जाने. १९७९

११. डॉ. पांढरे नीला, 'शि.म. परांजपे वाङ्मयीन अभ्यास', पुष्प प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती जून १९९३

१२. लेले रा. के., 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास', कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे १९९४

१३. प्रधान ग.प्र., 'पुणे जिल्ह्यातील स्वातंत्र्यलढा', प्रकाशक ऑगस्ट क्रांती सुवर्ण महोत्सव समिती, मुंबई–२०

१४. टिकेकर अरुण (संपा.) शहर, पुणे, एका सांस्कृतिक संचिताचा मागोवा, निळूभाऊ लिमये फौंडेशन, पुणे २०००

१५. परांजपे कुलवृत्तांत, परांजपे कुलवृत्तांत समिती, आवृत्ती तिसरी, २००१

१६. डॉ. मोरे सदानंद, 'लोकमान्य ते महात्मा', राजहंस प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती २६ जाने. २००७

१७. परांजपे प्र.ना., 'काळकर्ते शिवरामपंत महादेव परांजपे', गंधर्ववेद प्रकाशन, नोव्हेंबर २०१०

१८. डॉ. फडतरे भूषण गोविंद, 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यात पुणे जिल्ह्याचे योगदान', डायमंड पब्लिकेशन, पुणे, २०१३

१९. डॉ. शेळके रघुनाथ धोंडिबा, 'भाला वृत्तपत्राचे सामाजिक, धार्मिक आणि राजकीय कार्य' (१९०५ ते १९१० व १९२५ ते १९३५), हर्षवर्धन प्रकाशन, बीड, एप्रिल २०१७

- **दुय्यम साधने इंग्रजी – शासकीय**

१) Source Material for History of the Freedom Movement in Indian Vol. II, Bombay 1958

२) The Manager Governement Central Press- Bombay-4, Shivram Mahadev Paranjape, The Order of Patriotism